26-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1
BGO/ KTG/ D/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय सभागृहात येत आहेत. तो पर्यंत आपण कामकाजाला सुरूवात करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहाला परंपरा आहेत. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे आपण सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करावी.

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक सकाळी 11.10 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.01 ते 11.10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या दी छापाव्या.)

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "औरंगाबाद महानगरपालिकेने जलवाहिनीसाठी केलेल्या खर्चाच्या तपशिलाची माहिती उपलब्ध नसल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री.सतीश चव्हाण, संदीप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अनिल भोसले, दीपक साळुंखे-पाटील, विनायक मेटे, अमरसिंह पंडित, विक्रम काळे, एम.एम.शेख, वि.प.स.यांच्या दिनांक 17 जुलै 2013 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 42242 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

--

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांचे नाव घेऊन सभागृहाच्या पटलावर माहिती ठेवण्यात आलेली आहे. औरंगाबाद नगरपालिकेच्या संदर्भात गेल्या अधिवेशनात जो विषय उपस्थित झाला होता त्याची माहिती त्यावेळी आली नव्हती त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी यावेळीही सभागृहाच्या पटलावर माहिती ठेवू शकत नाही असे सांगितलेले आहे. विधी मंडळात उपस्थित झालेल्या प्रश्नाची माहिती अधिकारी देत नसतील व आपण त्यासंदर्भात काही बोललो नाही तर अधिकाऱ्यांचे फावेल. त्यांना यासंदर्भात काहीच वाटणार नाही. विधान मंडळाला माहिती नाही दिली तरी चालते असे त्यांना वाटू लागेल. विधी मंडळाचे काही गांभीर्य आहे की, नाही ? या सभागृहाला सर्वोच्च सभागृह म्हणायचे आणि माहिती द्यावयाची नाही हे बरोबर नाही. औरंगाबाद महानगरपालिकेच्या जलवाहिनीच्या संदर्भातील हा विषय आहे. या विषयावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: उभे राहून कारवाई करण्यात येईल अशी माहिती दिली होती. या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: निवेदन केले होते. असे असतांना माहिती येत नाही हे काही बरोबर नाही.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी त्यावेळेस सांगितले होते की, औरंगाबाद महानगरपालिकेने काम न करता केवळ बिले उचलली आहेत. 10 कोटी रुपयांच्या पाईपलाईनचे काम असेल तर त्या पाईपलाईनच्या दुरुस्तीसाठी 100 कोटी रुपयांच्या दुरुस्तीची बिले उचलली गेली आहेत. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हस्तक्षेप करुन 17 जुलै रोजी सांगितले होते तरी सुध्दा त्याची माहिती आलेली नाही. यामध्ये काही न्यायप्रविष्ट प्रकरणे सुध्दा आहेत. जी माहिती औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आपल्याला दिली ती माहिती आपण या ठिकाणी वाचून दाखवली आहे. ही माहिती खोटी आहे असे मी सांगितले होते. या विषयाच्या संदर्भात चौकशी करुन माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे त्यावेळी सांगण्यात आले होते. आता सुध्दा ही माहिती उपलब्ध नसेल तर आम्ही हतबल आहोत असेच म्हणावे लागेल. हे सर्व कशासाठी चालले आहे ? त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात की, नाही ? औरंगाबाद महानगरपालिका कोणाच्या ताब्यात आहे याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडे माहिती उपलब्ध नसते तेव्हा ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे म्हटले जाते व ही या सदनाची प्रथा आहे. जी माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाते त्यासंदर्भातील सर्व माहिती पुढील अधिवेशनामध्ये पटलावर आलीच पाहिजे ही त्या मंत्र्यांची नैतिक जबाबदारी असते. ही माहिती ज्यावेळेस आली त्यावेळेस आपण नव्हता. पूर्वीचे आमचे मंत्री त्या ठिकाणी होते. ते आमचे सदस्य म्हणून त्या ठिकाणी काम करीत होते. त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांचा अतिउत्साह पाहून स्वत: माननीय मुख्यमंत्री उठले व गांभीर्यपूर्वक सांगितले की, माहिती नसेल तर पटलावर ठेवतो. असे असतांना आताही माहिती आली नाही असे आपण सांगता ते काही बरोबर नाही. हे प्रकरण फार गंभीर आहे. राष्ट्रवादी पक्षाने कॉंग्रेस पक्षावर आघात करावा हे जसे गंभीर आहे तशाच प्रकारे हे सुध्दा गंभीर प्रकरण आहे. या महानगरपालिकेत 3 आमदारांचे मतदारसंघ येतात. या प्रश्नामध्ये मोठया प्रमाणात जनतेचा प्रश्न येतो. जायकवाडीमधून या ठिकाणी प्रकल्प येणार आहे. यासंदर्भातील माहिती शुक्रवारी तरी मिळणार आहे काय ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, पुढील अधिवेशनात यासंदर्भातील माहिती दिली जाईल तसेच यामध्ये उशीर का झाला याचीही तपासणी केली जाईल.

--------

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.: लेखी उत्तरे**

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "आंबोली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) घाटात पावसाळ्यात कोसळणाऱ्या दरडीवर उपाययोजना करण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री दिवाकर रावते, अमरनाथ राजूरकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. व सर्वश्री परशुराम उपरकर, राजन तेली, माजी वि.प.स.यांच्या दिनांक 23 जुलै 2012 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 30714 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

-----

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. संजय सावकारे ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. संजय सावकारे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : आश्वासनांची यादी व आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे**

श्री.सचिन अहिर (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी विधान परिषेदच्या सन 2013 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक 9 डिसेंबर ते 20 डिसेंबर 2013 या कालावधीत माननीय मंत्री/माननीय राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 338 आश्वासनांची यादी, तसेच सन 2013 चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 465 आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या विवरणपत्रांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : आश्वासनांची व विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची व विवरणपत्रांची यादी छापावी.)

----

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी 3 अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये तसेच माननीय सभापती महोदयांच्या दालनात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच संसदीय कामकाज मंत्री तसेच माननीय विरोधी पक्ष नेते उपस्थित असतांना मी विषय उपस्थित केला होता की, सभागृहापुढे केवळ अहवाल ठेवले जातात. सरकारला सदनाला अहवाल सादर करण्याचे जे घटनात्मक बंधन असते ते पाळले जाते परंतु या अहवालाचे पुढे काय होते याची काही सुध्दा माहिती मिळत नाही. अनेक अहवालात कारवाया सुचविलेल्या असतात. अर्थसंकल्पासारखी मोठी अधिवेशन असतात त्या अधिवेशनामध्ये एक दोन दिवस या अहवालाच्या संदर्भात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. सर्वच अहवालावर या सदनात चर्चा करणे शक्य नाही परंतु अहवालावर चर्चा केली तर अहवालाच्या संदर्भातून निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारने सूचना, कार्यवाही किंवा जे करणे आवश्यक असते ते केले तर यावर काही तरी नैतिक बंधन येऊ शकेल. असे केले तर या सर्वोच्च सभागृहाला सहज घेण्याची जी प्रवृत्ती आहे ती टळेल. या विषयाच्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली होती. त्यामुळे माझी सदनाला अशी विनंती आहे की, जुलैच्या अधिवेशनामध्ये किमान एक दोन दिवस फक्त अहवालावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्या दोन दिवसांमध्ये प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर अहवालावर चर्चा घ्यावी जेणेकरुन अहवालाला न्याय दिल्यासारखे होईल.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सूचना चांगली आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित ठेवण्याबाबत वित्त राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, "महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम 289 अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम 228(1) मधील सात दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित ठेवण्यात यावी." असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे**

**उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न डोंबिवलीतील प्रदूषणासंबंधी आहे. दोन-तीन आठवडयापूर्वी डोंबिवलीमध्ये पाऊस पडला आणि तो पाऊस संपूर्णपणे हिरवा होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 44 कारखाने बंद करण्यास सांगितले होते. परंतु 20 दिवस संपण्यापूर्वीच त्यातील 22 कारखाने पुन्हा सुरु करण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्येक कारखान्याकडून 5 लाख रुपयांची बँक गॅरेन्टी घेतली त्यामुळे हे कारखाने पुन्हा सुरु झाले. वास्तविक राष्ट्रीय हरित आयोगाने पुढील सुनावणी होईपर्यंत हे कारखाने कायमस्वरुपी बंद ठेवावेत असे आदेश दिलेले असताना कोणत्या आधारावर हे कारखाने पुन्हा सुरु करण्यात आले ? हे कारखाने पुन्हा सुरु करण्यात आल्यामुळे पर्यावरण आणि लोकांच्या आरोग्यावर फार मोठा विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. या कारखान्यांवर नियंत्रण नसेल तर अनेक समस्या निर्माण होतील. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हे कारखाने त्वरित बंद राहतील आणि नागरिकांचे जीवन सुरक्षित राहील या दृष्टीने तातडीची उपाययोजना करण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी डोंबिवली येथील प्रदूषणा संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. परंतु प्रदूषणाचा प्रश्न फक्त डोंबिवलीत नसून तो अनेक ठिकाणी आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कारभार अतिशय संथ गतीने सुरु आहे. ते एकेका मिटींगसाठी इतका वेळ का घेतात ते मला समजत नाही. ॲक्शन झाली पाहिजे हे मला मान्य आहे. परंतु त्यांनी वेळीच ॲक्शन न घेतल्यामुळे अशा गोष्टी घडतात. त्यामुळे कारखाने बंद करावे लागतात. कारखाने बंद झ ाल्यामुळे कारखान्यातील कामगारांवर उपासमारीची वेळ येते. या सर्व गोष्टींची एकत्रित चर्चा केली पाहिजे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर शासनाने बारीक लक्ष ठेवले पाहिजे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मिटींग्ज लवकर लागत नाहीत. सन्माननीय सदस्यांनी कारखान्यांवर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

कारवाई करण्यासंदर्भात उल्लेख केला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर देखील कारवाई करण्याची आवश्यकता आहे कारण ते करीत असलेला विलंब आणि त्यामुळे अशी संकटे येत आहेत. तेव्हा या संदर्भात शासनाने खुलासा करावा.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या मंडळावर कोणताही अशासकीय अधिकारी नेमलेला नाही, सर्व शासकीय अधिकारी आहेत. तेव्हा आपण दिलेल्या सूचनेची निश्चितपणे दखल घेतली जाईल.

----------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पुणे शहरातील ससून रुग्णालय हे पश्चिम महाराष्ट्रातील फार मोठे रुग्णालय आहे. या रुग्णालयामध्ये बदली कामगार मागील 25-30 वर्षापासून काम करीत आहेत. या कामागारांनी त्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी ससून रुग्णालय आणि बी.जे.वैद्यकीय शासकीय महाविद्यालयामध्ये 20 फेब्रुवारीपासून बेमुदत बंद आणि उपोषण सुरु केले आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील 2200 बदली कामगारांनी काम बंद ठेवलेले आहे. उपोषणास बसलेल्या कामगारांपैकी दोन कामगारांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. ससून रुग्णालयातील बदली कामगारांच्या प्रश्ना संदर्भात शासनाने तातडीने पावले उचलून त्यांना न्याय द्यावा. तसेच त्यांचे उपोषण मागे घेण्यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

---------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना मावळ येथे दिनांक 9 ऑगस्ट रोजी आपल्या मागण्यांसाठी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु असताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीनजण मृत्युमुखी पडले. त्या संदर्भात सभागृहात भरपूर चर्चा झाली. त्यानंतर मावळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. आता त्या समितीचा अहवाल आला अशी आमची माहिती आहे. त्या अहवालात कोणास दोषी ठरविण्यात आले आहे ? दोषींवर शासन काय कारवाई करणार आहे या संदर्भातील माहिती सरकार सभागृहाला केव्हा अवगत करणार आहे ? आज संध्याकाळपर्यंत किंवा परवापर्यंत अधिवेशन संपण्यापूर्वी या अहवालाची सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात मावळ गोळीबार प्रकरणी भरपूर चर्चा झाली होती. सभागृहाच्या नेत्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. मावळ गोळीबार प्रकरणाचा अहवाल आलेला आहे. अहवालात कोणाची नावे आहेत याची माहिती विविध चॅनेल्सच्या माध्यमातून आम्हाला समजत आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना असा अहवाल माध्यमांना सुपूर्द केला जातो, परंतु तो अहवाल सभागृहात मांडला जात नाही. आम्ही कोणत्या मंत्र्यांवर हक्कभंग दाखल करावा याबाबतीत आपण आम्हाला मार्गदर्शन करावे. आम्ही हा अहवाल विविध वाहिन्यांवर पाहिलेला आहे. त्यामध्ये कोणकोण दोषी आहेत हे जाहीर झालेले आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना असे घडत असेल तर या सदनाला काय अर्थ राहिला ? तेव्हा या संदर्भातील मंत्री कोण आहेत, आम्हाला त्यांच्यावर हक्कभंग दाखल करण्याची इच्छा असल्यामुळे आपण आम्हाला मार्गदर्शन करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, भंडारा येथे तीन लहान मुलींचा खून झाला होता की त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला होता या विषयावर येथे चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय गृह मंत्री महोदयांनी सांगितले होते की, हे प्रकरण सी.बी.आय.कडे सोपविण्यात येईल. भंडारा खून केस स्वीकारण्यास सी.बी.आय.ने नकार दिलेला आहे अशी माझी माहिती आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

त्या शाळकरी मुलींवर बलात्कार झाला होता, त्यांचा खून करण्यात आला होता की त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला या बाबतीत संशयाचे धुके आहे. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी माननीय गृह मंत्र्यांना विनंती करतो की, भंडारा येथील मुलींच्या मृत्यू प्रकरणी नेमके काय झाले या बाबतची माहिती त्यांनी सभागृहात उद्धृत करावी. सी.बी.आय. ने ही केस घेण्यास नकार दिला असेल तर त्या मागची कारणे काय आहेत, हे देखील सभागृहाला समजले पाहिजे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मावळ गोळीबार प्रकरणी सरकारकडून वारंवार निवेदन करण्यात येत होते की, गोळीबार प्रकरणी आंदोलनकर्त्यांची चूक आहे. परंतु मावळ गोळीबार प्रकरणी नुकताच जो चौकशी अहवाल सादर झालेला आहे त्यावरुन निदर्शनास येते की, ज्यांची त्या मोर्चावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी होती त्यांच्याकडूनच आगळीक झाली आणि त्यांच्याकडून करण्यात आलेल्या गोळीबारामध्ये 3 शेतकरी मृत्युमुखी पडले. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मावळ गोळीबार प्रकरणाचा चौकशी अहवाल सभागृहात मांडण्यापूर्वी सभागृहाबाहेर मांडला गेला. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, मावळ गोळीबार प्रकरणाचा अहवाल मांडल्यानंतर सरकार त्या अहवालाचे नेमके काय करणार आहे हे शासनाने घोषित करावे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, दिनांक 22 ते 25 फेब्रुवारी, 2014 दरम्यान महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी गारपीट झाली आहे. अनेकदा गारपीट होते, अवकाळी पाऊस पडतो किंवा इतर नैसर्गिक आपत्ती येत असते. वास्तविक पाहता नैसर्गिक आपत्तीमध्ये तत्काळ पंचनामे करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासनाचे स्थायी आदेश अस्तित्वात आहेत. परंतु जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी या बाबतीत लक्ष घालत नाहीत. परिणामी नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या कष्टकऱ्यांना, शेतकऱ्यांना किंबहुना नागरिकांना नुकसान भरपाई मिळत नाही. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अधिकाऱ्यांनी मंत्र्यांच्या किंवा सरकारच्या आदेशाची वाट पाहता कामा नये. या निमित्ताने मी मागणी करतो की, शासन स्तरावरुन अधिकाऱ्यांना सूचना गेल्या पाहिजेत की, नैसर्गिक आपत्तीमध्ये कोणाच्याही आदेशाची वाट न पाहता शासनाच्या स्थायी आदेशांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. जेणेकरुन नुकसानग्रस्त लोकांना तातडीने मदत मिळू शकेल. महोदय, नागपूरमध्ये 15 मिनिटांच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांची सर्व पिके उद्ध्वस्त झाली. अनेक झाडे उन्मळून पडली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तत्काळ पंचनामे केले नाही तर त्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी मागणी करतो की, शासनाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना स्थायी आदेशाचे तंतोतंत पालन करण्याबाबत आदेश द्यावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. त्यांनी मांडलेल्या मुद्याच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, गेल्या दोन-तीन दिवसात विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात पाऊस पडून गारपीट झाली आहे. भंडारा जिल्ह्यात 3 किलोची गारपीट झाली. त्यामुळे सर्व पिके उद्ध्वस्त झाली. परिणामी ज्वारी काळी झाली आहे. गहू, हरभरा, कांदा इत्यादी पिके देखील उद्ध्वस्त झाली आहेत. वास्तविक पाहता गारपीट झाल्यानंतर माननीय मंत्र्यांनी सभागृहात ताबडतोब निवेदन करावयास हवे होते. परंतु ते करण्यात आले नाही. नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत शासनाचे स्थायी आदेश असताना सुध्दा अधिकारी मंडळी त्या अनुषंगाने हालचाल करण्यास तयार नाहीत. या निमित्ताने माझी मागणी आहे की, नुकसानग्रस्त भागात तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकरी अगोदरच उद्ध्वस्त झाला आहे. अतिवृष्टी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

किंवा गारपिटीमुळे त्याच्या रब्बी पिकाची हानी झाली तर तो कायमचा उद्‌ध्वस्त होणार आहे. माझी मागणी आहे की, या विषयी सरकारने अधिवेशनात निवेदन करावयास पाहिजे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात अवकाळी पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. अशा परिस्थितीत शासन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहून त्यांना कोणती मदत करणार आहे या बाबत शासनाने निवेदन करावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप व पांडुरंग फुंडकर यांनी राज्यातील काही भागात झालेल्या गारपिटीचा मुद्दा उपस्थित केला आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीबाबतची माहिती त्यांनी सभागृहाला अवगत करुन दिली आहे. या अनुषंगाने मी राज्य सरकारला निदेश देतो की, नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत सरकारकडून जी कार्यवाही नेहमी करण्यात येते ती सत्वर करावी.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आमची विनंती आहे की, आपण या विषयी शासनास निवेदन करण्यास सांगावे.

**उप सभापती** : ठीक आहे. शासनाकडून या संदर्भात परवा निवेदन करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मुंबईतील हजारो माथाडी कामगारांनी हक्काचे घर मिळावे म्हणून अनेक वर्षे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. महाराष्ट्र शासनाने असे आदेश दिले की, नवी मुंबई परिसरात सिडकोमार्फत माथाडी कामगारांना घरे देण्यात यावीत. त्यानुसार सिडकोने शासन निर्णयानुसार सोडत काढली. परंतु 110 घरांच्या बाबतीत सिडकोने बेकायदेशीररित्या स्थगिती दिली आहे. पूर्वी ट्रान्सपोर्ट ॲण्ड वर्कर्स युनियन आणि अखिल भारतीय कर्मचारी संघ यांच्यात वाद होता. तो वाद आता मिटलेला आहे. परंतु सिडकोने अजूनपर्यंत 110 घरांचे वाटप केले नाही. अनेक वर्षे हा विषय प्रलंबित होता. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी विनंती करतो की, सिडकोने ताबडतोब 110 घरांचे वाटप सुरु करावे.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्थसंकल्पीय प्रकाशनांपैकी विभागनिहाय व विकास मंडळनिहाय योजनेत्तर विकास खर्चाची पुस्तके वितरित करणे

**मु.शी.**: अर्थसंकल्पीय प्रकाशनांपैकी विभागनिहाय व विकास मंडळनिहाय योजनेत्तर विकास खर्चाची पुस्तके वितरित करणे, यांबंधी माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

महोदय, या वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सुमारे तीन आठवडे अगोदर प्रस्तावित झाल्यामुळे वित्त विभागासह शासकीय मुद्रणालयाला रात्रं-दिवस काम करावे लागले. कालमर्यादेच्या तणावामुळे मुद्रणालयाला प्रकाशनासाठी वेळोवेळी हॉलमध्ये बाईंडींग करावे लागले. शेवटच्या टप्प्यात एक ग्रीन बुक, पिंक बुक, विभागनिहाय, विभाग मंडळनिहाय योजनेतर विकास खर्च यांची प्रकाशने छापण्यात येत असतात. त्यामुळे ती सर्वात शेवटी प्राप्त झाली होती. बॅगेत पुस्तके भरताना ग्रीन बुक व पिंक बुक निळ्या रंगाची असल्याने ती न चुकता टाकली गेली. तथापि, विभागनिहाय व विकास मंडळनिहाय योजनेतर विकास खर्चाची पुस्तके छापून तयार असून सुध्दा बॅगेत टाकण्याचे राहून गेले. ही बाब शासकीय मुद्रणालयाने आजच आमच्या निदर्शनास आणून दिली आहे. सदर पुस्तके उपलब्ध असल्यामुळे सन्माननीय सदस्यांना टपाल खणाद्वारे उपलब्ध करुन देण्याची परवानगी देण्यात यावी.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु........)

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, राज्यातील कायम विनाअनुदानित तत्त्वावरील 1100 कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक चार दिवसांपासून आझाद मैदानावर उपोषणास बसलेले आहेत. माझी विनंती आहे की, त्यांच्याशी चर्चा करुन त्यांचे प्रश्न निकाली काढावेत.

तसेच एम.सी.व्ही.सी. चे कायम विनाअनुदानित तत्त्वावरील प्राध्यापक सुध्दा आझाद मैदानावर उपोषणास बसले आहेत. त्यांच्यासोबत सुध्दा चर्चा करण्याची नितांत आवश्यकता आहे.

तसेच माध्यमिक शाळातील अपंग एकात्मिक योजनेंतर्गतचे काही शिक्षक सुध्दा उपोषणास बसलेले आहेत. त्यांच्याशी सरकारने गेल्या तीन-चार दिवसांपासून चर्चा केली नाही. कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळांचे मूल्यांकन झाले. परंतु यादी घोषित करण्याचे राहिल्यामुळे शेकडो शिक्षक दररोज मंत्रालयात चकरा मारत आहेत. या निमित्ताने मी विनंती करतो की, त्यांच्याकडे सुध्दा शासनाने लक्ष द्यावे.

----------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: (पुरवणी) विनियोजन विधेयक

L. A. BILL NO.VI OF 2014

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2014.)**

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 6 - दिनांक 31 मार्च, 2014 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारसी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, विधानपरिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, विधानपरिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

( पुढे सुरू ....

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी अतिशय महत्त्वाचा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहात मांडत आहे. मी या संदर्भात आपणामार्फत शासनाला विनंती करू इच्छितो. तिलारी धरणग्रस्तांचा प्रश्न अनेक दिवसांपासूनचा आहे. तिलारी धरण होऊन बरीच वर्षे झाली आहेत. परंतु, तरी सुध्दा अद्यापही पुनर्वसित लोकांचा प्रश्न सुटलेला नाही. 6 महिन्यांपूर्वी तेथील सर्वच ग्रामस्थ आंदोलनाला बसले होते. त्यांनी ठिय्या आंदोलन केले होते. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी तेथे जाऊन त्यांच्यासमोर वन टाईम सेटलमेंटचा प्रस्ताव ठेवला होता. मागच्या 2 महिन्यांपासून तो प्रस्ताव शासनाच्या दफ्तरी प्रलंबित आहे. कालपासून पुन्हा तिलारी धरणग्रस्त ठिय्या आंदोलनाला बसले आहेत. गोवा शासन आणि आपल्याकडून या संदर्भात संपूर्ण होकार देण्यात आला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी तिलारी धरणग्रस्तांच्या ओटीएस संदर्भातील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवून ठिय्या आंदोलनाला बसलेल्या ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी माझी विनंती आहे.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, बारावीच्या परीक्षा संपल्या आहेत. दहावीच्या परीक्षा सुरू होत आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकांनी बारावीच्या परीक्षेचे पेपर तपासण्यावर बहिष्कार टाकला आहे. त्यांच्या 2 महत्त्वाच्या मागण्या आहेत. शासनाकडून ते विषय मंत्रिमंडळात आणून त्या संदर्भात निर्णयही झाला आहे. सदर विषयांच्या संदर्भातील निर्णय मंत्रिमंडळात होऊन 15 दिवस झाले आहेत. परंतु, शासनाने अद्यापही त्या संदर्भात शासन निर्णय काढलेला नाही. त्यामुळे संबंधित प्राध्यापकांनी आंदोलन सुरू केले आहे. सदर आंदोलन तातडीने संपुष्टात येण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा आणि त्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील शंका देखील दूर करावी.

**उप सभापती** : मी या संदर्भात एक गोष्ट मुद्दाम मांडू इच्छितो. विद्यार्थ्यांच्या परीक्षा आल्या की, प्राध्यापक, शिक्षक संपावर जातात. हे कधी थांबणार आहे ? हे थांबणे आवश्यक आहे. सर्व लोकांना वेठीला धरण्यात येते. विद्यार्थ्यांनाही वेठीला धरतात. हे बरोबर नाही. त्यांचे प्रमुख नेते म्हणून आपण काही बोलणार आहात की नाही ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण अतिशय योग्य प्रश्न उपस्थित केला आहे. निवडणुका आल्या की, राज्यकर्ते फालतू घोषणा थांबवतील त्यावेळी हा प्रश्न प्राध्यापकांना विचारावा.

**उप सभापती** : भाषणातील 'फालतू' हा शब्द वगळण्यात येत आहे.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

**उप सभापती** : विधानपरिषद नियम 266 (5) च्या तरतुदींना अनुसरून मी सभागृहाला असे कळवितो की, या सभागृहातील सदस्य श्री. संजय रामचंद्र पाटील यांनी या सभागृहातील त्यांच्या जागेचा दिनांक 25 फेब्रुवारी, 2014 रोजी मध्यान्हानंतर राजीनामा दिलेला आहे आणि तो मी स्वीकारलेला आहे.

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.** : सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**उप सभापती** : आता अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा आज दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 रोजी होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी माननीय वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षांचे सन्माननीय सदस्य व स्वतंत्र सन्माननीय सदस्य यांना देण्यात येईल. या अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे आपल्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावीत.

आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात करतील.

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, मुळात अंतरिम अर्थसंकल्पावरील 3 दिवसांची चर्चा 1 दिवसावर आणणे योग्य नाही. चर्चा सुरू करताना माननीय वित्तमंत्री सभागृहात उपस्थित असते तर बरे झाले असते. माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. काल मांडलेल्या अर्थसंकल्पाला अंतरिम का म्हटले, हे मला समजत नाही. प्रत्येक वर्षी अर्थसंकल्प मांडला जातो. मात्र त्यानंतर पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून वेगळा अर्थसंकल्प येतच असतो. दरवेळी अंतरिमच अर्थसंकल्प असतो. मग यावेळीच अंतरिम अर्थसंकल्प का म्हटले, हे समजले नाही. अर्थसंकल्प मांडला जातो आणि त्यानंतर पुन्हा 20 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आणल्या जातात. त्यांना पुरवणी मागण्या असे न म्हणता पुरवणी अर्थसंकल्पच म्हटले पाहिजे. कालच्या अर्थसंकल्पाला अंतरिम अर्थसंकल्प का म्हणायचे याचे उत्तर मिळाले नाही. दरवर्षीप्रमाणेच हा अर्थसंकल्प आहे असे समजून मी चालत आहे. काल आम्ही चॅनेलवर जे पाहिले, पेपरमध्ये जे वाचले त्यामध्ये दादा म्हणाले की, आम्ही साधूसंत नाही. मी म्हणतो की, तुम्हाला साधूसंत म्हणण्यास कोणाला वेड लागले आहे ? घोटाळे, भानगडी होत आहेत, 16 मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत, गुन्हे दाखल करायचे आहेत आणि असे असताना तुम्हाला साधूसंत कोण म्हणेल, कोणाचे डोके फिरले आहे ?

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, मात्र हिंमतीला दाद दिली पाहिजे. 5492 कोटी रूपयांचा तुटीचा अर्थसंकल्प मांडताना सुध्दा अविर्भाव असा होता की, आम्ही शिलकीचा अर्थसंकल्प मांडत आहोत. काही तरी संकोच असावा लागतो. सद्सद्विवेक बुध्दी असलेल्यांना संकोच वाटतो की, राज्याचे अर्थमंत्री असताना राज्याचे नियोजन करताना आपण तुटीचा अर्थसंकल्प मांडत आहोत. आपण 3 लाख कोटी रूपयांच्या वर राज्याला कर्जात टाकले आहे. तुम्ही ज्या हिंमतीने अर्थसंकल्प सादर केला, त्याचे कौतुक केले पाहिजे. आपण नंतर बाहेर जाऊन त्याचे जोरात समर्थनही केले. ही हिंमत तुमच्यात कुठून येते हे समजून घेतले पाहिजे. हे अभिनंदनीय आहे. ही कला शिकली पाहिजे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

कालचे सर्व बघितल्यानंतर खरे म्हणजे जो काही भ्रष्टाचार चालला आहे, तो जरी काबूत आणला तरी ही तूट आपण थांबवू शकतो आणि भांडवली खर्च व विकासाला आरामात पैसा उपलब्ध होऊ शकतो. भ्रष्टाचारावर नियंत्रण आणले तर हे होऊ शकते.

सभापती महोदय, गेल्या 15 वर्षात बिघडलेली वित्तीय शिस्त आणि भ्रष्टाचारामुळे भारतातील सर्वाधिक महागडे राज्य म्हणून पुरोगामी महाराष्ट्राची नवीन प्रतिमा निर्माण झाली आहे. हा भ्रष्टाचाराचा बोजा जनतेवर आणि सामान्य माणसावर पडत चालला आहे. सर्वात महागडी वीज महाराष्ट्रात आहे. प्रति हेक्टरी सिंचन निर्मितीसाठी सर्वात जास्त खर्च महाराष्ट्रात झाला आहे. 70 हजार कोटी रुपयांचा खर्च करुन देखील गेल्या 12 वर्षात 11 लाख, 19 हजार, 940 हेक्टर एवढे क्षेत्र सिंचनाखाली आले आणि प्रति हेक्टरी सिंचन निर्मितीला 6 लाख, 95 हजार, 335 लक्ष रुपये खर्च आला. नियोजन आयोगाने हा खर्च 1 लाख 70 हजार रुपये काढला आहे. परंतु, राज्याचे माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी प्रति हेक्टरी 6 लाख, 95 हजार, 335 रुपये खर्च केला आहे. विजेतील भ्रष्टाचार, सिंचनाचा भ्रष्टाचार, सर्वाधिक भूखंडांचे घोटाळे या राज्यात झाले आहेत. जावयांचे हरयाणा राज्य मागे पडेल की काय, अशी स्थिती आहे. आदर्श गृहनिर्माण संस्थेचा भ्रष्टाचार असो, हिरानंदानी बिल्डरला हजारो कोटी रुपयांची जमीन स्वस्तात देण्याचे धोरण असो किंवा मुंबईतील मोक्याचे भूखंड सत्ताधाऱ्यांनी गिळंकृत केल्यामुळे आज गरीब, सर्वसामान्य माणसांना स्वस्तात घरे उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाकडे भूखंडच शिल्लक राहिलेले नाहीत. म्हाडा आता सर्वसामान्य जनतेला कोटी-कोटी रुपये किमतीची घरे देणार आहे.

सभापती महोदय, सर्वाधिक टोल महाराष्ट्रात आहेत. टोलच्या संदर्भात महाराष्ट्रात आंदोलने झाली. मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले गेले. संपादकांना घेऊन बैठकही झाली. बैठक होऊन अशी घोषणा करण्यात आली की, नवीन धोरण आणू, हे करु, ते करु. परंतु, अर्थसंकल्पात त्याचा कोठेही उल्लेख नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी टोलचा विषय या ठिकाणी मांडला आहे. चुकीची माहिती पटलावर येऊ नये म्हणून मला आपल्या परवानगीने काही दुरुस्ती करावयाची आहे.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप......

सभापती महोदय, टोलच्या संदर्भात केंद्र सरकारच्या काही मार्गदर्शक सूचना आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणात, "महाराष्ट्रात सर्वाधिक टोल आहेत", असे जे वक्तव्य केले आहे, ते चुकीचे आहे. त्याचे कारण असे आहे की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार दोन टोलमधील अंतर 30 ते 35 कि.मी. असावे. महाराष्ट्र राज्याने या सूचना तंतोतंत पाळल्या आहेत. गुजरात राज्यात हे अंतर 25 कि.मी., मध्य प्रदेशमध्ये 25 कि.मी. आणि पंजाब राज्यामध्ये 25 कि.मी.असे आहे आणि या सर्व राज्यात भारतीय जनता पक्षाचीच सरकारे आहेत, हे केवळ मी माहितीकरिता नमूद करु इच्छितो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जी माहिती दिली आहे, त्याला आव्हान देण्याची माझी तयारी आहे. आज अर्थसंकल्पावर चर्चा असल्याने तूर्त मी त्यांचा मुद्दा राखून ठेवतो. नॅशनल हायवे ॲथॉरिटीच्या नियमानुसार हे अंतर 80 कि.मी. निश्चित केलेले आहे. त्यामुळे या विषयावर त्यांच्याशी कधीही डिबेट करण्याची माझी तयारी आहे. त्यांना सन्माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर यांनी दिलेली माहिती चुकीची आहे, ती त्यांनी तपासून घ्यावी.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांकडे टोलविषयी बैठक झाल्यानंतर त्यांनी सांगितले होते की, 10 कोटी रुपयांच्या खालचे 24 टोलनाके बंद करु. त्यामुळे 200 कोटी रुपये कोठे आहेत, हे मी अर्थसंकल्पाच्या पुस्तकात शोधत होतो. परंतु, कोठेही तरतूद आढळून आली नाही. शासनाला जर हे टोल बंद करायचे असतील तर त्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद केली पाहिजे. अन्यथा, कंत्राटदाराला पैसे कसे देणार आहात ? परंतु, अर्थसंकल्पाचे पुस्तक चाळत असताना ज्या घोषणा या सरकारने केल्या आहेत, मुख्यमंत्री महोदयांनी जी आश्वासने दिली आहेत, त्याबाबतच्या तरतुदी केल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी त्यांच्या अभिभाषणात सांगितले की, माझे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी 100 कोटी रुपये देईल. मी अर्थसंकल्पाचे पूर्ण पुस्तक चाळले. परंतु, 3 कोटी रुपयांव्यतिरिक्त अन्य तरतूद आढळून आली नाही. कदाचित, चुकून राहून गेले असेल, सरकारकडे पैसे नसतील तर हरकत नाही.

...3....



SRR/ D/ KTG/ D/ D        प्रथम श्री.मंगेश कांबळे.........        11:50

श्री.विनोद तावडे.......

सभापती महोदय, आज एलबीटीचा बोजा महाराष्ट्रावर आहे. भूखंड घोटाळे, सिंचनातील भ्रष्टाचार, विजेतील भ्रष्टाचार, एलबीटी, महागडी वीज यामुळे महाराष्ट्राला महागड्या गोष्टींना सामोरे जावे लागत आहे, याची उजळणी अर्थसंकल्पाच्या निमित्ताने झाली आहे. गेल्या 14 वर्षात गृहनिर्माण, जलसंपदा, महसूल, ऊर्जा, उद्योग, सार्वजनिक बांधकाम या महत्त्वाच्या विभागांमध्ये झालेल्या भ्रष्टाचारामुळे महाराष्ट्रावर जवळपास 3 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे कर्ज होऊन हे राज्य देशात महागडे राज्य ठरले आहे.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प वाचत असताना किंवा त्याचा अभ्यास करीत असताना या अधिवेशनात मांडला आहे, त्याला अर्थसंकल्प म्हणायचे की, नंतर पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आणि त्यात ज्या वारेमाप घोषणा करण्यात आल्या, त्याला अर्थसंकल्प मानायचे, असा प्रश्न आमच्या मनात निर्माण झाला आहे. गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प 46938 कोटी रुपयांचा होता. अर्थसंकल्प मांडत असताना त्या वर्षात कोणत्या गोष्टी करण्यात येणार आहेत, याचा ऊहापोह त्यात करण्यात आला होता. एखादा अर्थसंकल्प मांडत असताना सरकार कोणत्या योजना राबविणार आहे, याची माहिती दिली जाते, तो त्यांचा संकल्प असतो. त्यानंतर वर्षभरात मोठा पाऊस पडला, ओला दुष्काळ, दुष्काळ पडला, भूकंप झाला आणि त्यामुळे काही बदल पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करावे लागले तर आम्ही समजू शकतो. परंतु, नियोजित अर्थसंकल्पाव्यतिरिक्त जुलै महिन्यामध्ये सादर केलेल्या 8007 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या, डिसेंबर, 2013 मध्ये सादर केलेल्या 11695 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आणि 14 जानेवारी पासून शासनाने नवीन घोषणा करण्याचा जो सपाटा लावला आहे, त्यासाठी ज्या काही आर्थिक तरतुदी करायच्या आहेत, त्याचे काय ? आता तर प्रि-कॅबिनेट, पोस्ट कॅबिनेट, कॅबिनेटवर कॅबिनेट सुरु आहेत आणि घोषणाचा पाऊस पडत आहे. अर्थमंत्री महोदय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर असे सांगतात की, पैसे नाहीत. पण घोषणा तर जोरात होत आहेत.

सभापती महोदय, शासनाने किती हजार कोटी रुपयांचे निर्णय घेतले, याबाबतीत जर आपण माहिती घेतली तर कोरडवाहू शेती मिशनसाठी, ज्याचा उल्लेख सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी केला आहे, त्यासाठी 20 हजार कोटी रुपये, वीज दर कपातीमुळे पडणारा बोजा 7272

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

कोटी रुपये, जलसंपदा विभागाच्या 147 प्रकल्पांच्या वाढीव खर्चास मान्यता देण्यासाठी 623 कोटी रुपये, 7 शहरांच्या विद्युत पायाभूत आराखड्यासाठी 1804 कोटी रुपये, असे मिळून 29699 कोटी रुपयांच्या प्रकल्पांना राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प 46938 कोटी रुपयांचा होता. त्यानंतर 19755 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या गेल्या 2 अधिवेशनात मांडल्या गेल्या आणि जानेवारी महिना सुरु झाल्यानंतर 29699 कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पांना मान्यता दिली गेली. हे सर्व गृहीत धरले तर गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प 184 कोटी 38 लाख रुपयांच्या महसुली अधिक्याचा होता. त्यामुळे नंतर 49454 कोटी रुपयांच्या वेगवेगळ्या घोषणा केल्या असतील तर सामान्य माणसाला असे वाटेल की, सरकारचे उत्पन्न वाढले आहे. त्यामुळे पैसे आले असतील तर खर्च होऊ द्या, अशी सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांची कल्पना असेल. पण तसे पैसे आले आहेत का ? खरे म्हणजे, कोणत्याही प्रकारचा अधिकचा महसूल जमा नाही. पण घोषणा मात्र दणादण चालल्या आहेत.

यानंतर श्री.मारोती शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ MMP/ पूर्वी श्री. रोझेकर 12:00

श्री. विनोद तावडे...

या लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये हे आघाडीचे सरकार वारेमाप घोषणा करते. परंतु त्या घोषणा प्रत्यक्षात अमलात येत नाहीत. त्यामुळे या आघाडीच्या सरकारला विधानमंडळाची प्रतिष्ठा पणाला लावून असत्य घोषणा करण्याची सवयच लागलेली आहे. मघाशी सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री. उदय सामंत यांनी "माहिती आली नाही" असे सांगितले. एक महानगरपालिका शासनाकडे माहिती पाठवत नसेल तर ती लाजिरवाणी गोष्ट नाही काय ? हे आघाडीचे सरकार सदनामध्ये असत्य घोषणा करुन, असत्य आकडेवारी देऊन विधानमंडळाच्या पावित्र्याशी खेळत आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या सर्व गोष्टींचा विचार सत्ताधारी पक्षामध्ये बसलेली मंडळी करणार आहे की नाही हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, गारपीट झाली, दुष्काळ पडला, किंवा 26 नोव्हेंबर सारखा अतिरेकी हल्ला झाला तर अशा वेळी शासनाला आर्थिक मदत करावी लागते हे आम्हाला समजते. परंतु ही आर्थिक मदत फक्त एक हजार कोटी रुपयाची दिलेली आहे. 3.5 हजार कोटी रुपयाचा अतिरिक्त खर्च कोणकोणत्या कारणासाठी झालेला आहे हे स्पष्ट होत नाही. सत्ताधारी पक्षातील आमदारांच्या मतदारसंघातील कामे करण्यासाठी पैसे वळते केलेले आहेत काय ? पैशाच्या विनियोगासंबंधीची असत्य आकडेवारी देऊन सरकारने एफआरबीएम कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. राज्याच्या आघाडी सरकारने असे सांगितले होते की, 2010 नंतर महसुली तूट शून्यावर आणण्यात येईल. आपण हे मान्य केलेले असताना 2014-2015 या वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना महसुली तूट 5417 कोटी 28 लाख रुपये इतकी दर्शविलेली आहे.

सभापती महोदय, एफआरबीएम कायद्यानुसार यलो बुक देणे अनिवार्य आहे. असे असताना शासनाने हे यलो बुक पिझन होलमध्ये टाकायचे राहून गेले अशा प्रकारचे न पटणारे निवेदन सभागृहामध्ये केले. हे यलो बुक आम्हाला मिळाले असते तर आम्हाला त्याचा अभ्यास करुन सरकारला काही सूचना करता आल्या असत्या. सदनाला यलो बुक उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी माननीय अर्थमंत्र्यांची आहे. ही गोष्ट त्यांच्या लक्षात कशी आली नाही याचे मला आश्चर्य वाटते. ही गोष्ट अर्थखाते इतक्या सहजतेने कशी घेते हे मला कळत नाही. शासनाला या गोष्टीचे अजिबात गांभीर्य नाही. यलो बुकामध्ये राजकोषीय धोरणासंबंधीचे विवरण असते. त्यावरुन राज्याचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आर्थिक स्थैर्य कसे आहे हे आपल्याला समजू शकते. हे यलो बुक न मिळाल्यामुळे आम्हाला आकडेवारी तपासता आली नाही. आम्ही जेव्हा अर्थखात्याकडे यलो बुकासंबंधी विचारणा केली त्यावेळी मग धावपळ होऊन सभागृहामध्ये निवेदन करण्यात आले. यलो बुक देणे बंधनकारक आहे ही बाब माननीय वित्त मंत्र्यांच्या लक्षात आली नाही. राज्याची वित्तीय शिस्त कशी बिघडली हे आम्हाला ॲट ए ग्लॅन्स या यलो बुकावरुन समजू शकले असते. परंतु हे यलो बुक न मिळाल्यामुळे आम्हाला विविध ठिकाणावरुन ही माहिती घ्यावी लागली. गेल्यावर्षीचा 184 कोटी रुपयाचा शिलकी अर्थसंकल्प हा 3017 कोटी रु. अधिक्यापर्यंत पोहोचला. प्रत्यक्षात महसुली उत्पन्नामध्ये 2423 कोटी रुपयांनी वाढ झालेली आहे. अतिवृष्टीसाठी शासनाने केवळ 1 हजार कोटी रुपये खर्च केले आहेत. राज्याचे उत्पन्न 16423 कोटी रुपयांनी वाढलेले आहे. असे असताना 3 हजार 17 कोटी 23 लाख रुपयाची महसुली तूट कशी निर्माण होते ? एका बाजूला उत्पन्न वाढलेले आहे असे शासन सांगते. या वाढलेल्या उत्पन्नातील केवळ 1000 कोटी रुपये शासनाने दुष्काळी परिस्थितीमध्ये उपाययोजना करण्यासाठी खर्च केले. त्यामुळे महसुली तुटीचा अर्थसंकल्प मांडताना जो वाढीव खर्च करण्यात आला तो अनुत्पादक बाबीसाठी कसा होतो ? आपल्या राज्याची आर्थिक शिस्त बिघडलेली आहे. मी आपल्या राज्याच्या वार्षिक योजनेची तुलना इतर राज्याशी आणि विशेषत: गुजरात राज्याशी केली तर सत्ताधारी पक्षातील मंडळींना चिमटे बसतात. सन 2013-14 या वर्षातील गुजरात राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 58500 कोटी रु., राजस्थान राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 40500 कोटी रु., कर्नाटक राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 43030 कोटी रु. , हिमाचल प्रदेश राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 21768 कोटी रु. आणि महाराष्ट्राच्या वार्षिक योजनेचे आकारमान 46538 कोटी रु. या प्रमाणे आहे. या वार्षिक योजनेच्या आकारमानाप्रमाणे 1 लक्ष लोकसंख्येमागे उपलब्ध होणारा निधी गुजरात राज्यामध्ये 97 कोटी रु., राजस्थानमध्ये 59 कोटी रु., कर्नाटकमध्ये 68 कोटी रु., हिमाचल प्रदेशमध्ये 320 कोटी रु. आणि महाराष्ट्रामध्ये 41 कोटी रु. याप्रमाणे आहे. इतर राज्यांच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रामध्ये 1 लाख लोकसंख्येसाठी 41 कोटी रु. निधी खर्च होतो. आपल्या राज्याचा जीडीपी सर्वाधिक असून सुध्दा महाराष्ट्रातील उद्योगधंद्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे त्या पायाभूत सुविधा आपल्याला देता येत नाहीत.

..3..



MSS/ KTG/ D/ MMP/ पूर्वी श्री. रोझेकर 12:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, वार्षिक योजनेचे आकारमान कसे घटत चालले आहे हे मी आपणास सांगतो. सन 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये 40 हजार कोटीची वार्षिक योजना केली. सन 2012-13 या आर्थिक वर्षात ती 25 हजार कोटी रु.नी वाढली. पण चलन फुगवटा लक्षात घेतला तर ही वार्षिक योजना 2011-12च्या तुलनेमध्ये 50 हजार कोटी रु. इतकीच मानली पाहिजे. सन 2013-14 या आर्थिक वर्षात 46938 कोटी रुपयाची वार्षिक योजना केली. पण चलनफुगवटा लक्षात घेतला तर त्या योजनेची किंमत 38021 कोटी रु. इतकी होते. आता 2014-2015या आर्थिक वर्षात 51222 कोटी रु.ची वार्षिक योजना असली तरी 2011-12च्या तुलनेत ही किंमत 37341 कोटी रु. इतकी आहे. म्हणजे 40 हजार कोटी रुपयावरुन 37000 कोटी रुपयावर आपली वार्षिक योजना आलेली आहे. या प्रमाणे आपल्या राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान घटत असेल तर आपले राज्य कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे हे स्पष्ट होते. 3 लाख 478 कोटी रु.पर्यंत राज्याचे कर्ज आहे. 2011-12मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न 11 लाख 99 हजार कोटी रु. इतके होते. गेल्यावर्षी त्यामध्ये 7 टक्क्यानी वाढ झाली आणि या वर्षी देखील स्थूल उत्पन्नामध्ये 7 टक्क्यांनी वाढ होईल अशी अपेक्षा अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली होती. याचा अर्थ सन 2013-14मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न 13 लाख 72 हजार कोटी रु. पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. राज्याच्या कर्जाची आणि जीडीपीची तुलना केली तर 25 टक्के कर्ज काढता येईल. परंतु आपण 7 टक्क्यांची वाढ गृहीत धरली तर आपण 22 टक्क्यापर्यंत पोहोचतो. 25 टक्क्यापर्यंत कर्ज काढण्याची मुभा असली तरी कर्जाचे प्रमाण 30 टक्क्यापेक्षा अधिक वाढले तर आपण डेट ट्रॅपमध्ये जातो. या डेट ट्रॅपमध्ये महाराष्ट्राने प्रवेश केलेला आहे. भारताचे नियंत्रक आणि लेखा परीक्षक यांनी ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. कर्ज फेडीचा कालावधी लक्षात घेता सन 2015 ते 2017 दरम्यान 15461 कोटी रु. 2017 ते 2021 दरम्यान 35234 कोटी रु.ची तरतूद कर्जफेडीसाठी करावी लागेल. त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी राज्याला आणखी कर्ज घ्यावे लागेल असे कॅगच्या अहवालामध्ये म्हटलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र हा आता डेट ट्रॅपमध्ये आलेला आहे. जीडीपीच्या 25 टक्क्यापर्यंत कर्ज काढता येणार असले तरी देखील आपली वित्तीय शिस्त बिघडलेली आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

युती सरकारने राज्य कर्जबाजारी केले असे सांगितले जात असले तरी क्रेडिट रेटिंग संस्थांनी 1999 मध्ये राज्याला ट्रिपल ए मानांकन दिले होते. ही वित्तीय शिस्त बिघडल्यामुळे आज ते मानांकन मायनस ट्रिपल बी पर्यंत आल्याचे क्रिसिल आणि इतर मानांकन संस्था म्हणत आहेत. मला वाटते जीडीपीमध्ये घट झाली असावी. कारण आर्थिक मंदी आहे. ग्लोबल स्लो डाऊनचा परिणाम महाराष्ट्रावर होणे स्वाभाविक आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पामध्ये राज्याच्या स्थूल उत्पन्नात 7.1 टक्के वाढ अपेक्षित धरली होती. परंतु जीडीपी मधील घट ही जागतिक मंदीमुळे आहे का?

सभापती महोदय, बिहार राज्यामध्ये 14.28, मध्यप्रदेशमध्ये 10.2 टक्के, छत्तीसगढ 8.60 टक्के असे प्रमाण आहे. हा डेटा सेंट्रल स्टॅटिस्टीक ऑर्गनायझेशनचा असेल तर त्या राज्यांना जागतिक मंदीचा परिणाम जाणवला नाही का? हा विचार करण्यासारखा प्रश्न निर्माण झाला आहे. कर्जाचे प्रमाण वाढले, कर्ज काढले तरी आपण भांडवली खर्च वाढवितो. कर्ज काढायला हरकत नाही. परंतु कर्ज वाढत असताना भांडवली खर्च मात्र घटत आहे. 2008-09 पासून घेतलेल्या कर्जाची आकडेवारी 2 लाख कोटीपर्यंत गेली असून बिगर भांडवली खर्च मात्र 84, 261 कोटी रुपये इतका झाला आहे. गेल्या 7 वर्षात बिगर भांडवली खर्च 84,261 कोटी रुपये इतका झाला असला तरी पुन्हा कर्ज फेडीसाठी उत्पन्न येणार कुठून? जनतेच्या पैशावर उधळपट्टी करायची आणि वित्तीय तूट वाढवत जायचे हेच यातून दिसून येते.

सभापती महोदय, 2012-13 मध्ये वित्तीय तूट 19,969 कोटी रुपये होती, 2013-14 मध्ये ती वित्तीय तूट 26,565 कोटीवर पोहोचली. या वेळी ही तूट 30,783 कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. हे होत असताना भांडवली खर्च मात्र घटत चालला आहे. सभापती महोदय, ज्या व्यक्तीला अर्थकारण कळते, अर्थशास्त्र कळते त्याला या सगळ्या वाक्यांचा अर्थ कळू शकतो. एका बाजूला वित्तीय तूट 30 हजार कोटी रुपये क्रॉस झाली असताना दुसऱ्या बाजूला घेतलेले कर्ज फेडण्यासाठी अर्थसंकल्पातील 40 टक्के रक्कम वापरत आहोत. त्यामुळे महाराष्ट्र कर्जाच्या विळख्यात सापडला आहे. भांडवली खर्चाचे प्रमाण दिवसेंदिवस घटत आहे. 2005-06 मध्ये अर्थसंकल्पातील 14 टक्के रक्कम भांडवली खर्चासाठी वापरली जात होती. या रक्कमेमध्ये दरवर्षी वाढ होणे गरजेचे होते. 2013-14 मध्ये भांडवली खर्चामध्ये वाढ न होता 12.31 टक्क्यापर्यंत घट झाली आहे. या वर्षी 2014-15 मध्ये 11.91 टक्क्यापर्यंत खाली आले आहे. म्हणजे एक

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

रुपयापैकी केवळ 11.91 पैसे भांडवली खर्चासाठी निधी उपलब्ध होणार असेल तर महाराष्ट्राला पुरोगामी विकसित राज्य म्हणता येईल का?

सभापती महोदय, वित्तीय नियोजन कसे चुकत आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. घटत्या भांडवली खर्चाचा तपशील विचारात घेतला तर ते कळून येते. बेस इयर 2008-09 प्रमाणे 21523 रुपये उपलब्ध झालेले होते. आता 2014-15 मध्ये 15012 इतका निधी बेस इयरप्रमाणे रुपयाची किंमत धरुन भांडवली खर्चासाठी उपलब्ध झाला आहे. म्हणजे हे प्रमाण दिवसेंदिवस घटत चालले आहे. त्यामुळे आर्थिक शिस्त आणि नियोजन कसे बिघडत चालले आहे आणि त्याकडे सत्ताधाऱ्यांनी गेली काही वर्षे सातत्याने दुर्लक्ष केले हे वास्तव आहे.

सभापती महोदय, सरकारी कर्जाच्या परतफेडीत दरवर्षी वाढ होत आहे. 2005-06 मध्ये एकूण उत्पन्नाच्या 4 टक्के रक्कम कर्जाच्या परतफेडीसाठी उपलब्ध झाली होती. 2009-10 मध्ये हे प्रमाण 5.52 टक्के, 2011-12 मध्ये 6.6 टक्के आणि 2013-14 मध्ये 6.77 टक्के आहे. म्हणजे सरकारी कर्जाची परतफेड करण्यामध्ये वाढ होत आहे. आर्थिक शिस्त बिघडल्यामुळे कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण वाढत आहे आणि विकास कामासाठी कमी निधी मिळतो हे वास्तव आहे.

सभापती महोदय, देशामध्ये महाराष्ट्राचा जीडीपी चालू किंमतीप्रमाणे 11.91 लक्षापर्यंत गेला आहे. शेतकरी, व्यापारी, उद्योजकांनी केलेल्या परिश्रमामुळे या राज्याचा जीडीपी देशामध्ये सर्वाधिक आहे. असे असताना राज्य सरकारमधील भ्रष्टाचार, लालफित यामुळे वस्तू निर्माणाचा, मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा वाटा हा 10 वर्षात निचांक पातळीवर आला आहे. कृषी क्षेत्रातील वाटा हा देशातील इतर राज्यांपेक्षा सर्वात कमी आहे. या राज्याचा सर्वात जास्त जीडीपी असताना सुध्दा केवळ दूरदृष्टी अभावी आणि योग्य समन्वय नसल्यामुळे राज्यातील जनतेच्या विकासासाठी वार्षिक योजनेचे आकारमान छोट्या राज्यांपेक्षा कमी होत आहे. ही सगळ्यात चिंतेची गोष्ट आहे.

सभापती महोदय, काल सह्याद्री चॅनेलवर 'बजेटचे वैशिष्ट्य काय?' या विषयावर झालेल्या चर्चेमध्ये माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री सहभागी झाले होते. जो सामान्य आहे, गरीब आहे, पिछडा वर्ग आहे त्याच्यासाठी आमचे बजेट आहे असे अर्थमंत्र्यांनी सांगितले. सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी हे बजेट असले तरी शाहु, फुले आणि आंबेडकरांचे नाव

..3..





श्री.विनोद तावडे.....

सातत्याने घेणाऱ्यांना सामाजिक विकासासाठी झटणारे शासन आहे हे दाखवायचे असते, त्यामुळे सोशल सर्व्हिस सेक्टरमध्ये आपला खर्च किती झाला याचा सहज अभ्यास केला तर शेवटी सामान्य माणसाच्या हितासाठी होणारा खर्च म्हणजे आरोग्य, शिक्षण, कामगार कल्याण, गृहनिर्माण यावर होत असतो. या सोशल सर्व्हिस सेक्टरवर झालेला खर्च 5.1टक्के आहे. मग हे सगळे बजेट सर्वसामान्य, दीनदलित दुबळयांच्या हितासाठी आहे असे म्हणत असताना मध्यप्रदेश राज्यात 16 टक्के, बिहारमध्ये 12.8 टक्के, उत्तरप्रदेशमध्ये 11 टक्के खर्च सोशल सर्व्हिस सेक्टरवर होत आहे. महाराष्ट्र राज्यात मात्र 5.1 टक्के खर्च होत आहे याबद्दल सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांनी त्यांच्या नेत्यांना जाब विचारला पाहिजे. खरोखर शाहु, फुले, आंबेडकर यांचे नाव घ्यायचा या सरकारला अधिकार आहे का?

सभापती महोदय, वित्तीय शिस्त बिघडल्यामुळे मुंबईचे गुंतवणुकीतील आघाडीचे स्थान कमी होत असल्याचा प्राईस वॉटर हाऊस कूपर कंपनीचा अहवाल आहे. त्या अहवालात गेल्या 10 वर्षात भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई यामुळे पायाभूत प्रकल्प पूर्ण करण्यास राज्य शासनाला आलेले अपयश इत्यादी कारणामुळे मुंबईचे आघाडीचे स्थान धोक्यात आले आहे असे म्हटले आहे. याच अहवालात या कंपनीने बंगळुरु पहिल्या स्थानावर, चेन्नई दुसऱ्या स्थानावर, दिल्ली तिसऱ्या स्थानावर आणि महाराष्ट्र चौथ्या स्थानावर असल्याचे नमूद केले आहे. हा शासनाच्या नाकर्तेपणाचा परिणाम दिसतो. तरी तुम्ही म्हणणार की, देशात सगळ्यात जास्त गुंतवणूक महाराष्ट्रात होते. पूर्वी किती गुंतवणूक होती आणि ते प्रमाण कुठवर आले आहे याबाबत तुम्ही आत्मपरीक्षण केले पाहिजे. आजची अवस्था जी आहे त्याची कारणे काय आहेत? गेल्या 14 वर्षात राज्य शासनाने अनेक घोषणा केल्या. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासन कटिबध्द आहे असे वारंवार सांगितले गेले. त्याकरिता केळकर समिती नियुक्त करण्यात आली. केळकर समितीचा अहवाल येऊन कित्येक महिने लोटले. विदर्भ, मराठवाड्यातील मंत्री मात्र गप्प आहेत.

सभापती महोदय, पायाभूत सुविधांमध्ये वीज हा घटक सर्वात महत्वाचा आहे. 12-12-2012 रोजी महाराष्ट्र भारनियमन मुक्त करु असे घोषित केले होते. रस्ते, पाटबंधारे यात प्रगती साधण्यात येईल. ते करीत असताना पुणे-नाशिक रस्त्याचे चौपदरीकरण, मुंबई-पोरबंदर, मुंबई बेट जोडण्याचा प्रयत्न करु असे म्हटले होते. कुलाबा-माहिम-चारकोप, चारकोप- बांद्रा-मानखूर्द

...4..



श्री.विनोद तावडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेट्रो रेल्वे प्रकल्प पूर्ण करु असे जाहीर केले होते. कृषी क्षेत्रात स्वामीनाथन अहवालाची अंमलबजावणी करु, कृषी पंपांना मोफत वीज देऊ असे म्हटले होते.

नंतर आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

ग्रामीण भागातील रूग्णांना एक्सरे, इसीजी, व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रक्तपेढीची सुविधा पुरविण्याची आपण घोषणा केली होती. अलिबाग, नंदूरबार, सातारा, मुंबई येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या घोषणा झाल्या होत्या. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी प्रत्येक तालुक्यामध्ये शासकीय आश्रमशाळा सुरू करण्याची घोषणा केली होती. पुणे येथे ललित कला विद्यापीठाची स्थापना करण्याची घोषणा झाली होती. भारतरत्न श्री.सचिन तेंडुलकर यांच्या नावाने क्रीडा संग्रहालय उभारण्याची घोषणा श्री.सुनील तटकरे साहेबांनी केली होती. स्वराज्य निर्मितीचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक उभारण्याची घोषणा झाली होती. सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे वित्त मंत्री होते तेव्हा त्यांनी पाचड येथे जिजामातेचे स्मारक बांधण्याची घोषणा केली होती. त्यासाठी आपल्याला साधी जमीन देखील मिळालेली नाही. गेल्या 14-15 वर्षात केलेल्या घोषणांची आज काय अवस्था आहे हे दाखविण्यासाठीच मी या घोषणा वाचल्या आहेत. सदर घोषणा कोणत्या वर्षी केल्या आहेत यासंबंधातील तारीखवार सर्व माहिती माझ्याकडे आहे.

गेल्या 14 वर्षात रूपये 4.00 लाख कोटींचे कर्ज काढले. खुल्या बाजारातून कर्ज उभारण्याची राज्य शासनाला फेब्रुवारी पर्यंतची मर्यादा होती. ती मर्यादा आता संपलेली आहे. त्यामुळे आपल्याला मार्च पर्यंत नव्याने कर्ज उभारता येणार नाही. मोठे कर्ज उभारून आपण काय साधले यासंबंधी मी मघाशी बोललो आहे. प्रादेशिक असमतोल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पायाभूत सुविधा, विकास याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे, रस्ते, वीज, पाटबंधारे या सगळ्या घटकांकडे राज्य शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे ज्या बाकीच्या घोषणा केल्या होत्या त्या पूर्ण केलेल्या नाहीत. आपण घोषणा करून देखील त्या प्रत्यक्षात आणलेल्या नाहीत. त्यामुळे नवीन घोषणांवर कोणाचा भरवसा राहील.

सन 2014-15 च्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये घोषणा केल्या आहेत. पण निधीची तरतूद न केलेल्या कोणत्या योजना आहेत हे देखील मी सांगणार आहे. व्यवसाय शिक्षण अंतर्गत कौशल्य विकास कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली असून त्यासाठी निधीच देण्यात आलेला नाही. आपत्कालीन वैद्यकीय सेवेची घोषणा करण्यात आली आहे. पण त्यासाठी देखील निधीच देण्यात आलेला नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कोरडवाहू शेती अभियानासाठी पाच वर्षात दहा हजार कोटी रूपये देऊ अशी घोषणा केली होती. आपण दरवर्षी दोन हजार कोटी रूपये द्यायला पाहिजे होते. दहा हजार कोटी रूपयांचे कोरडवाहू शेती अभियान आपल्याला खरोखरच करायचे आहे काय ? गेल्या वर्षी दिलेले 100 कोटी रूपये खर्च झाले नाहीत आणि या वर्षी दिलेल्या निधीचे काय होईल ते माहीत नाही. आपण या अभियानासाठी दरवर्षी 100 ते 125 कोटीच्या वर निधी देत नाही. आपण दहा हजार कोटींची घोषित केलेली ही योजना आहे.

सभापती महोदय, महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्याकरिता समुपदेशन केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याची देखील पूर्तता करण्यात आली नाही. स्वयंसिद्धा प्रशिक्षण कार्यक्रम देखील झाला नाही.

नवी मुंबई विमानतळ देखील अद्याप पर्यंत झाला नाही. टीव्हीच्या जाहिरातीतील माणूस झोपला आणि उठला की त्याला मेट्रो दिसते, विमानतळ दिसतो. पण महाराष्ट्रातील माणूस झोपला की, त्याला नवी मुंबईतील विमानतळ सन 2018 मध्ये दिसणार आहे. त्याला विमानतळ आता दिसणार नाही. सन 2018 पर्यंत नवी मुंबई येथे विमानतळ होणार असल्याची कालच अधिकृत घोषणा झाली.

मुंबई मोनोरेल टप्पा क्रमांक 2, पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प यासंबंधी घोषणा केल्या होत्या. एवढेच नव्हे तर रामटेक गडमंदिर विकास योजनेचा देखील मुद्दा आहे. तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अमळनेर येथील श्री संत सखाराम महाराज समाधीस्थळाचा विकास करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. पर्यटन विकास अंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील म्हैसमाळ, वेरूळ, खुल्ताबाद या पर्यटन स्थळांच्या सुशोभिकरणाची घोषणा केलेली आहे. या सर्वांसाठी आपण किती रूपयांची तरतूद केली आहे ? आम्ही बजेटमध्ये आकडे शोधून काढण्याचा प्रयत्न केला असता त्यासाठी तरतूद केली नसल्याचे आढळून आले. आपण विधिमंडळाच्या पावित्र्याचा आधार घेऊन घोषणा करीत आहात. पण त्या प्रत्यक्षात आणत नाहीत. आपल्याला जर कृती करता येत नसेल तर आपण घोषणा करू नका. विधि मंडळाचे पावित्र्य कमी होईल असे आपण काही करू नका. येथे झालेली घोषणा खोटी ठरली, आपल्याला फसविले असे जनतेला वाटू देऊ नका. राजकीय

..3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

पक्ष म्हणून काय करायचे असेल ते आपण करू. किमान विधान मंडळाचे पावित्र्य कमी करण्याचे पाप आपण करू नये असे मला बजेटच्या भाषणात केलेल्या घोषणा पाहिल्यानंतर वाटते. त्यामुळे नवीन योजनांच्या घोषणांची अंमलबजावणी कितपत होईल हा खरा प्रश्न आहे. गेल्या 15 वर्षात महाराष्ट्र शासनावर 3 लाख 478 कोटी रूपयांच्या कर्जाचा बोजा आहे. एक्स्प्रेस-वे, फ्लाय ओव्हर,नळपाणी पुरवठा योजनांवर खर्च करण्यासाठी कर्ज उभारले हे निदान सांगता तरी येते. आपण ज्या घोषणा केल्या आहेत त्या अंमलात देखील आणू शकलेलो नाहीत. सन 2001 पासून राज्य शासनाने बरेच कर्ज उभारले आहे. सन 2001 पासून ते सन 2014-15 पर्यंत राज्य शासनाने 4,44,529.00 कोटी रूपये कर्ज उभारले असून त्यापैकी काही कोटी रूपयांची राज्य शासनाने परतफेड केलेली आहे. तरी देखील आपले कर्ज शिल्लक राहात आहे.

आताच मी अनेक घोषणांचा येथे उल्लेख केला आहे. कोरडवाहू शेती अभियानासंबंधी आपण घोषणा केली होती. ती आपण खरोखच पूर्ण करणार आहात काय ? गेल्या वर्षी आपण या अभियानासाठी 100 कोटी रूपये दिले होते. या वर्षी आपण 95.00 कोटी रूपये दिलेले आहेत. सदर योजना ही दहा हजार कोटी रूपयांची असून श्री.मुळक साहेब, ती आपल्या विदर्भासाठी फार उपयोग पडू शकते. सदर अभियान नेमके कधी पूर्ण होणार आहे ?

सभापती महोदय, मनोधैर्य योजने संबंधी आम्ही माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील आणि माननीय महिला व बाल विकास मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांच्या खूप जाहिराती आणि घोषणा पाहिल्यात. ही योजना अतिशय चांगली आहे. मी क्राईम रेकॉर्डच्या आधारे माहिती काढली. त्यात सुमारे 700 महिलांवर बलात्कार/अत्याचार झाल्याचे आढळून आले. त्या महिलांना या योजनेचा लाभ मिळायला पाहिजे होता. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर जिल्हा गुन्हेगारी क्षती सहाय्य व पुनर्वसन मंडळ स्थापन करण्यात आले. पण दिनांक 2 ऑक्टोबर 2013 पर्यंत बऱ्याचशा जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आलेल्या नव्हत्या. सदर समित्या स्थापन न झाल्यामुळे आज पर्यंत 751 भगिनींपैकी केवळ 25 भगिनींनाच शासनाकडून मदत देण्यात आली आहे. पीडित महिलांना कुठेना कुठे तरी आधार मिळेल, अशा प्रकारची आपण जोरदार टिमकी वाजवली. प्रत्यक्षात फार कमी पीडित महिलांना त्याचा लाभ मिळालेला आहे.

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, टोल संबंधी मी सुरूवातीलाच उल्लेख केला आहे. मला फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे. श्री.सी.पी.जोशी यांनी दोन वर्षापूर्वी अहवाल दिलेला आहे. तो जरी अंमलात आणला तरी आपल्या विरोधातील जनतेचा अर्धा रोष कमी होईल. आपल्याकडे एखादा कार्यकर्ता आला की, त्याला इंजिनिअरिंग, मेडिकल, आटर्स-सायन्स-कॉमर्स कॉलेज दिले जाते. एवढेच नव्हे तर शाळा देखील दिली जाते, दारूचा ठेका दिला जातो. ते जर जमत नसेल तर मग टोलचा ठेका दिला जातो. घे आणि कमव हे आपल्या शासनात सुरू झाले आहे की काय असे मला वाटते. तो टोल गोळा करण्याचा ठेका आपण कार्यकर्त्याला दिलेला आहे. तो ठेका दिला असल्यामुळे काढून कसा घ्यायचा असा प्रश्न आता आपल्या समोर आहे. श्री.सी.पी.जोशी यांच्या शिफारशी चांगल्या होत्या. त्याची अंमलबजावणी केली असती तर राज्यातील 24 टोल नाके बंद होऊन 300 कोटी रूपये आपल्याकडे जमा झाले असते. दोन टोल प्लाझा मधील अंतर 35 च्या ऐवजी 45 कि.मी.असावे अशी त्यांनी शिफारस केली होती. आताचे जे अंतर आहे ते कमी आहे. परंतु, त्यांची शिफारस आपण मान्य केली नाही. सर्व टोल सेंट्रल सर्व्हरमार्फत एकमेकांना जोडले जावेत अशी देखील शिफारस करण्यात आली आहे. ती देखील मान्य करण्यात आलेली आहे. आपण असे केले तर किती वाहने जातात हे त्यातून कळून येईल.

मध्यंतरी टोलच्या विरोधात आंदोलन झाले. त्याबाबत बैठक देखील झाली. मग पृथ्वी-राज फॉर्म्युला झाला. म्हणजे पृथ्वीराज चव्हाण असे मला म्हणावयाचे आहे. हा पृथ्वी-राज फॉर्म्युला आल्यानंतर आम्हाला वाटले की, महाराष्ट्र आता टोलमुक्त होणार. पण आता कराडला घोषणा झाली की, असे काही ठरलेच नाही. यात खरे कोणाचे, खोटे कोणाचे देव जाणो.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पात आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजनेची घोषणा राज्य शासनाने केली होती व त्याकरिता 73 कोटी रुपयांच्या निधीची तरतूदही केली होती. परंतु सन 2012-2013 व सन 2013-2014 या दोन वर्षाच्या कालावधीत या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच या योजनेकरिता सन 2012-2013 या आर्थिक वर्षाकरिता तरतूद करण्यात आलेल्या 73 कोटीच्या निधीचा विनियोग नक्की कोठे व कोणत्या कारणास्तव झाला याचाही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, पोलीस भरती प्रक्रियेमध्ये राज्य पोलीस दलात येणाऱ्या पाच वर्षात पाच टप्प्यामध्ये एकूण 61,494 पदे भरण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात सुमारे 12,379 पदे निर्माण करण्यात येणार असून राज्य सुरक्षा आयोग व पोलीस तक्रार प्राधिकारणासाठी 133 पदे निर्माण करण्यास व या सर्वांकरिता 566 कोटी तरतूद राज्य शासनाने या वर्षीच्या अंतरिम अर्थसंकल्पात केली आहे. याबाबत मला असे नमूद करावेसे वाटते की, शासनाने दिनांक 15 जुलै, 2013 रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये दिनांक 22/09/2006 रोजीच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलीस तक्रार प्राधिकरणाची पुनर्रचना करण्याकरिता समिती स्थापन करण्याची घोषणा केली होती. परंतु आजपर्यंत या समितीचे गठन करण्यात आलेले नाही. या समितीचे गठन करण्याबाबत दिनांक 15 जुलै, 2013 रोजी शासन निर्णय निर्गमित केला असतांनाही आजमितीपर्यंत 220 दिवसांचा प्रदीर्घ कालावधी उलटूनही समिती गठीत न करण्याची कारणे काय आहेत ? या विलंबाकरिता जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कठोर कारवाई करण्याचे अपेक्षित असल्याने शासन दोषीवर कारवाई करणार आहे काय ?

सभापती महोदय, मुंबईमध्ये नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. या वर्षीच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये मुंबईतील पी डीमेलो मार्गावारील एस.व्ही.पटेल जंक्शन ते शीव-पनवेल रस्त्यावरील पांजरपोळ जंक्शनर्यंतचा पूर्व मुक्त मार्ग, मिलन सब वे येथील रेल्वे ओलांडणी पूल व सहार उन्नत मार्ग खुला करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु सन 2003 मध्ये शासनाने सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोड बांधण्याची घोषणा केली. सदरहू लिंक रोडचे काम सन 2005

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु संथगती शासन, अकुशल प्रशासक यांच्या निद्रावस्थेमुळे या प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष सुरु होण्यासाठी सन 2007 साल उजाडावे लागले. त्यामुळे हा प्रकल्प आता कधी पूर्ण होणार आहे याची काही सुध्दा माहिती देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, फेज 1 च्या मेट्रोची घोषणा सन 2006-2007 मध्ये झाली व सदरचा प्रकल्प सन 2010-2011 पर्यंत पूर्ण करावयाचा होता. परंतु 4 वर्षाच्या प्रदीर्घ विलंबानंतर सुध्दा मेट्रो प्रकल्प अजून सुरु करण्याची नजीकच्या काळात कोणतीही चिन्ह दिसून येत नाहीत.

सभापती महोदय, मोनो रेलच्या संदर्भात पाहिले तर प्रदीर्घ विलंबानंतर मोनो रेल सेवा सुरु झाली परंतु तब्बल 3 वर्षाच्या विलंबानंतर शासनाने मोनो रेल सेवा सुरु करुन स्वत:चा गौरव करुन आपली पाठ थोपटून घेतली आहे. मेट्रो रेल्वे पीपीपी मॉडेलवर तयार झाली असून यात राज्य शासनाला पाठ थोपटून घेण्याचे कारण काय ? आपण हे काम केलेले नसतांना आपण पाठ थोपटून घेतली आहे. जो विद्यार्थी पास होत नसतो तो काठावर पास झाला तर त्याच्या आई वडिलांना फार आनंद होत असतो तसा प्रकार यासंदर्भात आहे.

सभापती महोदय, केंद्राच्या अर्थसंकल्पात नमूद असलेल्या परंतु राज्य शासनास विसर पडलेल्या बाबीच्या संदर्भात सांगू इच्छितो केंद्रीय अर्थमंत्री श्री. चिदमबरम यांनी सन 2014 च्या अर्थसंकल्पात दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर पूर्णत्वास नेण्याबाबत नमूद केले होते. परंतु राज्य शासनाने जणू सदरच्या कॉरिडॉरचे महत्व जाणले नाही. अथवा त्या कॉरिडॉरचा तसेच डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर असो अथवा विरार-अलिबाग मल्टी नोडल कॉरिडॉर असो, शासनास जणू या संकल्पनेचा विसर पडल्याचे दिसून येते. हे सर्व करीत असतांना आर्थिक शिस्त पूर्णपणे बिघडत गेली, कर्ज वाढत गेले असतांनाही हे सरकार नवीन नवीन घोषणा करीत आहे. आता तर प्री कॅबिनेट, पोस्ट कॅबिनेट, दोन कॅबिनेटमध्ये कॅबिनेट, 100 कोटी रुपये याला देऊ, 50 कोटी रुपये त्याला देऊ अशा घोषणा हे सरकार करीत आहे.

सभापती महोदय, काल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले त्यामुळे मला फार आश्चर्य वाटते. त्यांनी सांगितले की, या वर्षामध्ये 5-6 महिने आचार संहिता राहणार असल्यामुळे योजनांसाठी पैसे द्यावेच लागणार नाहीत. परंतु ही सर्व परिस्थिती येणार आहे हे आपल्याला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

अगोदर माहिती असतांनाही आपण घोषणा का करता ? मला यासंदर्भात काही पत्रकारांनी चिंतेने विचारले की, हे सरकार मोठमोठया घोषणा करीत असल्यामुळे जनता यांच्या मागे जाईल. मी पत्रकारांना सांगितले की, या सरकारने सन 2004 मध्ये मोफत विजेची घोषणा केली, 3 महिने शून्य बिल दिले व चौथ्या महिन्यात विजेचे पूर्ण बिल आले.

2000 च्या झोपडयांच्या संदर्भात घोषणा करण्यात आली परंतु नंतर प्रिटींग मिस्टेक झ ााल्याचे श्रीमती प्रभा राव यांनी सांगितले. यासंदर्भात मी पत्रकारांना लहानपणी आपल्या सर्वांना माहीत असलेली गोष्ट सांगितली . एक टोपी विकणारा असतो. तो प्रत्येक गावामध्ये जाऊन टोपी विकत असतो. दुपारी हा माणूस एका झाडाखाली जेवतो, झोपतो परंतु उठल्यानंतर त्याच्या सर्व टोप्या माकडांनी पळवल्याचे त्याला दिसून येते. माकड कॉपी करते हे टोपीवाल्याला माहिती असते त्यामुळे टोपीवाला पान तोडून टाकतो. माकडेही पान तोडून खाली टाकतात. टोपीवाला काडी तोडून टाकतो तर माकडेही काडी तोडून खाली टाकतात. त्यानंतर टीपीवाला डोक्यावरील टोपी काढून खाली टाकतो तर माकडेही त्यांच्या जवळची टोपी खाली टाकतात. माकडांनी टोप्या खाली टाकल्याबरोबर टोपीवाला टोप्या गोळया करुन निघून जातो. 10 वर्षानंतर त्या टोपीवाल्याचा पुतण्या पुन्हा त्याच गावात टोप्या विकावयास जातो. टोपी विकून झाल्यानंतर शिल्लक टोप्यांसह दुपारी पुन्हा त्याच झाडाखाली टोपीवाला झोपतो. झोपेतून उठून बघतो तर माकडांनी टोप्या पळवून नेल्याचे दिसून येते. पुतण्याही पान तोडून टाकतो, काडी तोडून टाकतो. माकडेही पान तोडून, काढी तोडून खाली टाकतात. टीपीवाला टोपी काढून खाली टाकतो परंतु माकडे टोपी खाली टाकत नाही. एक माकड खाली उतरुन त्या टोपीवाल्याच्या मुस्कटात वाजवून सांगतो की, जशी तुझ्या काकाने तुला गोष्ट सांगितली तशीच गोष्ट माझ्याही काकाने मलाही सांगितली आहे. त्यामुळे सन 2004 ची गोष्ट या पुतण्याला माहिती नसली तरी ती येथील लोकांना चांगली आठवते हे आपण विसरु नका. त्यामुळे या अर्थसंकल्पाचा गोषवारा एका वाक्यात सांगावयाचा झाला तर "होऊ दे खर्च" हे जसे वाक्य आहे तसेच "होऊ दे कर्ज, बुडवून टाकू महाराष्ट्र" या पध्दतीने अर्थसंकल्प मांडणार असू तर आर्थिक बेशिस्त,या राज्याचे ढासळलेले नियोजन या सर्व गोष्टी या अर्थसंकल्पात आलेल्या आहेत. त्यामुळे "होऊ दे कर्ज" असा नारा घेऊन दादा पुढे जात आहेत. त्यामुळे यासंदर्भात आपल्या सारख्या माणसाने तरी याला पाठिंबा देऊ नये एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, कोणतीही करवाढ नसणारा, सर्वसामान्यांना दिलासा देणारा, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक महिला, युवक, आदिवासी, मच्छीमार इत्यादी घटकांच्या सामाजिक, आर्थिक व औद्योगिक प्रगतिपथावर राज्याला नेणारा सन 2014-2015 या वर्षाचा जो अंतरिम अर्थसंकल्प काल माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी या सभागृहाला सादर केला त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सुमारे 15 वर्षापासून आमचे आघाडी सरकार जनतेने दिलेल्या विश्वासावर राज्यकारभार करीत असून पुढील 25 वर्षे सुध्दा आघाडी सरकार राज्यकारभार करणार आहे. पुनश्च आमची सत्ता देशात व राज्यात प्रस्थापित होईल अशी अपेक्षा ठेवून मी माझ्या भाषणाला सुरुवात करतो.

आघाडी शासनाच्या कालखंडात राज्यातील दरडोई उत्पन्नात घसघशीत वाढ झाली असून दरडोई उत्पन्न 1 लाख 5 हजार 493 रुपयांपर्यंत झालेले आहे. सर्वसामान्य जनतेच्या दरडोई उत्पन्नात वाढ झालेली आहे. औद्योगिक विकासात राज्य देशात अग्रेसर आहे. औद्योगिक विकासात गुजरात राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. देशातील थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. औद्योगिक प्रस्तावाच्या एकूण गुंतवणुकीपैकी सर्वाधिक 18 टक्के वाटा एकटया महाराष्ट्राचा आहे. सध्या राज्यात 10 लाख 21 हजार 633 कोटी रुपयांची विक्रमी गुंतवणूक झालेली आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, चालू आर्थिक वर्षात 9 हजार 725 कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या 25 नवीन विशाल प्रकल्पांना राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे.

सभापती महोदय, औद्योगिक प्रोत्साहन योजनेंतर्गत 2 हजार 500 कोटी रुपयांची तरतूद माननीय अर्थ मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. औद्योगिक क्रांती झाल्याशिवाय जातीयता व विषमता नष्ट होणार नाही. महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असे आहे की, ज्या राज्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांना वेळोवेळी न्याय दिलेला आहे.

सभापती महोदय, रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी "अल्ट्रा मेगा" प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली असून त्या अंतर्गत 3 लाख 21 हजार 91कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून त्यातून 3 लाख 57 हजार लोकांना रोजगार देणाऱ्या 403 विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, राज्य योजनेचे आकारमान 51 हजार 222 कोटी 54 लाख रुपये निश्चित करण्यात आलेले आहे. या आकारमानाच्या 11.8टक्केप्रमाणे 6 हजार 44 कोटी 26 लाख रुपये अनुसूचित जाती उपाययोजनेसाठी आणि 9.4 टक्के प्रमाणे 4 हजार 814 कोटी 92 लाख रुपये नियतव्यय आदिवासी उपाययोजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती उपाययोजनेंतर्गत प्राप्त होणारा नियतव्यय हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या विविध शैक्षणिक-आर्थिक-सामाजिक व विकास कामांच्या योजनांसाठी वाटप करण्यात येतो. अनुसूचित जाती उपाययोजनेकरिता आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनाने कायदा करावा व त्याबाबतची शिफारस राज्य शासनाने केंद्र सरकारकडे करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, युपीएच्या नेत्या माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाने राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना लागू करण्यात आलेली आहे. या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील 8 कोटी 77 लाख लाभार्थ्यांपैकी 1 कोटी 77 लाख लाभार्थ्यांचे दायित्व राज्य शासन उचलणार आहे.

सभापती महोदय, भांडवली खर्चासाठी 2 हजार 253कोटी रुपये व तूट भरुन काढण्यासाठी 761 कोटी रुपयांची तरतूद राज्य शासनाने अर्थसंकल्पात केली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हे अर्थसंकल्पाला जोरदार पाठिंबा देत आहेत. समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी त्यांचे भाषण शांतपणे ऐकून घेतले पाहिजे. त्यांच्या भाषणात अडथळा होत असेल तर आपण त्यांना संरक्षण दिले पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्यांची भाषणे लिहून घेतली जातात. परंतु सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचे भाषण प्रोसिडींगमध्ये बोल्डमध्ये घेतले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य दलित समाजाबद्दल बोलताना शांतपणे बोलत असतात. परंतु आज ते इतक्या मोठ्याने बोलत असल्यामुळे आम्हाला वाटले की, ते पक्षाला दम देत आहेत.

श्री.सुभाष चव्हाण : आम्हाला परत सत्तेवर यायचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अर्थसंकल्पाला जोरदारपणे पाठिंबा देत आहेत. त्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांना सांगणार आहेच परंतु माननीय श्रीमती सोनिया गांधी यांना खास पत्र लिहून सन्माननीय सदस्यांनी जोरदार भाषण केले असे त्यांना कळविणार आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मुंबई हे देशातील अग्रगण्य औद्योगिक राजधानीचे शहर आहे. देशातील पहिला मोनोरेल प्रकल्प मुंबईत उभारला जात आहे त्याला मतदारांनी, मुंबईकरांनी उत्तम प्रतिसाद दिलेला आहे. मोनोरेल प्रकल्पाचा एकूण खर्च 2 हजार 460 कोटी रुपये असून या प्रकल्पाचा लाभ सुमारे 2 लाख प्रवाशांना होणार आहे.

सभापती महोदय, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प मेट्रोमार्ग-1 वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर प्रकल्प लवकरच कार्यान्वित होत आहे. 2 हजार 356 कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा सुमारे 6 लाख प्रवाशांना लाभ होणार आहे.

सभापती महोदय, विजेच्या एकूण मागणीपैकी राज्यात 97 टक्के मागणीची पूर्तता राज्य शासनाने केलेली आहे. 84 टक्के वीजग्राहक भारनियमनमुक्त करण्यात येणार आहेत. राज्य शासनाने वीजदर सवलतीसाठी 9 हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. अनुसूचित जाती, गरीब माणूस केंद्रबिंदू असून त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था केलेली आहे. इंदिरा

..3..



AJIT/ MMP/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे... 12:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

आवास योजनेंतर्गत 2014-2015 मध्ये 1 लाख 82 हजार 363 घरांचे उद्दिष्ट शासनाने गाठलेले आहे.

सभापती महोदय, नागरी आणि ग्रामीण भागात अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी रमाई आवास योजना राबविण्यात येत आहे.

सभापती महोदय, महिलांच्या सक्षमीकरणासाठी अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला असून, स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी परिणामकारक ठरणाऱ्या सुकन्या योजनेसाठी 187 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पातून विकास कामांवर जास्तीत जास्त खर्च व्हावा अशी माननीय वित्त मत्र्यांची अपेक्षा आहे आणि तसे त्यांचे प्रयत्नही आहेत. प्रत्येक 100 रुपयातील फक्त 11 रुपये 91 पैसे विकास कामांसाठी उपलब्ध होणार आहेत, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, काल या सदनामध्ये येणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन जेमतेम चार दिवसांच्या अधिवेशनात लेखानुदान मांडण्यात आले. लेखानुदान म्हटले तर त्यास काही अर्थ नाही म्हणून अंतरिम अर्थसंकल्प मांडत आहोत असे सांगण्यात आले. आपण बढाया कशा मारल्या त्याचा लेखाजोखा म्हणजे हा अंतरिम अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, मी अर्थसंकल्पावर बोलण्यापूर्वी अत्यंत तीव्रपणाने मराठी भाषेच्या संदर्भात या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये अन्यायकारी पाऊल उचलल्याबद्दल शासनाचा निषेध करतो. दादा येथे उपस्थित असते तर त्यांच्यासमोर बोललो असतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नवीन कार्यालय झाले त्यावेळी दादांना भेटायला अनेकजण आले होते. त्यावेळी एकाने विचारले की, दादा, मराठी भाषेसाठी काय करणार ? त्यावेळी दादांनी सांगितले की, "100 कोटी रुपयांच्या खाली एक रुपया देणार नाही." ही त्यांच्या कार्यालयामध्ये झालेली खाजगी चर्चा आहे. त्याचा शासनाशी काही संबंध नाही. पण हा मानसिकतेचा विषय आहे. मराठी भाषेसाठी फक्त 15 कोटी 60 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मी त्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला असता मला असे समजले की, हा सर्व निधी कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होणार आहे. मागील तीन वर्षापासून मराठी भाषेच्या संदर्भात योजना राबवीत आहात त्या पूर्णत्वाला जात नाहीत त्याकरिता किती निधी उपलब्ध करणार आहात ? शासनाचा मराठी भाषेप्रती असलेला जिव्हाळा लक्षात घेऊन श्री.चपळगावकरांनी राजीनामा दिलेला आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या संदर्भात शासन भविष्यात काय करणार आहे ? केंद्रात तो अहवाल पाठविला आहे हे आपण जाहीर केले. मराठी भाषा भवन उभारणार अशी सरकारने घोषणा केली होती. सेंट झेव्हीअर कॉलेजच्या बाजूला रंगभवन येथे जागा आहे. आता तेथे कार्यक्रम करता येत नाहीत आणि हा चांगला निर्णय होता.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

श्री.दिवाकर रावते....

माननीय मुख्यमंत्र्यांना तातडीने अभिनंदन करणारे पत्र पाठवत असतानाच पूर्ण मराठीकरिता तुम्ही समर्पित होत नाही याबाबत खेद व्यक्त करणारे पत्र पाठविले. त्या ठिकाणी पूर्णत: मराठी भाषा भवन उभे राहणार असताना त्या ठिकाणी एक पाचर मारुन ठेवण्यात आली. त्या ठिकाणचा काही भाग हिंदी भाषिक आणि इतर भाषिकांसाठी राखून ठेवला. सन्माननीय सदस्य श्री.कृपाशंकर सिंह यांच्या मेहेरबानीने बांद्रा येथील स्मशानभूमीसमोर हिंदी भाषा भवन उभे राहिले. परंतु त्या ठिकाणी एक इंच जागा सुध्दा मराठी लोकांसाठी ठेवली नाही. महाराष्ट्रात मराठी माणसाचे सरकार असताना घोषणा करुनही मराठी भाषा भवन बांधता आले नाही या बद्दल मी पहिले पत्र पाठविले. त्यामध्ये अशी सूचना केली की, मराठी भाषा भवन बांधत असताना बाहेर छत्रपती आणि कुसुमाग्रज यांचे पुतळे असावयास पाहिजे. तसेच ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे पुतळे आणि त्यांच्या नावाने दालन उभे करुन मराठी भाषा भवनामध्ये साहित्यिक वारसा कसा आहे याचे वेगळे दर्शन निर्माण करण्याबाबत सूचना केली. परंतु मराठी भाषा भवनाच्या बाबतीत अंतरिम अर्थसंकल्पात एका शब्दाचा देखील उल्लेख नाही. माझे मित्र या बाबतीत तरी माझ्याशी सहमत होतील. महोदय, मराठी भाषेची अवहेलना असह्य होते. मराठी भाषिकांचे सरकार असताना, मराठी राजभाषा असताना, मराठी मायबोली असताना हे सर्व घडत आहे. आमच्या मायबोलीला स्वत:च्या घरात उंबरठ्याच्या बाहेर उभे राहण्याची वेळ येते त्यावेळी खरोखरच मनापासून दु:ख होते. या संदर्भात आपल्याकडे खूप चर्चा झाली आहे. मराठीची झालेली घुसमट मांडून मी आता अंतरिम अर्थसंकल्पावर बोलणार आहे.

महोदय, आम्ही विरोधी पक्षात असल्यामुळे अर्थसंकल्पावर टीका करणारच. कारण ती आमची भूमिका असते. काल अर्थसंकल्प मांडल्यानंतर बऱ्याच वर्तमानपत्रांनी अर्थसंकल्पाच्या बाबतीत जे छापायचे होते ते छापलेले आहे. महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्राच्या संपादकीय लेखात नमूद केले आहे की, " हंगामी अर्थसंकल्पामध्ये दाखविलेली महसुली तूट आणखी वाढण्याची शक्यता आहे." महोदय, आजच्या घडीला ही तूट 5 हजार कोटी रुपयांची आहे. जुलै महिन्यामध्ये जेव्हा पूर्ण अर्थसंकल्प मांडण्यात येईल त्यावेळी गेल्या चार महिन्यात आलेल्या तुटीमुळे आता योजनांना लावण्यात आलेला 25 टक्के कट 40 टक्क्यावर जाईल. पुढे असे नमूद केले आहे की, "सत्तेत येणे जमले नाही तर त्याची काळजी आघाडीने कशाला करावी ?" महोदया,

श्री.दिवाकर रावते....

अर्थसंकल्पाच्या माध्यमातून हे देऊ, ते देऊ असे करुन थापा मारण्यात आल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचा सरकारवर विश्वास असल्यामुळे ते अंतरिम अर्थसंकल्पाचे कौतुक करीत होते. परंतु सरकारची प्रवृत्ती काय, परिस्थिती काय, वागण्याची पध्दत काय आणि आजपर्यंत चालविलेल्या राज्यकारभारामध्ये राजकीय इच्छाशक्ती काय याचा लेखाजोखा मांडून तज्ज्ञ जाणकारांनी अर्थसंकल्पाचे वर्णन वाजले तर वाजले नाही तर गाजराची पुंगी असे केले आहे.

महोदय, सकाळ वर्तमानपत्रात माननीय श्री.अजितदादा पवार यांचे थोडे थोडे कौतुक करण्यात आले. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील, सामना दैनिकाच्या अग्रलेखाचा मथितार्थ एवढाच आहे की, आता तुमच्यात अर्थसंकल्प मांडण्याची योग्यताच नाही. सकाळमध्ये नमूद केले आहे की, "तज्ज्ञच नव्हेत तर राज्यातील जनताही या उपक्रमाकडे सरकारची धोरणात्मक दिशा जाणून घेण्याच्या दृष्टीने पाहत असते. त्या मुद्यांचा विचार करता अर्थमंत्र्यांनी थोडीशी निराशा केली. गेल्या 10 वर्षातील आर्थिक वाटचालीचे चित्र अर्थमंत्र्यांनी रेखाटले, तसेच पुढच्या 10 वर्षांच्या वाटचालीचे रेखाचित्रही त्यांनी रेखाटायला हवे होते." परंतु तसे केले नाही. मागचे पुढचे सर्व सपाट आहे. आम्ही आता घरीच चाललो असल्यामुळे आम्हाला काही द्यायचे नाही आणि घ्यायचे नाही असा हा प्रकार आहे. मग कशाला पुढील रेखाचित्र रेखाटायचे ?

महोदय, लोकसत्ता वर्तमानपत्रातील लेखाने तर कहरच केला आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी आम्ही काही साधू संत नाही असे म्हटले होते. लोकसत्ता वर्तमानपत्राच्या लेखात नमूद केले आहे की, "अपेक्षा अशी आहे की, निदान साधू या शब्दाच्या विरुध्दार्थी वचनाने संभावना करावी लागेल असा राज्यकर्ता नसावा." याचाच अर्थ माननीय श्री.अजितदादांना साधू म्हणवून घेण्याचा अधिकार नाही असे लोकसत्तातील संपादकीय लेख म्हणतो. पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, "महाराष्ट्राची आज जी अवस्था झाली आहे ती का झाली याचे उत्तर शोधावयाचे असल्यास पवार यांचा अर्थसंकल्प पहावा. या राज्यात यापुढे प्रत्येक 100 रुपयांतील 11 रुपये 90 पैसे इतकीय रक्कम भांडवली कामांसाठी उपलब्ध असणार आहे." पुढे असे नमूद केले आहे की, "परिस्थिती बिकट असते तेव्हा हात जरा जपून चालवायचा असतो आणि दौलतजादा कमी करायचा असतो. महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांना ते मंजूर नसावे. ज्या पध्दतीने गेल्या काही महिन्यात राज्य सरकारने घोषणांची सरबत्ती केली आहे ती पाहता राज्यात

..3..



SJB/ MMP/ D/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

दिवाळी की दिवाळे असा प्रश्न पडावा." परंतु सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांच्या लक्षात हे आले नसेल. पुढे असेही नमूद केले आहे की, "कालचा अर्थसंकल्प हा अर्थसंकल्प न म्हणता संभाव्य अर्थसंकल्प असे म्हणावे लागेल. अशाच अनर्थकारणामुळे आपण अजित आहोत असे जर कोणास वाटत असेल तर तो भ्रम ठरेल". कालच्या अंतरिम अर्थसंकल्पाची मांडणी प्रमुख वर्तमानपत्रांच्या संपादकांनी उपरोक्त प्रमाणे केली आहे. महोदय, शासनाला अधिकाऱ्यांकडून जी आकडेवारी मिळत असते ती अर्थसंकल्पात मांडावी लागते. गेल्या 10 वर्षांत काय केले हे कालच्या अर्थसंकल्पामध्ये नमूद केले आहे. सरकारने आपलीच पाठ थोपटून घेतली आहे. गेल्या 10 वर्षात उद्योग काढले, दलितांना नोकऱ्या मिळाल्या, दलितांचे अमुक झाले, तमुक झाले असे सांगितले गेले. मी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांना सांगू इच्छितो की, आपण कालच्या अर्थसंकल्पाचे आत्मचिंतन केले तर आपण चुकलो असे तुम्ही म्हणाल याची मला खात्री आहे.

महोदय, कालच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये गेल्या दशकात राज्यातील दरडोई उत्पन्नात 24 हजार 35 रुपयांवरुन 1 लाख 5 हजार 493 रुपयांपर्यंत घसघशीत वाढ झाल्याचे नमूद केले आहे. म्हणजेच दलितांच्या घराचे दरडोई उत्पन्न 1 लाखाच्या वर गेले आहे असे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. एका अर्थाने दलितांची आर्थिक उन्नती झाल्याचे नमूद केले आहे.

महोदय, अर्थसंकल्पात जन्मदर घटल्याचे देखील नमूद केले आहे. 21 टक्के असलेला जन्मदर 16.7 टक्क्यांवर आल्याचे नमूद केले आहे. पूर्वी सभागृहात विनोदाने म्हटले जायचे की, माननीय श्री.अजितदादा यांच्यामुळे राज्यात भारनियमन करावे लागत असल्यामुळे किंबहुना अंधार असल्यामुळे लोकसंख्या वाढत आहे. परंतु आता माननीय श्री.अजितदादा यांनी इतका उजेड पाडला की, राज्यातील जन्मदराचे प्रमाण घटले आहे. तसेच मृत्यू दर 7.5 टक्कयांवरुन 6.3 टक्क्यांवर आल्याचे नमूद केले आहे. अर्भक मृत्यू दरात सुध्दा घट झाल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. अर्भक मृत्यू दर हा राज्य आणि देशासमोरील गंभीर विषय आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत मृत्यू दर आणि अर्भक मृत्यू दराविषयी अधिकारवाणीने बोलतात. कारण ते आरोग्य क्षेत्रात काम करतात. जर अर्भकांचा मृत्यू दर घटला असेल तर ते खरोखरच कौतुकास्पद आहे.

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पुढे म्हटले आहे की, राज्यातील दरडोई उत्पन्न 1 लाख 26 हजार रूपयांनी वाढले आहे. सभापती महोदय, म्हणजेच सर्वजण श्रीमंत झाले आहेत. माननीय सोनिया गांधी यांची अत्यंत आवडती अशी योजना देशात आली आणि ती म्हणजे अन्न सुरक्षा योजना. आता सर्वजण त्यामागे हात धुऊन लागले आहेत. काँग्रेसचे सर्वजण म्हणत आहेत की, हे झालेच पाहिजे. दरडोई उत्पन्न एवढे वाढले, 10 वर्षांत एवढी श्रीमंती आली तर मग अन्न सुरक्षा योजनेच्या मागे आपण का लागला आहात ?

आपण आकडेवारीमध्ये असे म्हटले आहे की, ग्रामीण भागातील 4 कोटी 70 लाख आणि शहरी भागातील 2 कोटी 30 लाख अशा 7 कोटी लाभार्थ्यांना या योजनेखाली सवलतीत धान्य मिळणार आहे. पिवळ्या व केशरी रंगाच्या रेशन कार्डांकरिता हे आहे. 1 लाख रूपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी हे आहे. राज्यातील लोकसंख्या साडे दहा कोटी आणि त्यातील 8 कोटी 77 लाख लोक दरिद्री आहेत. असे या अर्थसंकल्पात सांगण्यात येत आहे. कोणत्या समृध्द महाराष्ट्राची संकल्पना आपण आम्हाला सांगत आहात ? या पुस्तकामध्ये सरकार अधिकृतपणे आपली पाठ थोपटण्याकरिता कशा योजना राबवीत आहे, ते सांगत आहे. शासन सांगत आहे की, आमच्या राज्यात आम्ही देशापेक्षा चांगली योजना राबवीत आहोत. गेल्या 10 वर्षांत महाराष्ट्रातील लोकांना सर्वात जास्त दरिद्री कोणी केले असेल तर ते या सरकारने केले आहे. साडे दहा कोटी जनतेपैकी 8 कोटी 77 लाख जनता दरिद्री आहे. फक्त 1 कोटी 73 लाख जनता यामध्ये येत नाही. ही समृध्दी आहे का ? हा तुमच्या भाषेत दरिद्री अर्थसंकल्प आहे. आम्ही मांडलेला नाही. तुम्ही दरिद्री असा शब्द मांडला आहे, म्हणजेच दारिद्र्य रेषेखालील. मग आपण कशासाठी दरडोई उत्पन्न एवढे वाढले असे सांगता ? राज्यातील 80-85 टक्के जनता दारिद्र्य रेषेखालील असेल तर, त्यांना जेवणाकरिता, पोट भरण्याकरिता स्वस्त अन्न देण्याची पाळी आली असेल तर आपण कोणत्या भ्रमात सर्व जनतेला सांगता की, आम्ही या राज्याचा विकास केला. देशाच्या तत्कालीन माननीय पंतप्रधान इंदिरा गांधी ह्या सन 1984 साली मरण पावल्या. त्यांनी "गरीबी हटाव" असा नारा दिला होता. तुम्ही तो नारा सन 2013 मध्ये अंमलात आणण्यास सुरूवात केली. काँग्रेसने या देशात गरिबी वाढविल्याचे दिसत आहे. माननीय इंदिरा गांधी यांचे स्वप्न पूर्ण करण्यास एवढी वर्षे

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

लागली. आता दारिद्र्य वाढविल्यानंतर माननीय इंदिरा गांधीचा नारा घेऊन पुन्हा आला आहात. इतक्या वर्षांनी, "गरीबी हटा देंगे, अन्न सुरक्षा विधेयक काम में लाऐंगे", अशी ती घोषणा इतक्या वर्षांनी आणली आहे. हे दरिद्री राज्य असल्याचे दरिद्री अर्थसंकल्पातून सांगत आहेत.

सभापती महोदय, एक अत्यंत विनोदाची बाब आहे. मी मनरेगा या शब्दाचा अर्थ विचारला. मात्र या शब्दाचा अर्थ कोणीही सांगितला नाही. म म्हणजे काय, न म्हणजे काय हे अजूनही कोणी सांगत नाही. मनरेगा म्हटले नाही. अधिकारी हुशार झाले, सरकारही हुशार झाले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार म्हटले. मनरेगा म्हटले नाही. तसे म्हटले की वाढवावे लागते. मला काही तरी द्या असे म्हटले जाते. तसे नाही. कोणीतरी म्हटले आणि काही तरी आले. आता ते सर्व सुरू झाले. सभापती महोदय, त्याच्यातील खुलासा अत्यंत विद्रूप आहे. गुजरातचे नाव प्रत्येक वेळी का घेतले जाते, हे समजत नाही. गुजरातचे नाव तुम्ही घेता, आम्ही घेत नाही. अमुक एक हे गुजरातपेक्षा जास्त आहे, गुजरातपेक्षा आमच्याकडे समृध्दी आली आहे, असे म्हटले जाते. आनंद आहे. तुम्ही समृध्दीचे लक्षण म्हणून या अर्थसंकल्पातून अन्न सुरक्षा विधेयकात दरिद्री नारायणाचे दर्शन आम्हाला घडविले. आपण माणसामध्ये देव पाहतो. गाडगेबाबांनी देखील सांगितले आहे. माणसातील देव म्हणून दरिद्री नारायण आम्हाला तुम्ही दाखविला. अर्थसंकल्पात महात्मा गांधी ग्रामीण रोजगाराच्या संदर्भात गेल्या 3 वर्षांत या योजनेवर 4 हजार 500 कोटी खर्च केल्याचे सांगितले आहे. आपण सांगितले आहे की, 4 हजार 500 कोटी रूपये खर्च झाले आणि 1 हजार 410 लाख मनुष्यदिवस कामात आले. हा हिशेब कसा काढायचा ? किती लोकांनी काम केले हे कसे समजणार ? एका महिन्याला 15 दिवस आणि वर्षाला 15 गुणिले 12 असे काढायचे का ? मला हिशेब लागेना. अधिकाऱ्यांना या संदर्भात विचारले असता त्यांनाही सांगता येईना. फेब्रुवारी, 2011 मध्ये 127 रूपये रोज होता, एप्रिल, 2012 मध्ये 145 रूपये रोज होता, एप्रिल, 2013 मध्ये 162 रूपये रोज केला. विविध दर असल्यामुळे एकूण 4500 कोटी रूपये खर्च झाले. याचाच अर्थ राज्यात अनेक जण उपाशीपोटी आहेत. त्यांना तुम्ही मोफत अन्न दिले. परंतु, 2 रूपयांचे अन्नही विकत घेण्याची त्यांची ऐपत नाही. त्यामुळे रोजगार हमी योजनेच्या कामावर जातात.

..3



श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, करोडो लोक रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये दाखविले जातात. खरे किती, खोटे किती, यामध्ये मी जात नाही. आकडेवारीच्या सहाय्याने राज्यात पुन्हा दारिद्र्य कसे निर्माण झाले ते सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. आपण मोफत घरांची योजना मांडली. ती योजना कितपत यशस्वी आहे, हे आपल्यालाही माहीत आहे. ग्रामीण भागात काय परिस्थिती आहे ? गरिबांना मोफत घरे देणार असे म्हटले आहे. मी खोलात जात नाही. आम्ही गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सदनात सातत्याने विचारला आहे. आम्ही त्यांना मोफत घरे दिली पाहिजेत असा आग्रह धरतो. मागच्या वेळी सोडत काढली, त्यामध्ये 3 हजार लोकांना घरे दिल्याचे जाहीर केले. 3 हजार लोकांची लॉटरी लागली. 11 लाख रूपये किंमत ठरली. आम्ही भांडून, युनियनशी बोलून ती किंमत 7 लाखांवर आणली. मुंबई बँक बुडाली, त्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. मुंबई बँकेने कर्ज देतो असे सांगितले. फक्त 225 लोकांना घरे मिळाली. लॉटरी लागून दीड वर्षे झाली आहेत. अजूनही लोकांना घरे मिळत नाहीत, घेता येत नाहीत. गिरणी कामगार उद्‌ध्वस्त झाले. गिरणी कामगारांचे 25-30 वर्षे जीवन खराब झाले. ते कसे तरी दिवस काढत आहेत. वारसदारांचे अस्तित्व संपत आले आहे. आपण त्यांना मुंबईत मोफत घरे द्या. मुंबई घडविण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. मुंबई त्यांच्यामुळे उभी राहिली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांचा सर्वात मोठा सहभाग आहे. गिरणी कामगारांनी राज्याला 23 हुतात्मे दिले. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी हा विषय काढल्यानंतर ही माहिती पटलावर आली. 23 गिरणी कामगारांनी बलिदान दिले, त्यांना मोफत घरे दिली. वारसदारांच्या संदर्भात अजूनही काही होत नाही.

सभापती महोदय, गिरणी मालकांना एकूण जमिनीच्या पोटी मिळालेले पैसे 56 हजार कोटी रूपये आहेत. गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याकरिता फक्त 15 हजार कोटी रूपयांचा खर्च आहे. 10 टक्के खर्च जरी त्यांच्याकडून घेतला तरी हे होऊ शकते. गिरण्यांच्या जमिनी सरकारच्या होत्या. शासनाने त्यांना त्या जमिनी लिजवर दिल्या होत्या. लिज संपले होते तरी काम सुरू होते. मालकी नसताना त्यांच्या मालकीच्या जमिनी म्हणून त्या जमिनी विकण्यास त्यांना परवानगी दिली. त्यातील एक वाटा, 1/3 वाटा जरी कामगारांकरिता देऊन 56 हजार कोटी रूपयांतील 15 हजार कोटी रूपये यासाठी दिले तरी हे होऊ शकते. एनटीसीच्या जमिनी उपलब्ध आहेत. मी या संदर्भात

..4



श्री. दिवाकर रावते ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागे हिशेब दिला आहे. गिरणी कामगारांना मोफत घरे दिली पाहिजेत. आपण बाकीच्यांना मोफत घरे देण्याचे कौतुक सांगत आहात, ते बाजूला ठेवा. राज्यातील, मुंबईतील मूळ अस्सल मराठी माणसाला, गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याची योजना तातडीने राबवावी, अशी सूचना मी करतो. सदर प्रकरणाच्या संदर्भातील कोणताही उल्लेख अंतरिम अर्थसंकल्पात नाही. गिरणी कामगारांना वाऱ्यावर सोडणारा हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, मी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी नेहमीच बोलत असतो. सावकारी विधेयक येण्याकरिता किती वर्षे लागली, आम्ही किती संघर्ष केला, हे सर्वांनाच माहीत आहे. विधेयकाच्या वेळी मी या संदर्भात बोलेनच. ते विधेयक आजही अपुरे आहे. विधेयकाच्या माध्यमातून सावकारांना वाचविण्याचे काम केले जाणार आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी कोरडवाहू शेतीच्या संदर्भात धोरण आखणार असल्याबाबत सांगितले आहे. ते धोरण कुठे आहे ? आम्हाला अजूनही दिसलेले नाही. आमच्याकडून त्या संदर्भात अजूनही सूचना मागविलेल्या नाहीत. आता 2 वर्षे झाली आहेत. अंतरिम अर्थसंकल्पात कोरडवाहू शेती अभियान, सर्वंकष पीक विमा योजना असा उल्लेख केला आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मागील वेळी शेतीच्या बाबतीतील विषय मांडत असताना मी असे सांगितले होते की, ऊसासाठी राज्यातील 80 टक्के पाणी द्यावे लागते व ती फार गंभीर गोष्ट आहे. त्यावेळी सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी असे उत्तर दिले होते की, रावते साहेब, आपला हा विषय आम्ही महत्त्वाचा मानला आहे, बहुतेक ऊस कारखान्यांच्या क्षेत्रात ठिबक सिंचनाच्या माध्यमातून येत्या तीन वर्षात पाणी घ्यावे लागेल. अन्यथा, पाण्याचा वापर करता येणार नाही, अशा प्रकारचा निर्णय शासन घेईल. परंतु, त्या संदर्भातील कोणताही उल्लेख अर्थसंकल्पात नाही. या संदर्भात शासनाने कोणती उपायोजना केली, तरतूद केली, ठिबक सिंचनासाठी कशा प्रकारचे नियोजन केले, याचा कसलाही उल्लेख अर्थसंकल्पात नाही. राज्यातील शेतकरी देशोधडीला लागणार नाही, याची काळजी घेत असताना सदनात जाहीर झालेल्या योजना आणि कोरडवाहू शेतकऱ्यांना पाणी देण्याबाबतची जी संकल्पना होती, ती यामध्ये जाणवत नाही, हे मी अत्यंत कष्टाने मांडत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी दलितांच्या संदर्भातील विषय त्यांच्या भाषणात मांडला आहे. परंतु, त्याबरोबरच मला हे सांगावयाचे आहे की, मुसलमानांना खूश करणारा हा अर्थसंकल्प आहे. मुसलमानांच्या संदर्भात अर्थसंकल्पाच्या भाषणात 5 परिच्छेद आहेत. यापूर्वी मदरशांच्या बाबतीत सदनात अतिशय गंभीर चर्चा झालेली आहे. जर मदरसे शैक्षणिक संस्था असतील तर त्यामध्ये नमाज कशासाठी पढला जातो, बांग कशासाठी दिली जाते ? हा अभिनव उपक्रम आहे, मी त्याचे कौतुक करतो. परंतु, अशा प्रकारच्या मदरशांना शासन मदत करणार आहे का ? अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केल्यानुसार जर मदरशांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, मराठी, उर्दू शिकविले जाणार असेल तर मी या घोषणेचे निश्चितपणे कौतुक करीन, त्यासाठी शासन अभिनंदनास पात्र आहे.

सभापती महोदय, मला आणखी एक प्रश्न पडतो की, भाषण तयार करीत असताना प्रशासनाची अक्कल कोठे जाते ? यामध्ये "विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, मराठी, उर्दू", असा उल्लेख आहे. मराठीचे स्थान सुरुवातीला का नाही ? मराठी, विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, उर्दू असे का छापलेले नाही ? मराठीचा क्रमांक शेवटी दाखविला

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आहे. या शासनाला आणि प्रशासनाला काय झाले आहे, तेच कळत नाही. ते मराठीचा एवढा व्देष का करतात ? मराठीचा क्रमांक सुरुवातीलाच असला पाहिजे आणि तो त्या भाषेचा अधिकार आहे. कारण, या राज्याची राजभाषा मराठी आहे. या राज्यात मायबोलीचा काही अधिकार नाही का ?

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केल्याप्रमाणे या मदरशांमध्ये हे विषय शिकविले जातील की नाही, याबद्दल मला शंका आहे. मी मराठवाड्यातील मदरसे बघतो, अनुभवतो. त्यामुळे तेथे हे होईल की नाही, याबद्दल मला शंका आहे. तुमचा उद्देश कितीही चांगला असला तरी त्यांचा धर्मवाद तुम्ही थांबवू शकणार नाही, हा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे अल्पसंख्यांकांच्या नावाखाली मुसलमानांना खूश करण्याकरिता तयार केलेला हा अर्थसंकल्प आहे. या विषयाच्या खोलात जावे की नाही, हा देखील एक प्रश्न आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती जमातींकरिता शिष्यवृत्तीचा विषय अर्थसंकल्पीय भाषणात आहे. राज्यातील कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून काही कृषी महाविद्यालये चालविली जातात. त्याचप्रमाणे राज्यात काही पुढाऱ्यांची देखील खाजगी महाविद्यालये आहेत. पुढाऱ्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अनुदान महाविद्यालयांना दिले जाते. परंतु, कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अनुदान त्या महाविद्यालयांना दिले जात नाही. यापूर्वी मी हा विषय सभागृहात मांडला होता. त्यावेळी सामाजिक न्याय विभागाचे माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी सांगितले होते की, आम्ही याबाबत विचार करीत आहोत, ताबडतोब अनुदान देण्याची व्यवस्था करीत आहोत. परंतु, अद्यापही हे अनुदान मिळालेले नाही. हा भेदभाव कशासाठी आहे ? सरकारी महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही आणि पुढाऱ्यांच्या खाजगी महाविद्यालयांना मात्र शिष्यवृत्तीचे अनुदान दिले जाते. वास्तविक पाहता, शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्याच्या बँक अकाऊंटमध्ये जमा व्हावयास पाहिजे. परंतु, खाजगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयांकडे दिली जात आहे. या अनुदानाचे नंतर काय होत असेल, हा आणखी संशोधनाचा विषय आहे.

...3....



SRR/ KTG/ D/ प्रथम श्री.मंगेश कांबळे........ 13:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

सभापती महोदय, स्त्रीभ्रूणहत्या हा एक महत्त्वाचा विषय आहे. त्या बाबतीतही अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केलेला नाही. या संदर्भात अतिशय कडवट आणि कडक धोरण निर्माण झाले पाहिजे. हा काही पक्षीय विषय नाही. यापूर्वीच्या काही घटनांमध्ये डॉ.मुंडे आणि अन्य आरोपींना पकडण्यात आले होते. जळगाव, धुळे, बीड येथे काही घटना घडल्या होत्या. त्या आरोपींचे नंतर काय झाले ? हे आरोपी तुरुंगात आहेत, याची मला कल्पना आहे. परंतु, फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करुन लवकरात लवकर आरोपींना शिक्षा देण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता होती. तशा प्रकारची कृती शासनाकडून झालेली नाही. या घटनांना आता 3 वर्षे झाली आहेत. या प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई झाली आणि त्यांना शिक्षा झाली तर समाजात एक वेगळा संदेश जाईल आणि भविष्यात असे गुन्हे घडणार नाहीत. अशा गंभीर विषयाकडे बघत असताना सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी एक अतिशय चांगले अभियान राबविले होते. त्याचे निश्चितपणे कौतुक केले पाहिजे. परंतु, शासन मात्र आपल्या कृतीने हे कौतुक नाकारीत आहे, असा त्याचा अर्थ होतो किंवा मग हे अभियान म्हणजे प्रचाराचे एक नाटक होते, असाही अर्थ काढला जाऊ शकतो. शासन जर या विषयामध्ये गंभीर नसेल आणि काही कृती करण्यास तयार नसेल तर हे अभियान म्हणजे प्रचाराचे एक नाटक होते, असाच अर्थ निघेल. हा विषय अतिशय गंभीर आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय भाषणात समुपदेशन केंद्राबाबतचा उल्लेख करण्यात आला आहे. आता मी जे काही मांडणार आहे, ते कदाचित आपल्याला आवडणार नाही. आता काही सिनेमे आले आहेत, त्या सिनेमांचे कौतुकही झाले आहे आणि त्यांनी करोडो रुपये कमाविलेही आहेत. आजही हे सिनेमे चित्रपटगृहात हाऊसफुल जात आहेत. सिनेमा सुरु असताना शिट्या वाजविल्या जात आहेत, लहान मुले सिनेमा बघत आहेत, चांगली मजा सुरु आहे. टिनएजर लव्ह, टाईमपास आणि फाऊंड्री, अशी या सिनेमांची नावे आहेत. कला म्हणून या कलाकृती निश्चितपणे चांगल्या आहेत व त्याचे कौतुक केले पाहिजे. परंतु, त्या माध्यमातून समाजात आणि विशेषत: लहान मुलांमध्ये जाणारा संदेश गंभीर परिस्थिती निर्माण करणारा आहे. या माध्यमातून जी परिस्थिती निर्माण झाली आहे किंवा भविष्यात निर्माण होणार आहे, त्यासाठी शासन कोणाकोणाचे

...4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समुपदेशन करणार आहे, त्यासाठी किती केंद्रे लागतील ? कारण, उद्या हा प्रश्न घराघरात निर्माण होणार आहे. सज्ञान व्यक्तीची वयोमर्यादा किती असावी, या संदर्भात मागील काळात वाद निर्माण झाला होता. 18 वर्षावरुन 16 वर्षे करावे, असा मतप्रवाह होता. परंतु, तो निर्णय झाला नाही. आज 14 वर्षे, 15 वर्षे वयाच्या मुलांमध्ये प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांचे समुपदेशन कसे करणार आहात, याबाबत शासनाची भूमिका काय आहे, हे आम्हाला समजले पाहिजे. अशा पध्दतीने हा विषय समाजामध्ये जावा का, हा देखील विचार करण्यासारखा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आता एक नवीन निर्णय झाला आहे. कुटुंबाला एकत्रितपणे दूरचित्रवाणीवर काही चित्रपट बघणे शक्य नसल्यामुळे अशा चित्रपटांचे प्रसारण बंद करण्यात आले होते. आता रात्री उशिरा आक्षेपार्ह दृश्ये न कापलेले चित्रपट बघण्यास मुभा देण्यात आली आहे. रात्री कितीही उशिरा असे चित्रपट दाखविण्यास मुभा दिली तरी मुले रात्री लवकर झोपतात का ?

सभापती महोदय, कालपरवा राज्य पुरस्कारांचे वितरण झाले व त्यावेळी मी उपस्थित होतो. राज्याचे मंत्री महोदयही उपस्थित होते. तेथे शाहिरांना आमंत्रित केले होते. त्यांनी असे सांगितले की, पूर्वी आम्ही गावात वग घेऊन गेल्यानंतर लोकांकडून अशी विचारणा व्हायची की, वग कोणता आहे ? नंतर पुढची पिढी आली आणि गावात गेल्यानंतर अशी विचारणा होऊ लागली की, कोणत्या लावण्या सादर करण्यात येणार आहेत ? त्यानंतर पुढची पिढी आली आणि गावात गेल्यानंतर अशी विचारणा होऊ लागली की, वग आणि लावण्या जाऊ द्या, यामध्ये ब्रेक डान्स आणि अन्य डान्स आहेत का ? त्यानंतर पुढची पिढी आली आणि अशी विचारणा होऊ लागली की, फक्त एवढेच सांगा, बाया किती आहेत आणि गाड्या किती आहेत ? अभिरुची कशा प्रकारे बदलली आहे, हे शाहिरांनी अतिशय चांगल्या शब्दात त्या कार्यक्रमात सांगितले आहे.

सभापती महोदय, मला या निमित्ताने हे सांगायचे आहे की, भविष्यात शासनाला समुपदेशनासाठी फार मोठा खर्च करावा लागणार आहे. शासनाने आता 35 जिल्ह्यात ही योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. या अर्थसंकल्पात केलेली तरतूद खूप कमी आहे. शासनाची ही तरतूद, मानसिकता आणि डॉक्टर अपुरे पडणार आहे.

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

सभापती महोदय, आणखी एक गंभीर विषय आहे. नांदेड येथे 135 लव्ह जिहादी पकडण्यात आले. हा विषय मी यापूर्वीही सभागृहात मांडला होता. त्यावेळी मी अधिकाऱ्यांचे कौतुक केले होते. नंतर त्यांना दुसऱ्या क्राईम ब्रँचला पाठविले. लव्ह जिहादने संपूर्ण महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात धुमाकूळ घातलेला आहे. सिल्लोड मध्ये एका राष्ट्रवादी समर्थक कार्यकर्त्याने 133 लव्ह जिहादच्या केसेस सोडविल्या, त्यामधील मुली घरी पोहोचविल्या. त्यामुळे सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित दादा पवार यांनी त्याला शाबासकी दिली. नांदेडमध्ये लव्ह जिहादमध्ये सामील असलेल्यांवर जेव्हा आमचे लोक तुटून पडले, त्यावेळी मुसलमान दुखावला जाता कामा नये म्हणून पोलिसांनी त्यांना कान फाटेपर्यंत मारले. त्यांना 65 टक्के बहिरत्त्व आले आहे. मी स्वत: आय.जी. यांना भेटावयास गेलो होतो. त्यानंतर चौकशी सुरु झाली. त्यांनी मला एवढेच सांगितले की, शिवसैनिकांनी आम्हाला माहिती दिली असती तर आम्ही कारवाई केली असती. परंतु, पोलीस कारवाई करीत नाही म्हणून शिवसैनिक हल्ला करतात.

यानंतर श्री.मारोती शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

पोलिसांच्या बैठकीमध्ये मला असे सांगण्यात आले की, "शिवसैनिकांना एकदम हल्ला करण्यास सांगू नका, आमच्याकडे माहिती द्या, आम्ही कारवाई करु." पोलीस काही कारवाई करीत नसल्यामुळे आम्हाला अशा गोष्टी कराव्या लागतात. सरकारने जे समुपदेशन केन्द्र सुरु केलेले आहे ते केन्द्र लव्ह जिहादच्या बाबतीत समुपदेशन करण्यासाठी अजिबात पाऊल उचलणार नाही. कारण मुस्लिम समाज दुखावला तर आमचे काय होईल, अशी भीती सरकारला आहे. तेव्हा याबाबतीत शासन काय करणार हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझ्या बरोबर कोणी येत असेल तर राज्यातील किती रस्त्यांचे डांबरीकरण झालेले आहे ते मी त्यांना दाखवीन. मी मराठवाड्यामध्ये 8 दिवस फिरत होतो. बीड, नांदेड, परभणी या जिल्ह्यातील रस्त्यांचे डांबरीकरण पाहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. डांबरीकरणाचे पैसे कोठे गेले यासंबंधी चौकशी लावावी असे सांगण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये उद्योगधंद्याच्या वाढीसाठी ज्या काही गोष्टी सांगितलेल्या आहेत त्या निरर्थक आहेत. काल मी या सदनामध्ये टोलचा विषय मांडला. टोल हा विषय सामान्य माणसाचा आहे की गाडीवाल्यांचा आहे ? हा विषय निश्चितपणे गाडीवाल्यांचा आहे. मुंबईमध्ये पेट्रोलचे दर वाढविले. त्याबाबतीत सामान्य माणसाचा संबंध आला नाही. या सदनामध्ये विमानतळांच्या विकासाची कल्पना मांडली. आपण राज्यामध्ये विमानतळाचे जाळे निर्माण करु असे सांगण्यात आले. आपण कशा बद्दल आपली पाठ थोपटून घेत आहात ? ही विमानतळे कशासाठी करीत आहात ? विमानतळाच्या देखभालीसाठी 165 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. ही विमानतळे कोणासाठी आहेत ? सामान्य माणसासाठी ही विमानतळे आहेत काय ? नांदेडचे विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे केले. लातूरचे विमानतळ मोठे केले, कोल्हापूरचे विमानतळ मोठे केले, क-हाडचे विमानतळ यशवंतराव चव्हाण यांच्या काळापासून आहे. अकोल्याला विमानतळ झाले नाही तर अकोल्यातील जनतेचा जीव घुटमळेल. त्यांना कोणी तरी असे सांगितले की, विमानतळ आले की, उद्योगधंदे वाढतील. मी आपणास राज्यातील सर्व विमानतळांची नावे देतो. त्या त्या ठिकाणी किती उद्योगधंदे वाढले ते मला सांगावे. छोट्या छोटया विमानतळासाठी तिजोरीतील करोडो रुपये खर्च होत आहेत. आजच्या परिस्थितीमध्ये नांदेडला विमान जात नाही. लातूरला विमान जात नाही. केन्द्रीय मंत्री आदरणीय श्री. शरद पवार हे अकोल्याला आले होते. राष्ट्रवादीचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

केन्द्रीय मंत्री श्री. प्रफुल पटेल्ल यांनी अकोला येथे मोठे विमान उतरवून दाखवले. सर्व विमानतळे नुसती पडून आहेत. त्या ठिकाणची वाहतूकही बंद झाली आहे. विमानतळाचा ध्यास घेऊन तुम्ही कशासाठी फिरत आहात ? जी विमानतळे आहेत ती आधी सुरु करा. या विमानतळांवर राजकीय पक्षाची नेते मंडळी खाजगी विमाने घेऊन जातात. या व्यतिरिक्त तेथे कोणतीही विमान सेवा उपलब्ध नाही. यवतमाळच्या विमानतळाला कोणाचे नाव द्यायचे यावरुन मोठे आंदोलन झाले होते. मी म्हटले संत गाडगे महाराजांचे नाव द्या. परंतु त्यांना दर्डाजींचे नाव द्यायचे होते. त्या विमानतळावर शिवसैनिकांची गर्दी लोटल्यानंतर पोलिसांची एकच धावपळ झाली. शिवसैनिकांना पोलिसांनी अटक केली आणि त्या विमानतळाला दर्डाजींचे नाव देण्यात आले. विमानतळ हा काय कौतुकाचा विषय आहे ? नागपूर येथील मिहान प्रकल्पाच्या कामास गती देऊन तो पूर्ण केला तर विमान क्षेत्रामध्ये एक मोठी क्रांती घडेल आणि महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर रेव्हेन्यू मिळेल. हा आशियातील मध्यवर्ती असा प्रकल्प असून तो प्रकल्प अजून होत नाही हे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, आता दूरदर्शन वाहिन्यांवरुन एक जाहिरात दाखविण्यात येते. "इथे शाळा होती, कुठे गेली ? इथे हॉस्पिटल होते, कुठे गेले ? इथे विमानतळ होते कुठे गेले ? इथे ब्रिज होता, कुठे गेला ? तुम्हाला काय वेड लागले आहे, इथे ब्रिज, विमानतळ वगैरे काही नाही." मुंगेरीलालच्या स्वप्नाप्रमाणे ही जाहिरात दाखविण्यात येते. मला वाईट वाटते की, नागरी वाहतुकीसंबंधीची ही बनवाबनवी अधिकृतपणे जाहिरातीद्वारे सांगितली जात आहे. मुंबईमध्ये मोनोरेल चालू झाली. सर्वांना कौतुक वाटले. पहिल्या दिवशी प्रवाशांची झुंबड उडाली. आता ती मोनोरेल परवडत नसल्यामुळे कोणी जात नाही. "मुंबई मोनोरेल" असे इंग्रजीमध्ये लिहिलेले आहे. त्या मोनोरेलमध्ये ब्रिटन, अमेरिका या देशातील माणसे बसण्यासाठी येणार आहेत काय ? मुंबईतील मराठी माणसे आणि गावाकडून आलेली माणसे कौतुकाने त्या मोनोरेलमध्ये बसणार आहेत. "मुंबई मोनोरेल" असे इंग्रजीमध्ये नाव लिहिलेले आहे. अंबानीने रिलायन्स मेट्रो असे नाव लिहिले होते. त्याबाबतीत सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर रिलायन्स मेट्रो हे नाव तसेच राहिले आणि त्या नावाच्या खाली मराठीमध्ये नाव लिहिले गेले. आमच्या मायबोलीला कोणीही जुमानत नाही. मला सांगायला खेद होतो की, माझ्यासारख्या एखाद्याला जर कधी राग आला तर तो काच

..3..



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वगैरे फोडून टाकील. मग सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याबद्दल त्याच्यावर गुन्हा दाखल केला जाईल. म्हणजे आमच्या आईचे संरक्षण देखील आम्ही आमच्या राज्यामध्ये करायचे नाही अशी राज्यामध्ये अवस्था आहे. अशी ही बनावाबनवी या चित्रपटाप्रमाणे बनवाबनवी करणारा हा अर्थसंकल्प आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. हा दरिद्रीनारायणाचा अर्थसंकल्प मंत्री महोदयांनी अभिमानाने मांडला असला तरी कोणतीही आशा बाळगावी अशा प्रकारचा हा अर्थसंकल्प नाही. येत्या निवडणुकीमध्ये लोक या बाबतीत नक्कीच उत्तर देतील.

सभापती महोदय, मी एका गोष्टीचे या ठिकाणी कौतुक करतो. डॉ. नितीन राऊत हे राज्याचे मंत्री आहेत. त्यांनी झेपेल तेवढे काम केले आणि त्याचा अहवाल त्यांनी आमच्या हातामध्ये दिला. दुष्काळावरील चर्चेच्या वेळी मी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला होता. पश्चिम महाराष्ट्रामध्ये 82 कोटी रु.ची कामे केली आणि मराठवाड्यासाठी 183 कोटी रु.ची तरतूद केलेली असून कामे प्रगतिपथावर आहेत असे त्यांनी सांगितले. आपण जे काही केले ते सचित्र मांडून त्यांचा अहवाल आम्हाला दिला. हे काम कौतुकास्पद आहे. हे काम पुरेसे नसले तरी मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो आणि त्यांचे अभिनंदन करतो. मंत्र्यामध्ये अशा प्रकारची राजकीय जागृती असेल आणि पैसे न खाता बंधारे उभे रहात असतील तर धरणे गायब होणार नाहीत याची काळजी दुसऱ्यांनी घ्यावी एवढेच मी या ठिकाणी सांगतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल आपल्या सभागृहामध्ये राज्याचा सन 2014-2015चा अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला. या अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चेच्या माध्यमातून राज्याच्या एकूण अर्थव्यवस्थे बद्दल, कार्यकुशलते बद्दल आणि ध्येयापर्यंत पोहोचणाऱ्या मार्गांबद्दल एक साधकबाधक चर्चा आपल्या सभागृहामध्ये घडत आहे याचा मला विशेष आनंद वाटतो.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच या अर्थसंकल्पाशी संबंधित नसला तरी राज्याच्या दृष्टीने, राज्याच्या शिक्षण क्षेत्राशी संबंधित असलेल्या मुंबईतील महाविद्यालयाचा उल्लेख करु इच्छितो. युनिव्हर्सिटी ग्रॅण्ट कमिशनने देशभरातील कॉलेजेसची गुणवत्ता तपासून मुंबईच्या रुईया कॉलेजला प्रथम क्रमांक दिला आणि त्याबद्दल त्या कॉलेजला 2 कोटी रुपये दिले ही महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने एक अभिमानाची गोष्ट असल्यामुळे मी मुद्दाम या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. सरकारच्या धोरणांचा परिणाम म्हणून या गोष्टी आपल्याला दृश्य स्वरुपात दिसतात आणि त्यामुळे अशा गोष्टींचे आपण मनापासून कौतुक केले पाहिजे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि आदरणीय ज्येष्ठ नेते श्री. दिवाकर रावते यांनी साहजिकच काल रात्री विविध माध्यमामध्ये झालेली चर्चा, वेगवेगळया अर्थतज्ज्ञांनी मांडलेली मते आणि आज या अर्थसंकल्पाबद्दल वेगवेगळया प्रमुख वर्तमानपत्रानी आपल्या परीने या अर्थसंकल्पाबद्दल केलेले विवेचन याचा उल्लेख केला.

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 13:30

श्री.हेमंत टकले....

लोकसत्ता या दैनिकामध्ये संपादकीय लेख 'अनर्थ संकल्प' अशा स्वरुपाचा आहे. साधारणपणे आपण जेव्हा प्रत्यक्ष अर्थमंत्र्यांचे भाषण ऐकतो, त्या भाषणाची छापील प्रत आपल्याला मिळते, त्या अनुषंगाने आवश्यक असलेली प्रकाशने दिमाखदार बॅगेमध्ये भरुन कुपनाद्वारे वितरित करण्यात येतात. ती प्रकाशने आपल्यापैकी किती जण वाचतात हा सुध्दा प्रत्येकाने स्वत:ला विचारण्यासारखा प्रश्न आहे. बहुतेक जणांची बॅग पीए किंवा कर्मचारी घेऊन जातात. त्यावेळी पहिली सूचना दिली जाते की, त्या बॅगेतील सर्व प्रकाशने काढून एका पोत्यात भरा आणि बॅग गाडीत ठेवा. साधारणपणे 5 हजार रुपये एका बॅगेची किंमत असावी असा अंदाज आहे. दरवर्षी या निमित्ताने माननीय सदस्यांना बॅग देण्याकरिता शासन 25 लाख रुपये खर्च करते. आज मला या निमित्ताने चर्चेत सहभागी होत असताना गिल्टी कॉन्शस किंवा अपराधीपणाची भावना वाटते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी असा उल्लेख केला की, काही सदस्य आपल्या स्वीय सहाय्यकांना सांगतात की, बॅगेतील प्रकाशने गोणपाटात टाका आणि रिकामी बॅग गाडीत ठेवा. हा उल्लेख संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे हे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

श्री.हेमंत टकले : तो उल्लेख पटलावरुन काढला तरी मला चालेल. परंतु व्यक्तिश: मला अपराधीपणाची जाणीव झाली. मला वाटते ही सगळी मानसिकता आहे ती वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत पाझरत गेली आहे. जे जे काही आपल्याला विनाकष्ट, विनासायास मिळते ते अधिकाधिक आपल्यापर्यंत पोहोचावे आणि त्यात अधिकचे वाटेकरी कसे होणार नाहीत या दृष्टीने समाजाची मानसिकता होणार असेल तर शासन कोणाचेही असो, जोपर्यंत या प्रवृत्तीला आळा घातला जात नाही तोपर्यंत याबाबत आपल्याला सुधारणा करता येणे शक्य नाही. त्यामुळे अर्थसंकल्पातील आकडेवारी आणि त्यामधून दिसणारे दृश्य परिणाम, कर्जबाजारीपणा, व्याजाकरिता दिली जाणारी रक्कम, समाजाला एकत्रित ठेवून समाज पुढे नेण्यासाठी जे उद्दिष्ट आहे ते साध्य करण्यासाठी चाललेली धडपड या सगळ्या गोष्टीमध्ये एक प्रकारचा प्रचंड विरोधाभास निर्माण होतो. अर्थ विषयक जाणीव प्रत्येकाला हवी. त्यातील भाषा समजणे तेवढी सोपी नाही. ती समजावून घ्यायची असेल तर तुम्हाला कोणा तज्ज्ञाबरोबर चर्चा करायला हवी. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायला हवे. त्याप्रमाणे मला शिकविणा-या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांकडे जाऊन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.हेमंत टकले....

त्यांच्याबरोबर बसून या अर्थसंकल्पाविषयी त्यांना अर्थतज्ज्ञ म्हणून काय वाटते या संदर्भात मी त्यांचे मार्गदर्शन मिळविले. या अर्थसंकल्पावर आपण नजर टाकली तर साहजिकच समोरुन पहिला जो आक्षेप आला आणि वृत्तपत्रांमध्ये वारंवार उल्लेख झाला की, हे निवडणुकीचे वर्ष आहे, निवडणुका तोंडावर आल्या आहेत त्यामुळे भरपूर असे काही दिल्याचा आभास निर्माण केला आहे. वास्तविक एकूण कार्यकाळ 12 महिन्यांचा असतो. त्यापैकी 4 महिन्याची तरतूद म्हणून अंतरिम अर्थसंकल्प मांडला आहे. याचा अर्थ 4 महिने म्हणजे जवळजवळ 33 टक्के कालावधी आहे, त्याकरिता हा अर्थसंकल्प आहे. हाच अर्थसंकल्प त्याच मार्गाने पुढे नेणार आहोत. निवडणुका समोर आलेल्या आहेत म्हणून या अर्थसंकल्पाकडे पूर्वग्रहदूषित नजरेने बघू नये अशी मला सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे. अर्थसंकल्पामध्ये अनेक प्रकारची आकडेवारी दिलेली आहे. परंतु मूळ उद्देश ज्याप्रमाणे मांडण्यात आला आहे त्यामध्ये कोणत्या गोष्टीवर केंद्रीभूत होऊन अर्थसंकल्पाची मांडणी करण्यात आली आहे याचाही आपण सगळ्यांनी विचार करण्याची गरज आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.नीलम गो-हे)**

सभापती महोदया, अन्न, रोजगार, निवारा आणि आरोग्य या चार प्रमुख गोष्टी केंद्रीभूत करुन त्यासाठी तरतूद करणे आणि तरतूद चांगल्याप्रकारे कशी वापरली जाईल, त्याचा फायदा किंवा लाभ कसा पोहोचला जाईल या उद्देशाने अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षेबाबत विरोधाभासासारखी परिस्थिती असल्याचे माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले. राज्याचे दरडोई उत्पन्न वाढत असताना राज्यात 7 कोटी लाभार्थ्यांपर्यंत अन्न सुरक्षा मोहिमेच्या योजनेतून जाणार आहात अशा प्रकारचा युक्तिवाद त्यांनी मांडला आहे. आताच्या युपीए सरकारची घोषणा आहे, त्याबद्दल मनामध्ये असलेली अढी त्या निमित्ताने बाहेर पडत आहे ही चांगली गोष्ट आहे. एकूण अर्थशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर एखाद्या घरामध्ये जर योग्य प्रकारे मनरेगा अंतर्गत रोजगार निर्माण झालेला असेल आणि त्यामधून काही उत्पन्न येत असेल, त्या उत्पन्नातील मोठा हिस्सा घरातील कुटुंबीयांच्या अन्नासाठी खर्च झाला तर इतर गोष्टीवर खर्च करता येणार नाही. त्यामुळे त्या कुटुंबाला अन्नावरचा खर्च मर्यादित ठेवून इतर उत्पन्न आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी, प्रगतीसाठी खर्च करावा. याबद्दल अर्थशास्त्रात असे सांगितले आहे की,

...3...





श्री.हेमंत टकले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रत्येक माणसाची क्रयशक्ती वाढविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक सरकारने केला तर त्या द्वारे आर्थिक प्रगती होण्यासाठी फार मोठा हातभार लागतो. त्या आर्थिक प्रगतीमधूनच देशाची प्रगती निश्चितपणे साध्य होते.

सभापती महोदया, साखर उद्योगाबद्दल बोलले गेले. सर्वसामान्य माणसाला योग्य भावात साखर मिळावी यासाठी साखरेचे दर स्थिर राहण्यासाठी जी योजना आहे ती योजना या निमित्ताने महत्वाची आहे. त्यामुळे त्यातून येणारी तूट भरुन काढण्यासाठी आणि भांडवली खर्चासाठी केलेली तरतूद अतिशय योग्य स्वरुपाची आहे. मघाशी व्यवसाय शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमाचा उल्लेख झाला. प्रत्येक राज्यकर्त्याची अशी मनोभावना असते की, जे परंपरेने चालत आलेले आहे, जे शिक्षण प्रचलित पध्दतीतून मिळते त्यापेक्षा नव्या विज्ञानाशी, नव्या तंत्रज्ञानाशी जोडणारे कौशल्य शालेय स्तरापासून मिळत गेले तर ते कौशल्य पुढील आयुष्याच्या प्रवासाकरिता निश्चितपणे उपयोगी पडू शकते. त्यामुळे व्यवसाय शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमासारखे महत्वाचे कार्यक्रम या योजनेमध्ये अंतर्भूत केले आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये 40 मंत्री आहेत. सभागृहामध्ये फक्त एकच मंत्री महोदया उपस्थित आहेत. यापूर्वी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण सुरु असताना सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाच्या बाजूला अनेक मंत्री आणि अनेक माननीय सदस्य उपस्थित होते. आता माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे भाषण सुरु असताना सत्ताधारी पक्षातील माननीय सदस्य देखील सभागृहातून बाहेर गेले आहेत. सत्ताधारी पक्षाच्या बाजूच्या माननीय सदस्यांनी माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांच्या भाषणावर बहिष्कार टाकला आहे का? सभागृहामध्ये असे चित्र यापूर्वी मी कधी पाहिले नव्हते.

नंतर क्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

त्यामुळे माझ्या मनामध्ये संशय येत आहे. कॉंग्रेसचा फक्त एकच मंत्री बाहेर गेला असता तर मला काही वाटले नसते. पण दोन्ही पक्षातील माननीय मंत्री सभागृहाबाहेर गेलेले आहेत. तेव्हा माननीय मंत्री नेमके जातात कुठे, सभागृहापेक्षा अधिक महत्त्वाचे कोणते काम आहे हे सभागृहाला समजले पाहिजे. फक्त चार दिवसांचे अधिवेशन ठेवलेले आहे. चार दिवसांच्या अधिवेशनासाठी सभागृहाची ही अवस्था असेल तर ती योग्य नाही. आता माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना सभागृहात पाठवून देण्यात आले आहे. सभागृहात आदिवासी विकास मंत्री, महिला व बाल विकास मंत्री म्हणून बसावे असे सांगून त्यांना पाठविण्यात येत आहे. आम्हाला सभागृहात बसायला वेळ नाही. ही जी मंत्रिमंडळाची मानसिकता आहे ती बरोबर नाही. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या जनतेला संदेश देण्याचे काम ठीक नाही. शासकीय कामकाज घेण्यासाठी अधिवेशन घेण्यात आले आहे. विरोधी पक्षाचे कुठलेही कामकाज घ्यायचे नाही, त्यांना बोलू द्यायचे नाही असे आपण ठरविले आहे. विरोधी पक्षाला बोलायला दिले तर आपले कपडे उतरविले जातील, महाराष्ट्राच्या जनतेसमोर आपण उघडे पडू असे आपल्याला वाटते. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब करावे. माननीय वित्त राज्यमंत्री यांना येऊ द्यावे. या सभागृहाचे कामकाज व्यवस्थितपणे चालले पाहिजे. येथे मांडलेला प्रत्येक मुद्दा माननीय मंत्र्यांना समजला पाहिजे. त्याचे उत्तर येथे आले पाहिजे. येथे माननीय वित्त मंत्री देखील उपस्थित नाहीत. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. त्यामुळे येथे माननीय वित्त मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यकच असते. नियमबाह्य पद्धतीने सभागृहाचे कामकाज आम्ही चालवू देणार नाही. त्यामुळे यासंबंधी तातडीने योग्य तो निर्णय घेण्यासाठी सभागृहाचे कामकाज 10.00 मिनिटांसाठी तहकूब करावे अशी माझी सूचना आहे. सभागृहाचे कामकाज सुरू असताना माननीय मंत्री कुठे कुठे गेले होते, ते सभागृहात का थांबत नाहीत हे देखील आम्हाला समजले पाहिजे. तो आमचा अधिकार आहे, महाराष्ट्रातील जनतेचा अधिकार आहे. लालदिव्याच्या गाडतील डिझेल-पेट्रोलसाठी महाराष्ट्राच्या जनतेचा पैसा जातो. त्यात आपल्या घरचा पैसा जात नाही. आपली महाराष्ट्राच्या जनतेशी बांधिलकी आहे, या सभागृहाशी बांधिलकी आहे. तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, दहा मिनिटांसाठी आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभागृहाचे कामकाज थांबवावे. माननीय मंत्री महोदयांना येथे येऊ द्यावे. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांच्या भाषणाला न्याय मिळू द्यावा. त्यांचे भाषण माननीय मंत्री महोदयांच्या कानावर पडू द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती (डॉ.नीलम गोऱ्हे)** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांची अपेक्षा भावनिक व वैचारिक दृष्ट्या योग्य असली तरी सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. त्या महिला मंत्री असल्या तरी सक्षम आहेत असे मला वाटते. त्यामुळे सभागृहाचे कामकाज आपण सुरू ठेवावे असे तालिका सभापती म्हणून मी माझे मत व्यक्त केले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, अर्थसंकल्पावर चर्चा सुरू असल्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांनी उपस्थित असणे आवश्यक असते. सामुदायिक जबाबदारी काय असते याची मला देखील जाणीव आहे. मी या सभागृहात नवीन नाही. त्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे अत्यंत गरजेचे आहे, आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : माननीय वित्त मंत्र्यांना निरोप पाठविण्यात आलेला आहे. आपले वरिष्ठ सभागृह आहे. येथे अतिशय उच्च दर्जाची वैचारिक स्वरूपाची चर्चा होते. त्यामुळे मी सचिवांमार्फत माननीय वित्त मंत्र्यांनी उपस्थित राहण्याचा निरोप पाठवून देते. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यांच्याही वेळेचा विचार आपण करावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, येथे नुसती वांझोटी चर्चा होणार असेल तर त्याला काय अर्थ ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, येथे नुसती चर्चा होणार असेल तर त्याला अर्थ राहणार नाही.

**तालिका सभापती** : आपला मुद्दा माझ्या लक्षात आला आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदया, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, माननीय मंत्र्यांची सभागृहात उपस्थिती नसणे ही अतिशय चुकीची परंपरा आहे हे जरी आपण गृहीत धरले तरी आपले विचार मांडत असताना ते कुठे तरी नोंदले जात आहेत, रेकॉर्डींग केले जात आहे हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3

श्री.हेमंत टकले...

देखील लक्षात घेतले पाहिजे. माननीय वित्त राज्यमंत्री जेव्हा येथे येतील तेव्हा त्यांच्यापुढे सगळे मुद्दे ठेवले जातील ही अपेक्षा आम्हाला नक्की आहे. त्याप्रमाणे मुद्यांचे लेखन देखील होत आहे. हा विषय अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलावयाचे आहे. त्यामुळे या चर्चेमध्ये खंड पडू न देता ही चर्चा पुढे सुरू करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडलेला आहे. हे अधिवेशन चार दिवसांचेच आहे. या चार दिवसांमध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चाच झालेली नाही. आपण फक्त आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला आहे. अर्थसंकल्पावरील चर्चा ही देखील काही तासांची आहे. त्यामध्ये देखील मंत्री महोदय उपस्थित राहणार नसतील तर चर्चा कशाला करायची ? आपण बजेट मंजूर करून घ्यावे. चर्चा कशाला करायची. मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, नुसते रेकॉर्ड करून काहीच उपयोग नाही. भाषणाचे गठ्ठेच्यागठ्ठे लायब्ररीमध्ये पडलेले आहेत.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या भावना योग्य आहेत. आता माननीय वित्त राज्यमंत्री सभागृहात आलेले आहेत. त्यांनी जास्तीत जास्त काळ सभागृहात उपस्थित राहून माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. या चर्चेसाठी माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री उपस्थित राहिले असते तर तेही योग्य झाले असते असे माझे मत आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदया, खालच्या सभागृहामध्ये देखील याच विषयावर चर्चा सुरू आहे. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री खालच्या सभागृहामध्ये बसले आहेत.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आपण येथे पूर्णवेळ उपस्थित राहण्याची खबरदारी घ्यावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, खालच्या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री बसत असतील व त्यांना या सभागृहात होत असलेल्या चर्चेसाठी वेळ नसेल तर हे सभागृह कनिष्ठ आहे अशी आपण एकदा घोषणा करावी. तसा आपण निर्णय घ्यावा. खालच्या सभागृहात देखील याच विषयावर चर्चा सुरू असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत त्यामुळे ते वर येऊ शकत नाही असे किमान आपण रेकॉर्डवर आणू नये.

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभपती महोदया, या सभागृहात माझ्याच माध्यमातून बजेट सादर झाले. सदनाची भावना माननीय वित्त मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. सध्या दोन्ही सभागृहात एकाच विषयावर एकाच वेळी चर्चा सुरू असल्यामुळे मी या सभागृहात उपस्थित आहे, तर सन्माननीय उप मुख्यमंत्री हे खालच्या सभागृहात उपस्थित आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, मी माननीय वित्त मंत्र्यांचे आभार मानतो. त्यांनी या सभागृहात नातू धरणाच्या दुरूस्तीसाठी निधी देत असल्याचे जाहीर केले होते. पण ते निधी देऊ शकलेले नाहीत. माननीय राज्यमंत्र्यांना अधिकार काय असतात, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. मी हे त्यांचा आदर ठेवून बोलत आहे. त्यांची तळमळ मी जवळून पाहिली आहे. त्यांना फार मर्यादित अधिकार आहेत. ज्यावेळी आम्ही विरोधी पक्षातील सदस्य बोलतो तेव्हा कॅबिनेट मंत्री उपस्थित असेल तरच त्याला न्याय मिळू शकतो. येथे नुसते वांझोटी भाषण करण्यासाठी आम्ही बसणार असू तर मग सभागृहाचे कामकाज कशाला हवे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामदास कदम आणि पांडुरंग फुंडकर यांनी येथे माननीय वित्त मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे अशा प्रकारची भूमिका मांडली आहे. मधल्या दहा मिनिटांच्या कालावधीत माननीय वित्त राज्यमंत्री सभागृहात आलेले आहेत. प्रत्येक वेळी कॅबिनेट मंत्र्यांनी विधान सभेत थांबायचे आणि माननीय राज्यमंत्र्यांनी विधान परिषदेमध्ये थांबायचे अशी भूमिका माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मांडली आहे. यापुढे अशा प्रकारचे संकेत पडता कामा नयेत. हे सभागृह देखील सार्वभौम आहे. आपण विधान परिषदेच्या कामकाजाला देखील प्रतिष्ठा देतो, असा विचार राज्यामध्ये सातत्याने पोहोचणे आवश्यक आहे असे तालिका सभापती म्हणून मी मत व्यक्त करते. त्यामुळे आता माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी भाषणास पुढे सुरूवात करावी.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदया, मी फक्त एका मिनिटामध्ये माझा खुलासा करीत आहे. आताच येथे नातू नगरच्या धरणा संबंधातील मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी उपस्थित केला आहे. नातू नगर धरणाच्या दुरूस्तीच्या कामाची निविदा निघाली आहे. आता फक्त निधी द्यायचा आहे. तो निधी आम्ही या अर्थसंकल्पात देत आहोत.

यानंतर श्री.जुन्नरे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदया, या व्यत्ययानंतर तुटलेली लिंक जोडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. मध्यंतरी मुंबईहून कल्याणला निघालेल्या एका लोकलचे चार डबे मागेच राहून गेले होते. विधान परिषदेची अशी लिंक तुटून इंजिनाशिवाय डबे मागे राहणार नाही याची पुढील काळात आपण सर्वजण काळजी घेऊ एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, राजीव गांधी जीवनदायी योजना म्हणजे आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागापर्यंत वैद्यकीय मदत पुरवण्याची एक महत्वकांक्षी योजना आहे. या योजनेचा गेल्या 5/6 महिन्याचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल की, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमुळे कित्येक जणांचे प्राण वाचलेले आहेत. ही योजना नसतांना गरिबांना पैशा अभावी उपचार किंवा शस्त्रक्रिया करुन घेणे शक्य नव्हते परंतु आता या योजनेमुळे गरिबांना उपचार व शस्त्रक्रिया करता येणार आहे. असंख्य नागरिकांपर्यंत ही योजना आपण घेऊन गेलो आहोत. आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने वैद्यकीय सेवा पुरवणे आता शक्य झाले आहे. ही योजना महत्वाची असल्यामुळे या योजनेसाठी 937 रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या आहेत. या रुग्णवाहिकेमध्ये 24 तास डॉक्टरांची सेवा उपलब्ध होणार आहे. या रुग्णवाहिकेमध्ये अत्यावश्यक जीवनरक्षक साधन सामुग्री उपलब्ध राहणार आहे. या योजनेचा पहिला टप्पा राज्यातील 9 जिल्हयामध्ये देण्यात आला असून यामध्ये 156 रुग्णवाहिका 26 जानेवारी पासून कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदया, गेल्या 20/25 वर्षाचा आढावा घेतला तर प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य केंद्रात ज्या काही जुन्या पुराण्या ॲम्ब्यूलन्सेस होत्या त्या बहुतेक बंद अवस्थेत असतात, रुग्णवाहिका सुरु असल्या तर त्यांचे चालक जागेवर नसतात. चुकून एखादा चालक मिळालाच तर तो वाहन चालविण्याच्या अवस्थेतही नसतो अशा प्रकारची विदारक स्थिती वेगवेगळया जिल्हा आरोग्य रुग्णालयात आहे. यासंदर्भात संपूर्णपणे फेररचना करुन आपण राजीव गांधी जीवनदायी योजना आणली आहे. ही योजना लोकांचे जीव वाचविणारी योजना ठरणार आहे. ही योजना या अंतरिम अर्थसंकल्पातील उल्लेखनीय उपक्रम आहे असे मला नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदया, मधाशी मला सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी थांबवले तेव्हा मी कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत विचार मांडत होतो. शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना

...2...


SGJ/ KTG/ MMP/ D/ D/ प्रथम श्री.भारवि..... 13:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )

श्री.हेमंत टकले ......

शासकीय तंत्र विद्यालयातून रोजगाराभिमुख कौशल्य देण्याचे प्रस्तावित आहे. रोजगाराभिमुख कौशल्य देणे हे किती महत्वाचे आहे याबाबत मी सांगू इच्छितो की, मी अंधांच्या संस्थेत काम करतो. या संस्थेमध्ये अंधाना प्रशिक्षण दिले जाते. आम्ही येथील अंधांना वर्षानुवर्षापासून झाडू बनवणे, खडू बनवणे इत्यादी गोष्टी शिकवत असतो. लाकडी खुर्ची विणण्याचे आम्ही शिकवू लागलो. परंतु हळूहळू आमच्या असे लक्षात आले की, अगोदर सर्व ठिकाणी विणलेल्या लाकडी खुर्च्या वापरल्या जात होत्या. परंतु आज विणलेल्या खुर्च्या वापरल्या जात नाहीत. आज टेलिफोन ऑपरेटरचा जॉब सुध्दा अंधांसाठी शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे रोजगाराची नवनवीन संधी मिळण्यासाठी व्यवसाय शिक्षणांतर्गत कौशल्य विकास कार्यक्रम हा सगळयात वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम या योजनेत सहभागी केल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, विभागीय अनुशेष, पाटबंधारे प्रकल्प, पाटबंधारे प्रकल्पावर होणारा खर्च व त्या निमित्ताने सिंचन क्षमतेत निर्माण झालेली वाढ हे आपले नेहमीचे चर्चेचे विषय आहेत. या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांना विशेष अधिकार दिलेले असून त्यासंदर्भात चौकटीही घालून देण्यात आलेल्या आहेत. असे सर्व असतांना 1.25 लक्ष हेक्टर सिंचन क्षमता व 1 हजार दशलक्ष घन मीटर पाणीसाठा निर्माण करण्याचे उद्दिष्ट आपण ठेवलेले असून या वर्षात त्यातील 60 प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याचे ठरवले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे दर वेळेस मराठी भाषेचा रास्त असा आग्रह धरीत असतात. मराठी विषय हा बऱ्यापैकी दुर्लक्षित असलेला विषय आहे असे आपल्याला म्हणावे लागेल. मराठी भाषा विभागासाठी या अंतरिम अर्थसंकल्पात निधीची उपलब्धता करुन देण्यात आलेली आहे. हा निधी चार महिन्याच्या मानाने अतिशय कमी प्रमाणात आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठी भाषेचा संकल्प पूर्ण करुन मराठी भाषा राजभाषा होईल, मराठी भाषा सर्वामुखी होईल, सर्व ज्ञानांच्या शाखेसाठी ती उपलब्ध होईल यासाठी अधिकची तरतूद या अंतरिम अर्थसंकल्पात करण्याची आवश्यकता आहे असे मला नम्रपणे सुचवावयाचे आहे.

...3...



SGJ/ KTG/ MMP/ D/ D/ प्रथम श्री.भारवि..... 13:50

श्री.हेमंत टकले .....

सभापती महोदय, महिलांवरील होणारे अत्याचार, ॲसीड हल्ल्यात पीडित महिलेसाठी अर्थसहाय्य, नियोजित अर्थसहाय्य या सगळया योजना सामाजिक दृष्टया अतिशय महत्वाच्या आहेत. दिवसेंदिवस या सर्वांची परिस्थिती हाताबाहेर जाते की, काय अशा पध्दतीचा संभ्रम लोकांमध्ये निर्माण होत होता. परंतु आपण ही जी केंद्रे निर्माण करणार आहोत त्या केंद्रामधून समाजाच्या महत्वाच्या गरजेबाबत आपण अधिक जागरुक राहण्याची व आपण ही जबाबदारी ज्यांच्यावर सोपवत आहोत ती जबाबदारी ते लोक योग्यपणे पार पाडत आहेत की, नाही यावर देखरेख ठेवण्यासाठीची यंत्रणा आपल्याला निर्माण करावी लागणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पात इतर राज्यात नसतील एवढया महापालिकांचा समावेश आहे, वेगाने वाढणारे शहरीकरण, राज्याची ओलिताखाली येऊ शकणाऱ्या जमीनीतून शेती होऊ शकते अशी जमीन, निसर्गाची अनिश्चितता, पाण्याच्या संदर्भातील नियोजन या सर्व गोष्टींचा एकत्रिक विचार करता अतिशय महत्वाच्या या योजना आहेत.

सभापती महोदय, राज्याची सुरक्षा, त्यातून सामान्य नागरिकाला मिळणारा दिलासा या गोष्टी सुध्दा अतिशय महत्वाच्या आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींचा या अतरिम अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी एक गोष्ट मला पुन: पुन: सांगावीशी वाटते की, राज्याचे उत्पन्न हे वेगवेगळया माध्यमातून गोळा होत असते, ते कराच्या रुपाने आणि इतर रुपाने सुध्दा होत असते. निवडणुका आल्या म्हणून नवीन कर लादण्यात आले नाहीत अशी बातमी आज सकाळी वर्तमानपत्रामध्ये मी वाचली होती. परंतु हा कर लावण्याची खरोखर गरजच नव्हती. कर आणि निवडणूक असा संबंध जोडण्याचेही कारण नव्हते. जे काही घडत असते ते सुध्दा आपण नजरेसमोर ठेवले पाहिजे. ज्यावेळेस टोमॅटो बाजारात कमी प्रमाणात उपलब्ध असतात तेव्हा टोमॅटोचे भाव 80-100 रुपये किलोपर्यंत जातात. परंतु आमच्या जिल्हयातील शेतकऱ्याला जेव्हा टोमॅटोला भाव मिळत नाही, तो 2 रुपये किलोने रस्त्यावर विकावयास बसतो तेव्हा मात्र त्याचा कोणी विचार करीत नाही. त्यामुळे एकाच वेळी शेतीमालाला योग्य भावही देता आला पाहिजे आणि ग्राहकाला तो

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले .....

माल परवडणाऱ्या किंमतीत मिळालाही पाहिजे. परंतु स्वस्त मिळते तेव्हा बोलावयाचे नाही व महाग झाले की, आक्षेप घेत रहायचे अशा प्रकारची भूमिका आपल्याला स्वीकारता येणार नाही.

सभापती महोदय, 80 वर्षावरील निवृत्ती वेतन धारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना जे वेतन मिळते त्यामध्ये शासनाने 10 टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या विषयावर बोलतांना मी या सभागृहात उल्लेख केला होता की, आपण ही जी 10 टक्के वाढ म्हणत आहात त्या संदर्भात आताची जीवन वयोमर्यादा किती पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. माणसांचे वय जसे वाढत जाते जशी त्या माणसांची गरज वाढत जाते.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:00

श्री.हेमंत टकले....

त्यामुळे त्यांच्या गरजांकरिता दहा टक्क्याची वाढ पुरेशी नाही. वयोवृध्द व्यक्ती काही आजारामुळे कायम स्वरुपी अपंग झालेली असते. त्यांना स्वत:च्या औषधांसाठी किंवा स्वत:च्या दैनंदिन कामासाठी अधिक आर्थिक मदतीची आवश्यकता असते. तेव्हा या घटकाकडे पुन्हा एकदा पहावे असा या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड औद्योगिक वसाहतीमध्ये महाराष्ट्र माजी सैनिक औद्योगिक वसाहत उभारण्यात येत आहे. माजी सैनिकांसाठी औद्योगिक वसाहत उभारण्याचे देशातील एक वेगळे पाऊल आहे, एक महत्वाचे पाऊल आहे. कारण आपणास माहीत आहे की, लष्करी सेवेतील सैनिकांची शारीरिक क्षमता वयाच्या 50 वर्षापर्यंत अधिकची असते. त्यानंतर ते निवृत्ती घेणे पसंत करतात. परंतु त्यांनी जो अनुभव घेतलेला असतो, शिक्षण घेतलेले असते, तो उद्योगाच्या कारणी लागला तर एक चांगला उद्योग उभा राहील आणि निवृत्ती नंतर सैनिकांमध्येही जी एक अस्थिरता आलेली असते ती नष्ट होण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, मराठी भाषा विकासासाठी 15 कोटी 60 लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे की, मराठी भाषा भवनासाठी जी एकूण तरतूद केलेली आहे त्यापैकी या वर्षातील तरतूद 11 ते 12 कोटी रुपयांची आहे. त्यापैकी आपण आतापर्यंत किती खर्च केला ? तीन वर्षाचा संकल्प आहे. परंतु आपण अधिकचे बळ वापरुन, अधिकचा आर्थिक पुरवठा करुन तीन वर्षाचा कालावधी कमी करता आला तर मराठी भाषेच्या दृष्टीने तो एक अतिशय चांगला उपक्रम होईल.

सभापती महोदय, 35 हजारापेक्षा जास्त महा ई-सेवेच्या माध्यमातून 18 कोटीपेक्षा जास्त ई-व्यवहार झालेले आहेत. आता ई-व्यवहार, ई-टेंडर, ई-पध्दत, रोजगार हमी योजनेवरील मजुरांना बँकेत थेट पैसे, अशा अनेक योजना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून राज्यात येत आहेत. एकूणच संपूर्ण यंत्रणेमध्ये नागरिकांसाठी ई-गव्हर्नन्सच्या कल्पना असतील तर शासनाच्या प्रत्यक्ष कामामध्ये ई-गव्हर्नन्सचा वापर किती होतो, त्यासाठी वरच्या अधिकाऱ्यापासून खालच्या कर्मचाऱ्यांना कशाप्रकारे प्रशिक्षण दिले जाते, त्यासाठी आपण एक महत्वाचा कार्यक्रम हाती घ्यावा असे मला सुचवावेसे वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:00

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, हा तुटीचा अर्थसंकल्प आहे. मागील वेळेस अधिकचा अर्थसंकल्प सादर केला त्यावेळी ही आकड्यांची गोलमाल आहे, आर्थिक तूट दाखवायची नाही असा आक्षेप घेण्यात आला होता. या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये पहिल्या चार महिन्यांत महसुली तूट वाढणार आहे हे स्पष्ट केलेले आहे. इतर कोणतेही सोंग केले तरी आपणास पैशाचे सोंग आणता येत नाही. पैशाचे सोंग आणायचे नसेल तर जी वस्तुस्थिती आहे ती सर्वांसमोर मांडली पाहिजे आणि त्यावर काय उपाययोजना करता येतील हेही सांगितलेले आहे. अर्थव्यवस्थेमध्ये संथपणा आलेला आहे. लोकोपयोगी मागण्यांचा स्वीकार करावा लागणार आहे आणि हे कायमस्वरुपी चालणार आहे. आपण ही तूट स्वीकारली असली तरी महसुली वाढीसाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अनावश्यक खर्च कमी करणे हा दुसरा महत्वाचा भाग आहे. अनावश्यक खर्च कमी करणे हेच अर्थसंकल्पाचे ब्रीद वाक्य असले पाहिजे. आपण अनावश्यक खर्चाला कात्री लावली तर अर्थसंकल्पात नियोजित केलेली उद्दिष्टे गाठणे शक्य होईल. आपण सर्वांनी अर्थसाक्षरता वाढवून भागणार नाही तर या राज्यावर, या देशावर प्रेम करणाऱ्या अभिमानी नागरिकांनी आपल्यावरील आर्थिक जबाबदारींमध्ये आपण कसे वागले पाहिजे, संपत्ती कशी वाढविली पाहिजे, संपत्ती कशी वापरली पाहिजे, या सर्वांची अर्थसाक्षरता राज्यात मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज आहे. "थेंबे थेंबे तळे साचे" या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने सहभागी झालो तर आपले अर्थकारण, अर्थार्जन आणि तळे संपूर्ण भरल्याशिवाय राहणार नाही आणि ते शिगोशिग भरलेले तळे आपल्या सर्वांच्या नशिबी येऊन आपण सर्वजण त्यामध्ये सहभागी होऊ या. अर्थशास्त्रावरील विषयावर बोलताना आपल्या राजकीय भूमिका बाजूला ठेवून जे योग्य आहे त्यास योग्य म्हणावे. जे चुकीचे असेल ते निदर्शनास आणून ते दुरुस्त करण्यासाठी आग्रही राहा. अशा प्रकारच्या आग्रहाच्या कामामध्ये आम्हीही तुमच्या बरोबर राहून शासनाकडून ते काम करुन घेऊ असा विश्वास मी व्यक्त करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

---------

..3..

**पृ.शी.**: सभागृहात झालेल्या आरोपाबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

**मु.शी.**: सभागृहात झालेल्या आरोपाबाबत श्री.अमरसिंह पंडित , वि.प.स.यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री.अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

सभापती महोदय, काल सभागृहात माझ्या नावाचा उल्लेख झाला. बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या प्रशासकीय मंडळाविरोधात गुन्हा नोंद झाल्याचा येथे उल्लेख झाला. सदरहू गुन्हा सन 2008 ते 2011 या कालावधीतील 24 तत्कालीन संचालकांविरुध्द झाला. गुन्हा नोंद झाल्यानंतर गुन्ह्यातील मुख्य सूत्रधाराचा शोध घेण्यात आला. श्रीमती मल्लभाबाई वल्ह्याळ मेमोरियल चॅरिटेबल हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, सोलापूर, ही जिल्ह्या बाहेरची संस्था आहे. या संस्थेला कर्ज दिल्याचा आरोप संचालक मंडळावर ठेवण्यात आला. या संस्थेचे अध्यक्ष, खासदार श्री.गोपीनाथजी मुंडे साहेब, सचिव त्यांच्या कन्या आमदार श्रीमती पंकजा मुंडे आणि संचालक त्यांचे कुटुंबीय. दुसरे कारण व्यंकटेश्वर ॲग्रो शिवणी, जामगा, तालुका लोहा,जिल्हा नांदेड, या दोघांना कर्ज वितरित केल्यामुळे गुन्हा नोंदविण्यात आला. यातील मुख्य सूत्रधार श्री.राजाभाऊ मुंडे याला अटक करण्यात आली.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.राजाभाऊ मुंडे यांना अटक करण्यात आली. त्यापूर्वी ते सात-आठ महिने फरार होते. श्री.राजाभाऊ मुंडे फरार असताना,

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही ॲलिगेशन्स केली, विरोधकांकडून काही बोलले गेले त्या संदर्भात सन्माननीय सदस्य खुलासा करीत असतील तर त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचे सौजन्य ते दाखवू शकत नाही. सन्माननीय सदस्यांनी आपली बाजू

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

26-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S-4

AJIT/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:00

श्री.आर.आर.पाटील....

मांडायची नाही काय ? आपण सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. त्यांना काही बोलायचे असेल तर सन्माननीय सदस्याचे बोलणे झाल्यानंतर बोलू द्यावे. सन्माननीय सदस्यांचे काही ऐकून घ्यायचे नाही ही पध्दत बरोबर आहे काय ? आम्ही सन्माननीय सदस्यांना थांबवितो, त्यांचे काय म्हणणे ते त्यांनी सांगावे. आपण त्यांना बोलू देखील देणार नाही काय ? त्यांच्यावर ज्या कारणासाठी गुन्हा नोंद झ ालेला आहे त्या संदर्भातील ते माहिती देत असतील तर ते काय चूक करीत आहेत ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना मी, नियम 47 अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यांचे स्पष्टीकरण झाल्यानंतर आपणास बोलण्याची संधी देईन.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, श्री.राजाभाऊ मुंडे यांच्या विरोधात गुन्हा नोंद झ ाल्यानंतर ते सात महिने फरार होते. ते फरार असताना बीड जिल्ह्यातील खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या संपर्कात होते.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 14:10

श्री.अमरसिंह पंडित....

किंबहुना ते खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या घरी होते. फरार आरोपी राजाभाऊ मुंडे हा कोणाच्या घरी होता याची चौकशी पोलीस यंत्रणेला करण्यास सांगावे. फरार आरोपी राजाभाऊ मुंडे हा बीडचे खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या घरी नसल्याचे आढळून आल्यास मी राजीनामा देण्यास तयार आहे. मी पुन्हा सांगतो की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या घोटाळ्यातील अनेक गुन्ह्यांमध्ये वॉन्टेड असलेला फरार आरोपी राजाभाऊ मुंडे हा बीडचे खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या घरी होता. आपण त्याचे त्या काळातील मोबाईल कॉल्स स्ट्रेस करावेत. राजा मुंडे हा खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या संपर्कात होता. परंतु श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या पक्षातील लोक या ठिकाणी उजळ माथ्याने आरोप करीत आहेत. सभागृहामध्ये माननीय गृह मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी या विषयी स्वतंत्र चौकशी करुन या संदर्भातील अहवाल सभागृहात सादर करावा.

महोदय, सदरहू प्रकरणांत संबंधितांवर राजीनामा देण्याची वेळ आली आहे. जी प्रकरणे आहेत ती सर्व प्रकरणे बीड जिल्ह्याचे खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्याशी संबंधित आहेत. या सभागृहाच्या माध्यमातून मी विनंती करतो की, बीड जिल्ह्याचे खासदार श्री.गोपीनाथ मुंडे यांच्यामध्ये नैतिकता असेल तर त्यांनी खासदार पदाचा राजीनामा देऊन चौकशीला समोर जावे.

(माननीय विरोधी पक्ष नेते वेलमध्ये येऊन उप सभापतींना उद्देशून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना या विषयावर जे काही बोलायचे असेल ते त्यांनी बोलावे. परंतु त्यांनी समोर येऊन मला उद्देशून अनेकदा 'सेटर-सेटर' असा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, मला माझ्या आयुष्यात कधीही आणि कुठेही सेटींग करण्याची गरज पडली नाही. त्यामुळे त्यांची वाक्ये कामकाजातून काढून टाकण्यात येत आहेत.

श्री.आर.आर.पाटील : महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सभागृहातील सर्वोच्च चेअरवर किंबहुना आपल्यावर हेतुपुरस्सर काही आरोप केले असतील तर त्यांना माफी मागितल्याशिवाय बोलता येणार नाही. त्यांनी आपल्यावर आरोप केले असतील तर.....ही बाब रेकॉर्डवर आहे. ते नेमके काय बोलले हे आपण स्वत: ऐकलेले आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रित बोलतात.)

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांची वाक्ये कामकाजातून काढून टाकण्यास सांगितलेले आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, श्री.संजयकाका पाटील यांना आमच्या पक्षात आणल्यामुळे समोरचे लोक इतके का चिडले ?

(दोन्ही बाजूचे सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**उप सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 25 मिनिटांपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.13 ते 2.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

<u>**हरकतीच्या मुद्याबाबत**</u>

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझाही हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अगोदर मी हरकतीचा मुद्दा मांडण्यास उभा राहिलो आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते या सदनातील सर्वोच्च पदाबद्दल म्हणजेच माननीय सभापतींबद्दल जे बोलले ते आपण ऐकले. ते रेकॉर्डवरही आले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपला अवमान करणारे बोलले असतील. आपण मोठ्या मनाचे आहात. आपण ते सहन कराल. पण या सदनातील सर्वोच्च पदाचा अवमान आम्ही, या सदनाचे सदस्य कधीही सहन करणार नाही. त्यामुळे त्यांनी पहिल्यांदा माफी मागावी. स्पष्ट मराठीमध्ये माफी मागावी. मगच हरकतीचा मुद्दा उपस्थित करावा.

**उप सभापती** : मी सांगू इच्छितो की, घोषणाबाजी चालली होती. तेव्हा सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलले, ते मी कामकाजातून काढून टाकण्याचा आदेश दिला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या संदर्भात बोललो.

**उप सभापती** : ठीक आहे. हरकत नाही. माझा गैरसमज झाला असेल. आपण या विषयावर पडदा पाडू या. सभागृहाचे कामकाज होणे आवश्यक आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण कशा कशावर पडदा पाडणार आहात. सर्व पडदे संपून जातील. आपण पडदा टाकू नका.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. आबा कालपासून आक्रमक झाले आहेत. एवढे काय मनावर घ्यायचे. माझा हरकतीचा मुद्दा एवढाच आहे की, सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे नाव आले तर त्यांना स्पष्टीकरणाचा पूर्ण वाव आहे, परवानगी आहे आणि ते आम्ही नियमाने होऊही देतो. काल सुध्दा आम्ही पॉईंट ऑफ इन्फर्मेशन एवढाच मागितला होता की, ज्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला आहे, त्याला अटक झाली पाहिजे. जामीन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

मिळाला नाही. ती व्यक्ती कुठे लपून बसली असेल तर माहीत नाही असे म्हणू शकतो. पण ती व्यक्ती सभागृहात येते, माननीय सभापतींना भेटते. असे असेल तर पोलिसांनी त्या व्यक्तीला अटक केली पाहिजे. आबांचे पोलीस एवढे अकार्यक्षम आहे की, गुन्हेगार खुलेआम फिरत आहेत, अशी आम्ही चौकशी केली होती. सन्माननीय सदस्यांना काही बोलायचे असेल तर बोलण्याची त्यांना संधी आहे. नियम 47 प्रमाणे सन्माननीय सदस्यांना बोलता येईल. मी त्यांच्याविषयी बोललो असेन तर त्या विषयीचे फॅक्च्युअल सरकारने सांगितले पाहिजे की, ते फरार आरोपी आहेत, त्यांना जामीन नाही, तरी त्यांना आम्ही अटक केली नाही.

सभापती महोदय, सदर बाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री. अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे यांना स्वत:विषयी काही बोलायचे असेल तर त्या संदर्भात त्यांना अधिकार आहे. नियम 47 असा आहे की, "कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी, सभापतींच्या परवानगीने वैयक्तिक स्पष्टीकरण-मग त्यासंबंधी प्रश्न त्यावेळी विधानपरिषदेपुढे नसला, तरीही-करता येईल ; मात्र असे करताना तो कोणताही विवाद्य विषय पुढे आणणार नाही...." सन्माननीय सदस्य म्हणणे मांडू शकतात. त्यांच्याविषयी त्यांनी नक्की सांगावे. आदरणीय श्री. मुंडे साहेब, विधानसभेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा ताई मुंडे-पालवे यांचा उल्लेख रेकॉर्डमधून काढला पाहिजे. सन्माननीय सदस्यांना बाकी काही बोलायचे असेल तर बोलू द्यावे, त्यांना स्पष्टीकरण करू द्यावे. आमची हरकत नाही. आपण ही नावे काढली पाहिजेत अशी विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, एखाद्या संस्थेचा पदाधिकारी कोण आहे हे सांगण्यामध्ये काय विवाद्य मुद्दा आहे ? ही फक्त वस्तुस्थिती आहे. संस्थेचे अध्यक्ष हे आहेत, असे सांगण्यामध्ये विवाद्य काय आहे ? त्यांच्यावर कोणताही आरोप नाही. ते ज्या संस्थेचे अध्यक्ष आहेत त्या संस्थेला कर्ज दिले आहे. त्यांच्यावर आरोप नाही.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, संस्थेच्या अध्यक्षांचे नाव घेण्यास काय हरकत आहे ? त्या संस्थेला कर्ज दिल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

..3



MSK/ MMP/ D/ पूर्वी श्री. बोर्डे 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदनातील सदस्यांना सुध्दा संरक्षण मिळाले पाहिजे. मी या प्रकरणी बारकाईने पाहिले नव्हते. सन्माननीय सदस्य सांगत आहेत. ते बँकेत पदाधिकारी होते.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ........

या बँकेने ज्या संस्थेला कर्ज दिले, त्याबद्दलच त्यांच्यावर गुन्हे नोंद आहेत. संस्थेचे पदाधिकारी कोण आहेत ? त्यांनी का कर्ज घेतले ? एखाद्या सामान्य माणसाने चुकीचे कर्ज घेणे समजू शकतो. पण एका राष्ट्रीय नेत्याने चुकीच्या पध्दतीने कर्ज का घ्यावे ? यांनी कर्ज का दिले, हे ज्यावेळी आपण विचारता, त्यावेळी बेकायदेशीर कर्ज त्यांनी का घेतले, या प्रश्नाचे आपल्याकडे काय उत्तर आहे ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्वत: हरकतीचा मुद्दा मांडला आहे, तेच खुलासा घेत आहेत आणि तेच बोलत आहेत. हे चित्र फारच विचित्र आहे. आम्हाला खुलासाही करु दिला जात नाही. आम्हाला खुलासा करु द्यावा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांचे पत्र प्राप्त झाले होते. त्यानुसार त्यांना मी बोलण्यास परवानगी दिली. आता मी कोणालाही बोलण्याची परवानगी देणार नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आजची सर्व वर्तमानपत्रे काढून बघितली तर या दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख सर्व वर्तमानपत्रात आलेला आहे. एखाद्या राष्ट्रीय नेत्याएवढे नसेल, पण यांचेही समाजामध्ये किरकोळ का होईना काही स्थान असेल. यांच्याबद्दल समाजाचा, राज्याच्या जनतेचा गैरसमज झाला तर त्यांनी बाहेर कसे जायचे ? सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना काही हरकत घ्यायची असेल तर त्यांना अधिकार आहे, त्यांनी जरुर हरकत घ्यावी. पण सन्माननीय सदस्यांनी आपला खुलासा करायचा नाही, हे बरोबर नाही. त्यांच्यावर आपण अन्याय करु नये.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघाशी एक हरकतीचा मुद्दा मांडला. त्यावरील निर्णयाची वाट न बघता सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे मध्येच उभे राहिले. माझे असे म्हणणे आहे की, जे मेरिट आहे, त्यानुसार तुम्ही करा. मी अतिशय बॅलन्स पध्दतीने मुद्दा मांडला आहे. जे खालच्या सभागृहाचे सदस्य आहेत, त्यांच्याबद्दल बोलायचे असेल तर नोटीस द्यावी लागते. ती जर दिली नसेल तर ते वक्तव्य कामकाजातून काढले पाहिजे. मी सुध्दा सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांवर आरोप करु शकतो. असे कधी मी केले आहे का ? आपण मला दाखवून द्यावे की, मी कधी सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांवर किंवा सन्माननीय श्रीमती सोनिया

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

गांधीजींबद्दल आरोप केले आहेत. मी तसे कधीही करीत नाही. आपले राजकारण आहे, ते आपण आपल्या लेव्हलला करु. आपल्याला एकमेकांवर जे आरोप करायचे आहेत, ते आपण करु. पण ज्या गोष्टी अनावश्यक आहेत, त्या करु नये. सन्माननीय सदस्यांना व्यक्तिगत खुलासा करायचा आहे. काल आम्ही औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता व त्यामध्ये त्यांचे नाव आले होते. वर्तमानपत्रातही बातम्या आल्या आहेत. त्यामुळे त्यांना जो खुलासा करायचा आहे, तो करु द्यावा. पण नियमानुसार खुलासा करीत असताना विवाद्य विषय आणता येणार नाहीत. त्यासाठी नोटीस द्यावी लागते, ती दिली पाहिजे, हे मी म्हटले आहे. आम्ही पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन एवढाच मागितला की, त्यांच्यावर गुन्हा आहे का, ते फरार आहेत का, पोलीस खात्यांने त्यांचे स्टेटस काय दाखविले आहे, हे आम्ही विचारले होते. त्यांनी गुन्हा केलाच आहे, असे आम्ही म्हटलेले नाही. ते फरार आहेत का, कोर्टाने जामीन दिला आहे किंवा नाही, फरार असताना ते सभागृहात दिसतात. पेपरमध्ये छापून येते की, फरार आरोपी सभागृहात बसतात. हे होऊ नये, म्हणून आम्ही फॅक्चुअल माहिती विचारली. याउपर त्यांनी खुलासा केला. त्याबाबतही आमचे काही म्हणणे नाही. परंतु, नोटीस दिली नसल्यामुळे ती नावे काढली पाहिजेत, एवढीच मी हरकत घेतली आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नियमांचे पालन करुन खुलासा करता येईल, हे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे मत योग्य आहे. त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत. नियमांचे पालन करुन सन्माननीय सदस्यांनी आपला खुलासा करावा, हे त्यांचे म्हणणे योग्य आहे. तेवढा खुलासा सन्माननीय सदस्यांना आपण करु द्यावा, अशी विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी श्री.गोपीनाथ मुंडे वगैरे जी नावे सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी घेतली आहेत, ती वगळावी, असा जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबत मी सर्व रेकॉर्ड तपासून घेईन आणि आक्षेपार्ह असेल ते काढून टाकीन. रेकॉर्ड तपासल्यानंतर मी माझे मत देईन आणि जे आक्षेपार्ह असेल ते वगळून टाकीन.

आता सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी वैयक्तिक खुलासा करावा.

------------

...3....

**पृ.शी.**: सभागृहात झालेल्या आरोपाबाबत श्री.धनंजय मुंडे यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

**मु.शी.**: सभागृहात झालेल्या आरोपाबाबत श्री.धनंजय मुंडे यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री.धनंजय मुंडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

सभापती महोदय, काल सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या सभागृहातील दोन सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत ते फरार आहेत का, त्यांना पोलीस पकडत नाहीत, कोणत्या गुन्ह्यात आरोपी आहेत, या संबंधीचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या औचित्याच्या मुद्यामध्ये माझ्याही नावाचा उल्लेख झाला आहे. त्यामुळे मी माझा वैयक्तिक खुलासा आपल्या अनुमतीने करीत आहे.

सभापती महोदय, मी सन 2006 मध्ये संत जगमित्र नागा सहकारी सूत गिरणी या संस्थेचा संचालक झालो. या सूत गिरणीला कर्ज दिले होते. ते कर्ज थकित राहिले म्हणून आमच्यावर आरोप झाले, गुन्हा दाखल झाला आणि त्या गुन्ह्यात आम्ही आरोपी आहोत. संत जगमित्र नागा सहकारी सूत गिरणी सन 2000 मध्ये उभी राहिली. सन 2002 मध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेने सूत गिरणीला 2 कोटी रुपयांचे सी.सी.लिमिट दिले. जसजसा या सूत गिरणीचा व्यवहार वाढत गेला, तसतशी जिल्हा मध्यवर्ती बँकेने सी.सी.लिमिटमध्ये वाढ केली. सुरुवातीला 2 कोटी रुपयांचे सी.सी.लिमिटमधील कर्ज होते, ते शेवटी सन 2008 मध्ये 12 कोटी रुपये झाले. (गोंधळ)

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी ऐकून घ्यावे. मला ते सांगण्याची गरज नाही. तुम्ही आमच्या काकांचे ऐकून फसू नका, एवढेच माझे म्हणणे आहे. ते फसले, आम्ही फसलो, तुम्ही फसू नका, एवढीच आमची विनंती आहे. मी तर फसलो आहे. माझा नाईलाज आहे. पण तुमचे तसे नाही.

सभापती महोदय, 12 कोटी रुपयांचे कर्ज घेतले. 10 वर्षात या सूत गिरणीने 19 टक्क्यांनी 12 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम भरली. ज्यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मॅनेजमेंट सुपरसिड झाली, त्यावेळी बँकेच्या सर्व शाखा बंद झाल्या, सर्व शाखांना कुलुपे लागली. त्यावेळी

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

या सूत गिरणीने व्याज कोठे भरायचे होते ? व्याज हा टेक्निकली गुन्हा होऊच शकत नाही. (गोंधळ)

सभापती महोदय, माझे म्हणणे मला मांडू द्यावे. हा गुन्हा तर होऊच शकत नाही. आता हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. पोलिसांना जी काही मदत करायची आहे, ती आम्ही करीत आहोत. ज्यावेळी आम्हाला जामीन दिला गेला होता, त्यावेळी आम्ही पोलिसांना सर्वतोपरी मदत केलेली आहे, तपासात मदत केलेली आहे.

सभापती महोदय, कदाचित हा औचित्याचा मुद्दा मांडण्याची विरोधी पक्षनेत्यांची इच्छा असेल किंवा नसेल, हे मला माहीत नाही. पण जाणीवपूर्वक औचित्याचा मुद्दा मांडावयास लावला गेला, असे माझे मत आहे आणि हा औचित्याचा मुद्दा ऐकण्यासाठी या सभागृहात आमचे काका उपस्थित होते. आपला परफॉर्मन्स त्यामध्ये कसा आहे, हे पाहण्यासाठी ते उपस्थित होते. म्हणजे तुमच्या बाबतीत सुध्दा संशय आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक लक्षात घ्यावे की, ज्या सूत गिरणीच्या बाबतीत माझ्यावर गुन्हा दाखल झाला व ज्याचा उल्लेख त्यांनी या सभागृहात केला, त्या सूत गिरणीचे फक्त 3 संचालक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत. बाकीचे 18 संचालक भारतीय जनता पक्षाचे आहेत. पहिला संचालक जीवराज ढाकणे, जो संस्थापक संचालक आहे आणि तो आजही भारतीय जनता पार्टीचा तालुक्याचा अध्यक्ष आहे. तो आजही या सूत गिरणीचा व्हाईस चेअरमन आहे. ही सूत गिरणी जशी उभी आहे आणि जशी बंद पडली त्याचा कारभारही आमच्या काकांनीच केलेला आहे. याची देखील चौकशी व्हावी, असा माझा आग्रह आहे. उगाच काही तरी काढायचे.

सभापती महोदय, माझा या ठिकाणी उल्लेख झाला. मी 2 सेकंदात माझे म्हणणे संपविणार आहे. उद्या जर मी एखाद्या पक्षाचे नेतृत्त्व घेऊन सरपंच झालो, सरपंच झाल्यानंतर ज्याचे नेतृत्त्व मी स्वीकारले त्या नेतृत्त्वाने मला 4 चुकीच्या गोष्टी करण्यास सांगितल्या, अन्यथा, सरपंच पदावरुन काढून टाकीन, असे बजावले, अशा प्रकारे आमच्याकडून चुकीच्या गोष्टी करुन घेतल्या तर काय करायचे ? सभापती महोदय, हेच झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित

...5....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.धनंजय मुंडे......

साहेबांच्या बाबतीत, ते चेअरमन असताना त्यांच्या नेत्यांनी अशाच प्रकारचा दबाव आणला आणि स्वत:च्या डेंटल कॉलेजला कर्ज घेतले. स्वत:च्या खाजगी कॉलेजला कर्ज घेतले. हे चुकीचे आहे. कर्ज घेणाऱ्याने दबाव टाकून स्वत:च्या संस्थेसाठी कर्ज घेतले आहे, याचा उल्लेख तुम्ही कोठेही करणार नाही का ? तुमच्या छातीवर हात ठेऊन तुम्ही विचारा की, हे पाप त्यांनी केले आहे की नाही ? आमच्यावर तुम्ही आरोप करता, आम्ही खाल्ले म्हणता. कुणी खाल्ले आणि कुणी नाही खाल्ले, यासाठी सीआयडी किंवा जी कोणती चौकशी आहे, त्या सर्व चौकशांना आम्ही सामोरे जाण्यास तयार आहोत. डीसीसी बँकेच्या घोटाळ्यातील पैसे कोठे कोठे खर्च झाले, हे सुध्दा चौकशीमधून बाहेर येऊ द्या. दूध का दूध, पानी का पानी होऊन जाईल. उगाच जास्त तोंड उघडायला आम्हालाही लावू नका. आम्हालाही काही मर्यादा आहेत. आम्हीही मर्यादा पाळतो. पण याचा अर्थ असा नाही की.....होय कोर्टाने काय सांगितले आहे, कोर्टाने आदेश दिला आहे. कोर्टाने ज्या काही ऑर्डर्स दिल्या आहेत, त्या आम्ही फॉलो केलेल्या आहेत.

यानंतर श्री.मारोती शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. रोझेकर 14:40

श्री. धनंजय मुंडे...

कोर्टाने आम्हाला साडेतीन कोटी रुपये भरण्यास सांगितले. सूतगिरणीने साडेतीन कोटी रुपये भरले. जामीन नाकारल्याचा विषय कुठेही नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना या प्रकरणासंबंधीची अर्धवट माहिती दिलेली आहे. त्यावेळी 53 लोकांवर फिर्याद झाली. त्यापैकी 48 लोक हे भारतीय जनता पार्टीचे आहेत हे आपण लक्षात घ्यावे. माझा असा प्रश्न आहे की, जर बॉरोअर संस्था म्हणून संत जगमित्र नागा सूतगिरणी संस्थेवर गुन्हा दाखल होत असेल तर बॉरोअर संस्था म्हणून सोलापूरच्या डेंटल कॉलेजवर गुन्हा का दाखल झाला नाही ? त्यांना पैसे भरण्यासाठी एक दिवसाची मुदत का दिली, याची देखील चौकशी होण्याची आवश्यकता आहे. मी कुणाचे नाव घेतलेले नाही.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य असे बोलत आहेत की जणूकाही विरोधी पक्षाकडे गृहखाते आहे. गृहखाते त्यांच्याच पक्षाकडे आहे आणि चौकशी देखील त्यांच्याच पक्षाच्या गृहमंत्र्यांनी करायची आहे, निर्णय देखील त्यांनीच घ्यायचा आहे. विनाकारण आमच्यावर का आगपाखड केली जात आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, सन्माननीय सदस्यांनी व्यक्तिगत खुलासा करावा. ते तरुण आहेत. त्यांनी भावनेच्या आहारी जाता कामा नये. आम्ही काल जामीन आहे की नाही एवढीच विचारणा केली. त्यांना जामीन मिळालेला आह आणि ते फरार नाहीत एवढेच त्यांनी सांगावे. बाकीचा खुलासा कोर्टामध्ये करावा. ज्यांना तुम्हाला अडकवायचे होते ते न अडकता तुम्हीच अडकला आहात. तुम्ही त्यांच्या कशाला नादी लागलात ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल मी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि आज सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतले. बीड मध्यवर्ती बँकेमध्ये जे काही पाप झालेले आहे त्या पापाचा बाप कोण हे स्पष्ट होत नाही. त्या पापाचे ओझे कुणाचे आहे आणि ते कुणाच्या खांद्यावर आहे ? भारतीय जनता पार्टीची सर्व ओझी पेलताना आमच्या राष्ट्रवादी पक्षाचा खांदा देखील अपुरा पडेल. तुमची ओझी तुम्ही तुमच्या खांद्यावर घ्या आणि आमची ओझी आम्ही आमच्या खांद्यावर घेतो.

श्री. विनोद तावडे : कै. नरेंद्र दाभोळकर यांचे मारेकरी सापडत नसल्यामुळे माननीय गृह मंत्र्यांचा आत्मविश्वास हरवलेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सन्माननीय विरोधी पक्षनेते हे सत्तेमध्ये आहेत असे समजून मी त्यांना प्रश्न विचारलेले नाहीत. माझे म्हणणे एवढेच आहे की, जगमित्र नागा सूत गिरणी ही एक बॉरोअर संस्था आहे आणि सोलापूरची डेंटल कॉलेज ही दुसरी बॉरोअर संस्था आहे. एका बॉरोअर संस्थेवर गुन्हा दाखल झाला. परंतु बाहेरच्या जिल्ह्यातील डेंटल कॉलेजवर गुन्हा दाखल झालेला नाही. जिल्हा सहकारी बँकेच्या नियमाप्रमाणे बाहेरच्या जिल्ह्यातील कोणत्याही संस्थेला पैसे देता येत नाहीत. असे असताना त्या डेंटल कॉलेजवर गुन्हा का दाखल झाला नाही ? आमच्यावर मात्र आरोप करण्यात येत आहेत. आम्हाला कोणत्याही पोलिसांनी बॉरोअर म्हणून जाहीर केलेले नाही. एका प्रकरणामध्ये तक्रार दाखल होऊन चार्जशीट फाईल झालेली आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दोन्ही सन्माननीय सदस्यांना कालपासून बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. खरे अलिबाबा बाजूला राहिलेले आहेत. माननीय गृहमंत्री सदनामध्ये उपस्थित आहेत. ते खऱ्या अलिबाबांना बाजूला काढून त्यांना जेलमध्ये पाठविणार आहेत काय ?

श्री. विनोद तावडे : अलिबाबा सज्जन होते.

**उप सभापती** : या विषयावरील चर्चा संपलेली आहे.

श्री. विनोद तावडे : मी नावे काढून टाकण्याची विनंती केलेली आहे.

**उप सभापती** : कार्यवृत्त तपासून निर्णय घेण्यात येईल असे मी सांगितलेले आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2014-2015च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु...

श्री. पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-15च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे अधिवेशन 4 दिवसांचे आहे आणि अर्थसंकल्पावरील चर्चा केवळ एक दिवस आहे. या एका दिवसाच्या चर्चेचा बराचसा वेळ अन्य विषयावर चर्चा करण्यामध्ये गेलेला आहे. माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्प मांडत असताना राज्यातील शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पामध्ये काय काय आहे ते मी काळजीपूर्वक ऐकत होतो. अर्थसंकल्प मांडून झाल्यानंतर या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसलेली आहेत अशी माझी सहज प्रतिक्रिया उमटली. या अर्थसंकल्पामध्ये 56 परिच्छेद आहेत. त्यापैकी दोन किंवा तीन परिच्छेदामध्ये शेतकऱ्यांसंबंधीचा उल्लेख केलेला आहे. अर्थसंकल्पामध्ये असे म्हटलेले आहे की, "शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि शेतीच्या वृद्धीसाठी शासन कटिबद्ध आहे." प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये हे वाक्य असते. सूक्ष्म सिंचन, फलोत्पादन, अन्न प्रक्रिया, उत्पादकता वाढ यासारख्या केंद्र पुरस्कृत योजनांना आवश्यक पूरक हिस्सा प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येत आहे असे अर्थसंकल्पामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. परंतु हा हिस्सा किती आणि कोणकोणत्या योजनांसाठी आहे याचा उल्लेख नाही. कोरडवाहू शेती अभियानाचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी कोरडवाहू शेती अभियानाचा अर्थ आम्हाला समजावून सांगितला तर बरे होईल. सर्वंकष पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण, शेतकऱ्यांमध्ये कौशल्यवृद्धी अशा अनेक योजनांच्या माध्यमातून राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष प्रयत्नशील आहे. अन्नधान्य उत्पादकतेबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी पाणलोट विकास, फलोत्पादन, प्रक्रिया उद्योग, एकात्मिक पीक पध्दती, तंत्रज्ञान, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या योजनांची एकत्रित मांडणी करुन शाश्वत शेतीवर भर देण्यात येत आहे. सदर उपक्रमांसाठी आवश्यक असणारा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत आहे. हा आवश्यक असणारा निधी किती आहे ? शाश्वत योजना कोणत्या ?

..4..



श्री.पांडुरंग फुंडकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुग्धव्यवसाय, पशुपालन, तंत्रज्ञान प्रसार, एकात्मिक पीक पध्दती या गोष्टी किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेल्या आहेत. महाराष्ट्रातील 80 टक्के शेतकरी हा कोरडवाहू शेती करतो. या कोरडवाहू शेतीसाठी सरकारने कोणत्याही उपाययोजना केलेल्या नाहीत. निसर्गाच्या भरवश्यावर कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याला आधार देणारी कोणतीही योजना या अर्थसंकल्पामध्ये  नाही. केवळ मोघम परिच्छेदाचा अंतर्भाव करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसलेली आहेत.

सभापती महोदय, दुसऱ्या एका परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, राज्यात वारंवार उद्‌भवणारी दुष्काळसदृश परिस्थिती विचारात घेता, जलसंवर्धन योजनेला अनन्यसाधारण महत्व आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत अथवा राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत शेततळयांच्या प्लास्टिक अस्तरीकरणासाठी केंद्र शासन 50 टक्के अनुदान देते, या व्यतिरिक्त राज्य शासन 25 टक्के, 25 हजार रुपयांच्या मर्यादेत वाटा उचलणार आहे. 2014-15 पासून प्लास्टिक अस्तरीकरण करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येईल. ही योजना 10 हजार शेततळयांचे भौतिक उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत लागू राहील. सभापती महोदय, 35 जिल्ह्यांमध्ये 10 हजार शेततळी झाली तर एका जिल्ह्यामध्ये 400 तळी होतील.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

...नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ D/ KTG/ 14:50

श्री.पांडुरंग फुंडकर....

शेतक-यांना तुम्ही किती प्रोत्साहन देत आहात? दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीला ख-या अर्थाने प्रोत्साहन देऊन भविष्यात येणाऱ्या दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शेततळ्यांचा चांगला अभिनव उपक्रम आहे त्याचा या अर्थसंकल्पात विचार केलेला नाही. 10 हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत हा उपक्रम चालू राहणार आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट गाठण्याची मर्यादा ठरवून दिलेली आहे. एखाद्या जिल्हयामध्ये 300 पेक्षा जास्त शेततळ्यांची मागणी झाली तर शासन मंजुरी देणार नाही. प्रत्येक जिल्हयासाठी मर्यादा ठरवून दिली जाणार आहे. कोरडवाहू शेतकरी आहेत, ज्यांनी शेतामध्ये शेततळे तयार केले आहे आणि प्लास्टिक अस्तरीकरण करावयाचे आहे त्याबाबत मर्यादा न घालता मागणी करील त्या शेतकऱ्याच्या शेततळ्यासाठी आणि प्लास्टिक अस्तरीकरणासाठी मदत केली पाहिजे. आज या योजनेसाठी जी मदत केली आहे ती अतिशय अपुरी आहे. इतर योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. मोनोरेल किंवा मेट्रो रेल्वे प्रकल्पाला आमचा विरोध नाही, त्याची आवश्यकता आहे. परंतु शेतकऱ्यांसाठी देखील मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, 2014-15 च्या अंदाजपत्रकामध्ये जलसंपदा विभागातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी 8215 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केला आहे. 1.25 लाख हेक्टर सिंचन क्षमता असणारे आणि सुमारे 1000 दशलक्ष घन मीटर पाणीसाठा निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. या वर्षात सुमारे 60 प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या राज्यातील अनेक पाटबंधारे प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले आहेत.

सभापती महोदय, माझ्या बुलढाणा जिल्हयातील जिगाव हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. युती सरकारच्या काळात या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती त्यावेळी या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय किंमत 360 कोटी रुपये होती. परंतु वेळेवर निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे मागील 10 वर्षात या प्रकल्पाची किंमत 4 हजार कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. या सभागृहात मी या प्रकल्पाचा विषय अनेकदा उपस्थित केला आहे. शासनाचे धोरण आहे की, आधी पुनर्वसन मग धरण. जिगाव प्रकल्पावर शासनाने आतापर्यंत 1000 कोटी रुपये खर्च केले आहेत. त्यापैकी 500 कोटी रुपये यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी खर्ची पडले आहेत. या राज्यात उलट कारभार सुरु आहे. धरण पूर्ण होणे बाकी असताना लिफ्ट इरिगेशन योजनेसाठी निधी देण्यात

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आला. धरणामध्ये पाणी अडविले गेले नसताना लिफ्ट इरिगेशनसाठी 500 कोटी रुपये देण्यात आले. कॉन्ट्रॅक्टरला 500 कोटी रुपये ॲडव्हान्स देऊन त्या रक्कमेतून खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री प्रकल्पाच्या ठिकाणी धूळ खात पडली आहे.

सभापती महोदय, लोकलेखा समितीपुढे या प्रकल्पाचा विषय उपस्थित झाला होता. समितीने त्या प्रकल्पाच्या कामाला भेट दिली. आजपर्यंत या प्रकल्पाच्या कामाची चौकशी झाली नाही किंवा कोणत्याही दोषी व्यक्तीवर कारवाई झालेली नाही. 57 गावांचे पुनर्वसन व्हायचे असून एकाही गावाचे अद्याप पुनर्वसन झालेले नाही. 1000 कोटी रुपये मात्र खर्ची पडले आहेत. यावर्षी अंदाजपत्रकामध्ये या प्रकल्पाकरिता 110 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मंत्री महोदयांना मी पत्र लिहिले आहे. माझ्या भागातील दिवठाणा रोहना प्रकल्प निधीअभावी बंद आहे. भूसंपादनाची कार्यवाही अद्याप सुरु व्हायची आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, सुधारित मान्यता द्यायची आहे. आज अनेक प्रकल्प सुधारित मान्यता न मिळाल्यामुळे रखडले आहेत. सुधारित मान्यता द्यायची म्हणजे प्रकल्पाची किंमत वाढवून देणे. हा प्रकल्प पूर्ण झाला नाही तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने किती सिंचनाच्या गोष्टी केल्या तरी शेतकरी जिवंत राहू शकणार नाही. अजूनही विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत. जोपर्यंत तुम्ही शेतीला पाणी, वीज देणार नाही, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव देणार नाही तोपर्यंत शेतकरी जगू शकत नाही. विदर्भातील शेतीला पाणी मिळत नाही, वीज मिळत नाही. शासनाने म्हटले आहे की, विजेच्या एकूण मागणीपैकी राज्यात 97 टक्के मागणीची पूर्तता होत आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय हे विदर्भातील आहेत, ते सातत्याने दौरे करीत असतात, त्यांना अनेक शेतकरी येऊन भेटतात. तेथील अवस्था काय आहे? यंदा अतिवृष्टीमुळे हातचे पीक गेले. त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी पीक घ्यायचे ठरविले. मूळ पीक गेल्यामुळे शेतकरी रब्बी पिकाकडे वळला. गहू, हरभरा, कांदा पिकाची पेरणी केली. वीज सुरु करायला गेले तर वीज नाही. ज्या ज्या गावात जाल त्या ठिकाणचा फिडर बंद असल्याचे पहायला मिळते. शासन म्हणते की, 97 टक्के मागणीची पूर्तता करीत आहोत. माझे मंत्री महोदयांना आवाहन आहे. एखाद्या गावात आज ट्रान्सफॉर्मर लावला की दुसऱ्या दिवशी तो जळून जातो. मंत्री महोदयांनी याची चौकशी करावी. खामगाव तालुक्यातील पळशी गावाला देण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मर जळाला.

...3..



SGB/ MMP/ D/ D/ KTG/ 14:50

श्री.पांडुरंग फुंडकर....

शेतकरी ट्रान्सफॉर्मर बदलून मिळण्यासाठी वीज मंडळाच्या कार्यालयात गेले, त्यांना ट्रान्सफॉर्मर बदलून देण्यात आला. जो ट्रान्सफॉर्मर लावण्यात आला तो देखील जळाला. पुन्हा ट्रान्सफॉर्मर बदलून आणण्यात आला, वीज पुरवठा सुरु केल्याबरोबर तो सुध्दा जळाला. म्हणून तिसरा ट्रान्सफॉर्मर बदलून आणण्यात आला, तो सुध्दा जळालेला निघाला. तेथील सरपंचांनी मला फोन केला. मी संबंधित कार्यकारी अभियंत्यांना फोन केला त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, आमचा नाईलाज आहे. वरिष्ठ पातळीवरुन माल पाठविला जातो तो शेतकऱ्याला दिला जातो. शेतकऱ्यांना जिवंत ठेवायचे आहे की नाही? तो तुमच्याकडे मोफत विजेची मागणी करीत नाही. त्याला सवलत नको आहे. त्याला विकत वीज द्या, पण कायमस्वरुपी वीज पुरवठा सुरु असला पाहिजे.

सभापती महोदय, आम्ही गुजराथ राज्याचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांचे नाव घेतले की सत्ताधाऱ्यांच्या मर्मावर बोट ठेवले जाते. गुजराथ राज्यात मी स्वत: गेलो होतो. काही जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांकरिता सकाळी 6.00 वाजता वीज पुरवठा सुरु होतो, सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत वीज पुरविली जाते. या राज्यात असे कधीच घडले नाही. शेतकऱ्यांना तुम्ही किती वेळ वीज देता? परवा रात्री 11.00 वाजता मी अकोल्याहून खामगावला जात असताना काही मुले धावत असलेली मला दिसली. मी गाडी थांबवून त्यांच्याकडे विचारणा केली, तुम्ही संत गजानन महाराजांच्या दर्शनाला निघालेले आहात का? त्यांनी उत्तर दिले की, रात्री 11.00 वाजता वीज पुरवठा सुरु होतो म्हणून आम्ही शेतावर निघालो आहोत. रोटेशनच्या नावाखाली शेतकऱ्यांना दाबणार असाल तर ते तुम्हाला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाहीत. कारखानदारांना तुम्ही रात्री 11.00 वाजता वीज पुरवठा केलेला चालेल का? आज शेतकऱ्यांच्या शेतामधील कांदा, ऊस पाण्याअभावी जळत आहे. शेतकऱ्यांना विजेअभावी शेतीला पाणी देता येत नाही. मात्र आम्ही मागणीपैकी 97 टक्के पूर्तता करीत आहोत असे अर्थसंकल्पीय भाषणात नमूद करीत आहात हे कितपत योग्य आहे? सर्व औद्योगिक फिडर आणि 84 टक्के इतर ग्राहकांना भारनियमन मुक्त करण्यात आले आहे असेही म्हटले आहे. वस्तुस्थिती का दडविली जात आहे? हे शेतकऱ्यांच्या नावावर चालणारे राज्य आहे. या राज्यामध्ये बहुसंख्य अन्नदाता राहतात. हे राज्य भांडवलदारांसाठी आहे की शेतकऱ्यांसाठी आहे? अशा प्रकारे अंदाजपत्रकाची मांडणी करुन

...4...



श्री.पांडुरंग फुंडकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणार असाल तर तो तुम्हाला कधीही माफ करणार नाही. शेतकऱ्यांना पैसे देऊनही वीज मिळत नाही. ट्रान्सफॉर्मर जळल्यावर 15-15 दिवस बदलून मिळत नाही. एखाद्या गावाची मागणी केव्हा आली आणि कोणत्या दिवशी ट्रान्सफॉर्मर बदलून देण्यात आला याची मंत्री महोदयांनी चौकशी करावी. ट्रान्सफॉर्मर जळाला तर तो बदलून देण्याची आणि वीज पुरविण्याची जबाबदारी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांची आहे. परंतु विदर्भात ट्रान्सफॉर्मर जळला की शेतकरी वीज मंडळाच्या कार्यालयात गेल्यानंतर अधिकारी सांगतात की 8 दिवसानंतर या.

नंतर वाय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KTG/ D/ D/ MMP/ भोगले.. 15:00

श्री.पांडुरंग फुंडकर...

शेतकरी स्वत:च ट्रान्सफॉर्मर ट्रॅक्टरमध्ये टाकतात व घेऊन जातात. त्यानंतर मग विद्युत बोर्डाचा माणूस तेथे जातो. तो सर्व खर्च विद्युत बोर्डाचे अधिकारी काढतात. त्याची आपण कधी चौकशी करणार आहात काय ? या राज्यातील शेतकऱ्याला कशा प्रकारचे विजेचे वितरण होणार आहे ? आपण शेतकऱ्याला वीज, पाणी देणार नसाल तर शेतकऱ्याने जगावे कसे ? आज कापूस, सोयाबीनची काय अवस्था आहे ? कापूस उत्पादक शेतकऱ्याला सहा हजार रूपये भाव मिळाला पाहिजे अशी मागणी केली होती. आपल्या फेडरेशनला शेतकऱ्याने कापसाचे एक बोंड देखील घातले नाही. युतीच्या काळात शेतकरी लाखो क्विंटल कापूस फेडरेशनला घालत होते. पण आज एक बोंड देखील फेडरेशनमध्ये जात नाही. व्यापाऱ्याच्या घरात सर्व कापूस आहे. सरकार हमी भावाने कापूस खरेदी करत नसल्यामुळे ही परिस्थिती आहे. आज कापसाचा शासकीय भाव फक्त रूपये 3800/- इतका आहे. तोच भाव मार्केटमध्ये 5200/- रूपये आहे. एवढ्या तफावतीने कोणताही शेतकरी आपणाला कापूस देणार नाही. आज आपण कापूस उत्पादक शेतकरी व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला उद्ध्वस्त करीत आहात. सोयाबीनला घरात 2800/- रूपये भाव असतो. शेतकऱ्याच्या घरातून सोयाबीन निघून गेले की, त्याचा भाव 3800/- रूपये होतो. तुरी, हरभऱ्याच्या बाबतीत देखील हीच स्थिती आहे. शेतकऱ्याला उत्पादनाच्या आधारावर भाव मिळत नाही तो पर्यंत शेतकरी जिवंत राहू शकत नाही. आपण शेतकऱ्यांना सबसिडी देऊ नका. मी सांगतो त्या प्रमाणे आपण एक गोष्ट करावी. शेतकऱ्याला पुरेसे पाणी द्यावे, मुबलक वीज द्यावी, शेतकऱ्याच्या मालाला भाव द्यावा. मग कोणी कधीही भीक मागणार नाही. आजही आपल्या राज्यामध्ये शेतीचे नियोजन होत नाही. वर्षानुवर्षे शेतकरी उद्ध्वस्त होत चालला आहे, कर्जबाजारी होत चालला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत चालले आहे. असे दुष्टचक्र आपण शेवटपर्यंत सुरू ठेवणार आहात काय ? त्यामुळे माझी मागणी आहे की, आंध्रप्रदेश सरकारने, कर्नाटक सरकारने कृषीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर केला त्याप्रमाणे आपण देखील शेतीसाठी धोरण जाहीर करावे. आपल्याला शेतकऱ्यांसाठी काही करावयाचे असेल तर शेतीचे, पाण्याचे, विजेचे नियोजन करून शेतीला प्राधान्य द्यावे. शेतकऱ्याला प्रोत्साहन द्यायचे असेल तर आपण तुटक्या-फुटक्या योजना जाहीर करू नये.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

आपण ठिबक सिंचनची योजना जाहीर केली. शेतकऱ्यांचे किती पैसे देणे आपण बाकी आहात ? आपण योजना जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांनी फटाफट ठिबक सिंचनाचे संच खरेदी केले. या शासनाने एका बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे दहा कोटी रूपये अद्याप पर्यंत दिलेले नाहीत. घोषणा करून आपण पैसे देखील दिले नाहीत. अशा प्रकारचा भुलभुल्लैयाचा खेळ मांडला तर जनता त्याला फसणार नाही. आता निवडणुका जवळ आल्या आहेत.

नैसर्गिक आपत्ती निवारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मागच्या वर्षी देखील अतिवृष्टी झाली होती. यात आपण नमूद केले आहे की, गेल्या रब्बी हंगामात 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टर 4 हजार 500 रूपयांप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचा आपण ब्रेक-अप द्यावा. अजूनही असे अनेक जिल्हे आहेत की, तेथे ही मदत मिळालेली नाही. महापूर आले होते. त्यावेळी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी जाहीर केले होते की, नैसर्गिक आपत्तीमध्ये बळी पडलेल्यांच्या वारसांना प्रत्येकी 2 लाख 50 हजार रूपयांची मदत देण्यात येईल. सदर मदत आपण किती व्यक्तींना दिली आहे ? लहान जनावरांच्या मालकांना 5 हजार रूपये मदत दिली आहे आणि पडझड झालेल्या घरांच्या वर्गवारीनुसार 15 हजार ते 70 हजार रूपयांपर्यंत मदत देण्यात आली आहे. ही मदत आपण कुठे दिली आहे ? ही मदत अजून पर्यंत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. मदत मिळण्यासाठी शेतकरी ओरडत आहेत, तर पैसे यायचे आहेत अशा प्रकारचे उत्तर जिल्हाधिकाऱ्यांकडून दिले जाते. धान पिकांसाठी 7 हजार 500 रूपये प्रती हेक्टर, इतर पिकांसाठी 5 हजार रूपये, बहुवार्षिक पिकासाठी 12 हजार रूपये प्रती हेक्टर, खरडून गेलेल्या जमिनीसाठी 20 हजार रूपये आणि वाहून गेलेल्या जमिनीसाठी प्रती हेक्टर 25 हजार रूपये देण्यात आले आहेत. कुठल्या जिल्ह्यात किती रूपयांचे वाटप झाले त्यापैकी किती रक्कम शिल्लक आहे यासंबंधाचा ब्रेक-अप माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावा. हे सरकार बोलते एक आणि करते एक. यातून आपली बोलणी आणि करणी समोर येणार आहे. येथे आपण मोघम उत्तर देऊ नये.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

परवा दिनांक 24 फेब्रुवारी 2014 रोजी विदर्भामध्ये प्रचंड अतिवृष्टी झाली. 110 मि.मी.इतका पाऊस पडला. हरभरा, गहू, कांदा उद्ध्वस्त झाला. अजून पंचनाम्याला सुरूवात झालेली नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, पंचनाम्याचे आदेश दिलेले आहेत. मग त्याची अंमलबजावणी जिल्हाधिकारी का करत नाहीत ? पूर्ण पीक नष्ट झाल्यामुळे गावकऱ्यांचे सारखे फोन येत आहेत. या लोकांना आपण कधी मदत देणार आहात ?

हे शासन गतिमान म्हणून ओळखले जाते. काल झालेल्या अतिवृष्टीमध्ये तीन किलोची गार पडली आहे. तीन किलोच्या गारा पडल्यानंतर कुठले पीक शिल्लक राहणार आहे. आपले अधिवेशन सुरू असताना राज्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर त्यासंबंधी शासनाच्यावतीने ताबडतोब निवेदन होणे आवश्यक आहे. पण आम्हाला यासंबंधी मुद्दे उपस्थित करावे लागतात. काल सभापती महोदयांनी उद्या निवेदन करण्यात येईल असे सांगितले. आम्ही मागणी करतो तेव्हा शासनातर्फे निवेदन करण्यात येते. याकडे सरकारचे लक्ष नाही. आपण शेतकऱ्यांना दुर्लक्षित करून राज्य करणार असाल तर या राज्यातील शेतकरी आपल्याला माफ करणार नाही एवढेच सांगतो आणि मी थांबतो.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, अंतरिम अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे. हे चार महिन्यांचे लेखानुदान आहे. ही चार महिन्यांची आर्थिक बेगमी आहे, शिदोरी आहे. ही पुरून उरणारी शिदोरी आहे. आता लोकसभेच्या निवडणुका लागणार आहेत. पक्ष आणि अपक्ष यांच्या आश्वासनांची खैरात निवडणुकीच्या रणांगणामध्ये दिसणार आहे. रणदुदुंभी फुंकली जाणार आहे. या रणदुदुंभीमध्ये ही चार महिन्यांची बेगमी लोकांच्या स्मरणात राहणार आहे म्हणून मी माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो, राज्य शासनाला मन:पूर्वक धन्यबाद देतो.

सन्माननीय विरोधी पक्षाकडून 4 दिवसांचे अधिवेशन घेण्यात येत असल्यामुळे खंत व्यक्त करण्यात आली. आपला खेद प्रामाणिक असेल. माझ्याकडे जी काही आकडेवारी आहे ती मी आपल्या पुढे आता सादर करणार आहे. देशामध्ये अशी अनेक राज्ये आहेत की तेथे फक्त एक-दोन दिवसांचेच अधिवेशन घेण्यात आले. आपल्या लोकप्रिय गुजरात राज्यामध्ये तीन दिवसांचे, दोन दिवसांचे, एक दिवसाचे अधिवेशन झालेले आहे. तरी देखील आपण खेद व्यक्त करावा ?

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले......

सभापती महोदय, हा विकास नव्हे तर हा प्रपोगंडा आहे, ही माऊथ टॉकींग आहे. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विकास विकास म्हणून स्वत:ची पाठ थोपटून घेणे हा प्रकार आम्हाला संपूर्ण देशात बघावयास मिळतो आहे. महाराष्ट्र सरकारने 4 दिवसांचे अधिवेशन जाहीर करुन अप्रस्तुत, अनाठायी, औचित्य भंग केलेला नाही. चार दिवसाच्या अधिवेशनाबद्दल विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून खेद व्यक्त करण्यात आलेला आहे. ही चर्चा आहे. चर्चेमधून संवाद घडला पाहिजे. सवांदावर आमचा विश्वास आहे. लोकशाहीचे भरण पोषण संवादातून होत असते यावर आमचा विश्वास असून माननीय शिक्षण मंत्र्यांनी हा संस्कार महाराष्ट्रावर घडवलेला आहे. ही प्रबोधनाची दिंडी पुढे गेली पाहिजे अशी आमच्या सारख्यांची भावना आहे. लोकसभेच्या रणांगणामध्ये जे होईल ते होईल. विचारांची ही मैफल आहे. लोकांना कदाचित आमचा विचार आवडेल, कदाचित तुमचा विचार आवडेल. परंतु हे चार दिवसाचे अधिवेशन एकट्या महाराष्ट्रात नव्हे तर गुजरातमध्येही अनेक वेळा झालेले आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये जे उपेक्षित घटक आहेत, सर्वसामान्य माणूस आहे, वंचित आहेत त्यांना न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यात आला आहे. गरीब माणसापासून पशुपक्षापर्यंत या अर्थसंकल्पात काळजी वाहिली गेली आहे. या अर्थसंकल्पात वाघापासून माळढोक पक्षापर्यंत काळजी वाहण्यात आली आहे. वाघाचे अभयारण्य टिकले पाहिजे, माळढोक पक्षी जगले पाहिजे. या शासनाने आपल्या अर्थसंकल्पात प्राण्यांचा, पक्षांचाही विचार केलेला आहे. "जे जे भेटी ते ते मानिती भगवंत" हे सरकार भूत मात्रावर प्रेम करणारे असून अज्ञानाचेही भूत उतरवणारे आहे हे आपण विसरु नये. हा अर्थसंकल्प म्हणजे महाराष्ट्राची चार महिन्याची शिदोरी आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये ही शिदोरी आमच्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनाही कामाला येऊ शकते. ही शिदोरी पुरुन उरणारी आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर मोठया प्रमाणात टीका करण्यात येते. आता महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न वाढलेले आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील जनतेची आर्थिक क्षमता वाढलेली आहे. महाराष्ट्राचे साक्षरतेचे प्रमाण 82.9 टक्क्यावर गेलेले आहे. ज्या राज्यात साक्षरतेचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले......

प्रमाण वाढते ते राज्य विकासाच्या दिशेने झेप घेते असा माझ्या सारख्याचा विश्वास आहे. यामध्ये औद्योगिक विकास अग्रभागी आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासामध्ये त्या विभागाच्या प्रमुखाचा सिंहाचा वाटा असल्यामुळे मी त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन करतो. एकूणच हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला दिशा देणारा आहे परंतु यासाठी दृष्टीची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये शेततळयाविषयी एक योजना जाहीर केलेली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आर्थिक व नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक वेळेस संकटात येतो. अस्मानी संकटामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे पार कंबरडे मोडून जाते. नैसर्गिक आपत्तीमध्ये कधी पाच किलोची गार तर कधी सात किलोची गार पडत असते. मध्यंतरी गारामुळे जालन्यामध्ये काही गाढवे मेली होती. निसर्गाच्या अरिष्टावर मात करण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासन करीत आहे. महाराष्ट्रामध्ये 3-4 वर्षानंतर एकदा दुष्काळ पडतो. या दुष्काळामध्ये मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण होत असते. अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये पाण्याच्या थेबांसाठी त्राही भगवान होत असते. अशा ठिकाणी शेततळे तयार झाले तर ते दुष्काळावर निश्चितपणे मात करु शकतील. शेततळयाच्या मेणकापडाच्या अस्तरीकरणाच्या माध्यमातून आपण 10 हजार शेततळयाचे टारगेट ठेवलेले आहे. माझी शासनाला विनंती राहील की, 10 हजार शेततळयांचे टारगेट संपल्यानंतर शेतकऱ्यांच्या अस्तरीकरणाच्या मागणीकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अस्तरीकरणाची मागणी आपण पूर्ण करु शकलो तर मला खात्री आहे की, या राज्यातील जे तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतात त्या अवर्षण प्रवण क्षेत्रावर मात करण्याची क्षमता निश्चितपणे या शेततळयामध्ये आहे. त्यामुळे शेततळयाचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबवण्यात यावा अशी आग्रहाची विनंती मी करु इच्छितो.

सभापती महोदय, कृषी खात्याबरोबर औद्योगिक विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. आपण 25 विशाल प्रकल्प मंजूर केले असून त्यावर 25,700 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. केंद्र शासनाने उद्योगाच्या संदर्भात ज्या निविदा मागवल्या होत्या त्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्वात जास्त निविदा आलेल्या आहेत. याचा अर्थ महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विकास, औद्योगिक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले......

प्रगती मोठया प्रमाणात सुरु आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक केली तर त्याचा परतावा आपल्याला निश्चितपणे मिळू शकतो अशी उद्योजकांना खात्री पटलेली आहे. त्यामुळे राज्य शासनाने या चार महिन्यांसाठी 25,700 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली असल्यामुळे मी राज्य शासनाचे त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, नवी मुंबई येथे देशातील सर्वात मोठे विमानतळ उभे केले जाणार आहे. या विमानतळावरुन वार्षिक 6 कोटी प्रवासी प्रवास करणार आहेत. दररोज दीड लाख प्रवासी या विमानतळावरुन ये जा करु शकणार आहेत. देशातील कोणत्याही कोपऱ्यात जावयाचे असेल किंवा जगाच्या कोणत्याही कोपऱ्यामध्ये जावयाचे असेल तर नवी मुंबई येथील विमानतळावरुन जाता येऊ शकणार आहे. सन्माननीय सदस्य जर सिडनीत गेले किंवा शिकागो येथे गेले तर त्यांना आठवण होईल की, आघाडी सरकारने नवी मुंबई येथे जे विमानतळ केले त्यामुळेच मला नवी मुंबईच्या विमानतळावरुन शिकागोला जाता आले. नवी मुंबईतील हे विमानतळ म्हणजे कुंभमेळाच आहे. एवढा मोठा प्रकल्प नवी मुंबईत होत असल्यामुळे मी राज्य शासनाला मन:पूर्वक धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आपण पुणे आणि नागपूर येथे मेट्रो उभी करीत असल्यामुळे आनंद आहे. पुण्यामध्ये ग्रामीण भागाचा जास्त संपर्क आहे. विदर्भाला न्याय देण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात त्यामुळे आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद. परंतु मराठवाडयामध्ये औरंगाबादही आहे. त्यामुळे आपण मराठवाडयातील जनतेला आश्वासित करावे की, आम्ही औरंगाबाद येथेही मेट्रो प्रकल्प उभा करु. जेणे करुन या राज्याचे समन्यायी विकासाचे जे सूत्र आहे त्या विषयी या राज्यातील जनता आश्वासित होईल व मराठवाडयालाही विश्वास पटेल की, हे शासन आपले आहे. त्यामुळे या दृष्टीने आपण आश्वासन द्यावे अशी आग्रहाची विनंती मी या निमित्ताने करु इच्छितो.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, शासनाने सुकन्या योजना आणलेली आहे. ही सुकन्या योजना मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी संजीवनी ठरणार आहे. ही योजना अमृताचे कण ठरणार आहे. ही योजना म्हणजे गरीब मुलींच्या हातातील अतूट दोरी आहे. ही अतूट दोरी कल्पकतेने आणण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याबद्दल मी शासनाला मन:पूर्वक धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शासनाने महिलांकरिता स्वयंसिध्दा योजना आणली आहे. या योजनेमध्ये महिलांना संरक्षण प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिलांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षित केले जाणार आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या आवडीचा हा विषय आहे. महिला स्वयंसिध्द झाल्या पाहिजेत. महिला दुर्बल असतील तर त्यांचे संरक्षण कोण करणार ? महिलांचे संरक्षण करण्यास आपला पोलीस विभाग सक्षम आहे, परंतु त्यास काही मर्यादा आहेत. तेव्हा महिला पूर्णपणे स्वयंसिध्द झाल्या पाहिजेत यासाठी राज्य शासन आग्रही आहे. राज्य शासनाचा हा आग्रह यशस्वी ठरण्यासाठी शासनाचे जे प्रयोजन आहे ते मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे. "कोण पुसे अशक्ताला रोगी बळालीसे दिसे, कळा नाही, कांती नाही, युक्ती बुध्दी दुरावली." दुर्बलांच्या हातून काही घडत नाही. जे सबळ आहेत, ज्यांच्या बाहुबळात सामर्थ्य आहे तेच बदल करु शकतात. म्हणूनच कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णाने अर्जुनास गीता सांगितली. अर्जुन लढवय्या आहे, तो दोन हात करु शकेल असा श्रीकृष्णास विश्वास होता. तेव्हा महाराष्ट्रातील महिलांना स्वयंसिध्द करण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतलेली आहे. ही कृती अतिशय स्तुत्य आहे त्याबद्दल राज्य शासनाचे मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्यातील म्हैसमाळ, वेरुळ, अजिंठा, खुल्ताबाद ही पर्यटन स्थळे शासन विकसित करणार आहे. दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रात मुंबईतील समुद्रावर विमान उतरणार अशी बातमी होती. विमान समुद्रामध्ये उतरुन ते पाण्यावर तरंगणार आणि तेथूनच उड्डाण करुन महाराष्ट्रातील काही प्रकल्पांवर थेट उतरणार. अशी योजना असेल तर त्या योजनेमध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणच्या नाथसागराचा देखील समावेश असावा. माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांना जर कधीतरी वाटले की, पाण्यावरुन जाऊ, समुद्राचे दर्शन घेऊ तर त्यांना ते घेता येईल. तेव्हा तोही उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, पाण्यावर तरंगणारी बस देखील येणार आहे. रस्त्यावर चालणारी बस पाण्यावर तरंगणार आहे असे अभूतपूर्व दृश्य महाराष्ट्रात दिसणार आहे. हे स्वप्नातील दृश्य आहे. हे केवढे विहंगम दृश्य असणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटनाला मोठा वाव आहे. पुढील दोन-चार महिन्यामध्ये अशा तरंगणाऱ्या बसमध्ये माझ्यासारख्याला बसण्याची संधी मिळाली तर मी नक्कीच भाऊसाहेबांना आग्रह करीन की, आपण दोघेजण त्या तरंगणाऱ्या बसमध्ये तरंगू. असा तरंग निर्माण करण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केलेला आहे त्याबद्दल मी राज्य शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, नाशिक येथे कुंभमेळा आहे. त्या कुंभमेळ्यामध्ये नागासाधू आणि अन्य साधू अशा अनेक साधूंचा महामेळावा भरणार आहे. शैव आणि वैष्णव या दोघांचा अंतर्भाव त्या कुंभमेळ्यात असणार आहे. तेथे नग्न दशेमध्ये रहाणारे नागासाधू पाहावयास मिळणार आहेत. या देशातील परंपरेचे उत्तम दृश्य नाशिकच्या कुंभमेळ्यामध्ये पहावयास मिळणार आहे. उद्याच्या लोकसभेच्या कुंभमेळ्याव्यात सुध्दा आपणास असे दृश्य पहावयास मिळेल. अर्धनग्न अवस्थेमध्ये प्रचार करणारे आणि इतरांवर आरोप प्रत्यारोप करणारे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये प्रचार करताना दिसतील त्यांना जनता त्यांची जागा निश्चितपणे दाखवेल आणि अशी एक सनई लोकांच्या कानावर पडेल की, लोक त्या दिशेने पाहत राहतील की, हा ध्वनी कोठून येतो, हा स्वर कोठून येतो, ही सनई वाजविणारा मानव कोण आहे, समूह कोण आहे, तर जनतेला फक्त आघाडीचेच सदस्य दिसतील. आमचे माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा आणि माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांच्या मुखात ती सनई असेल आणि त्यातून निघणारा मंजूळ स्वर मतदारांच्या कानावर पडेल. मतदार त्यांच्याकडे आकृष्ट होतील. तो दिन लवकर येणार आहे आणि तो दिवस पाहण्याचे भाग्य आपल्यासुध्दा वाट्याला लवकर येवो असे सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2014-2015 चा जो अंतरिम अर्थसंकल्प येथे सादर करण्यात आला त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी स्वत:ची पाठ स्वत:च थोपटून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी त्यांच्या भाषणाचा शेवट चांगला केला. त्यांनी सांगितले की, सनईचा स्वर लोकांच्या कानावर पडेल आणि ती सनई वाजविणारे सत्ताधारी पक्षाचेच असतील. त्यांनी पुढे असे सांगितले पाहिजे होते की, आजही विदर्भामध्ये माता भगिनींचे मंगळसूत्र तुटत आहे, आजही विदर्भामध्ये माता भगिनींचे कपाळवरील कुंकू पुसले जात आहे. आजही विदर्भामध्ये माता भगिनी विधवा केल्या जात आहेत आणि हे सर्व सत्ताधारी पक्षाकडून केले जाते. विदर्भातील मायभगिनींचा आक्रोश हा सत्ताधारी पक्षामुळेच होत आहे हे देखील सांगावयास पाहिजे होते आणि या सर्व गोष्टी महाराष्ट्रातील जनतेपर्यंत निश्चितपणे पोहोचतील असा मी विश्वास व्यक्त करतो.

सभापती महोदय, दोन्ही बाजूकडून भाषणे होतील. परंतु आपण ज्यांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतो त्यांनी या अंतरिम अर्थसंकल्पाबद्दल काय म्हटलेले आहे ते मी वाचून दाखवितो. दैनिक नवाकाळने म्हटले आहे, "5 हजार 550 कोटी रुपये महासुली तुटीचा अर्थसंकल्प, राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट योजनांचा मात्र गडगडाट, अनुसूचित जाती, जमाती आणि नवबौध्दांवर मदतीचा पाऊस " दैनिक महाराष्ट्र टाईम्स हे लोकप्रिय दैनिक आहे. त्या वृत्तपत्राने म्हटले आहे "तूट डोईवर, हंगामी अर्थसंकल्प सादर, महसुली तूट 5 हजार 500 कोटीनी वाढली" दैनिक लोकसत्तामध्ये "आघाडी सरकारचा चारमाही अर्थसंकल्प, खिशात नाही आणा आणि उदार बाणा." आमच्या कोकणात असे म्हटले जाते की, "खिशात नाही आणा आणि मला बाजीराव म्हणा"

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

रामदास कदम हे विरोधी पक्षाचे आहेत म्हणून टीका केली असे आपण म्हणता कामा नये. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या मीडियाने ही टीका केली आहे. आपण किमान चौथ्या स्तंभाचा आदर ठेवावा अशी माझी अपेक्षा आहे.

महोदय, सामना दैनिकामध्ये "अबब...सरकारचे बजेट साफ कोसळले, 5500 कोटी रुपयांची तूट, बाकी सब झूठ" या मथळ्याखाली बातमी देण्यात आली आहे. पुढारी दैनिकामध्ये "निवडणुका छाप हंगामी बजेट" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झालेली आहे. या मथळ्याचा अर्थ असा आहे की, निवडणुका डोळ्यासमोर ठेवून बजेट सादर केले आहे. कालचे बजेट जनतेसाठी सादर केले नाही असा मी त्या बातमीचा अर्थ लावतो. वैयक्तिक स्वार्थासाठी, पुन्हा निवडून येण्यासाठी, किंबहुना खुर्च्या उबवण्यासाठी कालचे बजेट मांडल्याचे पुढारी दैनिकाने म्हटले आहे. महोदय, सकाळ दैनिकाने मात्र सावध पवित्रा घेतला आहे. त्या दैनिकाचे संपादक कोण आहेत हे मला माहीत नाही. त्यांना साक्षात्कार झाला. त्यानी सावध प्रतिक्रिया दिली. त्यांनी "कल्याणकारी योजनांचा वर्षाव- अंतरिम अर्थसंकल्प सादर, जीवनावश्यक वस्तूंवरील कर सवलत कायम" या मथळयाखाली बातमी दिली. लोकमत दैनिकाने "राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प : स्वस्त विजेसाठी 9 हजार कोटी, सवलतींचा संकल्पनामा" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द केलेली आहे. यावरुन आपल्या लक्षात येईल की, लोकमतने कालच्या अर्थसंकल्पाचे मोघम वर्णन केले आहे. अंतरिम अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने पुढे काही अंमलबजावणी होणार नाही असे कदाचित लोकमत दैनिकाला म्हणायचे असेल. तरुण भारत दैनिकाने "जुन्या घोषणांना नवा साज, 5417 कोटी रुपयांचा तुटीचा हंगामी अर्थसंकल्प सादर, करसवलती कायम" या मथळ्याखाली बातमी दिली आली. वार्ताहर दैनिकामध्ये "करमाफी सवलत कायम, 5417 कोटी रुपये तुटीचे लेखानुदान" या मथळ्याखाली बातमी देण्यात आली आहे.

महोदय, राज्यातील सबंध जनतेचा कानोसा घेतला तर एक गोष्ट स्पष्ट होते की, निवडणुका तोंडावर आल्यामुळे राज्याच्या मंत्रिमंडळाने निश्चितपणे निर्णयांचा पाऊस पाडला. निवडणुका तोंडावर असल्यामुळे एका महिन्यात 30 लोकाभिमुख निर्णय घेतले गेले. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, हे निर्णय दोन-पाच वर्षांपूर्वी का घेतले नाहीत ? आपण जनसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेने खुर्चीवर बसला असाल तर हे निर्णय 10-12 वर्षांपूर्वीच घ्यावयास हवे होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते का घेतले नाहीत, याचे उत्तर कोण देईल ? राज्यातील नागरिकांना, शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या त्याला कोण जबाबदार आहे ?

महोदय, सत्ताधारी पक्षाच्या काही नेत्यांकडून जाहीरपणे टीका केली गेली की, "फाईल्सवर सह्या होत नाहीत. शासनाच्या हाताला लकवा झाला आहे की काय ?" महोदय, मी विचारु इच्छितो की, सत्ताधारी बाजूच्या नेत्यांवर असे बोलण्याची वेळ का आली, अशा प्रकारची टीका होण्यापूर्वी लोकाभिमुख 30 निर्णय का होऊ शकले नाहीत ? सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब, आपल्याच पक्षाच्या ज्येष्ठ मंत्र्यांना हे सांगावे लागले की, या सरकारकडून विकासाची कामे होत नाहीत, विकासात्मक निर्णय होत नाहीत. ज्येष्ठ मंत्र्यांनी टीका केल्यानंतर तातडीने 30 निर्णय करुन घोषणांचा पाऊस पाडला गेला. किंबहुना त्या माध्यमातून ऐतिहासिक घोषणा करण्यात आल्या.

महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी मुद्दा मांडला की, अनेक राज्यांमध्ये 1, 2, 3 दिवसांचे अधिवेशन झालेले आहे. मी त्यांना विचारले की, गुजरात राज्य सोडून अन्य कोणत्या राज्यात अशी अधिवेशने झाली ते सांगा. त्यांनी सांगितले की, मला माहीत नाही. मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगू इच्छितो की, गुजरात राज्यात 1-2 दिवसांचे अधिवेशन कधी झाले याची माहिती आपण काढावी. महाराष्ट्रात ज्या ज्या वेळी गारपीट झाली, भूकंप झाला त्या वेळी विरोधी पक्षाने मागणी केल्यानंतर एक-दोन दिवसांचे अधिवेशन घेण्यात आले. परंतु यापूर्वी कधीही अर्थसंकल्प सादर करण्यासाठी 1-2 दिवसांचे अधिवेशन घेतले गेले नाही. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, दुसऱ्याकडे एक बोट दाखविले तर तीन बोटे आपल्याकडे असतात हे लक्षात ठेवा. आम्ही आदर्श प्रकरणाच्या अहवालावर चर्चेची मागणी केली आहे. सरकार त्या अहवालावरील चर्चा का स्वीकारत नाही ? आदर्श अहवालावर चर्चा करण्यासाठी एक-दोन दिवसांचे अधिवेशन बोलविण्यासाठी आम्ही माननीय राज्यपाल आणि शासनाला निवेदन दिले. शासन एक-दोन दिवसांचे अधिवेशन घेऊन आदर्श अहवाल प्रकरणी चर्चा का करीत नाही ? आदर्श इमारतीतील बेनामी फ्लॅट संदर्भात काहीच समजलेले नाही. परंतु त्या इमारतीमध्ये बेनामी फ्लॅट कोणाचे आहेत हे सांगून मी 9 मंत्र्यांचे कपडे उतरविणार आहे. त्यांनी कोठून पैसे आणले, ते कोणाच्या खात्यात आले, तेथून कोठे ट्रान्सफर झाले, डी.डी.कोणाच्या नावे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होता या बाबतची सविस्तर माहिती माझ्याकडे आहे.  त्या 9 मंत्र्यांमध्ये आमच्या पक्षाचा खासदार नाही. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित खाली बसून मी उच्चारलेल्या एका शब्दावर आक्षेप घेत आहेत.  मी त्यांना सांगतो की, 'कपडे उतरविणार' हा शब्द मी मागे घेतो व त्या ऐवजी 'भांडाफोड करणार' हा शब्द वापरतो.  मी त्यांना विचारु इच्छितो की, आपण नियमाच्या बाहेर जाऊन सभागृहात इतरांची नावे घेता ते चालते का ? मी पुन्हा एकदा सांगतो की, आम्ही ज्या ज्या वेळी अधिवेशनाची मागणी केली त्या वेळी विशेष अधिवेशन बोलाविण्यात आले नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

तुम्ही 4 दिवसांचेच अधिवेशन का ठेवले ? कारण यापेक्षा जास्त दिवसांचे अधिवेशन घेतले तर तुमचे घोटाळे बाहेर पडतील. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर जनतेसमोर जाऊ शकणार नाही. भांडाफोड होऊ नये म्हणून फक्त 4 दिवसांचे अधिवेशन घ्यायचे, कार्यक्रम घ्यायचे आणि पळून जायचे, हे ठरले आहे आणि म्हणूनच हे 4 दिवसांचे अधिवेशन आहे. मी 6 वर्षांचे सर्व अर्थसंकल्प आणले आहेत. माझ्याकडे सर्व माहिती आहे. 6 वर्षांत किती घोषणा केल्या याची माहिती माझ्याजवळ आहे. या सर्व अर्थसंकल्पांमध्ये कोणती समानता आहे, याची यादी माझ्याकडे आहे. मी खोलात जात नाही. मी काल एक मुद्दा मांडला होता. आपण त्या संदर्भात माझ्या ज्ञानात भर टाका. कोंढाणा धरणाच्या संदर्भातील उत्तर तुम्ही मला का देत नाही ? हिंमत असेल तर उत्तर द्यावे. कोंढाणा धरणाचे 57 कोटी रूपयांचे अंदाजपत्रक 20 दिवसांत साडे चारशे कोटी रूपयांचे कसे होते, 44 मीटरची उंची 74 मीटरपर्यंत कशी वाढते, विदाऊट टेंडर एफए कन्स्ट्रक्शनला काम कसे दिले जाते, एफए कन्स्ट्रक्शन शासनाचा जावई आहे का ? शासनाकडून लूट चालली आहे. शासन जनतेची कशी लूट करीत आहे त्याचे हे उदाहरण आहे. मी या संदर्भातील मुद्दा मांडला पण शासन उत्तर देत नाही. हिंमत असेल तर उत्तर द्यावे. मला माहीत आहे की, तुम्ही उत्तर देऊ शकत नाही. सभागृहात यायचे, भाषणे करायची आणि निघून जायचे. तुम्ही तुम्हाला हवे तेवढे घ्यायचे आणि बाकी सोडून द्यायचे.

सभापती महोदय, ही फक्त एका धरणाची माहिती आहे. माझ्याकडे विदर्भ पाटबंधारेच्या सर्व धरणांची माहिती आहे. माननीय पालकमंत्री 15 ऑगस्टला देखील सह्या करतात. झेंडावंदन करायचे सोडून माननीय पालकमंत्री सही करण्यासाठी येथे येतात. 6 हजार कोटी रूपयांचे 26 हजार कोटी रूपये 6 महिन्यांत होत आहेत. आमच्या ज्ञानात भर पडू द्यावी. मी जबाबदारीने बोलत आहे. 6 महिन्यांत 26 हजार कोटी रूपये होत असतील तर ते योग्य नाही. शासन तुमचेच आहे, लुटा. 20-20 हजार कोटी रूपये लुटण्याचे काम हे शासन करीत आहे. आपण अर्थसंकल्प 5-10 हजार कोटी रूपयांच्या तुटीचा सांगत आहात. अर्थसंकल्प तुटीचाच असणार, तो फायद्यामध्ये कसा येणार ? शासनाने माझ्या कोकणला किती पैसे दिले, कोकण वैधानिक विकास मंडळाची स्थापना का होत नाही ? या संदर्भात कोण उत्तर देणार आहे. कोकणात लॉटरी काढा. सतत 20 वर्षे मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभागृहात मागणी करीत आहे. विधानसभेत 2 वेळा एकमताने ठराव करून केंद्र शासनाला पाठविला तर पुन्हा केळकर समिती आली. हे कशासाठी ? पुन्हा समिती कशाला ? एखादे काम करायचे नसेल तर नवीन समिती नेमायची म्हणजे ते काम 3-4 वर्षे पुढे जाते. हा एककलमी कार्यक्रम सुरू आहे. आमची सत्ता असताना कोकणात पाटबंधारेची 35 कामे सुरू केली होती. तुमची सत्ता आल्यानंतर 19 वर्षांत किती पाटबंधारेची कामे पूर्ण झाली, अंतरिम बजेटमध्ये किती पैसा दिला, राज्यात कोकण आहे की नाही ? आमचा जीव तुटतो. ज्याच्या हातात ससा तो पारधी असे आम्ही ऐकले होते. ते आता आम्ही प्रत्यक्ष अनुभवत आहोत.

सभापती महोदय, विदर्भ व कोकण या संदर्भात काय चालले आहे ? खानदेश, मराठवाडा याचीही मला कल्पना आहे. पश्चिम महाराष्ट्र म्हणजेच फक्त महाराष्ट्र आणि त्यासाठीच हे बजेट असते का ? कोंढाणा धरणाचे 57 कोटी रूपयांचे साडे चारशे कोटी रूपये कसे झाले, किती खाणार ? कोकणात आम्ही सुरू केलेल्या 35 पाटबंधारे प्रकल्पांबाबत शासनाची भूमिका काय आहे, ते स्पष्ट होणे गरजेचे आहे. कोकणातील ग्रामीण भागातील एसटी बंद झाली आहे. रस्त्यांची दुरूस्ती केलेली नाही. लोक त्या संदर्भात रस्त्यावर आले आहेत, आंदोलन करीत आहेत. पोलीस येऊन लाठीचार्ज करीत आहेत. लोक बोजा घेऊन 10-15 कि.मी. चालत जात आहेत. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेब म्हणाले की, सनईचा आवाज लोकापर्यंत पोहचवायचा आहे. मी त्यांना सांगतो की, आपण कोकणात सनई घेऊन जावा. तुम्ही जाऊ शकत नाही. कारण तेथील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. गावेच्या गावे खड्ड्यात आहेत. लोक हायवेवरच बसत आहे. आंदोलन करीत आहेत. पोलीस येऊन लाठीचार्ज करीत आहेत. मी सर्व काही जबाबदारीने बोलत आहे. कोकणातील रस्त्यांच्या दुरूस्तीला पैसे मागत आहोत. शासन ते देत नाही. सिंचनासाठी 70 हजार कोटी रूपये खर्च होऊन 0.1 टक्का सिंचन होते, असे माननीय मुख्यमंत्री म्हणतात. सार्वजनिक बांधकाम विभागासाठी 70 हजार कोटी रूपये खर्च झाले आणि तरीही आमच्या रस्त्यांवर खड्डे आहेत. मग हा पैसा कुठे गेला ? कोकणात एसटी बंद झाली आहे. कोकणात दीड टक्का सिंचन आहे. अर्थसंकल्पात कोकणासाठी वाटाण्याच्या अक्षता दिल्या. आम्ही येऊन म्हणायचे की, आम्हाला बोलू द्या आणि मग आम्हाला शेवटचे 5 मिनिटे बोलण्यास द्यायचे, हे बरोबर नाही. आम्ही

..3



MSK/ KTG/ D/ पूर्वी श्री. बोर्डे 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

एवढे बोलतो पण आपण आम्हाला काहीही देत नाही. आम्ही हा सनईचा आवाज घेऊन कोकणात जायचे का ? माझी शासनाला या संदर्भात कळकळीची विनंती आहे. कोकणाचे प्रस्ताव 1:9 असे आले आहेत, ते प्रस्ताव ताबडतोब मंजूर करू असे मागे सांगितले होते. आतापर्यंत कोकणातून 1:9 याप्रमाणे किती प्रस्तावांना मान्यता दिली ? कोकणात आंबे, काजू, फणस, जांभूळ, आवळा, चिंच अशी सर्व फळे होतात. आपण तेथे आतापर्यंत फूड प्रोसेस करण्यासाठी किती निधी दिला ? तुमच्या स्वत:च्या संस्था आहेत. साखर कारखाने, सूत गिरण्या यांनी शासनाचे 4 हजार कोटी रूपये थकविले आहेत. ते साखर कारखाने, सूत गिरण्या आमदार, मंत्र्यांच्याच आहेत. त्यांनी 4 हजार कोटी रूपये खायचे आणि पुन्हा तुम्ही अनुदान द्यायचे, हे बरोबर नाही. तुम्ही असे करता कारण तुम्ही सत्तेमध्ये आहात. कोकणाने काय करायचे ? आपण कोकणात झाडे लावली. आम्ही त्या संदर्भात आभार मानले. काजू वाळले, ओली बोंडे खाली पडतात, सडून जातात. आंब्याची देखील नुकसानभरपाई दिलेली नाही. आपण 5 हजार कोटी रूपयांचा तुटीचा अंतरिम अर्थसंकल्प सादर करीत आहात. साखर कारखाने, सूत गिरण्या यांनी 4 हजार कोटी रूपये थकविले आहेत, ते त्यांच्या घशातून काढा आणि ते शेवटच्या माणसापर्यंत पोहचवा. तुम्ही ते करू शकणार नाही. धनदांडग्यांचे शासन आहे. तुम्ही शेवटच्या माणसासाठी काय करणार आहात ?

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

तुम्ही जे उद्योग केले, तुम्ही जो घोषणांचा पाऊस पाडला आहे, त्याची अंमलबजावणी होणार नाही, कारण, शासनाकडे तेवढा निधीच नाही. या शासनावर 3 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. आम्ही फक्त 19 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. तुम्ही पूर्वी 18 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. अशा प्रकारे 26 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. परंतु, तुम्ही त्यावेळी गावोगावी जाऊन ढोल वाजविले, या सरकारने तिजोरी लुटली, तिजोरीमध्ये खडखडाट आहे. त्यावेळी 19 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. आम्ही त्याचा हिशेबही दिला. पश्चिम महाराष्ट्रासाठी कृष्णा खोऱ्यासाठी कर्ज काढले, मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे तयार केला, त्यासाठी 3 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. राज्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी 2 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. राज्यातील ग्रामीण भागातील महिला रस्त्यावर शौचासाठी बसतात. मोफत शौचालये बांधून देण्यासाठी 2000 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. अशा प्रकारे आम्ही काढलेल्या कर्जाचा हिशेब आम्ही दोन मिनिटात देऊ शकतो. परंतु, या सरकारने 3 लाख हजार कोटी रुपयांचे जे कर्ज काढले आहे, ते कशासाठी काढले, हे श्वेतपत्रिका काढून सांगावे. हे सरकार अशी श्वेतपत्रिका काढू शकणार नाही. मी आपल्याला जबाबदारीने सांगू इच्छितो की, 20 हजार कोटी रुपये केवळ व्याज भरण्यासाठी लागणार आहेत. मग या राज्याचा विकास कसा करणार आहात ? या सरकारकडे पैसे आहेत का ? केवळ फसव्या घोषणा केल्या जातात. महाराष्ट्र आज कर्जबाजारी झाला आहे. प्रत्येक मंत्री ज्या लाल दिव्याच्या वाहनांमधून फिरतात, ते वाहन देखील कर्जात आहे. त्यांना माहीत आहे की, आम्ही सत्तेवर येणार आहोत. त्यामुळे जाता जाता जे काही मिळेल ते खाऊन जावे, असा त्यांचा विचार आहे. पुढे काय होणार आहे, याची त्यांना चांगली कल्पना आहे.

सभापती महोदय, हे सरकार कोकणावर अन्याय करीत आहे. विदर्भावर अन्याय करीत आहे. सर्व पैशाची लूट मंत्री करीत आहेत. मी अनेक वर्षांपासून विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी 200 कोटी रुपये द्यावेत, अशी मागणी करीत आहे. गेल्या 15 वर्षात सरकारने ही मागणी पूर्ण केलेली नाही. आता या दुरुस्तीचे अंदाजपत्रक 500 कोटी रुपयांवर गेले आहे. यामुळे 6 लाख बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार आहे आणि खाली असलेल्या सर्व शेतीला पाणी मिळणार आहे. परंतु, या सरकारकडे 500 कोटी रुपये देण्यासाठी पैसे नाहीत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

केवळ विदर्भाच्या जनतेला पॅकेज द्यायचे, त्या माध्यमातून आपल्या पतपेढ्यांचे आणि बँकांचे पैसे काढून घ्यायचे, आपली पोटे भरायची, बँका भरुन घ्यायच्या आणि तिकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरुच आहेत. पॅकेज हा केवळ धंदा झाला आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून पुन्हा एकदा मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, कोंढाणा धरणाची चौकशी करण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे शब्द टाकावा. यासाठी तातडीने समितीने नेमावी. आपण राज्यमंत्री असल्यामुळे आपल्याला अधिकार नाहीत. म्हणून त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करावी.

सभापती महोदय, हे भ्रष्ट, सिंचनामध्ये पैसे खाणारे, आदिवासींसाठी, मागासवर्गीयांसाठी करण्यात येणाऱ्या खरेदीमध्ये पैसे खाणारे शासन आहे. हे शासन मागासवर्गीयांनाही सोडत नाही. मागासवर्गीयांच्या एकाही औद्योगिक सहकारी संस्थेला 3 वर्षापासून पैसे मिळालेले नाहीत. काही बोगस सहकारी संस्था मंत्र्यांच्या आहेत. या सर्व व्यवहाराची चौकशी करावी. जो तळे राखील तो पाणी पिईल, अशी म्हण आम्हाला माहिती होती, पण जो तळे राखील तो अख्खं तळंच गिळंकृत करील, हे माहीत नव्हते.

सभापती महोदय, सन्माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर सभागृहात उपस्थित नाहीत. मी आरोप करीत नाही. परंतु, प्रभादेवी येथील एका बिल्डरची सुपारी घेऊन हे शासन काम करीत आहे. स्कॉयलॉक बिल्डर असे त्या बिल्डरच्या कंपनीचे नाव आहे. त्याची सर्व माहिती सचिन भाऊंना आहे. मी सतत मागणी करीत आहे. पण मला असत्य आणि चुकीची उत्तरे दिली जात आहेत. मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली की, आपण यामध्ये लक्ष घालावे. एखादी संस्था एसआरएच्या माध्यमातून विकास करु इच्छिते, झोपडीतून इमारतीमध्ये जाण्याचे स्वप्न रहिवासी बघतात, गेल्या 10 वर्षापासून पूर्वीचा बिल्डर काम करीत नाही म्हणून त्याला हाकलून देऊन दुसरा बिल्डर नेमण्यात आला. परंतु, त्याला काम करु दिले जात नाही. असे हे शासन आहे. हे भ्रष्ट शासन आहे.

सभापती महोदय, शासनाने 4 महिन्यांसाठी 5 हजार कोटी रुपयांचे अंतरिम बजेट सादर केले आहे. परंतु, उद्या जेव्हा पूर्ण बजेट सादर होईल, तेव्हा ते महसुली तुटीचे असेल, याची

...3.....



SRR/ KTG/ D/ MMP/ D/ प्रथम श्री.मंगेश कांबळे........ 15:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

मला जाणीव आहे. या भ्रष्ट शासनाचा धिक्कार आणि निषेध करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय श्री.रामदास कदम हे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांचे भाषण सुरु असताना डिस्टर्ब केलेले त्यांना आवडत नाही. परंतु, त्यांनी भाषणात काही वक्तव्ये केली आहेत, त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. राज्यात 0.1 टक्केच सिंचन झाले आहे, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. मागील अधिवेशनात आणि त्या अगोदर देखील याबाबतचा खुलासा करण्यात आला आहे. ही आकडेवारी वेगळ्या प्रकारची आहे. मुख्यमंत्री महोदय आणि जलसंपदा मंत्री महोदयांनी याबाबतचा खुलासा केलेला आहे. त्यामुळे माझा आक्षेप आहे की, 0.1 टक्के सिंचन क्षमता ही कशा पध्दतीने नोंदण्यात आली आहे, याचा खुलासा झालेला असल्यामुळे त्या आकडेवारीचा उल्लेख कामकाजातून काढावा. राज्यात 22 ते 23 टक्के सिंचन क्षमता झालेली आहे, हे देखील जाहीरपणे सांगण्यात आले आहे. त्यामुळे कामकाजात जी चुकीची आकडेवारी आली आहे, ती आपण वगळावी. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी बिल्डरची सुपारी घेऊन सरकार काम करीत आहे, असेही वक्तव्य केले आहे. हे शासन तुमचेही आहे आणि आमचेही आहे. कोणतेही शासन सुपारी घेऊन काम करीत नसते. त्यामुळे ते वक्तव्यही कामकाजातून वगळावे, अशी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासन म्हणजे कोण ? शासन म्हणजे कोणी व्यक्ती नाही. हा वाद न्यायालयामध्ये देखील गेला होता, याबाबत न्यायालयाने निकाल दिलेला आहे व तो स्पष्ट आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, तो योग्य आहे. याचे कारण असे आहे की, शासन सुपारी घेऊन काम करीत आहे, हे वाक्य चुकीचे आहे. एखाद्या व्यक्तीवर आपण असा आरोप करु शकतो. त्याला काही हरकत नाही. परंतु, 'शासन' हा जो काही शब्द वापरला आहे, तो योग्य ठरणार नाही. सभापती महोदयांनी, ते वक्तव्य तपासून पहावे व योग्य तो निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.मारोती शिगम......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : शासन ही व्यक्ती नाही. अशा प्रकारच्या अनेक बाबी न्यायालयामध्ये गेल्या होत्या. न्यायालयाने या बाबतीत काय निर्णय दिलेला आहे तो आपण तपासून पहावा. मी काही अयोग्य वक्तव्य केले असेल तर ते कार्यवृत्तातून काढून टाकावे. 0.1 टक्क्याचा उल्लेख कॅगच्या अहवालामध्ये आहे. कॅगचा अहवाल सर्वांना बंधनकारक आहे.

श्री. राम पंडागळे : या राज्यामध्ये 22 टक्के सिंचन झालेले असून आपण सर्वांनी ते मान्य केले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी आपले भाषण सुरु करावे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी केवळ दोन महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. बीड जिल्हयाला कापसाचे आगार म्हणून ओळखले जाते. गेल्या वर्षी बीड जिल्ह्यामध्ये साधारणपणे 60 लाख क्विंटल कापसाचे उत्पादन झालेले आहे. मी माननीय मंत्री महोदयांच्या विनम्रपणे एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या 60 लाख क्विंटल कापसापैकी फक्त 32 लाख क्विंटल कापूस जिनिंगमध्ये संकलित करण्यात आला. उर्वरित 28 लाख क्विंटल कापूस परराज्यामध्ये गेला. जेव्हा तामीळनाडू, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यातील कापूस आपल्या राज्यामध्ये येतो त्यावेळी त्या कापसावर कर लावला जातो. 100 क्विंटल कापसाच्या एका ट्रकला साधारणपणे साडेचार ते पाच हजार रुपये इतका कर लावला जातो. परंतु जेव्हा महाराष्ट्रातून परराज्यात कापूस जातो त्यावेळी राज्याला अपेक्षित कर मिळत नाही. आपल्या राज्यातील कर वसूल करणारी यंत्रणा कुचकामी आहे. साधारणपणे 9 ते 10 हजार कोटी रु. इतका कर व्यापारी बुडवतात. परिणामी सूतगिरण्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. आपल्या राज्यातील कर वसूल करणाऱ्या यंत्रणेची चौकशी करावी अशी मी विनंती करतो. कर वसुलीसाठी कडक उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, बीड ते सोलापूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाचा विषय मी गेल्या दोन वर्षापासून या सदनामध्ये सातत्याने मांडत आहे. या रस्त्याच्या बाबतीत पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी मिळालेली नाही. ही परवानगी लवकरात लवकर घेऊन या रस्त्याचे काम मार्गी लावावे अशी माझी विनंती आहे. या रस्त्याचे चौपदरीकरण झाल्याशिवाय मराठवाड्यातील व्यवसाय आणि व्यापार वाढीला लागणार नाही. तो वाढीला लागण्यासाठी हे शासन प्रयत्न करीत आहे असा संदेश जनतेमध्ये जाणे जरुरीचे आहे. म्हणून या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजना ही अतिशय चांगली योजना आहे. परंतु या योजनेचा प्रिमियर न भरल्यामुळे ही योजना बंद पडलेली आहे. आता चौथी पाचवीतील विद्यार्थ्यांना काही अपघात झाला तर त्यांना कोणतीही आर्थिक मदत मिळत नाही. ही योजना पुनश्च सुरु करावी अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-15च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेत असताना कोणत्याही मुद्याची पुनरावृत्ती न करता मी माझे विचार येथे मांडणार आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय असे म्हणतात की, "I propose to obtain vote on accounts to meet the current expenditure of the State Government and on the implementation of the ongoing schemes." हे "Vote on Accounts" कशासाठी आहे ? आताच्या सरकारचा खर्च भागविण्यासाठी आणि ज्या योजना ऑनगोईंग आहेत त्यांचा 4 महिन्याचा खर्च भागविण्यासाठी हा अंतरिम अर्थसंकल्प सादर केलेला आहे. मंत्री महोदय पुढे असे म्हणतात की, .. after Lok Sabha elections, which will include non-plan expenditure and new items of the plan for the next financial year...(अडथळा) ... या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही नवीन योजना, नवीन सर्व्हिसेस येता कामा नयेत, ऑन गोईंग प्रोजेक्टसची कामे चालू रहावीत आणि राज्याचा 4 महिन्याचा खर्च भागावा या दृष्टीकोनातून या अर्थसंकल्पाकडे पाहिले पाहिजे. भारतीय संविधानाच्या आर्टिकल 206 प्रमाणे सांगायचे झाले तर केवळ इलॅस्टिक ॲप्रोच राज्य सरकारने ठेवलेला आहे काय याचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी करावे. या अर्थसंकल्पामध्ये राज्य सरकारने धोरणात्मक निर्णयाच्या घोषणा केलेल्या आहेत असे माझे मत आहे. राज्य सरकारने याचे जस्टिफिकेशन करण्याची आवश्यकता आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार......

कोणतीही नवीन सेवा आणि योजना मांडणे हे अनकन्व्हेन्शनल आहे. राज्य सरकारने त्यालाही तिलांजली दिली आहे. त्यामुळे चार महिन्याच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये पडद्याच्या आडून अन कन्व्हेन्शनल आणि अनकॉन्स्टिट्यूशनल गोष्टींचा समावेश राज्य सरकारने केला आहे. त्या संदर्भात स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, हे केवळ व्होट ऑन अकाऊंट नाही. हे पुस्तक पूर्ण वाचल्यानंतर असे लक्षात येते की, ऑन अकाऊंट ऑफ व्होट मागण्याचा हा कार्यक्रम आहे. हा व्होट मागण्याच्या जाहीरनाम्याचा कार्यक्रम सरकारने केला आहे असे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर ज्या पध्दतीने नवीन घोषणा करण्यात आल्या त्या घोषणांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्य देण्याचे प्रस्तावित केले आहे. राज्यात 5 लाख सुशिक्षित बेरोजगारांची नोंदणी झालेली आहे. ग्रामीण भागात ही संख्या आणखी वाढू शकते. 10 ते 15 लाख युवकांना नवीन सुविधा देण्याचा प्रयत्न करीत आहात. ही नवीन सेवा अनकन्व्हेन्शनल आणि अनकॉन्स्टिट्यूशनल आहे.

सभापती महोदय, तंत्रशास्त्र व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी राज्यात महाराष्ट्र तंत्रशास्त्र विद्यापीठासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. व्होट ऑन अकाऊंटमध्ये अशा पध्दतीची घोषणा सरकारला करता येऊ शकत नाही. सरकारने या बाबत स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे. या बजेटच्या पुस्तिकेमध्ये सुरुवातीलाच राज्य सरकारने आपली स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न केला आहे. 24 हजार रुपये पर कॅपिटा इन्कम 1.05 लाख रुपयांवर गेले आहे असे म्हटले आहे. राजकारणाचा भाग बाजूला ठेवला तर 24 हजार रुपये पर कॅपिटा इन्कम 1.05 लाख रुपयांवर गेले असले तरी त्याची विषमता आणि विभागणी केली तर एमएमआर रिजनमधील पर कॅपिटा इन्कम 4 लाख रुपयाच्या घरात आहे. त्यामुळे मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात पर कॅपिटा इन्कम 4 लाखाच्या घरात आहे म्हणूनच तुमचे पर कॅपिटा इन्कम 1 लाख रुपये झाले आहे. मग एमएमआर रिजनमध्ये ज्यांच्या नेतृत्वाखाली सर्व महापालिकांचा कारभार सुरु आहे त्या सर्वांना याचे श्रेय देण्याचा प्रस्ताव कोणी केला तर ते योग्य ठरेल का? या संदर्भात शासनाने स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जीडीपी वाढला म्हणून आम्हाला कर्ज घेऊ द्या असे म्हणता येत नाही. काल मंत्री महोदयांनी चर्चा करताना म्हटले होते. जीडीपी नेमका कोणाच्या जीवावर वाढला? हे

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार......

राज्य एकसंघ असल्याची आमची भूमिका आहे. मग कधी कधी सूर येतो की, ज्यांच्या जीवावर पर कॅपिटा इन्कम वाढला त्या लोकांना म्हणजे एमएमआर रिजनमधील लोकांना आपण सुविधा काय दिल्या? या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये केलेली तरतूद लक्षात घेतली तर त्याच त्याच गोष्टी एमएमआर रिजनमधील लोकांसाठी दिल्याचे घोषित केले आहे. 2010 मध्ये मुंबईमध्ये मोनोरेल आणि मेट्रो प्रकल्प होणार होते. दोन निवडणुका यांनी याच मुद्यावर लढविल्या. आता तिसरी सार्वत्रिक निवडणूक आली आहे. 2010 चे आश्वासन 2014 मध्ये सुध्दा पूर्ण झालेले नाही. मोनोरेल प्रकल्पाचा काही भाग सुरु झाला. मेट्रो प्रकल्प अजून सुरु झालेला नाही.

सभापती महोदय, मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मंजुरी हा विषय बाजूला ठेवा. मी या सभागृहामध्ये रेकॉर्डवर बोलतो. अजूनही इंडियन ट्राम्स ॲक्टखाली मंजूर झालेला हा प्रकल्प इंडियन रेल्वेज ॲक्टखाली चालवू द्यावा अशी विनंती करुनही याची परवानगी केंद्र सरकारने अजूनही दिलेली नाही. इंडियन ट्राम्स ॲक्ट, 1986 खाली मंजूर झालेला प्रकल्प आहे. त्याच वेळी मुंबईतील नागरिक म्हणाले की, हा ॲक्ट ॲबोलिश झालेला आहे. त्या ॲक्टखाली प्रस्ताव मंजूर करु नका. केंद्र सरकारने इंडियन ट्राम्स ॲक्टखाली मेट्रो प्रकल्प मंजूर केला. हा प्रकल्प इंडियन रेल्वेज ॲक्टखाली केला तर ब-याच सुविधा देता येऊ शकतील. परंतु अद्याप त्याचीही परवानगी आलेली नाही. ज्यांच्या जीवावर जीडीपी वाढला त्यांच्यासाठी तुम्ही काय दिले?

सभापती महोदय, 2004-05 मध्ये धारावी झोपडपट्टी पुनर्वसनाची घोषणा केली गेली. काहीही केले नाही. 2005-06 मध्ये शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू प्रकल्पाची घोषणा केली गेली. काहीही केले नाही. 2007-08 मध्ये नवी मुंबई विमानतळाची घोषणा केली. हा प्रकल्प पूर्ण होण्यास 2018 साल उजाडेल. 2011-12 मध्ये मेट्रो प्रकल्प-2 पूर्ण होणार असे सांगितले होते, अजून पहिला प्रकल्प सुरु झालेला नाही. मुंबई शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक असलेला कोस्टल रोडचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे दोन वर्षे परवानगीसाठी पडून आहे. राज्य सरकार फक्त पाठपुरावा करीत आहे. सी रुट ट्रान्सपोर्ट म्हणजे सागरी महामार्गाचा प्रस्ताव दळणवळण पायाभूत समितीपुढे पडून आहे. मुंबईतील नागरिकांची मागणी आहे की, अंडरग्राऊंड मेट्रो रेल्वे सुरु करावी. त्यासाठी आंदोलने झाली. राज्य सरकारने भूमिका घेतली नाही. मोनोरेल प्रकल्प सुरु झाला, त्याचा आम्हाला आनंद आहे. परंतु तो प्रकल्प ज्यावेळी एमएमआरडीएपुढे प्रेझेंट झाला,

...3.....



SGB/ MMP/ D/ 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कमर्शियल डॉक्यूमेंट एमएमआरडीएसमोर सादर झाले त्यावेळी सांगितले होते की, पुढील 25 वर्षात मोनोरेल प्रकल्प कमर्शियली व्हायबल होऊ शकत नाही. मोनोरेल प्रकल्प झाला पाहिजे, त्याला आमचा विरोध नाही. परंतु मोनोरेल प्रकल्प कमर्शियली व्हायबल होणार नसेल तर तो कमर्शियली व्हायबल होण्यासाठी राज्य सरकारची भूमिका काय आहे? मुंबईकरांना हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सदनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, या सगळ्या प्रकल्पांकरिता नवीन बेटरमेंट टॅक्स एमएमआरमधील लोकांवर लागू करणार आहोत. एमएमआर रिजनमधील लोकांवर बेटरमेंट टॅक्स हा छुपा कर लागू करणार असाल तर मुंबईकर नागरिकांवर तो अन्याय करणारा आहे. या संदर्भात राज्य सरकारने स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत राज्य सरकारने 45 प्रकल्प मान्य केले. या 45 प्रकल्पांसाठी 3500 कोटी रुपयांचा निधी लागणार असल्याचे राज्य सरकारने बजेटमध्ये नमूद केले आहे. हे प्रकल्प राज्यातील सर्व नागरी संस्थांसाठी आवश्यक आहेत. 3500 कोटी रुपये खर्चाचे 45 प्रकल्प मंजूर केले जातात त्यावेळी केंद्र सरकारकडून 50 टक्के, राज्य सरकारकडून 20 टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून 20 टक्के वाटा दिला जातो. 3500 कोटी रुपयांचे गणित विचारात घेतले तर राज्य सरकारने आपला 20 टक्के वाटा म्हणून 700 कोटी रुपये देण्याची आवश्यकता आहे. या अंतरिम बजेटमध्ये राज्य सरकारने 700 कोटी रुपयांऐवजी फक्त 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. स्वप्न मोठे दाखविले गेले. अकाऊंट ऑफ व्होट यामध्ये आहे. जेएनएनयुआरएम योजनेची मुदत 31 मार्च, 2014 रोजी संपणार आहे. राज्य सरकारने 700 कोटी रुपयांची तरतूद केलेली नाही. केंद्र सरकारकडे त्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविला आहे की नाही याची माहिती नाही. याचा अर्थ हे स्वप्न सुध्दा दिवास्वप्न राहील अशी स्थिती आहे. त्यामुळे एमएमआर रिजनमधील लोकांसाठी जेएनएनयुआरएम अंतर्गत काय करणार आहात याचे उत्तर देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सदर अंतरिम बजेटमध्ये पोलीस दलासाठी 61494 नवीन पदे निर्माण होणार आहेत. 2006 सालातील कोर्टाचे जज्जमेंट माननीय विरोधी पक्षनेत्यांनी वाचून दाखविले. तो मुद्दा नजरेआड करता येणार नाही. पोलीस दलातील मंजूर पदांचा जीआर 23 जानेवारी,

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार......

1960 चा आहे. हा मुद्दा मी सभागृहात उपस्थित केला होता. 23 जानेवारी, 1960 रोजी जी पदे प्रस्तावित केली होती ती संख्या 2, 09, 443 इतकी होती. याचा अर्थ 1960 च्या जनगणनेनुसार 2.09 लाख पदे पोलीस दलासाठी आवश्यक होती.

नंतर 2जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

आज आपण बघितले तर 1 लाख 22 हजार पदे अजून भरणे बाकी आहे. आता केवळ 60 हजार पदांची घोषणा केली आहे. पहिल्या वर्षी केवळ बारा हजारांची पदे भरण्याची घोषणा केली आहे. उरलेली 60 हजार पदे आपण कशी काय भरणार आहात ? हा राज्याच्या सुरक्षितेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. तेव्हा यासंबंधी देखील शासनाने खुलासा करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, "माजी मंत्र्याचा गाडीचालक बनावट नोटांचा तस्कर ? मुंबईत आणखी दहा लाखांच्या बनावट नोटा हस्तगत" या आशयाखाली आजच्या दैनिक लोकसत्तामध्ये अतिशय गंभीर अशी बातमी पहिल्या पानावर आली आहे. आज आपण बजेटवर, इकॉनॉमीवर बोलत आहोत. या राज्यात पैसे खेळते कसे राहतील यावर बोलत आहोत. विकास कसा होईल यावर चर्चा करीत आहोत. आपण आरबीआय, केंद्र सरकार यांच्या धोरणांवर चर्चा करीत आहोत. राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवला तरी दोन दिवसांपूर्वीच अंधेरी युनिटने दोन लाख रूपयांच्या पकिस्तानमार्गे आलेल्या बोगस नोटा पश्चिम बंगाल मधील मालदा येथील लोकांसह पकडल्या. दोन दिवस होत नाही तो पर्यंत केंद्र सरकारच्या राष्ट्रीय तपास यंत्रणेने नेपाळमार्गे उपनगरात दहा लाख रूपये सर्क्युलेट करण्यासाठी येत असल्यामुळे ट्रॅप लावला. त्यामध्ये ज्या आरोपींना पकडले त्यातील एक आरोपी उपगनरातील आमदाराचा व माजी मंत्र्यांचा वाहन चालक आहे, असे वर्तमानत्राने म्हटले आहे. आम्हा सर्वांची इच्छा आहे की, ही बातमी खोटी असावी. आम्हा सर्वांचे असे मत आहे की, आपल्यातील कुठलाही सन्माननीय सदस्य असे कधीच करणार नाही. पण अशा प्रकारची बातमी आल्यानंतर चिंता अशी आहे की, राज्य सरकारमधील एकाही मंत्र्याने येथे उभे राहून या विषयासंबंधातील स्पष्टीकरण केलेले नाही. ही बातमी खरी असेल तर कुठल्या इकॉनॉमी आणि बजेटवर आपण चर्चा करीत आहोत ? पाकिस्तान आपला शत्रू देश असून बनावट नोटा भारताच्या चलनात मिसळवून भारताची इकॉनॉमी भ्रष्ट करणार असेल तर या प्रकरणातील आरोपी कोण, ते आरोपी असतील तर तो ड्रायव्हर कोणत्या माजी मंत्र्यांचा व आमदाराचा आहे, हे देखील सरकारने स्पष्ट केले पाहिजे. सदर बातमी खोटी ठरावी हीच आमची इच्छा आहे. ती बातमी खरी असेल तर त्याचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी या सदनासमोर केले पाहिजे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय, अंतरिम बजेटवर बोलताना त्याच्या व्यवहार्यतेवर देखील बोलले पाहिजे. सन 2013-14 चा अर्थसंकल्प मांडताना माननीय मंत्री महोदय असे म्हणाले की, रूपये 184.38 कोटी नफ्याचा अर्थसंकल्प मांडत आहे. पण प्रत्यक्षात त्यांचा अंदाज चुकला आणि 3017.00 कोटी रूपयांचा तुटीचा अर्थसंकल्प समोर आला. त्यांनी सुरूवातीला नफ्याचा अर्थसंकल्प मांडला पण तो वर्षअखेर तुटीत गेला. आज आपण 5437.00 कोटी रूपयांचा तुटीचा अर्थसंकल्प मांडला आहे. आजचा आपला अंतरिम अर्थसंकल्प प्रत्यक्षात येईल त्यावेळी तो 8618.00 कोटी रूपये तुटीचा असेल. हा रेशो सरकारच्या मांडणीवरूनच दिसत आहे. त्यामुळे ही आठ हजार कोटी रूपयांची तूट व नवीन केलेल्या घोषणा याची व्यवहार्यता कशी काय होणार आहे ? यासाठी राज्यावर डायरेक्ट व इनडायरेक्ट कर कसे काय लावण्यात येणार आहेत हे सांगून व्यवहार्यता पटवून दिली पाहिजे.

सदर बजेट पुस्तकात माननीय मंत्री महोदय म्हणतात की, आम्ही मांडलेला हा ड्राफ्ट आहे.हा ड्राफ्ट प्लॅन राज्याचा आहे. तो प्लॅनिंग कमिशनला पाठविण्यात येईल. मग त्याचा ॲन्युअल प्लान फायनल होणार आहे. आपल्या बजेटची साईज देखील फायनल झालेली नाही, ती केंद्र सरकारच्या प्लॅनिंग कमिशनशिवाय पूर्ण होऊच शकत नाही तरी आपण घोषणांवर घोषणा केलेल्या आहेत. आजचा हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत केवळ 8.25 टक्क्यांनी वाढविलेला आहे. अजूनही केंद्राच्या प्लॅनिंग कमिशनची परवानगी मिळायला वेळ आहे. याचा दुसऱ्या बाजूने असा अर्थ निघतो की, केंद्राच्या प्लानिंग कमिशनने कात्री लावली तर लेखानुदान मांडावे लागेल. उद्या केंद्र शासनाच्या प्लानिंग कमिशनने कात्री लावली तर राज्यातील जनतेला बजेटमधून काय मिळेल हे सुद्धा आपण स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महसुली उत्पन्नाबाबत सरकारने असे म्हटले आहे की, आम्ही चटईक्षेत्र निर्देशांक विकून दीड हजार कोटी रूपये मिळवणार आहोत. गेल्या वर्षी शासनाला फक्त 600.00 कोटी रूपये मिळाले होते. पुढच्या वर्षी दीड हजार कोटी रूपये अपेक्षित आहेत. माझी सरकारला अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विनंती राहील की, एफएसआय मधून मिळणारे उत्पन्न आपण कशाच्या

..3

ॲड.आशिष शेलार...

आधारे मांडत आहात ? यासाठी आपण नवीन काही धोरण आणू पहात आहात काय, आपण एफएसआय वाढीची नवीन पॉलिसी आणत आहात काय, टीडीआरचा दर आपण कमी करत आहात काय, इत्यादी सर्व बाबी या सदनाला समजल्या पाहिजेत.

सभापती महोदय, पुढचा मुद्दा देखील अतिशय महत्त्वाचा असून तो निवडणूक खर्चा संबंधातील आहे. दीड महिन्याने आपण सर्वजण निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. निवडणूक खर्चासाठी राज्य सरकारने 912.00 कोटी रूपये ठेवले आहेत, तर केंद्र सरकारने अंतरिम बजेटमध्ये निवडणूक खर्चासाठी रूपये 1500.00 कोटींची तरतूद केली आहे. यात लपून-छपून आपल्या जाहिराती करून मतदारांना फसविण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे असा आमचा दाट संशय आहे. तेव्हा शासनाने याचे देखील स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे की, केंद्र शासनाला निवडणुकीसाठी 1500.00 कोटी रूपये लागतात, तर आपल्याला रूपये 912.00 कोटी का लागतात ?

सभापती महोदय, राज्य सरकार या राज्यावर नवीन कर प्रणाली लागू करणार आहे काय ? याचे कारण स्थानिक संस्थांच्या करामधून राज्य सरकारला रूपये 696.00 कोटी मिळाले होते. आगामी वर्षामध्ये रूपये 1172.00 कोटी मिळणार आहेत असे सरकार म्हणत आहे. गेल्या वर्षी ज्यातून आपल्याला 600.00 कोटी रूपये मिळाले आहेत त्यातून 1200.00 कोटी रूपये कसे काय मिळणार आहेत ? शासनाचे ऑक्ट्रॉय बंद करण्याचे धोरण आहे. एलबीटीतून फायदा मिळत नाही. मग राज्यावर आपण कोणत्या पद्धतीने कराचा बोजा आणणार आहात, त्याचे देखील स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे.

या राज्याची आर्थिक स्थिती चांगली नाही असे आम्ही म्हणतो तेव्हा समोरील बाकावरील आमचे मित्र उभे राहतात आणि ती कशी चांगली आहे हे मांडतात. तो मांडण्याचा त्यांचा अधिकार आहे. आपल्या राज्यामध्ये एक रूपया किंवा 100 रूपये कसे येतात व खर्च होतात हे देखील आपल्या बुकमध्ये स्पष्ट केले आहे. आपल्याकडे 100 रूपये ज्यावेळी येतात त्यापैकी 38.34 म्हणजे 39/- रूपये हे कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च केले जातात. 10.37 रूपये निवृत्ती वेतनावर

..4



BGO/ D/ MMP/ भोगले.. 16:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

खर्च केले जातात. कर्जाची परतफेड करायला 14 टक्के जातात. याचा अर्थ कर्मचाऱ्यांचे वेतन अधिक निवृत्ती वेतन अधिक कर्जाची फेड हे सर्व एकत्रित केले तर 100 रूपयांपैकी 62/- रूपये या कामांसाठी खर्च केले जातात. उरतात फक्त 38/- रूपये. या 38/- रूपयांच्या जीवावर आपण सर्वजण राज्याला सुविधा देणार आहोत. हे 38/- रूपये तरी खर्च होतात काय ? हा मुद्दा मी परवाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये मांडला असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती करणार नाही.

मी ट्रेझरीच्या वेब-साईटवरून माहिती घेतली तेव्हा गेल्या वर्षीच्या एकूण पैशापैकी केवळ 77 टक्केच निधी डिस्बर्स झाल्याचे मला आढळून आले. अशी स्थिती पुढच्या वर्षी राहिली तर मग या राज्याला प्रगत कसे काय करता येईल, हे देखील कोडे आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट केले पाहिजे की, 100/- रूपयातील 38/- रूपये हे आपल्यासाठी असून त्यातील फक्त 77 टक्के आम्ही खर्च करणार आहोत. त्यातून आपण सुविधा कशा देणार आहात हे देखील स्पष्ट करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार ....

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये 2.11 करोड लोकांना कव्हर करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या योजनेमध्ये प्रत्येक फॅमिलीला 400 रुपये दिले जाणार आहेत. जर 2 करोड परिवारांना तुम्हाला योजना द्यावयाची असेल व त्याचा प्रिमियम 400 करोड असेल तर 844 कोटी रुपये या योजनेसाठी लागतील. परंतु आपण केवळ 690 कोटी रुपयांची प्रोव्हीजन या योजनेसाठी केलेली आहे. उरलेल्या 150 कोटी रुपयांची आपण प्रोव्हीजनच केलेली नाही. म्हणून आम्ही म्हणतो की, हे व्होट ऑन अकाऊंट नसून ते अकाऊंट ऑफ व्होट मागण्याचा प्रकार आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाने सुकन्या योजना सुरु केलेली आहे. या योजनेतून राज्यातील महिलांना नवीन लाभ दिला जाणार आहे असे शासनाचे म्हणणे आहे. असे केले तर आम्हाला आनंद आहे. परंतु तुमचा ट्रॅक रेकॉर्ड बघितल्या तर असे दिसून येते की, या योजना वर्षानुवर्षापासून सुरु आहेत. विद्यावेतन योजनेचे पूर्णपणे पैसे वापरण्यात आले नसून पैसे पडून आहेत. हुंडा निर्मूलनाचे 15 लक्ष रुपये अखर्चित आहेत, महिलांसाठी समुनपदेशक केंद्रासाठीचे 4 करोड रुपये अखर्चित आहे. सामुदायिक विवाहासाठी स्वयंसेवा संस्थांना अनुदानाचे 10 करोड रुपये अखर्चित आहेत. आधारगृहासाठींचे 30 लाख रुपये अद्याप खर्च झालेले नाहीत. महिला मंडळांना दिल्या जाणाऱ्या अनुदानातील 65 लाख रुपये अद्यापि खर्च झालेले नाहीत. देवदासी पुनर्वसन योजनेतील 10 लाख रुपये अखर्चित आहेत. महिला आयोगाचे 18 लाख रुपये शिल्लक आहेत. विवाह भत्याचे 14 लाख रुपये पडून आहे. अहिल्यादेवी होळकर पुरस्कार योजनेत प्रोव्हीजनच करण्यात आलेली नाही. बहुउद्देशीय महिला केंद्राचे 5 लाख रुपये अद्यापि अखर्चित आहेत. या अकरा योजनेत करोडो रुपये पडून आहेत. महिलांसाठीच्या योजनेतील पैसे सुध्दा आपण वापरलेले नाहीत. अशी स्थिती असतांना राज्यातील जनतेने तुमच्या सुकन्या योजनेवर भरोसा का ठेवायचा ? म्हणून आम्ही म्हणतो की, हे व्होट ऑन अकाऊंट नसून हा ऑन अकाऊंट ऑफ व्होट मागण्याचा प्रकार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

ॲड.आशिष शेलार ....

सभापती महोदय, प्रोग्रेसीव्ह महाराष्ट्र 2014 चे डॉक्यूमेंट माझ्याकडे आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी ट्रायडंट हॉटेलमध्ये प्रोग्रेसीव्ह महाराष्ट्र 2014 प्रसिध्द केला होता. हे डॉक्युमेंट मी मांडलेले नाही. प्रोगेसिव्ह महाराष्ट्र 2014 मध्ये दर्शवल्याप्रमाणे गेल्या पाच वर्षात नवीन गंतवणुकीचे प्रमाण 43 टक्क्याने घटले आहे. सन 2009 मध्ये 1लाख 80 हजार 20 कोटी तर 2013 मध्ये 51 हजार 933 कोटी रुपयांच्या संदर्भात 43 टक्के गुंतवणूकदारांनी राज्यात गुंतवणूक करण्याची मनाई केली असे प्रोग्रेसिव्ह महाराष्ट्र 2014 सांगते. औद्योगिक वाढ 5 वर्षापूर्वी 7 टक्के होती तर 2013 मध्ये औद्योगिक वाढ 4 टक्क्यावर आलेली आहे. तुमची औद्योगिक वाढ 3 टक्क्याने कमी झाली आहे. जीएसडीपी ग्रोथ रेट 5 वर्षापूर्वी 7.5 टक्के होता तो आज 3 टक्क्यावर आलेला आहे. 4.5 टक्क्याने जीएसडीपी ग्रोथ रेट कमी झालेला आहे. ही सर्व माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी पब्लीश केलेल्या डॉक्युमेंट मधील आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पब्लीश केलेल्या डॉक्यूमेंटमध्ये 97 टक्के लोक महाराष्ट्र राज्यात धंदा करण्यास येत नसल्याचे कारण लँड ॲक्वीझीशनचे आहे. 94 टक्के गुंतवणूकदार असे म्हणतात की, कन्स्ट्रक्शनला परवानगी देण्याचे कायदे या राज्यात बरोबर नाहीत. 50 टक्के गुंतवणूकदार असे म्हणतात की, या राज्यातील रेंटल चार्जेस खूप जास्त आहेत. या राज्याला प्रोग्रेसिव्ह करण्यासाठी नेमके आपण काय करणार आहोत याची माहिती या सदनाला जाणून घ्यावयाची आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माहिती म्हणून सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांना मी विचारु इच्छितो की, जे डॉक्यूमेंट माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरीत झाले आहे ते शासनाचे अधिकृत डॉक्यूमेंट आहे काय ?

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मी माझ्या पूर्ण भाषणात हे अधिकृत डॉक्युमेंट आहे किंवा नाही याबाबत उल्लेख केलेला नाही. मी असे म्हटले आहे की, प्रोग्रेसिव्ह महाराष्ट्र 2014 च्या संदर्भात जो सर्व्हे रिपोर्ट आला होता तो माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पब्लीश  झाला होता व त्याचा मी या ठिकाणी उल्लेख करीत आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार ....

सभापती महोदय, या सर्व्हेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कॉन्ट्रडीक्ट करणारे कोणतेही भाषण केलेले नाही. एका मुद्यावर राज्याचे राजकारण करण्याचा काही प्रक्षांचा प्रयत्न असून तो मायनॉरिटीच्या आधारावर करण्याचा प्रयत्न सुरु आहे. मौलाना आझाद मायनॉरीटी फंडच्या संदर्भातील या राज्याची स्थिती काय आहे ? सन 2006 सालापासून सन 2013 पर्यंत म्हणजे गेल्या 7 वर्षामध्ये मायनॉरिटीमधील वर्गातील मुलांना शिक्षण देता येईल, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारता येईल यासाठी या महामंडळाची स्थापना झाली आहे. परंतु असे असतांना या महामंडळाचे अद्याप साधे ऑडीट सुध्दा झालेले नाही. लोन आणि शिष्यवृत्ती देणारी ही स्कीम असून या योजनेमध्ये पैसे दिले परंतु पैसे परत घेतल्याचा रेशो फार कमी आहे. 695 कोटी रुपये या योजनेमध्ये देण्यात आले परंतु त्यापैकी केवळ 89 कोटी रुपये परत आले आहेत. या महामंडळाकडे सन 2009 मध्ये 2625 अर्ज आले होते. वांद्रे(पूर्व) येथून 1192 व वांद्रे (पश्चिम) येथून 900 अर्ज आले. या 2625 अर्जांपैकी केवळ 2 मतदार संघामध्ये पैसे वाटण्यात आले परंतु राज्यातील इतर भागातील जनतेला हा निधी मिळाला की, नाही याची मला माहिती नसल्यामुळे यासंदर्भातील स्पष्टीकरण राज्य सरकारने करण्याची आवश्यकता आहे. हे लोन मच्छीमारी, शैक्षणिक,औद्योगिक अशा सर्वांना मिळावयास पाहिजे होते म्हणून यासंदर्भातील प्रकरण कोर्टापर्यंत गेले असून यामध्ये सामान्य, गरीब, मच्छीमारी अशा मायनॉरिटी परिवारातील लोकांना ते मिळाले नाही अशी परिस्थिती आहे. म्हणून या नवीन योजनेमध्ये व्होट ऑन अकाऊंट आणि आर्टीकल 206 चा भंग झालेला आहे.

सभापती महोदय, मुंबईकरांसाठी कोणतीही योजना राबवण्यात आलेली नाही. पर कॅपिटा इन्कमचे आकडे फसवे आहेत, जेएनएनयुआरएम मध्ये 600 करोड रुपये दिलेले नाहीत. 61 हजार पोलिसांची अजून भरती होऊ शकली नाही. बनावट नोटांचे रॅकेट अजून उघडू शकले नाही. 8618 कोटी रुपयांपर्यंत जाईल असा तुटीचा अर्थसंकल्प या शासनाने मांडला असून प्लॅनिंग कमिशनची अजून साईज ठरलेली नाही. स्थानिक संस्थाकडून उरलेले 475 करोड रुपयांचे कर कसे आणणार याचे स्पष्टकरण देण्यात आलेले नाही. अशा पध्दतीच्या योजना असलेला हा अर्थसंकल्प व्होट ऑन अकाऊंट नसून तो ऑन अकाऊंट ऑफ व्होट करणारा आहे. म्हणून या अर्थसंकल्पाचा निषेध करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.धन्यवाद.

----

...4...

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत तसेच माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांनी विधान परिषदेत अंतरिम अर्थसंकल्प मांडला आहे. माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणातील काही ठळक मुद्दे या ठिकाणी मी मांडणार आहे. महाराष्ट्राचा आर्थिक व सामाजिक आढावा, दरडोई उत्पन्नात वाढ, ऊर्जा उत्पादनात वाढ, साक्षरतेमध्ये वाढ अशी माहिती दिलेली आहे. आपल्या राज्याचे 82.9 टक्के साक्षरतेचे प्रमाण आहे अशी माहिती आम्हाला देण्यात आली. ही वाढ साक्षरता दरात दिसत असली तरी आज ग्रामीण भागातील 5 वी, 7 वी व 8 वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी व गणित येत नाही हे आपल्याला मान्य करावे लागेल. साक्षरतेची नेमकी व्याख्या सांगणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

साक्षरतेमध्ये वाढ झाली म्हणजे नेमके काय ? मुलांना "अ"अक्षर ओळखता आले म्हणजे साक्षरता झ ाली की, 1 ते 5 पर्यंत पाढे म्हणता आले म्हणजे साक्षरता आली ? साक्षरतेचा नेमका अर्थ काय हे समजून घेण्याची माझी इच्छा आहे. त्याबाबत येथे स्पष्टीकरण व्हावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, जन्मदर 21 टक्क्यावरुन 16.7 टक्क्यावर आला ही चांगली गोष्ट आहे. स्व.संजय गांधी यांनी कुटुंब नियोजन योजना राबविली होती. त्यावेळी त्यांचे देशभर स्वागत झाले होते. परंतु त्यांचे अकाली दु:खद निधन झाले. त्यानंतर या योजनेचे काय झाले ते आपणा सर्वांना माहीत आहे. आज देश पॉप्युलेशन एक्स्प्लोझनवर आहे. आपण जन्मदर 21 टक्क्यावरुन 16.7 टक्क्यावर नेमका कसा आणला ? कोणत्या जाती जमातींनी कुटुंब नियोजनाचा मार्ग स्वीकारला ? महाराष्ट्रात, मुंबईत पारशी लोकांची संख्या कमी होत चालली आहे. अनेक जाती जमाती नष्ट होत चालल्या आहेत. ज्यांचा कुटुंब नियोजनाला विरोध होता त्यांनी कुटुंब नियोजनाचा मार्ग स्वीकारला आहे का ? मी स्पष्टपणे सांगतो की, मुस्लिमांनी कुटुंब नियोजन करण्याचे ठरविले आहे असे आपण या माध्यमातून सांगू इच्छिता का ?

सभापती महोदय, मृत्यूदर 7.5 टक्क्यावरुन 6.3 टक्के झाला, ही चांगली गोष्ट आहे. आता चांगल्या प्रकारची औषधे उपलब्ध होत असल्यामुळे माणसांचे आयुष्यमान वाढलेले आहे. अर्भक मृत्यूदर 48 टक्क्यावरुन 25 टक्क्यावर आला आहे. यापासून मी डिफर होत आहे. मी येथे मेळघाटचे उदाहरण देऊन माझे म्हणणे कसे योग्य आहे ते सांगतो. मेळघाटमध्ये गेल्या वर्षी 3 हजार 475 बालकांचा जन्म झाला. त्यापैकी 1 हजार 470 बालकांचा जन्म घरामध्ये झाला म्हणजे आपली इन्स्टीटयुशनल डिलिव्हरी आणि त्या योजनेला दिलेले पैसे वापरले गेले नाहीत किंवा ते कसे फोल ठरले हे यावरुन कळते. दोन हजार लोकांपर्यंत "माहेर" योजना पोहोचली नाही हे यावरुन सिध्द होते. बजेट तरतुदीमधील फक्त 25 टक्के तरतूद वापरली जाते हे सिध्द होते.

सभापती महोदय, माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना सांगितले होते की, मृत्यूदर हजारी 38 होता. मग तो 25 कसा झाला ? हे सर्व रेकॉर्डवर आहे. सुरुवातीला 48 दर होता नंतर तो 38 झाला आणि आता 25 झाला. ज्यावेळी आपण भाषणामध्ये आकडेवारी घेता त्यावेळी ती माहिती पडताळून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

पाहिली पाहिजे. मी माझ्या पदरचे काही सांगत नाही. रेकॉर्डवर ती माहिती आहे. मागच्या डिसेंबर महिन्यात ती माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, जानेवारी ते सप्टेंबर या महिन्यांत 253 बालमृत्यू झाले. ही आरोग्य विभागाची माहिती आहे. सप्टेंबर 2013 मध्ये मॅममध्ये 10 हजार 585 बालके होती आणि सॅममध्ये 10 हजार 67 बालके होती. म्हणजे तीव्र कुपोषित गटात 10 हजारांहून अधिक मुले होती. सप्टेंबर, 2012 मध्ये सॅममधील मुलांची संख्या 3 हजार 050 होती आणि मॅममध्ये 2 हजार 593 होती. म्हणजे 83 मुलांचा फरक आहे. ही 83 मुले दगावली गेली की जिवंत आहेत याचे कुठेही स्पष्टीकरण नाही.

सभापती महोदय, गेल्या पाच वर्षात हजारहून अधिक मृत्यू झाले. एप्रिल 2012 ते मार्च 2013 या वर्षात धारणी आणि चिखलदरामध्ये 408 बालकांचा मृत्यू झाला. त्यापैकी 129 स्टीलबर्थ होते. सन 2013 मध्ये 65 बालकांचा मृत्यू झाला त्यापैकी 23 बालकांचा जन्मजात मृत्यू झाला होता म्हणजे आपली यंत्रणा फेल झालेली आहे हे मला सांगायचे आहे.

सभापती महोदय, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने वैद्यकीय सेवा पुरविल्यास 90 टक्के प्रकरणांमध्ये आपदग्रस्तांचे प्राण वाचवू शकतात म्हणून 937 रुग्णवाहिकांमधून 24 तास डॉक्टर्सची कुमक आणि अत्यावश्यक जीवरक्षक सामुग्री उपलब्ध होणार आहे. दिनांक 26 जानेवारी 2014 पासून 9 जिल्ह्यांमध्ये 156 रुग्णवाहिका कार्यान्वित आहेत. या रुग्णवाहिकांचे गौडबंगाल काय आहे हे मला माहीत नाही. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी देखील हा प्रश्न उपस्थित केला होता. मी सुध्दा आपत्कालीन रुग्णवाहिकेबाबत प्रश्न उपस्थित केला होता. मागील तीन वर्षापासून ही योजना का रखडली आहे हा आमच्या सर्वासमोर प्रश्न होता म्हणून मी त्या प्रश्नाच्या खोलात गेलो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर उपस्थित नाहीत अन्यथा ते चांगल्या प्रकारे माहिती देऊ शकले असते. सुरुवातीला रुग्णवाहिका सेवेसाठी जीव्हीके कंपनीने आणि जिकित्सा हेल्थकेअर या कंपनीने अप्लाय केला होता. या दोन्ही कंपन्यांचा दर्जा तपासण्यात आला. जीव्हीके कंपनी 16 राज्यांत रुग्णवाहिका सेवा पुरविते तर जिकित्सा हेल्थकेअर कंपनी 6 राज्यांत रुग्णवाहिका सेवा पुरविते. असे असूनही या

..3..



AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे... 16:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

दोन्ही कंपन्यांना रुग्णवाहिका पुरविण्याचा ठेका मिळाला नाही. या दोन्ही कंपन्यांना अपात्र ठरविण्यात आले. रुग्णवाहिका पुरविण्याचे ठेका बीव्हीजी कंपनीला मिळाला. बीव्हीजी म्हणजे भारत विकास कंपनी. या भारत विकास कंपनीस या राज्यातील सर्वात मोठ्या नेत्याचा वरदहस्त लाभलेला आहे. राज्यकर्त्यांपैकी एकाचा वरदहस्त लाभलेला आहे. बीव्हीजी कंपनी रुग्णवाहिका सेवा कुठेही पुरवित नाही. मग ही बीव्हीजी कंपनी करते काय ? ही बीव्हीजी कंपनी हाऊस किपींगचा ठेका घेते. ही कंपनी संडास साफ करते, युरीनल साफ करते, चादरी बदलण्याचे काम करते, अशा कंपनीस रुग्णवाहिका पुरविण्याचे आणि मेन्टेनन्सचे काम दिलेले आहे. सरकारची मानसिकता कोणत्या दिशेने चालू आहे हे दिसून येते. ही कंपनी 10 जनपथ, संसद, राष्ट्रपती भवन आणि मुंबई या ठिकाणी हाऊस किपींगचे काम करते. केवळ राजकीय वरदहस्त लाभला म्हणून भारत विकास कंपनीला रुग्णवाहिका पुरविण्याचे काम मिळाले आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 16:50

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा फंडामेंटल राईटस्‌चा प्रश्न आहे. रस्ते साफ करणारी, टॉयलेट साफ करणारी, स्वच्छता करणारी, स्वच्छता ठेवणारी कंपनी जर पददलिताची असेल तर त्या बाबतीत आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही.

डॉ.दीपक सावंत : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी असे काहीही म्हटलेले नाही. कृपया आपण मुद्दा ट्विस्ट करु नका. त्या कंपनीला ॲम्ब्युलन्स सेवा पुरविण्याचा अनुभव आहे काय, या बाबतीत मी बोलत होतो.

श्री.राम पंडागळे : महोदय. मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, जी कंपनी टॉयलेट साफ करते ती कंपनी ॲम्ब्युलन्सचा पुरवठा करु शकत नाही काय ? 10 राज्यांमध्ये, 16 राज्यांमध्ये ॲम्ब्युलन्स पुरविणाऱ्या कंपन्यांच्या स्पर्धेत टॉयलेट साफ करणारी कंपनी उतरत असेल आणि तिला ठेका मिळत असेल तर कोणाच्या पोटात दुखण्याचे कारण नाही. गरीब, पददलितांना अशा प्रकारे ठेका मिळविण्याचा अधिकार नाही काय ? मुळात हा अर्थसंकल्पच गरिबांसाठी आहे. टॉयलेट साफ करणाऱ्या कंपनीला ॲम्ब्युलन्स पुरविण्याचा ठेका दिला असेल तर सन्माननीय सदस्यांनी त्याचे स्वागतच करायला पाहिजे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, बी.व्ही.जी. ही पददलिताची नव्हे तर मोठ्या माणसाची कंपनी आहे. ॲम्ब्युलन्स पुरवठा करण्याबाबतचा ठेका देण्यापूर्वी टेंडर डॉक्युमेंट होते. जी.व्ही.के. आणि जिकित्सा या दोन कंपन्यांनी ॲम्ब्युलन्स पुरवठा करण्याचे टेंडर भरले होते. टेंडर डॉक्युमेंटमध्ये काही अटी व शर्ती होत्या. त्यातील एक अट अशी होती की, सदर कंपनीने ऑडिटेड बॅलन्सशीट सादर करावी. ज्या दोन कंपन्यांनी टेंडर भरले होते त्यांच्याकडे ऑडिटेड बॅलन्सशीट नसल्यामुळे टेंडर प्रक्रिया रद्द केली. परंतु नंतर नव्याने टेंडर मागविण्यात आले नाही आणि थेट बी.व्ही.जी. कंपनीला ठेका देण्यात आला. निविदेतील अटीनुसार ऑडिटेड बॅलन्सशीट सादर करावी लागत असल्यामुळे बी.व्ही.जी. कंपनीने लंडन येथील 100 ॲम्ब्युलन्स पुरविणाऱ्या एका कंपनीशी पार्टनरशीप असल्याचे दाखविले. परंतु त्या कंपनीकडे ऑडिटेड बॅलन्सशीट नव्हती. कारण लंडनमध्ये ज्यांचे उत्पन्न 5 हजार स्टर्लिंग पाऊंड असते त्यांना ऑडिटेड बॅलन्सशीट लागत नाही असा नियम आहे. बी.व्ही.जी. कंपनीने या बाबीचा आधार घेऊन ऑडिटेड बॅलन्सशीट सादर न करता लंडनच्या कंपनीबरोबर जॉईंट व्हेंचर केला. त्यानंतर बी.व्ही.जी. कंपनीला ॲम्ब्युलन्स पुरविण्याचा ठेका देण्यात आला.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

या विरोधात जी.व्ही.के. आणि जिकित्सा या दोन्ही कंपन्या न्यायालयात गेल्या. परंतु बी.व्ही.जी. कंपनीने दुसरी शक्कल लढविली. मुळात ॲम्ब्युलन्स सेवा पुरविताना ॲम्ब्युलन्समध्ये डिजीटल ऑक्सीजन पॅनल, ऑक्सीजन सिलींडर, पल्स ऑक्सीमीटर, वॉल माऊंटेड स्ट्रेचर इत्यादी सर्व वस्तू पुरवायच्या होत्या. या वस्तू आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असाव्यात असा मानक होता. या वस्तू इटली आणि चायना या दोन देशात बनतात. वास्तविक पाहता दिल्लीत सुध्दा बनतात. निविदा प्रक्रियेत कोणीही सहभागी होऊ नये म्हणून ही बाब निविदा प्रक्रियेत टाकली होती. परंतु जी.व्ही.के. आणि जिकित्सा कंपनी निविदा प्रक्रियेत सहभागी झाल्याची बाब महाराष्ट्र सरकारच्या जिव्हारी लागली. महाराष्ट्र सरकारने जी.व्ही.के. आणि जिकित्सा कंपनीला सांगितले की, आम्हाला इटालीयन आणि चायनीज भाषा समजत नसल्यामुळे सी.ई.सर्टिफिकेट इंग्रजी भाषेत ट्रान्सलेट करुन द्यावे. परंतु त्या कंपन्या मुदतीत सी.ई.सर्टिफिकेट देऊ शकल्या नाहीत म्हणून त्यांना पुन्हा निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात आले. बी.व्ही.जी. कंपनीकडे सी.ई.सर्टिफिकेट नव्हते. परंतु बी.व्ही.जी. कंपनीसाठी राज्य सरकारने सी.ई.सर्टिफिकेटची अटच काढून टाकली व त्या कंपनीला ठेका दिला.

तसेच फॅब्रीकेशनचा पुरवठा करण्यासाठी एव्हॉन कंपनीला ठेका दिला गेला. एव्हॉन ही छोटी कंपनी आहे. परंतु त्या कंपनीचे लागेबांधे मात्र मोठे आहेत. त्यामुळे त्या कंपनीला फॅब्रीकेशन पुरविण्याचा ठेका दिला ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ॲम्ब्युलन्सची सेवा पुरविण्याचे काम दिल्यानंतर त्या ॲम्ब्युलन्समध्ये 24 तास डॉक्टर्स ठेवावे लागणार होते. मुळात राज्यात डॉक्टरांची संख्या कमी आहे. शिवाय त्या ॲम्ब्युलन्समध्ये मॉर्फीन, पेटाडीन सारखी महागडी व जीवरक्षक औषधी ठेवावी लागणार आहेत. राज्यात डॉक्टरांची संख्या मुळात कमी असल्यामुळे हे काम बी.ए.एम.एस. व बी.यु.एम.एस. डॉक्टरांकडे दिले जाणार आहे. त्यांच्याकडून इंजेक्शनची रिॲक्शन होऊ नये म्हणून राज्य सरकारने त्यांना 15 दिवसांचे ट्रेनिंग दिले. मुळात केंद्र सरकारचा या बाबतीत 570 तासांचा कोर्स आहे. परंतु राज्य सरकारने तो कोर्स सीझ करुन तो 15 दिवसांवर आणला आणि त्यांना ट्रेनिंग देण्याचे ठरविले. मी माहितीच्या अधिकारांतर्गत या संदर्भातील माहिती मिळविली. त्यातून असे निदर्शनास आले की, ज्यावेळी या डॉक्टरांकडे रुग्ण येईल त्या वेळी ते पुणे येथील कॉल सेंटरला फोन करुन विचारतील की, उपचारासाठी आलेल्या पेशंटला कोणती

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



डॉ.दीपक सावंत.....

औषधे द्यायची.  याचाच अर्थ कॉल सेंटरमधून सांगितल्यानंतर त्या रुग्णांवर उपचार करण्यात येतील.  मी तर म्हणेन की, ही योजना अतिशय बोगस आहे.  या योजनेमध्ये आपल्या घरातील माणसाचा प्राण जाऊ शकतो.  योजनेवर टीका करीत असताना जीवनाचा ज्यावेळी प्रश्न येतो त्यावेळी कृपया कॉम्प्रोमाईज करु नका.  ज्यांना या सेवेचा कोणताही अनुभव नाही त्यांना हे काम देता कामा नये.  ॲम्ब्युलन्स सेवा ही स्पेशलाईज सिस्टीम आहे.  बी.व्ही.जी. कंपनी कोणाची आहे, त्या कंपनीवर कोणाचा राजकीय वरदहस्त आहे, या कंपनीसाठी सरकारने गेल्या तीन वर्षात अटी व शर्तींमध्ये बदल का केला आणि पाणी नक्की कुठे मुरते हे सभागृहाला समजले पाहिजे.  ते पाणी सिंचनात मुरते, धरणात मुरते की रस्त्यात मुरते हे समजले पाहिजे.

महोदय, मदरशांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, मराठी व उर्दू विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मानधनासाठी तसेच मदरशांमधील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी अनुदान देण्याचा उल्लेख अर्थसंकल्पात आहे.  महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आपल्या भाषणात म्हणाले होते की, सांताक्रुझ येथील मदरशाविषयी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत बोलतील.  मिलन सबवेच्या उड्डाणपुलाचे उद्‌घाटन नुकतेच माननीय मुख्यमंत्र्यांनी केले. मी तेथील रस्त्यावरुन दररोज जातो. मिलन सबवेच्या खाली एक अनधिकृत मदरसा आहे.  परंतु तेथे केवळ नमाज पढला जातो. त्या ठिकाणी शिक्षण दिले जात नाही. परंतु बाजूचे हनुमान मंदिर हे पूर्वीप्रमाणेच अर्धवट कोसळलेल्या स्थितीत आहे. मदरशांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असेल तर स्वागतच आहे.  कारण शिक्षणाचा विस्तार झाला पाहिजे या मताचा मी आहे.  परंतु मदरशांचा उपयोग प्रार्थना स्थळ म्हणून होत असेल तर त्यावर माझा आक्षेप आहे.

महोदय, लैंगिक अत्याचारास किंवा ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला तसेच बालकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने मनोधैर्य योजना सुरु केली आहे.  या योजनेंतर्गत पीडितांना 2 ते 3 लाख रुपये आर्थिक सहाय्य आणि 50 हजार रुपयांपर्यंत प्रासंगिक खर्च अनुज्ञेय आहे.  ही रक्कम आपण कशी देणार आहात ? वास्तविक पाहता एखाद्या मुलीवर ॲसिड हल्ला झाला तर स्किन गार्टीन आणि बाकीच्या सर्व गोष्टी कराव्या लागतात.  त्यापोटी जवळजवळ 10 लाख रुपयांचा खर्च येतो. मग दोन-तीन लाख रुपये देऊन काय होणार आहे ? राज्य सरकारला जर खरोखरच पीडितांना मदत करावयाची असेल तर जास्तीत जास्त आर्थिक मदत करावयास पाहिजे.  इतक्या अपुऱ्या रकमेत शासकीय रुग्णालयात कसे उपचार होतील ?                    नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

शासकीय रूग्णालयांमध्ये प्लॅस्टिक सर्जन्स नाहीत. तुम्ही कशाला उगाच घोषणा करता ? तुम्हाला खरोखर मदत करायची असेल तर कमीत कमी हे पैसे वाढवून द्यावेत. शासन काऊन्सिलर्स, सायकॅट्रिक्स नेमणार आहे. मला या ठिकाणी एक गोष्ट निदर्शनास आणायची आहे. आपण अंतरिम अर्थसंकल्पात 'मनोवैज्ञानिक' असा एक शब्द वापरला आहे. आपण म्हटले आहे की, मनोवैज्ञानिकांची मदत घेण्याची तरतूद आहे. 'मनोवैज्ञानिक' असा शब्द कुठेही नाही. 'मानसशास्त्र' असा शब्द आहे आणि 'मनोशास्त्रज्ञ' असा शब्द आहे. 'मनोवैज्ञानिक' असा शब्द तुम्ही वापरला आहे. कृपा करून या शब्दामध्ये बदल करावा. मी काल पूर्ण दिवस या संदर्भात माहिती घेतली.

सभापती महोदय, मुंबईमध्ये 300 ते 400 सायकॅट्रिक्स आहेत, औरंगाबादमध्ये 52 सायकॅट्रिक्स आहेत आणि संपूर्ण राज्यात 1200 सायकॅट्रिक्स आहेत. दोन्ही टोके कशी जुळवणार ? पेशंट आणि सायकॅट्रिक्स यांचा मेळ कसा घालणार, हे मला सांगावे. कारण त्यांची इतकी संख्याच नाही. आपण काऊन्सिलर्स नेमणार असेही सांगितले आहे. संपूर्ण राज्यात 400 ते 600 क्वॉलिफाईड काऊन्सिलर्स आहेत. महिलांसाठी कोठून काऊन्सिलर्स आणणार ? तुम्हाला ज्येष्ठ नागरिकांसाठी, शाळेत जाणाऱ्या, न जाणाऱ्या मुलांसाठी, महिलांसाठी काऊन्सिलर पाहिजे. आपण ते कोठून आणणार ? मला या प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहेत. मला या प्रश्नांची उत्तरे मिळतील किंवा मिळणारही नाहीत. परंतु, भारत विकास कंपनीच्या संदर्भातील उत्तर मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, स्त्री भ्रूणहत्येचा विषय महत्वाचा आहे. मुलीला 21 वर्षांनंतर 1 लाख रूपये देणार आहात. 21 वर्षांनंतर 1 लाख रूपयांची किंमत किती असणार आहे ? आपण किती तुटपुंजी प्रोव्हिजन करीत आहात हे मला दाखवून द्यायचे आहे. मुलीला 21 वर्षांनंतर 1 लाख रूपये देणार असाल तर त्याची किंमत त्यावेळी 1 हजार रूपयांपेक्षा कमी असेल, असे मला वाटते. रूपयांचे अवमूल्यन होत आहे. एवढे मुद्दे मांडून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ D/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 17:00

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी सन 2014-2015 चा पुरोगामी अंतरिम अर्थसंकल्प मांडला आहे. मी या अंतरिम अर्थसंकल्पाच्या संदर्भात सर्वप्रथम आदरणीय उप मुख्यमंत्री व माननीय राज्यमंत्री यांचे अभिनंदन करतो. अंतरिम अर्थसंकल्पात गावातील शेवटच्या, गावकुसाच्या बाहेरच्या, निराधार, पददलित, वंचित, गरीब, मागासवर्गीय असलेल्या माणसाचा विचार केला आहे. त्यामुळे मी अंतरिम अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, घरकुल योजना पददलितांसाठी वरदान आहे. 2 वर्षांपासून महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात पददलित झोपड्यात राहत होता. शासनाच्या घरकुल योजनेमुळे तो झोपडीतून चांगल्या घरात राहण्यास चालला आहे. अनेक गाववस्त्यांमध्ये, दलित वस्त्यांमध्ये घरकुल योजना अतिशय सुरेख काम करीत आहे. अंतरिम अर्थसंकल्पात घरकुल योजनेसाठी फार मोठी आर्थिक तरतूद केल्याचे दिसत आहे. दलित सुधार वस्ती योजना देखील आहे. गेल्या 20-25 वर्षांपूर्वी दलित वस्तीमध्ये जाताना पावसात चिखल होतो तशी स्थिती असायची. आता खेड्यापाड्यांत 100 गावांच्या वस्तीमध्ये दलित वस्ती असली तर तेथे सिमेंट काँक्रिटचे रस्ते आहेत. दलित वस्तीत गेल्यानंतर, तेथील रस्ते पाहून आज सुध्दा प्रश्न पडतो की, आपण खरोखर दलित वस्तीमध्ये आलो आहोत का ? संबंध राज्याला भूषण ठरेल असे काम दलित वस्त्यांमध्ये सुरू आहे. शासनाचे त्याबद्दल कितीही अभिनंदन केले तरी कमी आहे. दलित वस्त्या सुधार योजना, घरकुल योजना यांवर केवळ सरकार थांबलेले नाही. सरकारने ठरविले आहे की, दलित समाजाला आर्थिक मदत करून, दलित समाजातील तरूणांना आर्थिक मदत करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करायचे. त्यांनी व्यवसाय करावेत, धंदे करावेत, असे शासनाचे अतिशय सुंदर नियोजन आहे. पददलित तरूण सूत गिरणी मालक व्हावा असे शासनाचे नियोजन आहे. मागासवर्गीयांच्या सूत गिरण्यांना सरकारच्या वतीने पतपुरवठा देऊन त्यांना उद्योगपती करण्याच्या सरकारच्या संकल्पाचे मी अभिनंदन करतो. गेल्या 6-7 वर्षांपासून सरकारने मागासवर्गीयांच्या संदर्भात धोरण अवलंबिले आहे. औद्योगिक संस्थांचे जाळे पसरले आहे. 1 कोटी पासून 15 कोटीपर्यंत मागासवर्गीय औद्योगिक संस्थांना पतपुरवठा करून, हजारो गावांतील तरूणांना आपल्या पायावर उभे करण्याचा संकल्प केला आहे. मागासवर्गीय तरूण उद्योगधंद्याला लागले आहेत. त्यामुळे दलितांचा प्रतिनिधी

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ....

म्हणून मला शासनाचे अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही. अनेक योजना आल्या. सन्माननीय सदस्य जीवनदायी योजनेच्या 25 हजार रूपयांबद्दल बोलले. गरीब माणसाला, गावकुसाच्या बाहेरच्या माणसाला आजारी पडल्यानंतर खर्च करणे किती अवघड आहे याची तुम्हाला कल्पना नसेल. जे जीवनदायी योजनेवर टीका करीत आहेत त्यांना याची कल्पना नाही. असाध्य रोगाने जर्जर झाल्यानंतर मृत्यूला सामोरे जाण्याशिवाय पर्याय नसलेल्या गरीब माणसाला, गावकुसाच्या बाहेर राहणाऱ्या गरीब माणसाला ही जीवनदायी योजना म्हणजे नवीन जीवन आहे हे आपण समजून घेतले पाहिजेत. काही अडचणी असतील. किमान दीड लाख रूपयांपर्यंत खर्च करायचा, असाध्य आजाराने जर्जर झालेल्या माणसाला पुन्हा माणुसकीचे जीवन जगण्यासाठी आर्थिक मदत करायची अशा तऱ्हेची ही योजना आहे. सरकारने ती मांडली आहे. सदर योजनेसाठी सरकार प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे मला सरकारचे अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही.

सभापती महोदय, शासनाने जाहीर केलेल्या विमानतळांच्या संदर्भात टीका झाली. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य चांगल्या गोष्टींबद्दल बोलतच नाहीत. नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विषय घ्या, पुण्याच्या विमानतळाचा विषय घ्या. विमानतळावर शेवटच्या दिवशी तिकिट मिळते का ते पहा, किंमत काय असते ते तपासून पहा. रेल्वे फलाटावर गर्दी असते, त्याप्रमाणे तुफान गर्दी नागपूरच्या विमानतळावर असते, पुणे विमानतळावर असते, औरंगाबाद विमानतळावर असते. मग आपण या संदर्भात कौतुक का करीत नाही ? सरकारने योजना राबविल्या, औद्योगिकीरण केले.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे......

ज्या सुसाट वेगाने विकास कामे सुरु आहेत, त्याबद्दल विरोधी पक्ष का बोलत नाही ? मात्र, एखादे काम बंद पडले तर त्याबद्दल येथे उल्लेख केला जातो, ही दुर्दैवाची बाब आहे. सरकारच्या कामाच्या पध्दतीने आज विरोधी पक्ष गलितगात्र झाला आहे.

सभापती महोदय, काल आपण काही प्रकार बघितले. विरोधी पक्षाने इकडचे सदस्य उचलले आणि तिकडे नेले. यापूर्वी सन्माननीय श्री.सुभाष भोईर यांचे काय झाले, हे सर्वांना माहिती आहे. ते या सभागृहात सन्माननीय सदस्य म्हणून आले. पण त्यांना उचलले आणि तिकडे नेले. ते नगरपालिकेच्या निवडणुका 4 ते 5 वेळा लढले होते आणि कधीही त्यांनी पराजय बघितला नव्हता. तिकडे गेले आणि पराभूत झाले. त्याप्रमाणेच सन्माननीय सदस्य श्री.संजय काका पाटील यांना विरोधी पक्षाने गळ टाकला, असे म्हणतात. परंतु, खऱ्या अर्थाने, श्री.संजय काका पाटील यांच्यासाठी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी संधी दिली. त्यांना सन्मानाने या सभागृहात बसविले. परंतु, जे भोईरांचे झाले तेच संजय काकांचे होणार आहे. आम्ही भुजबळ साहेबांना इकडे घेतले, त्यांचे उदाहरण बघा. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आहेत आणि ते राज्याचे उप मुख्यमंत्री देखील होते. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांचे उदाहरण घ्या. काकांचे काय होणार आहे, हे 6 महिन्यात सर्वांना कळेलच. तुमच्याच पक्षाचे लोक त्यांचे डिपॉझिट कसे जप्त होईल, याचा प्रयत्न करीत होते. ते काय करणार आहेत, ते आम्हाला माहीत आहे. "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले." मी आमदार असेन किंवा नसेन. परंतु, या राज्याच्या नेत्यांनी ज्याप्रमाणे शब्द दिला, त्याप्रमाणे गोरगरिबांना अभिप्रेत असलेला अर्थसंकल्प मांडला आणि त्याचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. मी आमदार असेन किंवा नसेन. मला त्याची पर्वा नाही. मधल्या काळात मी आमदार नव्हतो. परंतु, पददलित, गोरगरीब, झोपडपट्टीवासियांचा लाखो लोकांचा मोर्चा मंत्रालयावर आणणारा राम पंडागळे हा एकमेव कार्यकर्ता आहे, हे देखील आपण लक्षात ठेवावे. आपण एवढा मोठा मोर्चा आणू शकणार नाही. त्यामुळे मी आमदार म्हणून राहीन किंवा नाही, याची मला चिंता नाही. पण सरकारला पाठिंबा देणारा एक कार्यकर्ता म्हणून काम करण्याची संधी माझ्याकडे निश्चितपणे असेल, एवढेच मी सांगतो.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे......

सभापती महोदय, गुजरातबद्दल नेहमी या सभागृहात बोलले जाते. बॅनर आणि पोस्टरबद्दल सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मुद्दा उपस्थित केला. परंतु, संपूर्ण मुंबईच्या मार्गांवर त्यांचेच बॅनर लागलेले आहेत. गुजरातबद्दल एवढे बोलले जाते. पण गुजरातमध्येच ठाणे शहरातील एक महाविद्यालयीन मुलगी गेली होती. तिला संरक्षण देण्याऐवजी मारले गेले, याचा उल्लेख कोणी करीत नाही. या राज्याचे सरकार चांगल्या प्रकारचे निर्णय घेत आहे. गुजरात राज्यात एका महिलेच्या मागे हेर लावले होते, त्याचा उल्लेख आपण का करीत नाही ?

सभापती महोदय, हे सरकार चांगले काम करीत आहे. या सरकारने समतोल विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक येथे बसलेले आहेत व ते विदर्भातील आहेत. विदर्भातील विकासाकडे सरकारचे बारकाईने लक्ष आहे, हे आपण सर्वजण पहातो आहोत. विदर्भाला न्याय देण्याचा प्रयत्न या सरकारने केला आहे. या सरकारने विकासाच्या बाबतीत चांगला समतोल ठेवला आहे. सर्वात जास्त सिंचनाच्या योजना आज विदर्भात सुरु आहेत. मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी 33 टी.एम.सी. पाणी मराठवाड्याला मिळाले पाहिजे, यासाठी हे सरकार कटिबध्द असून तशा योजना सुरु केल्या आहेत. सर्व विभागांमध्ये समतोल ठेवण्याचा सरकारचा उद्देश अभिनंदनीय आहे व आपण त्याचे स्वागत केले पाहिजे.

सभापती महोदय, यापूर्वी मेट्रोचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 6/6 लोकसभा सदस्य मुंबईमधून निवडून येतील आणि मेट्रो रेल्वे या पक्षांचा झेंडा फडकवत ठेवील, याबद्दल शंका नाही. त्यानंतर तुम्हाला आमचे अभिनंदन करावे लागेल. या अर्थसंकल्पामधून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय लिहिलेला आहे म्हणून तुमची तडफड सुरु आहे. परंतु, तुमची तीच जागा आहे व ती तुम्हाला सोयीचीही आहे. विरोधी बाकावर बसून काहीही बोलता, चुकीची विधाने करता, अर्थसंकल्पावर नको ती टीका करता म्हणून ती जागा तुमच्यासाठी योग्य आहे आणि ती कायमची आहे.

...3....



SRR/ D/ KTG/ प्रथम श्री.मंगेश कांबळे........ 17:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.......

सभापती महोदय, मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो. या अर्थसंकल्पामधून शेवटच्या माणसाचा, तळागाळातील माणसाचा, पददलितांचा, गोरगरिबांचा विचार केलेला आहे. म्हणून या अर्थसंकल्पाचे मी सहर्ष स्वागत करतो, या अर्थसंकल्पाला तहे दिल से पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

यानंतर श्री.मारोती शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ. निलम गो-हे)**

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आणि सन्माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये राज्याचा सन 2014-2015 चा जो अंतरिम अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, या सभागृहामधील सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि काही सन्माननीय अर्थतज्ज्ञ यांनी अंतरिम अर्थसंकल्पावर आपली मते मांडली. योगायोगाने काही सन्माननीय सदस्य आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सन 2014-15 च्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये 1 लाख 69 हजार 907 कोटी 55 लाख रु. महसुली जमा दाखविलेली असून महसुली खर्च 1 लाख 75 हजार कोटी रुपये आहे. मघाशी फिगर ॲण्ड फॅक्ट बाबत बोलताना सर्वांनी सांगितले की, महसुली तूट 5 हजार कोटी रुपये आहे. कर्जाची रक्कम वाढत आहे. त्याच बरोबर महसुली उत्पन्नामध्ये देखील भरघोस अशी वाढ होत आहे, दरडोई उत्पन्नामध्ये देखील भरघोस अशी वाढ होत आहे. मी या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित करु इच्छितो की, 1995 ते 2000 या दरम्यान युती शासनाने कर्ज घेतले होते त्यावेळी महसुली उत्पन्न किती होते, कर्जाची रक्कम किती होती आणि दरडोई उत्पन्न किती होते ? त्यावेळच्या आकडेवारीशी आपण सांगड घातली तर जे कर्ज घेण्यात आले होते ते 25 टक्के होते. आता महसुली उत्पन्नामध्ये झालेल्या वाढीच्या तुलनेत दरडोई उत्पन्न 1 लाख रुपयापर्यंत गेलेले आहे. ही टक्केवारी 17 टक्के आहे. जेव्हा युती शासन होते त्यावेळी घेतलेले कर्ज आणि उत्पन्न यांचे प्रमाणे 25 टक्के होते. आज ही टक्केवारी 17 आहे.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली आकडेवारी ही तांत्रिकदृष्टया बरोबर आहे की चूक आहे हे तपासून पहाणे आवश्यक आहे. त्यांनी सांगितल्या प्रमाणे जर दरडोई उत्पन्न वाढलेले असेल तर दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी योजना का राबविता ? या योजना राबविण्याची आपणास गरज नाही, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्याची गरज नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : ही सरासरीची आकडेवारी आहे. वर्गातील एका विद्यार्थ्याला 99 टक्के मार्क्स मिळाले तर त्याचा अर्थ सर्व विद्यार्थ्यांना 99 टक्के मार्क्स मिळाले असा होत नाही. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला मी उत्तर देणे योग्य होणार नाही. माननीय मंत्री महोदय त्यांच्या मुद्याचे उत्तर देतील. दरडोई उत्पन्नामध्ये जी 1 लाख 5 हजार रुपयाची वाढ झाली ती चुकीची आहे असे सन्माननीय सदस्यांना म्हणता येणार नाही. महसुली जमेचे उद्दिष्ट शासनाने गाठले आहे. वीजदर असेल, सवलती असतील, टंचाई निवारणाचा खर्च असेल, नैसर्गिक आपत्ती असतील या सर्व गोष्टी जमेस धरल्या तर त्याचे प्रमाण आपणास कळून येईल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, 60 वर्षापासून हेच चालत आलेले आहे. 60 वर्षापूर्वी पासून रोटी, कपडा आणि मकान हे तीन मुद्दे घेऊन सर्व पक्ष पुढे जात होते. राज्यातील जनतेला पोटभर अन्न मिळावे, अंगभर कपडे मिळावेत आणि राहाण्यासाठी घर मिळावे यासाठी सर्व पक्ष प्रयत्नशील होते. आज दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्य कोणत्या गोष्टींची मागणी करीत आहेत ? तर राज्यामध्ये चांगले रस्ते असावेत, वीज असावी, विमानतळे असावीत, मेट्रो-मोनो रेल असावी अशा प्रकारची मागणी ते करीत आहेत. आपण इतर देशांची तुलना केली तर त्या देशामध्ये ज्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या गोष्टी आपल्या राज्यामध्ये देखील व्हायला पाहिजेत अशी आपली अपेक्षा असते. आपल्या राज्यामध्ये आज विविध प्रकल्प राबविले जात आहेत, काही प्रकल्प अपूर्ण असले तरी ते प्रगतिपथावर आहेत. याचा अर्थ आपण विकासाच्या दिशेने जात नाही काय, की अजूनही आपण रोटी, कपडा आणि मकान याच गोष्टी मागत आहोत ? म्हणून निवडणूक डोळयासमोर ठेवून हा अर्थसंकल्प मांडलेला आहे असे मला वाटत नाही. तसे असते तर आज आपल्या राज्यातील प्रत्येक माणूस खिशामध्ये मोबाईल घेऊन फिरला नसता. याचा अर्थ आपले राज्य हे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे असा होतो. त्याच बरोबर सर्व समाजाची एकत्रितपणे प्रगती साधणारा असा हा अर्थसंकल्प आहे. अल्पसंख्याक असतील, मागासवर्गीय असतील, ग्रामीण भागातील जनता असेल, शहरी भागातील जनता असेल, महिला असतील, विद्यार्थी असतील, वृद्ध असतील या सर्वांना बरोबर घेऊन आणि प्रत्येक धटकाला त्यांच्या गरजेनुसार काही तरी मिळावे या दृष्टीने हा अर्थसंकल्प मांडलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..



श्री. किरण पावसकर....

सभापती महोदया, ग्लोबल वॉर्मिंग हा केवळ आपल्या राज्यापुरता किंवा देशापुरता मर्यादित राहिलेला विषय नाही. पर्यावरण प्रदूषण, वाढलेली लोकसंख्या, विकसनशील देशांची स्पर्धा या सर्व गोष्टींचा विचार हा अर्थसंकल्प मांडताना केलेला आहे. आपली स्पर्धा कुठे होते ? विदर्भामध्ये काय चालले आहे, पश्चिम महाराष्ट्रामध्ये काय चालले आहे, गोव्यामध्ये काय चालले आहे, केरळमध्ये काय चालले आहे या गोष्टी आपण पहात होतो. आता आपण लंडन, अमेरिका या देशांच्या प्रगतीच्या गोष्टी करतो. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या आर्थिक राजधानीची आपण अन्य देशातील शहराशी तुलना करीत आहोत. राज्यातील जनतेला, टंचाई, अतिवृष्टी, पूर, गारपीट, अशा नैसर्गिक आपत्तीत मदत करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निधी उपलब करुन दिलेला आहे. या वर्षी देखील नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. राज्यामध्ये 2013मध्ये पूर आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये बळी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना 2 लाख 50 हजार रुपयाची मदत करण्यात आलेली आहे. 5 वर्षापूर्वीच्या अर्थसंकल्पामध्ये ही मदत किती होती त्याची आकडेवारी आपण पाहू शकता. वाढत्या लोकसंख्येला आपण कोणकोणत्या गोष्टी दिल्या पाहिजेत याबद्दलही आपण बोलू शकता. त्याच प्रमाणे बोटी, जाळी आणि मत्स्यबीजांच्या नुकसानीपोटी मच्छीमार व्यावसायिकांना केंद्र शासनाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दरानुसार मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. कोकणातील मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या लोकांचे ज्या ज्या वेळी नुकसान झालेले आहे त्या त्या वेळी शासनाने त्यांना मदत केलेली आहे. फळपिकांच्या नुकसानी बाबत शासनाने जी मदत केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे जाहीर आभार मानतो.

सभापती महोदया, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी 15 कोटी 60 लाख रुपयाचा निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. 1995 ते 2000 या कालावधीत मराठीच्या संवर्धनासाठी किती निधी देण्यात आला होता ? हा निधी 4 महिन्यासाठी आहे. विरोधी पक्षातील काही नेते मंडळीनी मंत्रालयातील इंग्रजी अद्याक्षरे असलेल्या पाट्या काढण्यासंबंधी आंदोलने केली. मुंबई ही सर्व भाषिकांची असली तरी मुंबईतील सर्व दुकानावरील फलक मराठीमध्ये असावेत यासाठी आंदोलने करण्यात आली. 1995 ते 2000 या दरम्यान प्रत्येक वर्षी

..4..



श्री. किरण पारवसकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जो अर्थसंकल्प मांडण्यात आला त्यामध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासाठी किती पैसे खर्च केले याचा विचार करण्याची गरज आहे. 15 कोटी रुपये हे मराठी भाषेच्या प्रचार अणि प्रसारासाठी भरपूर आहेत असे मी म्हणणार नाही. ही रक्कम कमी आहे. या कामासाठी आणखी पाच पटीने निधी मिळाला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर..........

सरकारला मी विनंती करणार आहे, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आणखी जास्त वेगाने योजना राबविण्यात यावी.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मराठी भाषेबद्दल राबविण्यात येणाऱ्या योजनेबद्दल शासनाची पाठ थोपटण्याचा प्रयत्न चालविला आहे. मुंबई विद्यापीठामध्ये जर्मन आणि मराठी भाषा शिकविण्यासाठी सरकार निधी देत नाही म्हणून चित्रपट अभिनेते आमीर खान यांनी 25 लाख रुपये दिले. विद्यापीठाला 1 कोटी रुपये निधी द्यायचा आहे. मराठी भाषा शिकविण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता आमीर खान 25 लाख रुपये देत असेल तर शासन 1 कोटी रुपये देण्यास टाळाटाळ का करीत आहे?

श्री.किरण पावसकर : महाराष्ट्रामध्ये आमीर खानसारखे आणखी 500 आमीर खान तयार व्हावेत अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. महाराष्ट्रामध्ये आल्यानंतर त्यांनी फिल्म सिटीच्या माध्यमातून चांगले चित्रपट निर्माण केले. त्यातून त्यांना भरपूर उत्पन्न मिळाले. त्याचे ऋण फेडण्यासाठी त्यांनी 25 लाख रुपये मदत दिली असावी. असे आणखी 500 आमीर खान तयार व्हावेत आणि त्यांनी आवश्यक त्या ठिकाणी आर्थिक मदत करावी. त्यांचे स्वागत केले जाईल.

सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उद्योगपती आणि व्यापारी यांच्या वापरासाठी विमानतळ उभारले जात आहेत असे सांगितले. राज्यात विमानतळांचे जाळे निर्माण करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. कराड, अमरावती, जळगाव, अकोला, सोलापूर, रत्नागिरी आदी ठिकाणी विमानतळ उभारले जात आहेत. कोल्हापूर येथे विमानतळ आहे. शिर्डी येथील विमानतळ अंतिम टप्प्यात आहे. विमानतळाचा विकास, देखरेख आणि देखभाल यासाठी शासनाने 165 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला आहे. विमानतळाची योजना एका दिवसात पूर्ण होऊ शकत नाही. कोल्हापूर येथे विमानतळ तयार आहे, परंतु त्याचा उपयोग करता येत नाही. कराड, नांदेड, जळगाव, अकोला या ठिकाणी विमानतळ उभारल्यानंतर पहिल्याच दिवशी विमानाची ये-जा होऊ शकत नाही. याच देशात नव्हे तर बाहेरच्या कोणत्याही देशात पहिल्या दिवशी विमानतळावर ड्रीमलायनर किंवा 707 विमान उतरत नाही. छोटे विमानतळ असते, त्या ठिकाणची धावपट्टी वाढविली जाते. सिंधुदुर्ग जिल्हयात विमानतळ होत आहे. त्यासाठी 900 हेक्टर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर..........

जमीन संपादित केली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विमानतळासाठी 262 हेक्टर जमिनीची आवश्यकता असते. ज्यावेळी कामाचा फ्लो वाढेल त्यावेळी विमानतळाचा विकास करता येईल. कोल्हापूर येथे चांगले विमानतळ उपलब्ध आहे. त्या ठिकाणच्या विमानतळाचा पुरेशा क्षमतेने वापर व्हावा म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन कंपन्यांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा केल्यानंतर ते विमानतळ सुरु झाले. परंतु 25 टक्के देखील प्रवासी मिळत नसल्यामुळे फायदा होत नसल्याने तेथे विमान उड्डाण करण्यास विमान कंपन्या उत्सुक नाहीत. केवळ विमानतळ उपलब्ध आहे म्हणून विमान उतरविले जाईल असे होत नाही.

सभापती महोदया, औरंगाबाद येथे बजाज कंपनीचा कारखाना सुरु झाला. बजाज कारखान्यासाठी काम करणारे आणखी 250 कारखाने आजूबाजूला सुरु झाले. त्यानंतर औरंगाबाद विमानतळाला महत्व आले. औरंगाबादला औद्योगिक नगरीचे स्टेटस मिळाल्यानंतर आज त्या ठिकाणच्या विमानतळावर दररोज 5 विमाने ये-जा करीत आहेत. उद्योग निर्माण झाले नाहीत तर कोणी ये-जा करणार नाही. उद्योग उभे राहिल्यानंतर त्यांना पॅरालल व्यवसाय सुरु करण्याबाबत सांगड घातली पाहिजे. त्यानंतर विमानतळांचा विकास चांगल्या पध्दतीने होऊ शकेल. मोठे विमानतळ नाही, विमान उतरणार नाही अशी भूमिका घेऊन चालणार नाही. भविष्यात मोठी विमाने उतरण्यासाठीच शासनाने 165 कोटी रुपयांची योजना प्रस्तावित केली आहे, त्या योजनेचे आपण स्वागत केले पाहिजे.

सभापती महोदया, नवी मुंबई येथे वर्षाला 6 कोटी प्रवासी क्षमतेचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ होणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करावी.

**तालिका सभापती** (डॉ.नीलम गोऱ्हे) : सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.36 ते 5.46 पर्यंत स्थगित झाली.)

--------

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगिती नंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.नीलम गोऱ्हे)**

श्री.किरण पावसकर : सभापती महोदया, विमानतळासंबंधी आपण बोलत होतो. कराड, अमरावती, जळगाव, अकोला, सोलापूर येथील विमानतळाची कामे प्रगतिपथावर आहेत. नांदेड, कोल्हापूर येथे विमानतळ बांधून झालेले असून तेथे पॅसेंजर लोड असेल तर तेथील विमानतळ देखील सुरू राहील. विमानतळ बांधून तयार आहे पण सेवा सुरू नाही अशा विमानतळांना चालना देऊ नये अशा प्रकारचा मुद्दा विरोधकांनी मांडला होता. हा मुद्दा पूर्णपणे चुकीचा आहे असे मी म्हणेन.

शिर्डी हे श्रद्धास्थान आहे. येथे दररोज एक हजार बसेस येतात. येथे येण्यासाठी रेल्वेच्या तीन गाड्या देखील आहेत. येथे लाखो भाविक येत असल्यामुळे 165 कोटी रूपयांचे विमानतळ प्रस्तावित आहे. यासाठी मी शासनाला खरोखर धन्यवाद देतो. अशा ठिकाणी विमानतळ होण्याची खरोखरच गरज आहे. त्याच बरोबर मी शासनाला विनंती करणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे. चिपी विमानतळाचे काम सुरू आहे असे सांगण्यात आले आहे. भूसंपादनाचे देखील काम झालेले आहे. या विमानतळाचे काम कमीतकमी वेळामध्ये पूर्ण व्हावे म्हणून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देऊन तेथे जास्तीतजास्त ऑपरेशन कसे होईल हे देखील आपण पहावे. त्यास आपण प्राधान्य दिले तर जास्तीतजास्त पर्यटक येथे येऊ शकतील.

सभापती महोदया, आपण घंटी वाजवू नये. मी फक्त पाच ते सहा मिनिटेच बोललो आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकरजी, आपण 5 वाजून 22 मिनिटांनी भाषणास सुरूवात केली आहे. अजूनही अनेक सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून व माननीय मंत्री महोदयांचे सविस्तर उत्तर ऐकावयाचे असल्याने आपण फक्त मुद्दे मांडावेत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदया, लहान व मध्यम शहरांच्या नागरी सुविधांसाठी 3500 कोटी रूपये प्रस्तावित आहेत. आपण प्रकल्प मंजूर केलेले आहेत. नागपूर सारख्या ठिकाणी दोन मेट्रो रेल्वे प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. हा 38 कि.मी.लांबीचा प्रकल्प आहे. मिहान प्रकल्प देखील नागपूरला आहे. पुण्याच्या मार्गिका क्रमांक 2 आणि 1 साठी 6960 कोटी रूपये आणि दोन क्रमांकासाठी 3223 कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. याचा अर्थ पुणे, नागपूर, मुंबई येथील पायाभूत सुविधांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबईत मोनो रेल्वे प्रकल्प उभा केलेला आहे. वडाळा ते चेंबूर हा पहिला टप्पा दिनांक 1 फेब्रुवारी 2014 पासून कार्यान्वित झाला आहे. मुंबईत व राज्यात सुरू झालेले अन्य प्रकल्प याबाबत शासनाचे अभिनंदनच करावे लागेल. आपण मेट्रो, मोनो रेल्वे प्रकल्पाला प्राधान्य दिले नाही तर आम्ही फक्त 55 पूल केले, एक एक्सप्रेस-वे केला एवढेच ऐकून घ्यावे लागेल. आपण आपले राज्य चालविताना केले असेल तर ते बरोबर असेल. 1999 मध्ये 55 उड्डाण पूल होणे, मुंबई पुण्यासाठी रस्त्याचा प्रकल्प होणे हे ठीक होते. पण आता विमानतळ, मोनो व मेट्रो रेल्वेचे काम सुरू आहे त्यासाठी शासनाचे आभार मानावेच लागतील.

मी एकाच मुद्यांवर बोलणार आहे. राज्य पोलीस दलामध्ये पाच वर्षामध्ये पाच टप्प्यामध्ये 61494 पदे निर्माण करण्यात येत आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर .....

पहिल्या टप्प्यात 12300 पदे भरण्यात येणार असून त्यासाठी अंदाजे 566 कोटी रुपयांचा आवर्ती खर्च येणार आहे. मुंबईला आर्थिक राजधानी म्हटले जाते. मुंबईवर आंतकवाद्यांचा हल्ला झाला होता त्यावेळी त्याचा परिणाम आपल्या राज्यातील उद्योग धंद्यांवर झाला होता. आर्थिक राजधानीला सांभाळण्यासाठी, प्रगतिशील महाराष्ट्राचा क्राईम रेट तसेच महिलावरील अत्याचार खऱ्या अर्थाने थाबवावयाचे असतील तर आपल्याला सुरक्षेसाठी जास्त खर्च करावा लागणार आहे. आपल्याला जर यासंदर्भात गुजरात राज्यासारखे ॲडव्हटाईज प्रॉडक्ट करावयाचे असेल तर गोष्ट वेगळी. टीव्ही वर एखादा साबण घेतला जातो, अंगाला लावला जातो आणि भरपूर फेस येतो असे दाखवले जाते. परंतु हाच साबण घरी घेऊन गेल्यानंतर त्याचा फेसच निघत नाही. म्हणजे गुजरात सारखी ॲडव्हटाईज प्रॉडक्ट सारखी परिस्थिती आपली होता कामा नये. किती खोटे बोलावयाचे आणि जाहिरात किती करावयाची यालाही काही मर्यादा असली पाहिजे. आता निवडणुका जवळ आलेल्या आहेत. अंतरिम अर्थसंकल्प या शासनाने मांडलेला आहे. निवडणुकांना सामोरे जावे लागत असल्यामुळेच आपल्याला अंतरिम अर्थसंकल्प मांडावा लागला आहे. जनतेच्या गरजा भागवण्यासाठी अंतरिम अर्थसंकल्प या ठिकाणी मांडला गेला आहे. दोन्ही बाजूच्या अर्थतज्ज्ञांनी या अर्थसंकल्पावर विचार मांडलेले आहेत. पोलीस दल सक्षम करण्यासाठी 566 कोटी रुपयांचा खर्चाचा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आलेला आहे. पोलीस भरतीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच माननीय गृहमंत्र्यांचे मी आभार व्यक्त करतो.

सभापती महोदया, मुंबईमध्ये बॉम्बस्फोट भरपूर प्रमाणात झालेले असल्यामुळे मुंबई पोलीस कमिशनर म्हणून श्री. राकेश मारियांची नेमणूक यावेळी करण्यात आली असून राकेश मारिया यांना आयपीएस अधिकाऱ्यांमधून पहिला प्रेसिडेन्शीअल अवॉर्ड, आऊट ऑफ दि टर्न ॲवॉर्ड मिळाला असल्यामुळेच श्री. मारिया यांची मुंबई पोलीस कमिशनर पदी नियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. मुंबईच्या तसेच महाराष्ट्राच्या पोलीस दलाला सक्षम करण्यासाठी अजूनही रक्कम लागली तर ती खर्च करण्यात यावी अशी विनंती करुन माझे दोन शब्द येथेच थांबवतो.जय हिंद, जय महाराष्ट्र, धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

----------

...2...

डॉ. रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) सभापती महोदया, सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. विषयाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मी ठराविक मुद्देच मांडणार आहे.

सभापती महोदया, सरकारने 100 रुपये मदत जाहीर केली तर त्यातील केवळ 15 रुपये लाभार्थ्यांपर्यंत पोहचतात अशी माहिती दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी दिलेली आहे. सन 2008 मध्ये राज्यातील पीक कर्जासाठीची मदत असेल, दुष्काळाची मदत असेल किंवा अतिवृष्टीची मदत असेल यामध्ये ल एकूण मदतीच्या केवळ 15 ते 20 टक्केच मदत शेतकऱ्यांपर्यंत गेलेली आहे. महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीयांसाठी आणि दुर्लक्षितांसाठी जेवढया जेवढया योजना आहेत त्यांच्यासाठी जेवढा निधी पोहचावयास पाहिजे तेवढा पोहचत नाही ही वस्तुस्थिती आहे. आकारमानानुसार अनुसूचित जातीसाठी 11.8 टक्के व अनुसूचित जमातींना 7.8 टक्के रक्कम एकूण बजेटमधून दिली जाते. यासंदर्भातील गेल्या 4-5 वर्षाची अर्थसंकल्पातील रक्कम पाहिली तर प्रत्येक अनुसूचित जाती,जमातीच्या कुटुंबामध्ये 4 ते 5 लाख रुपये आजपर्यंत जाणे आवश्यक होते. ही रक्कम त्यांनी फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवली असती तर त्याच्या व्याजावर या वर्गांचा संसार चालला असता. इतका पैसा महाराष्ट्र शासनाने मगासवर्गीयावर गेल्या 7-8 वर्षात खर्च केलेला आहे.

सभापती महोदया, ज्यांना दुष्काळाच्या झळा पोहचतात त्यांच्यापर्यंत मदत पोहचत नाही याची मला खंत  आहे. इंटरनॅशनल मॉनिटरींग फंड आणि संयुक्त राष्ट्र संघ काहीही कारण नसतांना आपल्याला पैसे देत नाहीत. आपल्याला त्यांनी मिलिनियम उद्दिष्ट दिलेले असते व हे उद्दिष्ट आपल्याला साध्य करावे लागणार असून ते उद्दिष्ट आपल्याला सन 2015 पर्यंत पूर्ण करावे लागणार आहे. मिलिनियम उद्दि्ष्टामध्ये भीषण दारिद्रय, रोगराई, निरक्षरता, महिलांचे सक्षमीकरण, पर्यावरणाचा समतोल व विकासामध्ये जागतिक भागीदारी असे त्यांचे उद्दिष्ट असून ते उद्दिष्ट गाठण्यासाठी पैसे दिले जात असतात. परंतु ही उद्दिष्टे आपण कधीच साध्य केलेली नाहीत. त्यासोबतच या देशाचा आर्थिक कणा असणाऱ्या शेतकऱ्यांची जोपर्यंत परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत हे उद्दिष्ट आपण साध्य करु शकत नाही असे मला वाटते. हे करावयाचे असेल तर शेती

..3...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील .....

क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूक करावी लागेल, सिंचन क्षेत्रामध्ये सुध्दा महत्तम गुंतवणूक करावी लागेल. पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन व शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये जो मध्यस्थांचा वाटा आहे तो आपल्याला कमी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, जेव्हा शेतकऱ्यांच्या घरी सोयाबीन येते तेव्हा सोयाबीनचा भाव 2900 ते 3000 रुपये क्विंटल असतो. परंतु हेच सोयाबीन जेव्हा व्यापाऱ्यांकडे जाते तेव्हा 15/20 दिवसामध्ये या सोयाबीनचा भाव 3500 ते 3700 रुपये क्विंटल पर्यंत जातो. कास्तकाराला हाडाची काडे आणि रक्ताचे पाणी करुन जेवढा नफा मिळालेला नसतो त्याच्यापेक्षा जास्त नफा 10-15 दिवसात व्यापारी कमावित असतो. कापसाच्या बाबतीत सुध्दा अशीच परिस्थिती आहे. शेतकऱ्याकडे कापूस असतो तेव्हा 3900 ते 4000 रुपये प्रती क्विंटल भाव असतो परंतु जेव्हा व्यापाऱ्याकडे माल जातो तेव्हा त्या मालाची किंमत 5 ते 6 हजार रुपये होते. त्यामुळे यामध्ये आपल्याला बाजार समितीचे विपणन करुन शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे लागणार आहे.

सभापती महोदया, आयात निर्यातीच्या धोरणामध्ये धरसोडीचे धोरणे असतात. जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मालाला चांगले भाव असतात तेव्हा शेतकऱ्यांना कमी भावाने माल विकावा लागतो. शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढलेल्या भावाचा काहीच फायदा होत नाही हे दुर्दैव आहे.

सभापती महोदया, सिंचनाच्या संदर्भात या राज्याने केवळ 50 टक्के सबसिडी दिलेली आहे. या राज्यात तुषार व सूक्ष्म सिंचनासाठी केवळ 50 टक्के सबसिडी दिली जाते. विदर्भ किंवा मागास जिल्हे तसेच आत्महत्याग्रस्त जिल्हयांचा अभ्यास करुन त्यासंदर्भातील अहवाल केंद्र सरकारला पाठविला जातो व त्याचा अभ्यास करुन केंद्र सरकार पॅकेजेस देत असते. असेच एक पॅकेज विदर्भ सधन सिंचन योजनेंतर्गत 3250 कोटी रुपये 5 वर्षामध्ये खर्च करण्यासाठी विदर्भासाठी केंद्र सरकारने दिले होते. यातील 1750 कोटी रुपये मृदसंधारणावर खर्च करावयाचे असून 1500 कोटी रुपये आपल्याला कृषीवर खर्च करावयाचे आहेत. या पैशांचा उपयोग सिंचन व्यवस्था पुनरप्रस्थापित करण्यासाठी खर्च करावाचे आहेत. म्हणजे एखादे माल न्यूट्रीटेड चाईल्ड असते त्या माल न्यूट्रीटेड चाईल्डला हाय प्रोटीन डाएट मिळावे यासाठीचे 3250 कोटी रुपये पाठविले आहेत.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील.....

मी अमरावती विभागामध्ये जलसंधारण व मृदसंधारणाच्या संदर्भात बैठक बोलावली होती यासंदर्भातील माहिती संबंधित मंत्री महोदयांना सुध्दा आहे. या विषयाच्या संदर्भात तारांकित प्रश्न सुध्दा उपस्थित केला होता. येथील कार्यकारी अभियंत्यांनी असे पत्र दिले आहे की, आमच्याकडे मॅन पॉवर कमी असल्यामुळे व योजनेतील 1750 कोटी रुपये खर्च करावयाचे असतील तर कंत्राटी पध्दतीने इंजिनियर नेमण्याची आम्हाला परवानगी द्या. परंतु ही परवानगी सुध्दा आपण देत नाही. यासोबतच 1500 कोटी रुपये आपल्याला सिंचनावर खर्च करावयाचे आहेत. आपण असे म्हणता की, तुषार व सूक्ष्म सिंचनाची सबसिडी 50 टक्क्यावरुन 75 टक्के केलेली आहे. 3 वर्षाच्या सूक्ष्म सिंचनाची आपल्याला जी सबसिडी द्यावयाची आहे ती किती द्यावयाची आहे ? 3 वर्षाच्या अगोदरची सबसिडी सुध्दा आपण अद्याप दिलेली नाही. आपल्याकडे व्हीआयआयडीपीचे पैसे ज्या उद्दिष्टासाठी आले होते ते पैसे त्या मूळ उद्दिष्टावर खर्च न करता अनुदान व सिंचनाच्या सबसिडीसाठी दिले जात असून यासंदर्भात आपण केवळ दोनच वर्षे पैसे दिलेले आहेत.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ MMP/ D/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 18:00

**तालिका सभापती (डॉ.नीलम गोऱ्हे)**: सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदया, आपण चर्चा लवकर लवकर संपविण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी सन्माननीय सदस्यांना त्यांचे विचार मांडण्यासाठी खूप कमी वेळ मिळतो. माझी आपणास विनंती आहे की, परवा सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यंत ठेवावी आणि त्या विशेष बैठकीत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह चर्चा संपवावी. आपण अशाप्रकारे वेळेचे नियोजन केल्यास आणि आपल्या सर्वांच्या दृष्टीने ते सोयीचे होणार असेल तर आपण त्याचा जरुर विचार करावा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितले की, शेवटच्या सदस्यांना बोलण्यासाठी खूप कमी वेळ मिळतो, त्यांना घाईघाईने बोलावे लागते. त्यांना आपले मुद्दे मांडताना वेळेची खूप अडचण निर्माण होते. आपली सूचना योग्य असली तरी आपण सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत चर्चेचा अंदाज घेऊ या. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अजून 11 सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. तेव्हा त्यांनी दहा ते पंधरा मिनिटांमध्ये आपले विचार मांडावेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, 11 सन्माननीय सदस्यांपैकी आता सभागृहात किती सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत ?

**तालिका सभापती** : सहा सदस्य म्हटले तरी एका सदस्याला दहा मिनिटे दिल्यास 7.00 वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील. त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर होऊ शकेल. तसे झाले नाही तर आपण नंतर विचार करु. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदया, जोपर्यंत आपण तुषार आणि सूक्ष्म सिंचनाला महत्व देत नाही, त्यासाठी 90 टक्के सबसिडी देत नाही तोपर्यंत आपला कृषी विकास दर वाढणार नाही. मध्य प्रदेश राज्याने शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी 90 टक्के सबसिडी दिल्यामुळे तेथील कृषी विकास दर 18 टक्के आहे. तेव्हा आपण या गोष्टीचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. मागील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

आठ वर्षे त्यांनी त्यांचा विकास दर 18 टक्के ठेवला आहे. मागील दहा वर्षे गुजरात राज्याचा विकास दर 10 टक्के आहे. आपल्या राज्याचा कृषी विकास दर 4 ते 5 टक्के आहे आणि त्याचे कारण म्हणजे आपण सूक्ष्म आणि तुषार सिंचनाला पाहिजे तेवढे महत्व देत नाही.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पातील पहिल्या पानावर दरडोई उत्पन्नाचा उल्लेख आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मागील दहा वर्षातील सरासरी दरडोई उत्पन्न 24 हजार रुपयांवरुन 1 लाख रुपयांपर्यंत गेले आहे. माझे असे म्हणणे आहे की, आपण विकासाची काही बेटे राज्यात स्थापन केली. दोन-चार भागांचे दरडोई उत्पन्न तीन ते चार लाख रुपये असले तरी मी ज्या भागाचे प्रतिनिधित्व करतो त्या भागातील दरडोई उत्पन्न 55 ते 60 हजार रुपये आहे. माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक हे त्याच भागातील आहेत. अकोला, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न 45 ते 50 हजार रुपये आहे. म्हणजे काही ठिकाणी दरडोई उत्पन्न 1 ते 3 लाख रुपये आहे तर काही ठिकाणी 45 ते 50 हजार रुपये आहे. ही विषमता लक्षात घेऊन लोक वेगळ्या विदर्भाची मागणी का करणार नाहीत ? मराठवाड्यासाठी लोक वेगळे मत का मांडणार नाहीत, कोकणासाठी वेगळे मत का मांडणार नाहीत ?

सभापती महोदया, आपणास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, आपणास स्वातंत्र्य मिळाले असले तरी जोपर्यत आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य होणार नाही.

सभापती महोदया, आम्हाला वाटले होते की, नागपूर करार झाल्यानंतर महाराष्ट्राच्या प्रगतीच्या वाटचालीमध्ये आम्हाला देखील सामावून घेतले जाईल परंतु दुर्दैवाने तसे झालेले नाही. आज सुध्दा आमचे दरडोई उत्पन्न सरकारच्या दुर्लक्षीपणामुळे वाढत नाही. अकोला, बुलढाणा, वाशिम व विदर्भातील सर्व जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न 58 हजार रुपयांच्या खाली आहे, हे सत्य नाही काय ? सन 2010-11 ते 2013-14 या पाच वर्षात भौतिक अनुशेष निर्मूलनासाठी माननीय राज्यपालांनी टाईमबाऊंड कार्यक्रम दिला होता. तो कार्यक्रम आपण 2015-16 पर्यंत वाढवून घेतला. आमच्या अकोला जिल्ह्यात माननीय राज्यपाल आले होते. त्यांनी नेरधामणा प्रकल्पास भेट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

दिली होती. त्या ठिकाणी काटेपूर्णा प्रकल्प आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये पूर्णा खोरे आहे. या पूर्णा खोऱ्यास खारपाणपट्टा म्हणून संबोधले जाते. जमिनीत पाणी नसल्यामुळे सिंचन करु शकत नाही आणि तेथे क्षार जास्त प्रमाणात असल्यामुळे ते पाणी पिण्यायोग्य नाही. उत्तरेकडील अमरावती, बुलढाणा आणि अकोल्याचा भाग हा खारपाणपट्टा म्हणून संबोधला जातो. या खोऱ्यातील प्रकल्प 60 ते 70 टक्के पूर्ण झालेले आहेत. माननीय राज्यपालांनी सांगितले की, हे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करावेत. या पूर्णावर पाच साखळी बॅरेजेस आहेत. स्वातंत्र्यांच्या 65 वर्षानंतर बॅरेजेस उभारण्याचे सुचले त्याबद्दल शासनाचे कौतुक केले पाहिजे. परंतु हे सर्व प्रकल्प मागील तीन वर्षापासून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी रखडलेले आहेत.

सभापती महोदया, या ठिकाणी माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी रुग्णवाहिका सेवेबद्दल सांगितले. मी रोज दोन-तीन मेजर सर्जरी करणारा ऑर्थोपेडीक डॉक्टर आहे. मी पुस्तकी ज्ञान घेतल्यानंतर मला एन्ड्रोट्रीकल इन्ट्रेमेशन कौशल्य प्राप्त करण्यासाठी तीन महिने ट्रेनिंग घ्यावे लागले. परंतु आपण 15 दिवसांच्या ट्रेनिंगनंतर एन्ड्रोट्रीकल इन्ट्रेमेशनचे सामान डॉक्टरांच्या हाती देणार असाल तर यातून काही साध्य होईल असे मला वाटत नाही. आपला हेतू चांगला आहे. अशा प्रकारच्या सर्व्हीसेस पहिल्यांदा होत आहेत. सांगण्याचा मुद्दा एवढाच की, आपण डॉक्टरांना 15 दिवसांच्या ट्रेनिंग नंतर एन्ड्रोट्रीकल टयुब टाकण्याचा प्रयत्न केला तर कधी कधी कॅज्युअल्टी आणि कॅलामिटी होऊ शकतात याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदया, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केल्याबद्दल राज्य शासनाचे कौतुकच केले पाहिजे. परंतु या योजनेमध्ये काही फ्लॉज राहू नयेत याची आपण काळजी घ्यावी. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे पॅकेजेस कुठे 11 हजार रुपये, कुठे 12 हजार रुपये आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी आपण इम्प्लान्ट खरेदी करण्याचे ठरविले आहे. म्हणजे हाड फ्रॅक्चर झाल्यानंतर जी खिळापट्टी लावली जाते ती खिळापट्टी खरेदी करण्यासाठी 12 ते 15 कोटी रुपयांचे कंत्राट दिले आहे. या कंत्राटासाठी आपण निविदा मागविल्या. आपण जी निविदा स्वीकारणार आहोत त्या निविदेमध्ये एका सर्जरीसाठी इम्प्लान्ट 7

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ MMP/ D/ D/      पूर्वी श्री.जुन्नरे..                    18:00

डॉ.रणजित पाटील....

हजार रुपयांना विकत घेत आहोत. परंतु जी एल-1 निविदा होती, ज्यामध्ये इम्प्लांटची किंमत एक-दीड हजार रुपये आहे आणि जे आम्ही इम्प्लांट वापरतो. ती निविदा स्लीव्ह लागत नाही, कॉलर बाहेर येते अशा छोट्या छोटया कारणांसाठी रद्द केली. आपण जी एल-2 निविदा घेत आहोत त्या पैशामध्ये चार सर्जरी करु शकतो. आपण मला सांगावे की, आपल्याला ॲनेस्थेशियाचा खर्च, मेडिसीनचा खर्च, इन्व्हेस्टीगेशनचा खर्च, जाण्यायेण्याचा खर्च हे सर्व करीत असताना आपण इम्प्लान्ट महाग खरेदी करीत आहात. आपण हे मान्य करीत आहात की, एका सर्जरीसाठी सात हजार रुपये लागत आहेत. मग आपण 12 हजार रुपयांचे पॅकेज कसे देता ? मला वाटते आपण यामध्ये लक्ष घालून तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

सभापती महोदया, प्रंपच व्यवस्थित व्हावा म्हणून आपण एक महिन्याचा खर्च बजेट करतो. तसे चांगले जीवन जगायचे असेल तर आमदानी कशी वाढेल याचा आपण विचार करतो.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

महोदया, राज्याच्या तिजोरीत भर पाडण्यासाठी आपल्याकडे पर्यटनाचा चांगला पर्याय उपलब्ध आहे. हे मी मागील भाषणात सुध्दा सांगितले होते. आपल्या राज्याला केवळ ऐतिहासिक, भौगोलिक आणि नैसर्गिक संपत्तीचा वारसा लाभला नाही तर आपल्याकडे चांगले डॉक्टर्स आणि कृषी क्षेत्र आहे. आपण आरोग्याचे आणि कृषी क्षेत्राचे चांगल्या प्रकारे पर्यटन करु शकतो. आपल्या राज्याला 720 कि.मी. लांबीचा सागरी किनारा लाभला आहे. आपल्या राज्यात बरेच शिवकालीन आणि भुईकोट किल्ले आहेत. तसेच लेण्या सुध्दा आहेत. बाहेरच्या राज्यात लाईट ॲण्ड म्युझिक शोच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न होत असतो. छोट्या छोट्या गोष्टींना हायलाईट करुन त्यातून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु दुर्दैवाने तशा प्रकारचा प्रयत्न आपल्याकडे होताना दिसत नाही.

महोदया, राज्याच्या एमटीडीसीच्या कोणत्याही कार्यालयात किंवा विश्रामगृहात सुतकी वातावरण असते. त्या ठिकाणी एखादा पर्यटक गेल्यास तेथील कर्मचाऱ्याला बोलवून आणावे लागते. त्या व्यक्तीची किमान 15 मिनिटे प्रतीक्षा करावी लागते. अशा परिस्थितीत आपण पर्यटन विकासाची अपेक्षा ठेवू शकत नाही. केरळ, गोवा ही राज्ये आपल्या शेजारी आहेत. माझ्याकडे त्या राज्यातील पर्यटन विषयक बाबींची सांख्यिकीय माहिती आहे. बाहेरची राज्ये आपल्या राज्याच्या तुलनेत 4500-5000 कोटी रुपये पर्यटनाच्या माध्यमातून कमवतात. बाहेरच्या राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यात पाच पट अधिक पर्यटक येतात. परंतु आपल्याकडे पर्यटन विषयक सुविधा नसल्यामुळे ते आपल्या राज्यातून अन्य राज्यात निघून जातात. यावर कोठे तरी गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

महोदया, 11 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये सँक्शन अँड अलॉकेशन ऑफ फंडमध्ये महाराष्ट्र आणि केरळ कोठे आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. 2008 साली आपल्या राज्याचे 7 प्रोजेक्ट होते. त्यासाठी 22 कोटी रुपये....

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, आपली वेळ संपल्यामुळे कृपया आता आपण भाषणाचा समारोप करावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : महोदया, अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मी ज्या बाबी पोटतिडिकीने मांडल्या त्या बाबत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा, अशी विनंती करतो. तसेच इम्प्लांटच्या बाबतीत माननीय मंत्र्यांकडून माहिती मिळाली तर बरे होईल.

श्री.सुरेश शेट्टी : महोदया, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याला मी एक मिनिटात उत्तर देतो. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या इम्प्लांटच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, राज्य सरकार स्वत:हून खरेदी करणार नाही. पूर्वी स्टेन्ट खरेदीमध्ये गडबड होत होती. एका स्टेन्टची किंमत 1.40 लाख, 1.60 लाख, 1.70 लाख, 2.50 लाख रुपयांपर्यंत होती. आम्ही सर्वांसोबत चर्चा करुन स्टेन्ट खरेदीचे टेंडर काढले. त्यामुळे 60 हजार रुपये किंमतीचे स्टेन्ट आता 23,300 रुपयांत मिळायला लागले. इतक्या कमी किंमतीत खरेदी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. कोबाल्ट स्टेन्ट आता 9 हजार रुपयांत खरेदी करायला लागलो आहोत. आम्ही प्रयत्न केला की, जे कॉन्झुमेबल्स ऑर्थोपेडीक्समध्ये लागतात त्यासाठी टेंडर कॉल करावे. जे एम्पॅनल्ड हॉस्पीटल आहेत त्यांना कॉन्झुमेबल्स कमी दरात मिळावे. सरकार स्वत:हून कोणतीही खरेदी करीत नाही. परंतु सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांना प्रोक्युअरमेंट प्रोसेसमध्ये काही शंका असेल तर त्यांची प्रोक्युअरमेंट कमिटीमध्ये सदस्य म्हणून मी नेमणूक करतो. आम्ही प्रोक्युअरमेंट प्रोसेस अतिशय पारदर्शक केली आहे. केंद्र सरकारचे कॉन्झुमेबल आणि औषधांचे जे दर आहेत त्या दरांपेक्षा आपल्या राज्याचे दर कमी आहेत. मी सन्माननीय सदस्यांना त्या समितीवर सदस्य म्हणून घेतो. पुढील वेळी टेंडर येतील त्यावेळी त्यांनी स्वत: तेथे बसून निर्णय घ्यावा. मला वाटते महाराष्ट्रात अशा प्रकारची घोषणा करणारा मी पहिला मंत्री असेल. संपूर्ण खरेदी व्यवहारात पारदर्शकता आणण्याचा मी प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्यांना त्या समितीवर घेतले तर मला काय फरक पडणार आहे ?

**तालिका सभापती** : माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी या विषयी चांगल्या प्रकारची तयारी दाखविली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसंदर्भात सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. परंतु या अधिवेशनात आपल्यावर वेळेची मर्यादा आहे. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात सकारात्मक उत्तर देऊन एक पाऊल पुढे टाकले व प्रोक्युअरमेंट कमिटीवर

..3..



**तालिका सभापती....**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांचा अंतर्भाव केला आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबाबत दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये विविध प्रश्न आहेत. माझी सूचना आहे की, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची लवकरात बैठक घेतली तर या योजनेचा जनतेला बराचसा फायदा होऊ शकेल.

आता सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

-----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन 2014-15 या वर्षाच्या अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदया,राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना शासनाने गोरगरीब जनता, कष्टकरी आणि शेतकरी बांधवांच्या हिताचा प्राधान्याने विचार केला व त्यांच्या कल्याणकारी योजनांच्या बाबतीत पुरेशी आर्थिक तरतूद करुन राज्यातील जनतेला दिलासा देण्याचे काम केले आहे.

महोदया, राज्यात दिनांक 1 फेब्रुवारी, 2014 पासून अन्न सुरक्षा योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ राज्यातील गोरगरीब जनतेला होणार आहे. ही योजना सुरु करण्यात माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्र पवार साहेबांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच युपीए सरकारला ही महत्त्वाकांक्षी आणि जगात अद्वितीय असलेली योजना राबविता आली. अन्न सुरक्षा योजनेंतर्गत 8 कोटी 77 लाख लाभार्थ्यांपैकी 1 कोटी 77 लाख लाभार्थ्यांचे दायित्व राज्य सरकार उचलणार आहे. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदचंद्र पवार साहेबांच्या दूरदृष्टीमुळेच हे शक्य झाले आहे. कारण त्यांच्या प्रयत्नांमुळेच देशात कृषी उत्पादनात वाढ झाली आहे. यापूर्वीचे कृषी उत्पादन आणि परिणाम पाहिल्यास 11 व्या पंचवार्षिक योजनेनुसार अन्नधान्याचे एकूण उत्पादन 75 द.ल.मे.ट. पेक्षा जास्त होते. 2009-2010 व 2010-2011 या दोन्ही वर्षी राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली. 2011-2012 या आर्थिक वर्षात देशाचे अन्नधान्य उत्पादन 259.32 द.ल.मे.ट. इतके झाले असून, सन 2012-13 मध्ये अन्नधान्य उत्पादनात सर्वाधिक वाढ झाली आहे. राज्यात अवकाळी व अनियमित पावसाची परिस्थिती असतानाही राज्याला 255.36 द.ल.मे.ट. अन्नधान्याचे उत्पादन करण्यास राज्य सरकारला यश प्राप्त झाले आहे. सन 2011 या वर्षात गव्हाचे उत्पादन 92.64 द.ल.मे.ट. झाल्याची नोंद झाली असून, 2012-13 मध्ये 94.88 द.ल.मे.ट. गव्हाचे उत्पादन करण्यास शेतकऱ्यांना आकर्षित करण्यात आले आहे.

महोदया, आपल्याला विदितच आहे की, माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांनी अन्नधान्य उत्पादनाच्या दृष्टीने घेतलेले निर्णय आणि त्यामुळे देशाच्या कृषी क्षेत्राच्या उत्पादनात झालेली वाढ विचारात घेऊन देशाचे माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांचे लोकसभेमध्ये जाहीर कौतुक केले.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे....

महोदया, शासनाने तंत्रशास्त्र व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी कोकणातील रायगड जिल्ह्यातील महाड येथे तंत्रशास्त्र विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री आणि उच्च तंत्रशिक्षण मंत्र्यांचे आभार मानतो.

महोदया, स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी आणि मुलांइतकाच मुलींचा जन्मदर वाढविणे, शिक्षण व आरोग्य यामध्ये सुधारणा, बालविवाह रोखणे व मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुकन्या योजना सुरु करुन राज्य सरकारने मुलींच्या भविष्याचा विचार केला आहे. 2014-15 या वर्षासाठी सुकन्या योजनेसाठी 187 कोटी 71 लाख रुपये निधी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

महोदया, लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला तसेच बालकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने मनोधैर्य योजना सुरु केली आहे. सरकारने या योजनेसाठी 2014-15 या वर्षात 15 कोटी 10 लाख रुपयांची तरतूद केली आहे. तसेच उपरोक्त प्रकरणी त्वरित निर्णय घेण्यासाठी थेट जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकार देण्यात आले आहेत. पीडित महिलांना तत्काळ अर्थसहाय्य होण्याच्या दृष्टीने आवश्यक ते प्रयत्न केल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री आणि महिला व बालविकास मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांचे आभार मानतो.

महोदया, देशभरातून केंद्र सरकारकडे सादर झालेल्या औद्योगिक प्रस्तावांमध्ये महाराष्ट्र राज्य हे सर्वाधिक प्रस्ताव असणारे आणि सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारे राज्य आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

आपण उद्योगासाठी, चांगले चलन मिळण्यासाठी कराड, अमरावती, जळगाव, अकोला, सोलापूर व शिर्डी इत्यादी ठिकाणी विमानतळे विकसित करीत आहात. निश्चितपणे यामुळे उद्योगधंदे, कारखाने यामध्ये चांगला रोजगार निर्माण होईल. तसेच पर्यटनालाही चांगली चालना मिळेल. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईत देशातील सर्वांत मोठे विमानतळ होत आहे. त्या माध्यमाने चांगले पर्यटन विकसित होईल असा मला विश्वास वाटतो. शासनाने भारतातील पहिला 20 कि.मी. लांबीचा मोनो रेल प्रकल्प राबविला असून सर्वसामान्य जनता निश्चितच यामुळे फार मोठा लाभ घेत आहे. मी शासनाचे यासाठी मनापासून अभिनंदन करतो. तथापि, ठाण्यालासुध्दा या प्रकल्पाने जोडून घेतल्यास निश्चितपणे ठाणेकरांनाही फार मोठा लाभ होईल. कारण ठाण्यातील बरेच लोक मुंबईला नोकरीसाठी सातत्याने येत असतात. निश्चितपणे या सुविधांचा फायदा जास्त लोकांना त्या माध्यमातून घेता येईल.

सभापती महोदया, राज्यात कायदा व सुव्यवस्था आणि शांततेचे वातावरण राहण्यासाठी गृहरक्षक दल व नागरी संरक्षण दल यांमध्ये शासनाने 5 वर्षांत 61,494 पोलिसांची पदे निर्माण करण्याचा व त्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात 12,379 पदे निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. सणासुदीच्या व संवदेनशील काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी गृहरक्षक दल व नागरी संरक्षण दल यांमध्ये स्वयंसेवक काम करतात. स्वयंसेवकांच्या उपस्थिती भत्त्यात दुपटीने वाढ केली आहे, याबद्दल मी शासनाचे आभार मानतो.

सभापती महोदया, राष्ट्रपती पदक प्राप्त पोलिसांना एसटी बस सेवा प्रवास व रेल्वे प्रवास मोफत करण्याच्या दृष्टीनेही कार्यवाही व्हावी अशी मी शासनाला विनंती करतो. कारण या लोकांचेही फार मोठे योगदान त्यांच्या सेवेच्या वेळी होते. नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी राज्याने घेतलेले संवेदनशील निर्णय हे देखील प्रशंसनीय आहेत. मी फार खोलात जाणार नाही. कारण सर्वांनी या संदर्भात आपली मते मांडली आहेत. शासनाने केलेल्या आर्थिक सहाय्याबद्दल मी मनापासून आभार मानतो.

सभापती महोदया, सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासनाने राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या संदर्भात 690 कोटी रूपयांच्या वर तरतूद केली आहे. रूग्णांच्या सेवेसाठी 937 रूग्णवाहिका

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

उपलब्ध करून दिल्या आहेत. सातही दिवस 24 तास तेथे डॉक्टर उपलब्ध राहणार आहेत, असे राज्य शासनाने म्हटले आहे. ही सुविधा उपलब्ध करू शकलो तर जीव निश्चितपणे वाचविता येईल. या योजनेच्या माध्यमातून एक चांगली सुविधा लोकांसाठी उपलब्ध करू शकू, असा मला विश्वास वाटतो. राज्य शासनाने फार महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे राज्य शासनाचे सर्वांनीच एकत्रपणे अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदया, एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका सेवानिवृत्त झाल्यास अथवा मृत झाल्यास त्यांच्या वारसांना एक लाख रूपये तर मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस सेवानिवृत्त झाल्यास अथवा मृत झाल्यास त्यांच्या वारसांना 75 हजार रूपये अशा आयुर्विमा मंडळाच्या योजनेंतर्गत एक रकमी लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मी त्यासाठी राज्य शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. गहू, तांदूळ, डाळ, धने, मिरची, नारळ, सोलापुरी चादरी, मनुके, बेदाणे या वस्तूंवर नेहमीच कर माफी राहते. ती करमाफी पुन्हा देऊन शासनाने कर वसुलीमध्ये मदत केली आहे त्यासाठी राज्य शासनाचे कौतुकच केले पाहिजे. अन्नधान्य वस्तुंना कर सवलत देऊन राज्यातील जनतेच्या हिताचा शासनाने प्रामुख्याने विचार करून त्याचे प्रतिबिंब अंतरिम अर्थसंकल्पात उमटविले आहे. तसेच वीज दरात सवलत देऊन कृषी व जलसिंचनासाठी तरतुदी केल्या आहेत. अंतरिम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शासनाने राज्यातील गोरगरीब जनतेचा विचार करून त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबवून आर्थिक तरतूद केली आहे. मी यासाठी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांचे आभार मानतो. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. धन्यवाद !

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने काही विचार मांडू इच्छितो.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मागच्या डिसेंबर महिन्याच्या अधिवेशनात शालेय शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी आम्हाला खूप चांगल्या प्रकारचा दिलासा दिला म्हणून मी त्यांचे सुरूवातीलाच आभार व्यक्त करतो. महाराष्ट्रातील कधी नव्हे तेवढ्या म्हणजे जवळजवळ प्राथमिक विभागातील 4571 तुकड्या आणि 5221 शिक्षकांना 93 कोटी 97 लाख रूपये माननीय मंत्र्यांनी मंजूर केले. मागच्या अधिवेशनात 178 तुकड्यांना 8 कोटी 55 लाख रूपये दिले. ती अत्यंत चांगल्या प्रकारची गोष्ट घडली. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्या नंतरही अनेक माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांतील तुकड्या अनुदानास पात्र असल्याचे घोषित केले. मात्र त्या तुकड्यांना अनुदान मिळाले नाही. आताच्या बजेटमध्ये त्यांनी काय व्यवस्था केली आहे हे मला माहीत नाही. शासनाने या तुकड्यांना सुध्दा शालेय शिक्षण विभागाच्या मंजुरी आदेशानुसार पात्र घोषित केले आहे. त्यांच्या अनुदानाच्या संदर्भातही व्यवस्था होण्याची गरज आहे. माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास मी एक बाब आणू इच्छितो. शालेय शिक्षण विभागातील 511 हे लेखाशीर्ष उच्च माध्यमिक शाळांच्या वाढीव तुकड्यांचे आहे. या लेखाशीर्षाखाली शिक्षण विभागाकडून जेवढी मागणी व्हावयास पाहिजे होती तेवढी होऊ शकली नाही. चुकीच्या पध्दतीने मागणी करण्यात आली. त्यामुळे या लेखाशीर्षाखाली जवळजवळ 60 कोटी रूपये शासनाकडून त्यांना कमी देण्यात आले. परिणामत: राज्यातील 1044 शिक्षकांना आणि 100 पेक्षा अधिक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 7 महिन्यांपासून पगार मिळाला नाही.

सभापती महोदय, आपण पुरवणी मागण्या मंजूर केलेल्या नाहीत. शालेय शिक्षण विभागाचा एक प्रस्ताव आपल्याकडे आहे. आपल्याला पुनर्विनियोजनातून ही रक्कम देता येईल. शिक्षक 8 महिन्यांपासून पगारापासून वंचित आहेत. त्यांना हा पगार देता येईल. माननीय मंत्र्यांनी त्या दृष्टीने सहकार्य केले तर शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न मिटू शकेल.

महोदय, शालेय शिक्षण विभागात नगरपालिका, महानगरपालिका यांच्या माध्यमिक शाळा आहेत. नगरपालिकांच्या प्राथमिक शाळांना वित्त विभागाने परवानगी दिली. त्यांना सहावा वेतन

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आयोग लागू झाला. आमच्या माध्यमिक शाळांना अद्यापही वित्त विभागाने परवानगी दिलेली नाही. शालेय शिक्षण विभागाने किंवा नगरविकास विभागाने या संदर्भात कोणत्याही प्रकारचा सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा आदेश काढलेला नाही.

सभापती महोदय, मी एक गंमत सांगणार आहे. राज्यातील 7 हजार माध्यमिक शिक्षकांना अद्यापही सहावा वेतन आयोग लागू केल्याचा शासन निर्णय काढलेला नाही. आज राज्यात परिस्थिती अशी आहे की, फक्त ठाणे जिल्हा सोडला तर शासनाचा आदेश नसताना, वित्त विभागाची परवानगी नसताना अन्य जिल्ह्यांतील सर्व नगरपालिकांच्या आणि नगरपरिषदांच्या माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षकांना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गेल्या 6 वर्षांपासून सहावा वेतन आयोगानुसार वेतन मिळते. मग एकट्या ठाणे जिल्ह्याला का देत नाही ? मग ज्यांनी ते दिले आहे त्यांना वित्त विभागाची परवानगी आहे का ? ज्यांनी दिले नाही त्यांच्यावर वित्त विभागाकडून कारवाई होणे अपेक्षित आहे किंवा ज्यांनी परवानगी असतानाही दिले नाही त्यांच्यावर तरी कारवाई होणे अपेक्षित आहे. संपूर्ण प्रकार विचारात घेता आपण या प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. अर्थसंकल्पात व्यवसाय शिक्षणाला अधिक महत्त्व देण्याचा प्रयत्न केला आहे. व्यवसाय शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेवटी जी मुले शिकू शकत नाहीत, ज्यांच्याकडे गुणवत्ता नाही किंवा पुढील उच्च शिक्षण घेण्याची ऐपत नाही ते विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे वळतात.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

व्यावसायिक शिक्षणाच्या संदर्भात औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत किंवा अन्य काही व्यावसायिक संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळते. या राज्यामध्ये विनाअनुदानित तत्त्वावर सुरु असलेल्या अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. अद्यापही शासनाच्या वित्त विभागाने व्यावसायिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याच्या संदर्भात, त्यांना आर्थिक मदत करण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. ती होण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात शासनाचे नक्की धोरण काय आहे, ते आम्हाला या निमित्ताने कळावे.

सभापती महोदय, या राज्यातील महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाचे धोरण खूप सकारात्मक आहे. त्या सकारात्मक दृष्टीकोनामुळे आणि केंद्र सरकारच्या निर्णयामुळे शासकीय सेवेतील किंवा अन्य अनुदानित संस्थेमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना 90 दिवसांऐवजी 180 दिवसांपर्यंत प्रसूती रजा दिलेली आहे. त्याचा लाभही महिला भगिनींना मिळतो आहे. ज्या महिला मूल दत्तक घेतात त्यांना अशा प्रकारची सवलत, जोपर्यंत 90 दिवसांची रजा होती, तोपर्यंत मिळालेली आहे. मी या प्रकरणात सातत्याने प्रयत्न करीत आहे, शासनाला विनंती करीत आहे. ज्या महिला मूल दत्तक घेतात त्यांना मुलाचे संगोपन करण्यासाठी प्रसूती रजेप्रमाणे 6 महिन्यांची रजा मिळणे अपेक्षित आहे. मला विभागाने दिलेल्या उत्तरानुसार शासनाने असे म्हटलेले आहे की, अद्याप वित्त विभागाकडून परवानगी मिळत नाही. वित्त विभागाचेही पत्र मला आलेले आहे. वित्त विभागाने अशा प्रकारचा कोणताही निर्णय अद्याप घेतलेला नाही, असे कळविलेले आहे. हा अत्यंत महत्त्वाचा आणि महिला भगिनींचा खूप जिव्हाळ्याचा विषय आहे. ज्याप्रमाणे प्रसूती रजा 180 दिवस केलेली आहे, त्याचप्रमाणे दत्तक मूल घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनाही ही रजा देय करावी. पूर्वीच्या आदेशात हे नमूद केले होते. वित्त विभागाने मान्यता देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वेळ अपुरा असल्यामुळे मी माझे भाषण येथे पूर्ण करतो. मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या पुरोगामी महाराष्ट्राचे सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि या राज्याचे अर्थमंत्री, सभागृहाचे नेते श्री.अजित दादा पवार आणि माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांचे अभिनंदन करण्यासाठी, जो अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे, त्याचे स्वागत करण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर आणि मंत्री महोदयांच्या भाषणावर नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की, मागील दशकातील दरडोई उत्पन्नात भरीव वाढ झालेली आहे. 24035 रुपयांवरुन 1 लाख 593 रुपयांपर्यंत दरडोई उत्पन्नात वाढ झालेली आहे. खऱ्या अर्थाने या देशामध्ये प्रगती करणारे प्रथम क्रमांकाचे महाराष्ट्र राज्य आहे, हे आपल्याला दरडोई उत्पन्नाची आकडेवारी पाहिल्यानंतर लक्षात येईल. त्यासाठी मी या शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न सिंचनाचा असतो. आज अर्थ मंत्री महोदयांनी या सिंचनाच्या प्रश्नामध्ये लक्ष घातले आणि जवळ जवळ 8215 कोटी 70 लक्ष रुपयांची भरघोस तरतूद सिंचनासाठी केलेली आहे. सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत सांगायचे झाले तर या वर्षात सुमारे 60 प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

सभापती महोदय, सिंचनाचे काही प्रकल्प प्रलंबित आहेत. म्हैसाळ, टेंभू, ताकारी या प्रकल्पांसाठी तरतूद केली पाहिजे. मागील अधिवेशनात राज्यात पडलेल्या दुष्काळाबाबत चर्चा झाली होती. या चर्चेत भाग घेत असताना पश्चिम महाराष्ट्रासाठी जो निधी देण्यात आला, त्याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही टीकाही केली होती. परंतु, पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागात अक्षरश: जनावरे तडफडून मरत होती. एवढेच नाही तर माणसेही मरत होती. तेथील लोकांना 100 कि.मी.अंतरावरुन पाणी आणावे लागत होते. नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या सामान्य माणसांच्या दु:खावर फुंकर घालण्यासाठी शासनाने काही निधी दिला होता. परंतु, पश्चिम महाराष्ट्राला का निधी दिला, अशा प्रकारे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सरकारवर टीका केली, सरकारचा तिरस्कार केला होता. पाण्यासाठी होरपळणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील जनतेला वाचविण्यासाठी पैसे दिल्याबद्दल त्यांचा आक्षेप असेल, ते विरोध करीत असतील तर यापुढे त्यांना अशा प्रकारचा विरोध करण्याची संधी मिळू नये म्हणून कवठेमहांकाळ, सांगोला, यासारख्या कायम दुष्काळी भागातील ताकारी, टेंभू, म्हैसाळ या प्रकल्पांना जास्तीत जास्त निधी द्यावा, अशी माझी विनंती आहे.

...3....

श्री.रमेश शेंडगे......

सभापती महोदय, सिंचनासाठी निधी देत असताना यापूर्वी आपण जिल्हा हा घटक मानला, त्यानंतर तालुका हा घटक मानला. आता जिल्हा परिषदेचे सर्कल हा घटक मानला जावा व त्यानुसार निधीचे वाटप करावे, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. देशात किंबहुना जगातील हा पहिलाच निर्णय आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. राज्य शासनाने अन्न सुरक्षा योजना लागू केली आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात अन्न सुरक्षा योजना राबविण्याच्या निर्णयाचे आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. हा धाडसी निर्णय घेतल्याबद्दल राज्यकर्त्यांचे निश्चितच अभिनंदन केले पाहिजे. 257 द.ल.मे.टन अन्नधान्य उत्पादन या देशात झाले आणि त्या माध्यमातून 2 लक्ष 33 हजार कोटी रुपयांचे परकीय चलन या देशाला मिळाले. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी युपीए सरकारच्या माध्यमातून माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग आणि युपीएच्या अध्यक्षा सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या धोरणातून जे काम केले, त्यामधून हे उत्पादन झाले आहे. देशातील 130 कोटी जनतेला अन्न देऊन जगातील 18 देशांना अन्नधान्याची निर्यात भारताने केली आहे. हिंम्मत दाखविली, शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविल्यामुळे हे शक्य झाले आणि त्यासाठी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार, माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग आणि युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांचे मी अभिनंदन करतो. या योजनेबद्दल खऱ्या अर्थाने अभिनंदन आणि कौतुक करावयाचे सोडून दारिद्र्य रेषेखालील लोकांना कशासाठी अन्न सुरक्षा देत आहात, अशा प्रकारचे वक्तव्य विरोधी बाकावरुन केले गेले. दरडोई उत्पन्नाची वाढलेली आकडेवारी बघितली आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांना कशाकरिता ही योजना दिली, अशा प्रकारचे वक्तव्य केले गेले. हे राज्य, हे शासन गोरगरीब जनतेसाठी, शेतक-यांसाठी, बहुजनांसाठी, अल्पसंख्यांकांसाठी, मागासवर्गीयांसाठी, दलित बांधवांसाठी चालविले जाते. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने पुढे जाणारे हे राज्य आहे. हे सरकार गोरगरीब जनतेसाठीच अर्थसंकल्प सादर करणार आहे.

यानंतर श्री.मारोती शिगम........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. रोझेकर 18:40

श्री. रमेश शेंडगे...

हा अर्थसंकल्प श्रीमंत घटकासाठी नाही तर शेतकरी, कामगार, गोरगरीब जनतेसाठी हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, आदिवासी, मागासवर्गीय, भटक्या व विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी या अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. 5 लाख विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. या बाबतीत मी शासनाला एक विनंती करु इच्छितो. या शिष्यवृत्तीचा फायदा देत असताना भटक्या व विमुक्त जातीसाठी क्रिमिलेअरची मर्यादा घातलेली आहे. ही क्रिमिलेअरची मर्यादा 4.5 लाख रुपयावरुन 6 लाख रुपयापर्यंत केलेली आहे. 6 लाख रु.पर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-या लोकांना सवलती दिल्या जातात. 6 लाख रु. मर्यादेपर्यंतचा जी.आर. निघालेला असून देखील शिक्षण संस्था 4.5 लाख रु.च्या जुन्या जी.आर.प्रमाणे काम करीत आहेत. त्यामुळे 6 लाख रुपये उत्पन्न असणा-या लोकांना सवलती दिल्या जात नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, 6 लाख रुपयापर्यंत उत्पन्न असणाऱ्या भटक्या आणि विमुक्त जातीच्या लोकांना सवलती देण्यात याव्यात.

सभापती महोदया, वीज दरामध्ये दिलेली सवलत हा अतिशय कौतुकास्पद निर्णय आहे. 5 हजार कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प का सादर केला अशी विचारणा विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य करीत आहेत. वीज दरामध्ये दिलेल्या सवलतीसाठी शासनाने अर्थसंकल्पामध्ये 9 हजार कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी केवळ 5 हजार कोटी रुपयाची तूट पाहू नये. या राज्यातील गोरगरीब जनतेसाठी 3 लाख कोटी रुपयाचे कर्ज काढावे लागले तरी शासन हिंमत हारणार नाही. या राज्यातील गोरगरीब जनतेसाठी कोणत्याही प्रकारच्या योजना करण्याची गरज भासली तरी त्या योजना सरकार करील असे या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सरकारने दाखवून दिले आहे. विकासाच्या अनेक योजना राज्यामध्ये सुरु आहेत. धार्मिक स्थळांच्या विकासाच्या, पर्यटन स्थळांच्या विकासाच्या योजना राज्यामध्ये आपण राबवित आहोत. या निमित्ताने मी एका गोष्टीचा उल्लेख करु इच्छितो की, पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. अहमदनगर जिल्हयातील चौंडी या गावी त्यांचे स्मारक करण्यासाठी स्मारकाचा आणि चौंडी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

गावाच्या विकासाचा 42 कोटी रुपयाचा आराखडा तयार केलेला आहे. परंतु या आराखडया नुसार अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही. फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांची कास धरुन वाटचाल करीत असताना पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी आपण तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये अन्नधान्य आणि अन्य जीवनोपयोगी वस्तूवर कोणताही कर लावलेला नाही. त्यामुळे ज्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळणार नाही अशा बीपीएलच्या वरील लोकांना जीवनोपयोगी वस्तूवर कर न लावल्यामुळे योग्य दरामध्ये चांगल्या प्रकारचे अन्नधान्य मिळणार आहे. मदरशांचे आधुनिकीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. नैसर्गिक आपत्ती आणि दुष्काळी परिस्थितीमध्ये भरीव तरतूद करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अंगणवाडी सेविकांना निवृत्तीनंतर 1 लाख रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. वीज दर सवलतीसाठी 9 हजार कोटी रुपयांची, मागासवर्गीयांच्या घरकुल योजनेसाठी 333 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. रमाई योजनेसाठी देखील भरीव तरतूद करण्यात येते. या निमित्ताने मी शासनाला विनंती करु इच्छितो की, काही जिल्ह्यामध्ये रमाई योजनेचा निधी पडून आहे. त्या योजनेमध्ये लाभार्थी मिळत नाहीत असे सांगितले जाते. आमच्या सांगली जिल्ह्यामध्ये रमाई योजनेचा 20 कोटी रुपयाचा निधी पडून आहे. मागासवर्गीय विभागाचे काही एपीएलचे घटक त्या योजनेमध्ये समाविष्ट होत असतील तर त्यांना देखील या योजनेचा लाभ द्यावा आणि पडून राहिलेला निधी समर्पित न करता खर्च करावा. हा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर राज्यातील जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे आणि विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये नैराश्याची भावना निर्माण झालेली आहे. त्यामुळे येणाऱ्या पुढील काळात विरोधी पक्षातील मंडळी ही आमच्या समोरच बसणार आहेत आणि आम्ही इकडे सत्ताधारी बाकावर बसणार आहोत एवढे बोलून आणि अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

...3..



MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. रोझेकर 18:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2014-2015च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर बोलणे अर्थशून्य आहे. तरी देखील या अर्थसंकल्पावर बोलले नाही तर विविध क्षेत्रात जी काही वस्तुस्थिती आहे ती सरकारच्या निदर्शनास येणार नाही. वित्त विषयक विवरणामध्ये जमाखर्चाचे विवरण आहे. त्या विवरणपत्राचा अभ्यास केला तर परिस्थितीचे गांभीर्य आपल्या लक्षात येईल. कोणकोणत्या गोष्टीमध्ये वाढ आणि कोणकोणत्या गोष्टीमध्ये घट झाली हे पाहिले तर मुद्रांक आणि नोंदणी फी, विक्री कर, वाहनांवरील कर, माल आणि प्रवासी कर या गोष्टींमध्ये वाढ झालेली दिसते. गृहनिर्माणाच्या जमेमध्ये मात्र घट झालेली दिसते. वेतनावरील खर्च कमी झाल्यामुळे ही घट झालेली दिसते. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी उल्लेख केल्याप्रमाणे 1495 कोटी रुपये जमा होणे अपेक्षित असताना केवळ 64 कोटी रुपये जमा झाले आणि त्यामुळे 894 कोटी रुपयाची घट झालेली आहे. आपल्या राज्यात सुशासन आहे तर मग ही घट का झाली याची चर्चा आपण कुठे करीत नाही.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी दरडोई उत्पन्नाचा उल्लेख केला. खरे तर महागाई निर्देशांकाच्या तुलनेत दरडोई उत्पन्न किती वाढले हे सांगणे अपेक्षित होते. दरडोई उत्पन्न वाढलेले आहे असे सांगताना राज्यातील जनतेला काही कळत नाही असे सरकारने गृहीत धरलेले आहे काय ? पूर्वी आफ्रिकेमधील कृष्णवर्णीय लोकांना कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही असे गृहीत धरुन त्या देशातील लोक त्यांच्याशी वागत होते. त्या प्रमाणे विरोधी पक्ष हा गैरलागू आहे, राज्याशी संबंध नसलेली भाषणे ते करतात अशा प्रकारची भावना सत्ताधारी पक्षातील सदस्यांची असेल तर ती चुकीची आहे. आर्थिक शिस्तीचा विचार करीत असताना 29 बाबीवरील खर्चामध्ये घट झाल्याचे दिसून आलेले आहे. पीक संवर्धन खर्चामध्ये 494 कोटी रुपये, मोठे आणि मध्यम प्रकल्पाच्या खर्चामध्ये 60 कोटी रुपये, ग्रामीण रोजगार योजनेच्या खर्चामध्ये 926 कोटी रुपये खर्च कमी झालेला आहे. हा खर्च कमी का झाला ? तर लोकांपर्यंत त्या योजनांचा लाभ पोहोचलेला नसल्यामुळे हा खर्च कमी झालेला आहे. प्रत्येक ठिकाणी आपणास सुप्रशासनाचा अभाव दिसून येत आहे. मानव विकास निर्देशांक समितीचा अहवाल, कस्तुरीरंगन समितीचा अहवाल, विजय केळकर समितीचा अहवाल आणि शिक्षणाच्या बाबतीत असर या एनजीओने केलेला अहवाल,

..4..



डॉ. नीलम गो-हे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या अहवालांच्या बाबतीत शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. केन्द्रीय अर्थसंकल्पामध्ये नेहमी मानव विकास निर्देशांकाचा उल्लेख करण्यात येतो. राज्याच्या ग्रामीण विकास विभागाच्या मांडणीमध्ये देखील याचा उल्लेख असतो. या मानव विकास निर्देशांकानुसार आपण कोणकोणत्या योजना केलेल्या आहेत हे समजणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये मानव विकास निर्देशांक हा केवळ कुपोषणाच्याच संदर्भात आहे अशातला भाग नाही. तर शिक्षण, आरोग्य, आयुर्मान इत्यादी विषयांच्या बाबतीत देखील हा निर्देशांक लागू होतो. सरकारने स्वत: तयार केलेल्या अहवालाच्या बाबतीत कोणताही संदर्भ न देता हा अर्थसंकल्प मांडलेला असल्यामुळे माझ्या मनात बरेचशे प्रश्न निर्माण झ ालेले आहेत. सरकारने निर्माण केलेल्या स्वस्त घरांची आकडेवारी दिलेली आहे. किती प्रमाणात स्वस्त घरांची आवश्यकता होती आणि त्या तुलनेत किती स्वस्त घरे बांधण्यात आली याचा उल्लेख करणे आवश्यक होते. इंदिरा आवास योजना, राजीव आवास योजना या योजनांच्या माध्यमातून घरकुलांच्या योजना राबविल्या जातात. आज शहरातील झोपडपट्टीमध्ये राहाणाऱ्या माणसांना घर घेताना अनेक अडचणी भेडसावतात. महिन्याभरापूर्वी स्वस्तघरे मिळणार म्हणून हजारो लोकांनी मंत्रालयामध्ये येऊन रांगा लावल्या. आमच्या घरी काम करणाऱ्या महिला आम्हाला सांगत होत्या की, ताई, तुम्ही आमदार असताना इतक्या स्वस्त किंमतीमध्ये घरे मिळतात हे आम्हाला का सांगितले नाही ? लोकांना सरकारची विश्वासार्हता वाटेनाशी झालेली आहे. कुणाच्या तरी सांगण्यावरुन हजारो महिला आणि पुरुषांनी हातामध्ये अर्ज घेऊन मंत्रालयामध्ये रांगा लावल्या होत्या. त्यामध्ये गरीब, दलित, निराधार स्त्रिया होत्या.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

अनेक पोलीस कॉन्स्टेबल, शासकीय कर्मचारी आम्हाला विचारत होते की, या योजनेचा फायदा गरीब लोकांना मिळत असेल तर हिरानंदानी यांच्या पवई योजनेत आम्हाला घर मिळेल का? लोकांची ही अगतिकता, विफलता याची माणुसकी म्हणून शासनाला कदर ठेवावीशी वाटली नाही. त्या संदर्भात एकाही शब्दाचे स्पष्टीकरण या सभागृहात कोणत्या ना कोणत्या माध्यमातून केले गेले नाही. या अधिवेशन काळात लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वये सूचना, प्रश्नोत्तरे इत्यादी आयुधांचा वापर करता येत नसल्यामुळे जनतेची फसवणूक होते त्याबाबतचे उत्तर मागण्याची जबाबदारी फक्त विरोधी पक्षाचीच आहे, विरोधी पक्षाला बोलायला जर दिले नाही तर मग सरकारची भूमिका स्पष्ट व्हायला नको का?

सभापती महोदय, अंगणवाडी सेविकांनी अनेक दिवस संघर्ष केला. 45 ते 50 दिवस हजारो महिला आझाद मैदानात उघड्यावर उपोषणाला बसल्या होत्या. त्यांचे म्हणणे होते की, आमच्याबरोबर काही महिला रात्रभर राहिल्या तर त्यांना वस्तुस्थिती कळेल. किती हाल त्या सहन करीत होत्या. शासनाने त्यांना 1000 रुपये वाढवून दिले, ही चांगली बाब आहे. परंतु राज्य सरकारने स्वत:चा वाटा घालण्याच्या संदर्भात भूमिका घेतली पाहिजे. माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड या व्यक्ती म्हणून सक्षम आहेत. त्यांच्या विभागाचे स्थान दुय्यम आहे. काल महिला धोरणाबद्दल शासनाने स्वत:ची पाठ थोपटून घेतली. महिला धोरणाच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाने स्वत:च्या बजेटमध्ये महिलांच्या हिताच्या दृष्टीने किती योजना राबविल्या, किती योजनांमुळे महिलांच्या हितावर दुष्परिणाम होतो याचा स्टेटस अहवाल बनवावयास हवा होता. त्याला जेंडर रिस्पॉन्सीव्ह बजेट म्हणतात.

सभापती महोदय, स्व.विलासराव देशमुख या राज्याचे मुख्यमंत्री होते तेव्हा जे महिला धोरण जाहीर केले गेले त्या महिला धोरणात कमिटमेंट होती. त्याला 10 वर्षे होऊन गेली आहेत. गेल्या वर्षी 8 मार्च रोजी सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी महिला धोरणाचा स्वीकार केला आणि सांगितले की, आम्ही सोबत आहोत. त्यानंतर आम्ही महिला व बालविकास मंत्र्यांना सुचविले की, प्रत्येक विभागाने हा अभ्यास करणे गरजेचे आहे. ते काही अद्याप झालेले नाही.

सभापती महोदय, सुकन्या आणि मनोधैर्य योजना महिला व बालविकास विभागाच्या आहेत. एखादी अन्यायाची घटना घडली की, आम्ही फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करणार आहोत अशी

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

शासनाकडून घोषणा केली जाते. प्रत्यक्षात त्यासाठी किती तरतूद केली, किती फास्ट ट्रॅक कोर्ट अस्तित्वात आली आहेत? ज्या ज्या शहरात 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या आहे तेथे एक कौटुंबिक न्यायालय असेल हे आम्ही 2008 पासून ऐकत आहोत. 16 कौटुंबिक न्यायालयाची घोषणा झाली. त्याबाबत काय प्रगती झाली? माझ्या माहितीप्रमाणे 4 ते 5 ठिकाणी कौटुंबिक न्यायालये सुरु झाली असून इतर ठिकाणी ती प्रतिक्षेत आहेत.

सभापती महोदय, सुकन्या आणि मनोधैर्य या दोन्ही योजना सुरु करण्यापूर्वी यासाठी किती निधी लागणार याचे शासनाने असेसमेंट करावयास हवे होते. त्यानंतर अन्याय, अत्याचार पीडित भगिनी आहेत त्याचे पॅरामीटर निर्भया केसनंतर निश्चित केले. त्यानंतर कशाप्रकारे इतर केसेसचा अंतर्भाव होऊ शकतो याचा विचार करुन त्यासाठी तरतूद करणे आवश्यक होते. महिला सक्षमीकरणाची जबाबदारी फक्त महिला व बालविकास विभागाची नाही. विधी व न्याय, गृह, पाणी पुरवठा विभागांनी प्रत्येक विषयामध्ये महिला विकासाच्या नजरेतून पाहिले पाहिजे. आमच्या राज्य सरकारची नजर स्वतःच्या कुटुंबातील महिला व मुलींपुरती मर्यादित आहे की काय अशी मला शंका वाटते. आपल्या मुलींचे, सुनांचे भले म्हणजे समाजाचे भले असा दृष्टीकोन ठेवलेला दिसतो. आज संपूर्ण राज्यामध्ये महिलांची वंचना करण्याचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, महिला बचत गटाच्या संदर्भात विधानसभेत बोलले गेले, वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. महिला बचत गट सुध्दा सावकारी पध्दतीने व्याज घेतात असे सांगण्यात आले. माझी सूचना आहे की, केंद्र सरकारने ज्याप्रमाणे 1000 कोटी रुपयांचा निर्भया फंड दिला, त्याच धर्तीवर राज्य सरकारने 1000 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला असता तर त्यातून महिला बचत गटांना कर्ज देता आले असते.

सभापती महोदय, महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने महिला बँक स्थापन केली. मुंबईमध्ये महिला बँकेचे उद्‌घाटन करण्यात आले. त्या महिला बँकेच्या माध्यमातून कसे कर्ज मिळवून देतो याची जाहिरात केंद्र सरकार करते. महाराष्ट्रामध्ये सहकार क्षेत्रात काम करणारी भगिनी निवेदिता बँक आहे. या बँकेला सक्षम करुन अनेक बचत गटांना निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले असते. त्यांचे जाळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात मजबूत झाले असते. त्याऐवजी मुंबईमध्ये महिला बँक स्थापन करुन त्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांना काम देत आहात.

....3...



SGB/ MMP/ KTG/ D/ D/ 18:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

वुमन वर्ल्ड बँकिंग फेडरेशनची मदत घेण्याऐवजी सरकारची भूमिका काय आहे हे सांगण्याचा प्रयत्न महिला बँकेच्या माध्यमातून केंद्र सरकारने केला.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सिंचनामध्ये किंवा इतर विषयामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही. महाराष्ट्रामध्ये सगळ्यांना एक शब्द परवलीचा झाला आहे. तो शब्द म्हणजे 'भूखंडाचे श्रीखंड'. स्व.मृणाल गोरे विरोधी पक्षनेत्या असताना त्यांनी राज्य सरकारविरुध्द अविश्वास प्रस्ताव आणला होता. त्यांनी 300 भूखंडांची यादी दिली होती. या यादीमध्ये कोणकोणती अनियमितता झाली हे त्यांनी सभागृहात मांडले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी 300 भूखंडांच्या संदर्भात सरकारने कोणती उपाययोजना केली, कुठे चुकीचा वापर झाला ते भूखंड सरेंडर केले पाहिजेत असा अहवाल या सभागृहात दिला. त्यामुळे मला वाटते की, नवीन भाषा, नवीन संस्कृती, नवीन विचार यामधून विरोधी पक्ष बोलतो ते वेड्यासारखे बोलतो अशाप्रकारे हातवारे करायचे, सभागृहात बोलायचे आणि निघून जायचे, बाहेर जाऊन टीका करायची या पध्दतीने जे वर्तन चालले आहे त्यामधून संपूर्णपणे सत्ताधाऱ्यांची वैचारिक दिवाळखोरी स्पष्ट दिसून येते. मध्यंतरी एका मोठ्या नेत्याच्या भाषणातील वाक्य मी ऐकले होते. विरोधी पक्ष टक्कल असलेल्या माणसाला कंगवा विकायचा प्रयत्न करतो. ज्याला जेवणही मिळत नाही, त्या माणसाला दगडाची भाजी आणि रेतीची भाकर द्यावी अशा प्रकारची भूमिका राज्य सरकार घेते. म्हणून महाराष्ट्रामध्ये काही शब्दांची खैरात चालली आहे. त्यामध्ये टगेगिरी, मुर्दाड हे दोन शब्द वापरुन सत्ताधाऱ्यांनी जी काही मर्दुमकी दाखविली आहे ती पाहता सरकारच्या पायाखालची वाळू सरकायला लागली आहे, त्यावर पांघरुण घालण्यासाठी विरोधी पक्षावर टीका केली जात आहे. युती सरकारची साडेचार वर्षाची राजवट वगळता कायम तुम्ही राज्य चालवित आहात. तरी देखील तुम्हाला युती सरकारच्या साडेचार वर्षातील कारभाराचा दाखला द्यावासा वाटतो. तुमच्या प्रदीर्घ राजवटीत तुम्ही काय काय केले हे जनतेला पाठ असले पाहिजे. एखाद्या माणसाच्या डोक्यावर परिणाम झाला की तो अचानकपणे तेच तेच बडबडतो. तुम्ही सतत युती युती, शिवशाही, शिवशाही उच्चार करीत आहात, त्यातून तुम्ही प्रत्यक्षात इतके घाबरत आहात की, त्या घाबरण्यामधून तुमचा बॅलेन्स जात आहे हे तुम्ही लक्षात घ्या.

...4...



डॉ.नीलम गोऱ्हे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये आमचे गटनेते, सन्माननीय सभापती महोदय, उप सभापती महोदय यांनी माझ्यावर तालिका सभापती पदाची जबाबदारी सोपविली होती. सभागृहात तसा ठराव मांडून तो संमत झाला होता. परंतु ज्या पध्दतीने या सभागृहात कामकाज रेटण्याचा प्रयत्न झाला, त्या प्रकाराला आपल्या गटनेत्यांनी थांबविले नाही त्यामुळे मी तालिका सभापती म्हणून पीठासीन अधिकाऱ्यांच्या स्थानावर बसणार नाही हे सभागृहात सांगू इच्छिते. या पध्दतीने तुम्ही पक्षपात करणार असाल तर ते चुकीचे आहे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

----------

नंतर 2डब्ल्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेताना आता काही गोष्टींचा, काही शब्दांचा खास एकेरी उल्लेख केला आहे. त्यांना आपले मत मांडण्याचा, बोलण्याचा अधिकार आहे,स्वातंत्र्य आहे हे मी मान्य करतो. आपण सातत्याने गेली 20 वर्षे आपलेच राज्य आहे असे म्हणत होता. तेवढी फक्त आपण सुधारणा करावी. 1999 ते 2014 पासून आघाडी सरकार आहे. आपली इच्छा असेल तर हा कालावधी 20 वर्षाच्याही पुढे जाऊ शकेल. त्यामुळे आपल्या इच्छेचा मान आम्ही नक्की ठेवू. धन्यवाद.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अर्थसंकल्प चाळल्यानंतर काही बाबी लक्षात आल्या आणि तेवढ्याच बाबींकडे मी लक्ष वेधतो. राज्यामध्ये कायम शब्द काढलेल्या सुमारे 3800 प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. त्यांचे मूल्यांकन झाले आहे. त्यासंबंधातील तरतूद या अर्थसंकल्पामध्ये होईल अशी अपेक्षा होती. अद्याप ती तरतूद दिसून येत नाही. त्यामुळे शिक्षकांमध्ये थोडीशी नाराजी वाढलेली आहे किंवा त्यांचा अपेक्षाभंग होत आहे. त्याच बरोबर कायम शब्द काढलेले उच्च माध्यमिकचे 11500 वर्ग आहेत. त्याचा जी.आर.देखील तयार आहे. खरे म्हणजे शिक्षकांच्या भावना लक्षात घेऊन तरतूद करणे अपेक्षित होते. ती तरतूद देखील झालेली नाही. सन 2003 पासून थकित असलेले वेतनेतर अनुदान देण्यासंबंधी अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आता थोडेफार अनुदान दिलेले आहे. थकित वेतन शाळांच्या भवितव्यासाठी फार आवश्यक आहे. त्याची तरतूद दिसून येत नाही. या शासनाने 10 मानके पूर्ण करण्यासाठी रेटा लावलेला आहे. राज्यातील सुमारे 70 ते 72 हजार शाळांना 10 मानके पूर्ण केली नसल्यामुळे शाळांची मान्यता का काढून घेण्यात येऊ नये अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. पण राईट टू एज्युकेशन अंतर्गत या शाळांना निधी उपलब्ध करून देणे राज्य शासनावर बंधनकारक आहे. पण त्याची तरतूद येथे दिसत नाही.

या महिन्यापासून राज्यामध्ये संगणकीयप्रणाली लागू होऊन शालार्थ योजनेखाली शिक्षकांचे वेतन अदा करण्याची पद्धती येणार होती. शाळांना लागणारी सुविधा देण्याकरिता कोणतीही तरतूद केलेली नाही. तूर्तास त्यास स्थगिती देण्यात आली आहे. निधी नसल्यामुळे ती कल्पना पूर्णपणे राबविता येईल अशा प्रकारची स्थिती नाही. राज्यामध्ये सुमारे 30 हजार बालवाड्या आहेत. सरकार अनेक वेळा चर्चा करून अनुकूल भूमिका घेते, पण प्रत्यक्षात तरतूद फक्त 11 लाख रूपयांचीच करते. याचा अर्थ सरकार बालवाड्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. त्यांनाही निधी देण्याची गरज आहे. राज्यामध्ये दिनांक 24 नोव्हेंबर 2001 पूर्वी कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिलेली सुमारे 78 कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये आहेत. त्यांचा कायम शब्द काढण्यासाठी चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. त्याला जोडून काही बी.एड., लॉ कॉलेजस देखील आहेत. या सगळ्यांसाठी मान्य करून देखील तरतूद मात्र शासनाने केलेली नाही. सन 2007 पासून विद्यार्थी संख्या वाढली, कार्यभार वाढला, पदे वाढली. अशी 2400 पदे आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

त्यांना दरवेळी मान्यता देण्यात येईल असे म्हटले जाते. पण मान्यता आणि तरतूदही दिलेली नाही. त्याकडे लक्ष वेधण्याची नितांत आवश्यकता आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून चालणाऱ्या राज्यात सुमारे 6000 प्राथमिक शाळा आहेत त्यामध्ये कला, क्रीडा व कार्यानुभव विषयासाठी कंत्राटी शिक्षक नेमण्याची तरतूद आहे. यात राज्य सरकारची 35 टक्के तर, केंद्र सरकारची 65 टक्के तरतूद आहे. यासाठी अनेक न्यायालयीन खटले झाले. पण सरकारने तरतूद केल्याचे दिसून येत नाही. यातील 18000 शिक्षकांना आज वाऱ्यावर सोडले जात आहे.

राज्यातील सुमारे 600 अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये एकात्म अपंग शिक्षण योजना केंद्र शासनाच्या माध्यमातून राबविली जाते. त्या शाळेतील शिक्षकांना गेल्या 2-3 वर्षापासून वेतन मिळालेले नाही. त्यासाठी तरतूद केल्याचे दिसून येत नाही. राज्यामध्ये कायम विनाअनुदानित तत्त्वावर उच्च माध्यमिक शाळांमध्ये साधारणत: 650 पूर्णवेळ व 400 अर्धवेळ पदे आहेत. ती अनुदानित करण्याचे मान्य केले आहे. यासाठी 14 कोटी रूपयांची तरतूद अपेक्षित आहे. ती तरतूद झाल्याचे दिसून येत नाही. अनुसूचित जाती व जमातींच्या मुला-मुलींसाठी कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता दिलेल्या 288 केंद्रीय आश्रमशाळा आहेत. त्यातील 169 शाळा निकषबाह्य ठरल्या आहेत. या शाळांसाठी 50.00 कोटी रूपयांची तरतूद करण्याचे मान्य करून देखील तरतूद केल्याचे दिसून येत नाही. कायम विनाअनुदानित तत्त्वावर सुमारे 200 औद्योगिक प्रशिक्षण संस्था खाजगी शिक्षण संस्थांमार्फत चालविल्या जातात. त्यांच्यासाठी शासनाने मान्य करून देखील कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. मी शेवटचा एकच मुद्दा मांडून थांबणार आहे. राज्यातील शिक्षकांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावत चालल्या आहेत. त्यांना प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. यासाठी केलेली तरतूद फार अपूर्ण आहे. यात अधिकची तरतूद झाली असती तर शिक्षकांना देखील दिलासा मिळाला असता. धन्यवाद.

....

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केवळ चार महिन्यांचे लेखानुदान मांडणे आवश्यक असल्यामुळे विधान सभेमध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार व विधान परिषदेमध्ये माननीय वित्त राज्य मंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी अंतरिम अर्थसंकल्प मांडला असून त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

मी शेवटचा वक्ता असल्यामुळे फार दीर्घकाळ बोलणार नाही. खरे म्हणजे तो आमच्यावर अन्याय आहे. या अर्थसंकल्पाचे संक्षिप्तपणे वर्णन करावयाचे झाले तर मी असे म्हणेन की, हा अर्थसंकल्प आर्थिक न्यायाच्या तत्त्वावर आधारलेला आहे. त्याच बरोबर या अर्थसंकल्पात मला सामाजिक न्यायाचे प्रतिबिंब पहायला मिळते. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या पुरोगामी धोरणाचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात पहायला मिळते. या अर्थसंकल्पाचे वेगळे रूप पहायला मिळते. आमचे वित्त मंत्री नामदार श्री.अजित पवार व माननीय वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी भविष्यावर नजर ठेवून विकासाच्या योजनांसाठी अर्थसंकल्पात तरतुदी केल्या आहेत, त्या देखील मला अतिशय लक्षवेधक वाटतात. खऱ्या अर्थाने फुले, शाहू आंबेडकरांच्या विचारांचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पामध्ये मला पहायला मिळते. जागतिक पातळीवर मंदीचे वातावरण असताना, महाराष्ट्रामध्ये गेल्या वर्षी व त्याच्या मागच्या वर्षी दुष्काळ आणि अतिवृष्टी झालेली असताना या अर्थसंकल्पामध्ये ज्या काही तरतुदी आहेत त्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, महिलांना, अल्पसंख्याकांना, दुर्बल घटकांना, मागासवर्गीयांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. एक लक्षवेधक गोष्ट मला या अर्थसंकल्पातून पहायला मिळाली आहे. एवढे सगळे असताना जीवनावश्यक वस्तूंच्या दरामध्ये वाढ झालेली नाही. त्याकडे देखील मी सभागृहाचे लक्ष वेधतो. खरे म्हणजे माननीय वित्त मंत्र्यांचे कौतुक केले पाहिजे. हा अर्थसंकल्प निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयार करत असताना अतिशय कौशल्यपूर्ण केलेला आहे. जर काही जादा देण्याचा प्रयत्न केला असता तर विरोधकांनी आरोप केले असते की, मतदानावर डोळा ठेवून अर्थसंकल्प तयार केला आहे. आपल्या लोकशाहीमध्ये माणूस हा केंद्रबिंदू आहे. माणसाला खऱ्या अर्थाने न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असा प्रयत्न केला की, निवडणुकीची मते मागण्यासाठी अनुनय केला अशा प्रकारचे आरोप आपण केले असते. अशा प्रकारचे कोणतेही आरोप आपण करू शकला नाहीत म्हणून नामदार वित्त मंत्री श्री.अजित पवार व वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांचे मनापासून अभिनंदन करतो. ..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

मी अधिक बोलणार नाही. मी म्हणालो की, भविष्यावर नजर ठेवून अर्थसंकल्पामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. आमच्या पुणे शहरातील मेट्रोसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. आगामी काळात नागपूरमध्ये देखील मेट्रो झाली पाहिजे यादृष्टीने टाकलेली पावले अतिशय महत्त्वाची असून ती लक्षवेधक आहेत असे मला वाटते.

या अर्थसंकल्पामध्ये सामाजिक न्यायाच्या देखील गोष्टी आहेत. अंगणवाडी सेविकांसाठी एक लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात जन्मलेल्या मुलींसाठी वयाच्या 18 व्या वर्षी एक लाख रूपये मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. या सामाजिक तरतुदी आम्हाला अर्थसंकल्पामध्ये ठळकपणे पहायला मिळतात.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड ....

त्याच बरोबर मी एक सूचना करु इच्छितो की, या अर्थसंकल्पात रस्ते विकासासाठी 2836 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याचवेळी मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, आपण रस्ते विकासाच्या योजनेसाठी भरीव तरतूद केली आहे. टोलचा प्रश्न सध्या गंभीर बनला आहे. टोल नाक्यांच्या रकमेमध्ये वाढ न होता टोल नाक्याच्या किंमती कमी होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये गृहबांधणीच्या संदर्भात ग्रामीण भागातील बेघर लोकांच्या किंवा जे लोक झोपडयांमध्ये राहतात त्यासंदर्भात महत्वाची तरतूद करण्यात आलेली आहे. या लोकांसाठी शासनाने 1.82 लक्ष घरे बांधण्यासाठीची तरतूद केलेली आहे. ग्रामीण भागात जी घरे बांधली जातात ती बांधतांना आपली भूमिका नेमकी काय असली पाहिजे याबद्दल मला विचार मांडावयाचे आहेत. आपल्याला पूर्वीचे गाव पाहिजे की, नवीन गाव पाहिजे हा महत्वाचा विषय आहे. आपल्याकडे लोकशाही आल्यामुळे नवीन निर्मितीची प्रोसेस आपल्या देशात सुरु झाली. गेल्या 60-65 वर्षामध्ये जेवढे बदल झालेले आहेत तेवढे बदल हजारो शेकडो वर्षामध्ये होत नव्हते. मला या निमित्ताने एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे की, गावाकडे नवीन घरे बांधत असतांना आपले धोरण सुध्दा पुरोगामी असले पाहिजे. परंतु या दृष्टीने आपण खरोखर विचार करतो काय ? पूर्वी जसे गाव होते तसेच गाव आजही आहे. पूर्वी ज्या स्वरुपात वस्त्या होत्या त्या आजही तशाच स्वरुपात आहेत. शासन दलित वस्ती सुधारणा योजना राबवित असते व आहे त्याच दलित वस्त्यांमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत असते. या योजनेमध्ये दलित वस्त्यांमध्ये रस्ते, वीज, पाणी देण्याचा प्रयत्न करीत असते. गाव जसे आहे तसेच ते ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. नवीन गावाची निर्मिती करण्याचा विचार नवीन घरांचा प्रोग्राम करताना राबविण्याची आवश्यकता आहे. आज आपल्या महाराष्ट्रात आणि देशात बघावयास दलित वस्त्या या मुख्यत्वे गावाच्या वेशीच्या बाहेर असतात, ही वस्तुस्थिती आपल्या लोकशाहीला शोभणारी नाही. परंतु यासंदर्भात आपण गांभीर्यपूर्वक विचार करणार आहोत की, नाही ? दलित वस्ती सुधारणा म्हणजे गावाच्या वेशीच्या बाहेरील सुधारणा असा प्रोग्राम असता कामा नये. तसेच सर्व गावांमध्ये गावातील घरे पडल्यामुळे या ठिकाणचे शेतकरी आपल्या शेतात घर बांधून राहतात असे विदारक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

ॲड.जयदेव गायकवाड ....

चित्र आपल्याला सर्व ठिकाणी बघावयास मिळते. त्यामुळे गावे आपल्याला भकास दिसत आहेत. गावामध्ये निम्म्यापेक्षा जास्त घरे पडलेली दिसतात. गावामध्ये फक्त 10-20 टक्के बऱ्यापैकी घरे दिसतात व त्या ठिकाणचे लोक शेतामधील घरात राहत असल्याचे दिसतात. त्यामुळे यासंदर्भात पुनर्रविचार करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, गावठाणामध्ये दलित, दुर्बल घटकातील तसेच ओबीसी समाजातील लोक राहतात. या लोकांना गावामध्ये घरे बांधण्याची तरतूद केली पाहिजे अशी मला या निमित्ताने सूचना करावयाची आहे. या समाजाची आपल्याला पुनर्रचना करावयाची असेल तर गावकुसाबाहेरील लोकांना गावामध्ये आणले पाहिजे. बहुतेक ठिकाणी दलित माणसे गावकुसाबाहेर राहत असतात. कलेक्टर असला किंवा माझ्या सारखा आमदार जरी असला तरी त्याचे घर गावकुसाबाहेरच असते. खरे म्हणजे माझ्या गावाला माझ्या बद्दल अभिमान आहे. परंतु जे विदारक सत्य आहे ते सत्य तसेच राहते. आपल्याला समाज बदलावयाचा असेल तर दूरदर्शीपणाने आमच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला पाहिजे. बजेटमध्ये सुध्दा यासंदर्भातील प्रतिबिंब दिसले पाहिजे जेणेकरुन गावाच्या कन्स्ट्रक्शन व रिकन्स्ट्रक्शनची भूमिका परिवर्तनवादी असली पाहिजे. आमचे सरकार असल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना आवाहन करु इच्छितो की, घरबांधणीच्या संदर्भात कार्यक्रम राबवितांना अशा प्रकारची भूमिका ठेवली तर गावामध्ये सुध्दा एक प्रकारचे परिवर्तन येईल. आता गावामध्ये शिक्षणाची सोय आली आहे. परंतु जी जुनी व्यवस्था आहे ती टिकवण्याचा कोणी प्रयत्न न करता जुनी व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. गावाचा जो काही विकास होत असतो त्या विकासामध्ये दलित,दुर्बल व अल्पसंख्यांकाना सहभाग मिळाला पाहिजे. दलित, दुर्बल व अल्पसंख्याक हे लोक गावाच्या मुख्य प्रवाहातच आले पाहिजेत असे विचार मांडून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>मातंग समाजाच्या मोर्चावर करण्यात आलेला लाठीमार</u>

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला आपल्यामार्फत सरकारकडून ताबडतोब माहिती हवी आहे की, आज विधान भवनाच्या बाहेर लहुजी वस्ताद संघटनेच्या मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांवर अमानुष लाठीमार करण्यात आला आहे. यातील 3 व्यक्तींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जसे नागपूरमध्ये गोवारीकांड झाले होते तसेच हे कांड आहे. या ठिकाणी आम्ही कोणत्याही प्रकारे मोर्चा काढावयाचा नाही, कोणत्याही प्रकारच्या मागण्या मांडावयाच्या नाहीत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयदेव गायकवाड साहेब गावकुसाबाहेरचे प्रश्न मांडत आहेत. या मोर्चाने कलम 144 मोडला असेल किंवा अजून काही केले असेल परंतु अशा पध्दतीने ॲडिशनल सीपी, डीसीपी लेव्हलच्या अधिकाऱ्यांनी मातंग समाजाच्या मोर्चाला गुराप्रमाणे मारायचे हे काही बरोबर नाही. या मोर्चातील लोकांना अतिशय अमानुषपणे मारहाण करण्यात आलेली आहे. त्यामुळे हा प्रकार का झाला, कशा पध्दतीने झाला यासंदर्भात शासनाने निवेदन करण्याची आवश्यकता आहे. आम्ही आमच्या मागण्या मांडावयाच्या नाहीत काय, मोर्चे काढावयाचे नाहीत काय, निदर्शने करावयाची नाहीत काय ? मातंग समाजातील लोक आपल्या मागण्या मांडण्यासाठी आलेले असतांना तुम्ही त्यांना अशा प्रकारे मारहाण करणार असाल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. ही घटना का घडली, कशी घडली यासंदर्भातील माहिती माननीय मंत्र्यांनी अगोदर द्यावी व त्यानंतर रिप्लायला सुरुवात करावी. माननीय मंत्री महोदया श्रीमती वर्षा गायकवाड येथे उपस्थित असतांना बाहेर काय झाले याची त्यांना माहिती नाही ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या घटनेच्या संदर्भात माहिती घेऊन सभागृहाला अवगत केली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मातंग समाजाच्या लोकांवर अमानुष लाठीमार झ ाालेला आहे. या मोर्चातील लोकांची डोकी फुटल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. असे असतांना सरकार यासंदर्भातील माहिती देणार नसेल तर ते योग्य नाही. विधान भवनासमोर ही घटना घडलेली असतांना त्यासंदर्भातील निवेदन माननीय मंत्री महोदयांकडून होत नसेल तर ते बरोबर नाही. आपण मोर्चेकऱ्यांकडून निवेदन घेऊ शकत होता. शेतकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी मार खायचा, अपंगानीही मार खायचा, मराठी मागासवर्गीय अधिकारी असेल तर त्याची पोस्टींग ठाण्याला करावयाची हा प्रकार यापुढे आम्ही खपवून घेणार नाही. ...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. दीपकराव साळुंखे )** : माननीय गृहमंत्र्यांना या विषयाच्या संदर्भात त्वरित अवगत केले जाईल.

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विधान भवनाच्या बाहेर झालेल्या घटनाक्रमाच्या संदर्भात सभागृहात उल्लेख केलेला आहे. मातंग समाजाच्या आंदोलकांवर लाठीमार झाला असल्याचा उल्ल्लेख त्यांनी केलेला आहे. आम्ही सगळे सकाळ पासून सभागृहात उपस्थित आहोत. या विषयाच्या संदर्भात मी निवेदन करीत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

सभापती महोदय, मी सकाळपासून सभागृहामध्ये बसलो आहे. जेव्हापासून अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु झाली तेव्हापासून मी येथे उपस्थित आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची मी नोंद घेत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे जे सांगितले, ती घटना घडली असेल...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात माननीय मुख्यमंत्री आले आहेत. ते या ठिकाणी महत्वाचे निवेदन करण्यासाठी आले आहेत. या राज्यातील दीनदलित आणि दुबळ्या मातंग समाजाचा एक छोटा मोर्चा विधान भवनाच्या जवळपास कुठेतरी आला असता त्या मोर्चावर अमानुषपणे लाठीमार करण्यात आला. त्या मोर्चावर ॲडीशनल सी.पी. तसेच डी.सी.पी. यांनी लाठीमार केला. नागपूरला गोवारी हत्याकांड झाल्याचे आपण ऐकले असेल तसे या ठिकाणी घडले असते. मोर्चातील चार जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. हे का झाले ते आम्हाला समजले पाहिजे. लोकांनी मोर्चा आणायचा नाही काय ? आपणास मनमानी करायची असेल तर जरुर करावी, आम्ही मोर्चा आणायचा नाही असे आपले काही धोरण आहे काय ? मोर्चा आणला तर लाठीने बडविणार असे काही आहे काय ? नेमके काय झाले याची माहिती आम्हाला समजली पाहिजे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माझ्या कानावर आताच ही घटना आली. मी त्याची माहिती घेत आहे. माहिती मिळाल्यानंतर शासनाच्या वतीने निवेदन करण्यात येईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिनांक 1.1.1995 वा त्यापूर्वीच्या संरक्षणपात्र झोपडीचे हस्तांतरण नियमित करण्याबाबत अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याचा घेतलेला निर्णय

**मु.शी.**: दिनांक 1.1.1995 वा त्यापूर्वीच्या संरक्षणपात्र झोपडीचे हस्तांतरण नियमित करण्याबाबत अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील 138 तालुका मुख्यालयांमध्ये असलेल्या ग्रामपंचायतींचे रुपांतर करुन त्याऐवजी नगरपरिषद/नगरपंचायती स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय

**मु.शी.**: राज्यातील 138 तालुका मुख्यालयांमध्ये असलेल्या ग्रामपंचायतींचे रुपांतर करुन त्याऐवजी नगरपरिषद/नगरपंचायती स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय या संबंधी मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सावर्जनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील राज्यातील सर्व आरोग्य केंद्रे व रुग्णालयांमध्ये सर्व नागरिकांना मोफत औषधी व वैद्यकीय साहित्य/सामुग्री उपलब्ध करुन देण्याची योजना

**मु.शी.**: सावर्जनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील राज्यातील सर्व आरोग्य केंद्रे व रुग्णालयांमध्ये सर्व नागरिकांना मोफत औषधी व वैद्यकीय साहित्य/सामुग्री उपलब्ध करुन देण्याची योजना यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 19:20

**पृ.शी.**:अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु....)

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे )**: माननीय वित्त मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा एक जेन्युईन प्रश्न आहे. काल सभागृहात अर्थसंकल्प मांडण्यात आला. अर्थसंकल्पामध्ये आगामी वर्षाची दिशा, ध्येयधोरण, योजना याचा उल्लेख असतो. काल अर्थसंकल्प मांडल्यानंतर आज माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निवेदन का केले ? माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना क्रेडीट जाऊ नये म्हणून हे निवेदन करण्यात आले काय ? काल अर्थसंकल्प मांडताना या गोष्टी का सांगण्यात आल्या नाहीत ? आपण नेहमी बजेटमधील एकेक पान वाचणार काय ? या घोषणा अर्थसंकल्पमध्ये मांडल्या तर त्याला एक महत्व असते. ते एक दिशा देणारे धोरण असते आणि त्या संदर्भात काल घोषणा न करता आज घोषणा करण्यात आली. उद्यासाठी काही घोषणा होणार आहे काय ? असेल तर उद्या महाशिवरात्री निमित्त सुट्टी असली तरी आम्ही उद्या येतो. हा अर्थसंकल्प आहे की, एकेका पानाची लक्तरे काढत आहात ? हे काय चालले आहे, याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे.

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी काल येथे अर्थसंकल्प मांडला. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचे उत्तर मी माझ्या उत्तराच्या भाषणामध्ये देतो.

सभापती महोदय, सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, दिवाकर रावते,हेमंत टकले, अमरसिंह पंडित, पांडुरंग फुंडकर, प्रा.सुरेश नवले, डॉ.दीपक सावंत, डॉ.रणजित पाटील, सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामनाथ मोते, श्री.रमेश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.भगवान साळुंखे, ॲड.जयदेव गायकवाड इत्यादी सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत बर्हिगमन करतात. )

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, हा अतिशय चांगला अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पातील चांगल्या घोषणा ऐकून या सर्व मंडळींमध्ये विसंगती आली आहे. आपण भविष्यातील निवडणूक जिंकू किंवा नाही अशी त्यांना शंका आहे. त्यांनी आता जो सभात्याग केलेला आहे हे त्याचेच एक रुप आहे म्हणूनच ही सर्व मंडळी सभागृहातून बाहेर गेली आहेत. हे सर्व त्यांचे नैराश्य आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय चांगला अंतरिम अर्थसंकल्प खालच्या सभागृहात मांडलेला आहे. या सभागृहात मी तो मांडलेला आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगल्या सूचना केल्या. माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात थांबले असते तर मला चांगले वाटते असते आणि त्यांनी मांडलेल्या सर्व बाबींचा मी येथे खुलासा केला असता.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक.....

विरोधी बाजूच्या सदस्यांना हे माहीत होते की, राज्य सरकार त्यांच्या प्रत्येक बाबीचा खुलासा प्रखरपणे करु शकते. आपण मांडलेले प्रश्न किंबहुना अर्थसंकल्पामध्ये असलेल्या बाबींसंदर्भात जो संदेह काढला तो चुकीचा ठरु शकतो हे विरोधी बाजूच्या मंडळींना माहीत असल्यामुळेच ते सर्वजण सभागृहातून निघून गेले.

महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, महाराष्ट्र ही देशाची आर्थिक राजधानी आहे. याचा आपणा सर्वांना गर्व आहे. संपूर्ण देशाला दिशा आणि निर्देश देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्र हे आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेले क्रमांक-1 चे राज्य आहे. या बाबीचा सुध्दा आपल्याला गर्व असावयास पाहिजे. देशात सर्वात जास्त महसूल जमा करणारे महाराष्ट्र हे क्रमांक-1 चे राज्य आहे. महोदय, सर्व गोष्टीचे सोंग घेता येते, परंतु पैशाचे सोंग घेता येत नाही. ज्या राज्याच्या तिजोरीत पैसा असेल, जे राज्य सक्षम असेल, ज्या राज्यामध्ये आर्थिक भार सहन करण्याची क्षमता असेल तेच राज्य स्वयंपूर्ण अशा चांगल्या योजना राबवू शकते. आपल्या राज्याच्या बाबतीत या सर्व गोष्टी माहीत असल्यामुळेच माननीय विरोधी पक्ष नेते आणि विरोधी बाजूच्या सर्वच सन्माननीय सदस्यांनी पळपुटेपणा स्वीकारला. मी सभागृहाच्या माध्यमातून विरोधी पक्षाच्या सदस्यांना विचारु इच्छितो की, त्यांना निषेध करण्याचे काय कारण होते ? आम्ही सकाळपासून सभागृहामध्ये आहोत. सभागृहामध्ये ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडले त्या प्रत्येक मुद्यांची काटेकोरपणे नोंद घेऊन व टिप्पणी तयार करुन त्या मुद्यांच्या अनुषंगाने सकारात्मक उत्तर तयार केले. परंतु सरकारचे उत्तर ऐकण्यापूर्वीच विरोधी पक्षाची मंडळी सभागृहातून बाहेर निघून गेली.

महोदय, मागील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत आज राज्याची महसुली जमा 8 टक्के आहे. पूर्वीच्या वर्षाच्या तुलनेत ती वाढून 1 लाख 69 हजार 907 कोटी रुपयांपर्यंत अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेतली तर आज महसूल जमा करण्याचे जे मुख्य स्त्रोत आहे त्यामध्ये विक्रीकर हे एक आहे. इतर स्त्रोतांच्या महसुली जमेमध्ये मागील 5 वर्षात वाढ झाली आहे.

महोदय, विरोधी बाजूच्या सर्व मंडळींनी वारंवार विचारले की, या राज्याने एवढ्या मोठ्या प्रमाणावर कर्ज का काढले ? त्यांनी असेही सांगितले की, राज्य कर्जाच्या डोंगरात गेले आहे. महोदय, 1995 ते 1999 या कालावधीत आर्थिक शिस्त नसणाऱ्या मंडळीच्या हातात राज्य गेले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचा परिणाम असा झाला की, या मंडळींनी हे राज्य संपूर्णपणे कर्जाच्या डोंगरात टाकले. 1999 मध्ये आमच्या पक्षाचे सरकार आले तेव्हापासून राज्याला कर्जातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. नियोजन आयोगाने राज्याला कर्ज घेण्याची मर्यादा ठरवून दिली आहे. नियोजन आयोगाने ठरवून दिलेल्या 17 टक्के मर्यादेच्या आतच राज्याने कर्ज घेतलेले आहे. मी विचारु इच्छितो की, कर्ज घेणे वाईट आहे काय, कोणते राज्य कर्जाविना चालू शकते ? परंतु कर्ज घेतल्यानंतर ते फेडण्याची राज्य सरकारची पत पाहिजे आणि ती पत आपल्या राज्याची आहे.

महोदय, विरोधी बाजूचे सदस्य राज्याच्या क्रेडिट रेटींगबाबत बोलले. मी सांगू इच्छितो की, आपल्या राज्याचे क्रेडिट रेटींग देशात क्रमांक-1 चे आहे. ज्यांच्याकडे महसुली जमा असते, महसूल जमा करण्याची क्षमता असते, महसूल जमा करण्याचे विविध स्त्रोत उपलब्ध असतात त्यांचेच क्रेडिट रेटींग चांगले असते. देशात महाराष्ट्र हे क्रमांक-1 चे औद्योगिक राज्य आहे. ट्रेडींगमध्ये सुध्दा महाराष्ट्र हे क्रमांक-1 चे राज्य आहे. महाराष्ट्रात देशामध्ये सर्वात जास्त कमर्शियल ॲक्टिव्हीटी होते. या सर्व बाबी लक्षात घेता देशात सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करुन देणारे महाराष्ट्र हे क्रमांक-1 चे राज्य आहे. या सर्व बाबी लक्षात घेता आपण जे कर्ज घेतले आहे त्या कर्जाची परतफेड करताना दायित्व स्वीकारले आहे. कर्जाचे हप्ते वेळेवर भरणे आणि कर्जाचे व्याज वेळेवर देणे या बाबतीत राज्य सरकार सक्षम आहे. उपरोक्त सर्व बाबींमुळेच राज्य सरकारला कर्जाचे सर्व हप्ते वेळेवर भरता आले आहेत. म्हणूनच आपल्या राज्याची ही परिस्थिती आहे.

महोदय, हा अर्थसंकल्प थोडासा तुटीचा सादर करावा लागला आहे हे मला मान्य आहे. परंतु तो तुटीचा का सादर करावा लागला ? विजेच्या अर्थसहाय्यापोटी 9 हजार कोटी रुपये दिले आहेत. या राज्यातील शेतकऱ्यांना विजेच्या देयकांत सबसिडी देण्याचे काम आमच्या सरकारने केले आहे. मीटर असलेल्या कृषीपंपधारकांना आणि मीटर नसलेल्या कृषीपंपधारकांना सबसिडी दिली आहे. या सोबतच उद्योगांना सबसिडी देण्याचे काम सुध्दा राज्य सरकारने केले आहे. अनेक उद्योजकांबरोबर मोठ्या प्रमाणात करारनामे झाले आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग आले तर राज्यात रोजगार उपलब्ध होईल. रोजगार वाढला तर ट्रेडींग वाढेल आणि महसूल जमा होईल. एकप्रकारे ही औद्योगिक गुंतवणूक आहे. या दृष्टिकोनातूनच आपण या सबसिडीकडे

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिले पाहिजे. त्यामुळेच वीज दराच्या सवलतींसाठी 9 हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. राज्यात उद्योग जास्त यावेत म्हणून औद्योगिक प्रोत्साहनाकरिता 2500 कोटी रुपये अर्थसहाय्य दिले आहे.

महोदय, अंगणवाडीसेविका आणि मदतनिसांच्या बाबतीत राज्य सरकारने चांगला निर्णय घेतला आहे. माननीय महिला व बालविकास मंत्री प्रा.वर्षाताई गायकवाड सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. अंगणवाडीसेविका व मदतनीस या गावागावांमध्ये उद्याच्या येणाऱ्या भविष्यासाठी राबत असतात. उद्याचे भविष्य सुरक्षित आणि सक्षम तसेच शारीरिकदृष्ट्या सुदृढ राहावे यासाठी अंगणवाडीसेविका आणि मदतनीस यांना मदत करण्यासाठी 200 कोटी रुपये देण्यात आले आहेत.

महोदय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला 1558 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य दिले आहे.

महोदय, सर्वप्रथम देशाने अन्न सुरक्षा योजना सुरु केली. आपल्या राज्यात सुध्दा ही योजना राबविण्यास सुरुवात झाली आहे. ही योजना राबवित असताना राज्याचा हिस्सा म्हणून राज्य सरकारने 330 कोटी रुपयांची तूट आणि 1440 कोटी रुपयांचा भांडवली खर्च देण्याचे काम केले. या दृष्टिकोनातून आपण या अर्थसंकल्पाकडे बघितले पाहिजे.

महोदय, महसुली खर्चाचा तपशील पाहिला तर राज्य सरकार व्याजावर 23,805 कोटी रुपये, वेतनावर 64,986 कोटी रुपये आणि निवृत्ती वेतनावर 17,633 कोटी रुपये खर्च करते. अशा प्रकारे महसुली जमेची 62.33 टक्के इतकी रक्कम अंदाजित केली आहे. महोदय, ज्यावेळी विरोधी बाजूचे सदस्य राज्य करीत होते त्या वेळी त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या वर्षी म्हणजेच निवडणुकीच्या वर्षी 1999-2000 मध्ये महसुली जमा 24,237 कोटी रुपये आणि महसुली खर्च 32,209 कोटी रुपये होता. महोदय, आमच्या सरकारचे हे शेवटचे वर्ष आहे. त्यामुळे 2013-14 या वर्षी महसुली जमा 1,58,409 कोटी रुपये आहे. जीएसडीपीची टक्केवारी काढली तर ते प्रमाण 4.2 टक्के आहे. आमच्या सरकारचा 2013-14 मध्ये महसुली खर्च 1,61,427 कोटी रुपये आहे. जीएसडीपीची टक्केवारी बघितल्यास ती 1.7 टक्के आहे.

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

राज्यात ही आर्थिक शिस्त लावण्याचे काम मागील 15 वर्षांत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमच्या आघाडी सरकारने करून दाखविले आहे. त्यामुळे विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांनी या वेळी सभागृहातून बाहेर जाण्याची पळवाट काढली आहे. मी अनेक विषयावर बोलू शकतो. अनेक सन्माननीय सदस्य अनेक विषयांच्या संदर्भात बोलले. मी या सर्व मंडळींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे निश्चितपणे त्यांना लिखित पाठवून देईन. आम्ही सकाळपासून बसायचे. सन्माननीय सदस्यांनी सकाळपासून रेटून विषय मांडायचे आणि त्यानंतर उत्तर घेण्याची वेळ आल्यावर काही तरी कारणाने पळवाट काढायची हे बरोबर नाही. मी त्यांच्याही सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सक्षम आहे. आम्ही त्यांच्या प्रश्नांची उत्तरे लिखित पाठवून देऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी सांगितले होते की, मराठी भाषा भवन बांधायचे आहे, त्या संदर्भात काही निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. मी सांगू इच्छितो की, मराठी भाषा विभागासाठी निधीची उपलब्धता कमी आहे. मराठी भाषा सर्व शाखांच्या उच्च शिक्षणासाठी उपयुक्त होईल यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून द्यावा अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केली आहे. मराठी भाषा उच्च शिक्षणासाठी उपयुक्त होण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत योजना तयार करण्यात येत आहे. यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करून घेण्याच्या सूचना आम्ही उच्च व तंत्र शिक्षण विभागाला देत आहोत.

राज्य शासन आपली योजना चालविते आणि सोबत डीपीडीसी सुध्दा जिल्हा स्तरावर योजना चालविते. विरोधी पक्षाच्या हातात ज्यावेळी सत्ता होती त्यावेळी राज्यातील 33 जिल्ह्यांचा एकूण प्लॅन 963 कोटी रूपयांचा होता. राज्याचे आकारमान पाहिले तर त्याच्या 7 पॉईंट काही तरी टक्के त्यांचा डीपीडीसीचा प्लॅन रहायचा. या सरकारने सन 2014-15 साठी डीपीडीसीचे जे आकारमान ठरविले आहे ते 5902 कोटी रूपयांचे आहे, म्हणजे 11 टक्के आहे. मागच्या वेळी राज्यात काही भागात दुष्काळ पडला, अतिवृष्टी झाली. आम्ही डीपीडीसीला सांगितले होते की, 15 टक्के निधी रिझर्व्ह ठेवावा. आम्ही कोणताही भेदभाव केला नाही. जिल्ह्यातील आमदार असतील मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, सर्वांना समान निधी देण्याचे काम केले. दुष्काळाच्या, अतिवृष्टीच्या संदर्भातील उपाययोजना असतील, रस्त्यांच्या सुधारणा असतील, ब्रिजेसच्या सुधारणा

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

असतील, चारा छावणीच्या संदर्भात मदत करण्याच्या उपाययोजना असतील अशा प्रकारच्या योजना डीपीडीसीच्या माध्यामतून राबविण्याचा प्रयत्न केला आहे. मी ज्या जिल्ह्यातील आहे, तेथील डीपीडीसी 225 कोटी रूपयांची आहे. विरोधी पक्षाच्या काळात ती 71 कोटी रूपयांची होती. ते 1-2 कोटी रूपयांची वाढ करीत होते. माझ्या जिल्ह्याची डीपीडीसी मी ज्यावेळी शपथ घेतली त्यावेळी 121 कोटी रूपयांची होती. ती वाढत 225 कोटी रूपयांची झाली आहे. डीपीडीसीला किती वाढ दिली, या संदर्भात आपण टकेवारीनुसार अंदाज काढून घ्यावा. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून अनेक योजना राबविता येतात. आम्ही नाविण्यपूर्ण योजना तयार केली. काम एखाद्या योजनेत घेता येत नसेल अशा कामाला जर मदत करायची असेल तर ते काम नाविण्यपूर्ण योजनेत घेता येऊ शकते. शाळांत डेस्क बेंच देण्याचे काम होते. सोलर लाईट देण्याचे काम होते. सोलर कुंपण देण्याचे काम होते. जंगली जनावरांचा प्रकोप शेतात वाढला. त्यामुळे आम्ही ही सर्व कामे नाविण्यपूर्ण योजनेत घेतली. आम्ही अशा चांगल्या योजना जमीन पातळीवर राबवित असल्यामुळे आम्हाला खात्री आहे की, आम्ही या बाकावर निश्चितपणे राहू. विरोधी पक्षातील बाहेर गेलेली मंडळी तेथेच राहतील आणि तशीच राहतील. लोकांना अभिप्रेत असलेला विकास, बाबी मिळाल्या पाहिजेत. नागरी सुविधा प्रदान करणाऱ्या शासनाच्या सोबत लोक राहतात. आम्ही जिल्हा पातळीवर डीपीडीसी सक्षम केली. मागील अनेक वर्षांपासून आमच्या सर्व जिल्ह्यांत अनेक पध्दतीची कामे आम्ही डीपीडीसीच्या माध्यमातून करण्याचाा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक विषयांच्या बाबतीत मुद्दे मांडले आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी हॉस्पिटलच्या, ॲम्ब्युलन्सच्या बाबतीत मुद्दे मांडले. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी काही मुद्दे मांडले. परंतु, त्यांनी ते सभागृहात चुकीच्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला. थोडेसे गुमराह करण्याचा प्रयत्न केला. मी सांगू इंच्छितो की, आम्ही एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत 937 ॲम्ब्युलन्स ऑन रोड आणणार आहोत. आम्ही सॉफ्ट लॉंच केला. 26 जानेवारीला 156 ॲम्ब्युलन्स आणल्या. दिनांक 1 मार्च, 2014 ला 250 ॲम्ब्युलन्स आणू आणि उर्वरित सर्व ॲम्ब्युलन्स एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत आणून ही योजना राबविणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी काही गोष्टींच्या संदर्भात ॲलिगेशन केले. जीव्हीके आणि एका कंपनीच्या

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

बाबतीत निविदा प्रक्रिया झाली. त्या कंपनीनेच उच्च न्यायालयामध्ये ते डिसिजन चॅलेंज केले. त्यानंतर उच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या फेव्हरमध्ये डिसिजन दिला. त्यानंतर ही सर्व मंडळी सर्वोच्च न्यायालयात गेली. सर्वोच्च न्यायालयामध्येही राज्य शासनाच्या फेव्हरमध्ये डिसिजन झाला. कारण सर्व कामांमध्ये पारदर्शकता होती. सर्व निविदा प्रक्रिया करताना पारदर्शकता होती. जे लोक काम करू शकतात अशाच लोकांच्या हातात काम देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी काही गोष्टींचा उल्लेख केला. राज्याचे दरडोई उत्पन्न म्हणजे पर कपिटा इंकम मुंबईमुळे वाढले आहे, असे ते म्हणाले. मला हे मान्य आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. आम्हाला त्याचा अभिमान आहे. परंतु, पर कपिटा इंकम वाढविण्यामध्ये राज्यातील इतरही भाग तेवढेच सहभागी आहेत. मागील 15 वर्षांत नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे, जळगाव किंवा राज्यातील इतर सर्व भागातील दरडोई उत्पन्न वाढले. सन्माननीय सदस्य मुंबईच्या संदर्भात बोलले की, राज्य शासनाने मुंबईला काहीच दिले नाही. मी सांगू इच्छितो की, मुंबईत मोनो रेल सुरू झाली. व्हीटीपासून इस्टर्न फ्री वे सुरू झ ाला. उद्या मेट्रो रेल सुरू होत आहे. मुंबईला आवश्यक असलेली कम्युटिंग फॅसिलिटी मोठ्या स्वरूपात वाढत आहे. परवा सी प्लेन सुरू केले आहे. राज्यातील धरणांत ते प्लेन उतरेल. पर्यटनासाठी असो, भाविकांना दर्शनासाठी असो, अशा सर्व भागात 4, 5, 8, सीटर पर्यंतच्या प्लेनचा वापर होऊ शकतो. राज्य शासनाने ही कम्युटिंग फॅसिलिटी वाढविली आहे. हे सी प्लेन जायकवाडी धरणात जाईल. सन्माननीय दादांनी उल्लेख केलेले धरणही आम्ही सेकंड फेजमध्ये घेणार आहोत. जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून प्रकल्प राबविणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील क्रमांक 1 चे राज्य आहे. जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून सर्वात मोठे आर्थिक सहाय्य देशात कोणाला मिळाले असेल तर ते महाराष्ट्र राज्याला मिळाले आहे. सदर योजनेच्या माध्यमातून मोठ्या शहरात विकासाची अनेक कामे करण्यात आली. मुंबई मनपा तिचे दायित्व पूर्ण करू शकली नाही. जेएनएनयूआरएम, एमएमआरडीए, म्हाडा यांच्या माध्यमातून विकास कामे घडवून आणण्याचे काम शासनाने केले. खरे म्हणजे ते दायित्व मुंबई मनपाचे होते. शासनाने अनेक प्रयत्न केले.

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

सभापती महोदय, शासनाने सुकन्या योजना आणली. मी माननीय मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांना धन्यवाद देतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

त्यांनी अत्यंत कल्पकतेने या राज्यासाठी 'सुकन्या' योजना आणली आहे. याबाबत राज्य शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. वार्षिक 576 कोटी रुपयांमधून 182 कोटी रुपयांची तरतूद यासाठी केली आहे. ही योजना यशस्वी व्हावी, हा आमचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे मनोधैर्य योजनेसाठी 74 कोटी रुपयांचा वार्षिक नियतव्यय दिलेला आहे. त्यासाठी सुध्दा 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आपल्याला माहीत आहे की, 4 महिन्यांच्या खर्चासाठी शासनाने अंतरिम अर्थसंकल्प सादर केलेला आहे. दिनांक 2 ऑक्टोबर, 2013 पासून सुरु झालेल्या या योजनेमध्ये आजपर्यंत 200 लाभार्थ्यांना मदत झाली आहे.

सभापती महोदय, गेल्या दोन दिवसांपूर्वी विदर्भ, खानदेश आणि मराठवाड्यातील काही भागात गारपीट झाली. खालच्या सभागृहात या विषयावर चर्चा झाली व माननीय मदतकार्ये व पुनर्वसन मंत्री महोदयांनी त्या चर्चेला उत्तर दिले आहे. मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विश्वास देतो की, यापूर्वी अतिवृष्टी झाली होती, त्यावेळी 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज सरकारने दिले होते, त्यापूर्वी दुष्काळ पडला होता, त्यावेळी 2500 ते 3000 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. आता गारपीट झालेली आहे. त्यामध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतकार्ये व पुनर्वसन विभागाच्या, कृषी विभागाच्या नियमानुसार निश्चितपणे मदत केली जाईल.

सभापती महोदय, राज्यात लोडशेडिंग होत आहे, आम्ही जी घोषणा केली आहे, त्यापासून दूर जात आहोत, अशा प्रकारचा आरोप काही सन्माननीय सदस्यांनी केला आहे. मला आपल्या माध्यमातून त्यांना सांगावयाचे आहे की, त्यांनी जरा इतिहासाची पाने उलटवून पहावीत. या राज्यात काही वर्षांपूर्वी 16 ते 17 तासांचे लोडशेडिंग होते. आपल्या राज्याला आवश्यक असणारी वीज आणि निर्मित वीज यामध्ये तफावत होती. याच मंडळींनी एनरॉन प्रकल्प समुद्रात बुडविण्याचे काम केले. आम्ही सत्तेत आल्यानंतर चंद्रपूर, परळी, पारस, कोराडी, खापरखेडा, भुसावळ, एकलहरा येथील वीज केंद्रांच्या क्षमतेमध्ये वाढ केली. विंड मिल सारख्या नवीन योजना आणल्या आणि कोयना धरणात लेक टॅपिंगचा अभिनव प्रयोग करुन वीज निर्मिती करण्याचा, क्षमता वाढ करण्याचा प्रयत्न केला. ही क्षमता वाढ केल्यामुळे आज 15 हजार मे.वॅ.एवढी आपली विजेची आवश्यकता आहे व तेवढीच वीज आज राज्यात उपलब्ध आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

सभापती महोदय, आजही लोडशेडिंग का केले जात आहे, अशा प्रकारचा प्रश्नही उपस्थित केला जातो. हे लोडशेडिंग शिस्त लावण्यासाठी केले जात आहे. ज्या भागातील लोक वेळवर बिलाचा भरणा करतील त्या भागामध्ये लोडशेडिंग केले जाणार नाही. त्यासाठी आपण अ, ब, क, ड अशी वर्गवारी केली आहे. या वर्गवारीतील भागामध्ये लोडशेडिंग केले जात नाही. परंतु, इ, एफ, जी, जी-1, जी-2 व जी-3 या भागामध्ये लोडशेडिंग केले जाते. विजेची निर्मिती करीत असताना कोळसा रोख स्वरुपात पैसे अदा करुन आणावा लागतो. यंत्रसामुग्री, ल्युब्रिकंटस् देखील रोख पैसे देऊन आणावे लागतात. कर्मचाऱ्यांचे वेतन रोख स्वरुपात द्यावे लागते. त्यानंतर आपण जी वीज पुरवितो, त्याची बिले दोन ते तीन महिन्यानंतर आपल्याला प्राप्त होतात. आज आपण शेतकऱ्यांना 85 पैसे प्रती युनिट या दराने वीज उपलब्ध करुन देत आहोत. क्रॉप सबसिडी देणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे आपले राज्य आहे. आज देशात जवळपास 10 हजार कोटी रुपयांची सबसिडी देणारे हे राज्य आहे. आज शेतकऱ्यांना दिवसा 8 तास आणि हप्त्यातून दोन दिवस 10 तास वीज दिली जात आहे.

सभापती महोदय, ट्रान्सफॉर्मरबाबत काही तक्रारी आलेल्या आहेत. मी त्याबाबतची माहिती काढली आहे. हे खरे आहे की, पहिला ट्रान्सफॉर्मर जळाला. त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्याचवेळी दुसरा ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड झाला होता व तिसरा ट्रान्सफॉर्मर सुरु आहे, अशी माहिती मला मिळाली आहे.

सभापती महोदय, मला अनेक विषयावर या ठिकाणी बोलावयाचे होते. सन्माननीय सदस्यांनी एक-दोन प्रश्नांच्या बाबतीत घोषणा केली नाही, असा मुद्दा उपस्थित केला होता. एखाद्या कामाच्या संदर्भात अपेक्षा होती, ती घोषणा करावयास पाहिजे होती, असे मत व्यक्त केले आहे. एखादी घोषणा केली तर कशासाठी घोषणा केली, तुमच्याकडे पैसे नाहीत, असा आरोप केला जातो. एखाद्या वेळी, एखाद्या तांत्रिक अडचणीमुळे काम राहून गेले असेल तर घोषणा केली नाही, करावयास हवी होती, असे सांगितले जाते. एक संदिग्ध वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांकडून केला जात आहे.

...3....



SRR/ KTG/ D/ प्रथम श्री.मंगेश कांबळे........ 19:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

सभापती महोदय, हे वर्ष निवडणुकीचे वर्ष आहे. निवडणुकीच्या वर्षाला सामोरे जात असताना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या आघाडी सरकारने चांगले नियोजन केले, चांगली कामे केली, पायाभूत योजना आणल्या, कृषीमध्ये, वीज निर्मितीमध्ये प्रगती केली, वीज निर्मिती क्षमता वाढविली, चांगल्या योजना आणल्या, राजीव गांधी जीवनदायी योजनेसारखी सामाजिक उत्तरदायित्त्वाची योजना आणली आहे. चांगले काम केल्यामुळे हे राज्य आघाडीवर आहे. या अंतरिम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून एक नवीन मेसेज राज्यातील सर्व जनतेला देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. जून महिन्यामध्ये संपूर्ण अर्थसंकल्प मांडला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक सूचना केल्या आहेत. निश्चितपणे लिखित स्वरुपात त्यांना उत्तर दिले जाईल, असा विश्वास मी या निमित्ताने देतो आणि माझ्या शब्दांना विराम देतो.

**तालिका सभापती** : सन 2014-2015 च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन शुक्रवार, दिनांक 28 फेब्रुवारी, 2014 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 58 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 28 फेब्रुवारी, 2014 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही